# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

# भारतीय इतिहासातील स्त्रिया
## (Women in Indian History)

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून

**एम. ए. भाग-२ : सत्र-४**
**इतिहास**
Major Mandatory : MM 2

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२५
एम. ए. भाग - २ करिता (भारतीय इतिहासातील स्त्रिया)
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १,०००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-48427-31-1

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. के. बी पाटील** (सदस्य सचिव)
प्र. संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ अभ्यासमंडळ : इतिहास ■

अध्यक्ष - **डॉ. चंद्रवदन मोहनराव नाईक**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर

- **डॉ. अवनिश आर. पाटील**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. अभयकुमार जगन्नाथ पाटील**
  सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड,
  ता. कराड, जि. सातारा
- **डॉ. श्रीमती आरती बळवंत नाडगौडा**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती कविता अशोक गगराणी**
  द न्यू कॉलेज, कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती उर्मिला एन. क्षिरसागर**
  मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली
- **डॉ. जयपाल चंद्रकांत सावंत**
  शंकरराव जगताप आर्टस कॉलेज, वाघोली, ता. सातारा
- **डॉ. संभाजी आनंदा मोरे**
  एम. एच. शिंदे महाविद्यालय, तिसंगी, ता. गगनबावडा,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. प्रमोदकुमार अंकुश ओलेकर**
  आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा, ता. वाळवा,
  जि. सांगली
- **डॉ. चंद्रकांत संदिपान चव्हाण**
  इतिहास अधिविभाग, वालचंद कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड
  सायन्स, अशोक चौक, सोलापूर
- **डॉ. तेजस मदन घारगे**
  डायरेक्टोरेट ऑफ आर्किओलॉजी ॲण्ड म्युझियम, संत
  गोर्गे फोर्ट, संत गोर्गे हॉस्पिटल प्रिमाईसेस, फोर्ट, मुंबई
- **डॉ. नंदा पारेकर**
  एव्हरग्रीन होम, टॉवर डी, फेज ४, फ्टॅट नं. २०८,
  राजहंस प्रिंटींग प्रेस समोर, प्रभू हॉस्पिटल रोड,
  नागाळापार्क, कोल्हापूर
- **डॉ. निरंजन कुलकर्णी**
  इतिहास अधिविभाग, मा. श्री. आण्णासाहेब डांगे, आर्टस,
  कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, हातकणंगले, जि. कोल्हापूर
- **श्री. सदानंद कदम**
  शिवराज, १०८२, दक्षिण वसंत नगर, छत्रपती शिवाजीराजे
  मार्ग, सांगली.

# प्रस्तावना

शैक्षणिक वर्ष २००७ पासून शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या वतीने दूरशिक्षण केंद्रामार्फत बहिःस्थ विद्यार्थ्यांना दूरशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तसेच यंदाच्या वर्षापासून म्हणजे २०२४-२५ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारीत अभ्यासक्रम राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने, एम. ए. भाग-२ इतिहास या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी "**भारतीय इतिहासातील स्त्रिया**" या विषयाचे स्वयं अध्ययनासाठी हे पुस्तक सन २०२४-२५ या वर्षात तयार केले. सदर पुस्तकाच्या लेखनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पदव्युत्तर विभागात अध्ययन करणाऱ्या अनुभवी व तज्ज्ञ लेखकांकडून या विषयाच्या अभ्यासक्रमानुसार असलेल्या विविध घटकांचे लेखन करून घेण्यात आले आहे. या पुस्तकातील विविध घटक लिहिताना साधी व सोपी भाषा, संकल्पनात्मक स्पष्टता, विषयाच्या आकलनासाठी तक्ते इत्यादींचा वापर केलेला आहे. वाचक व विद्यार्थ्यांना समजेल अशी विषयाची सोपी व सुटसुटीत मांडणी करण्यात आलेली आहे. प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयं अध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे दिलेली आहेत. तसेच घटकाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द, शब्दार्थ व अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची सूची दिलेली आहे.

**भारतीय इतिहासातील स्त्रिया** या स्वयं अध्ययन साहित्यामध्ये स्त्रियांच्या इतिहासाचे लेखन, स्त्रियांच्या इतिहास लेखनातील प्रवाह, भारतीय स्त्रियांचा रुढीगत व वैधानिक दर्जा, विविध चळवळीतील स्त्रियांची भूमिका इ. घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यामध्ये काही उणिवा असल्यास वाचक व विद्यार्थ्यांनी त्या आमच्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी निश्चितपणे होईल. हे पुस्तक पदवी, पदव्युत्तर व विविध स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल असा आम्हाला विश्वास आहे.

शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण अंतर्गत स्वयं अध्ययन साहित्य निर्मितीसाठी मा. कुलगुरू यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन मोलाचे ठरले. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक, समन्वयक, इतिहास अभ्यास मंडळ अध्यक्ष आणि शिवाजी विद्यापीठ इतिहास विभागप्रमुख डॉ. अवनिश पाटील यांचे सहकार्य लाभले. सदर पुस्तक पूर्ण करण्यासाठी घटक लेखकांनी तसेच पुस्तक प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, दूरशिक्षण विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. या सर्वांच्या मार्गदर्शनाबद्दल व सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार!

■ **संपादक** ■

**डॉ. संघमित्रा सरवदे**

मा. श्री आण्णासाहेब डांगे आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज,

हातकणंगले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **डॉ. संघमित्रा सरवदे**<br>श्री आण्णासाहेब डांगे आर्टस, कॉमर्स, ॲण्ड सायन्स कॉलेज,<br>हातकणंगले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | १, २, ३ |
| **डॉ. सुप्रिया खोले**<br>राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कदमवाडी रोड, कोल्हापूर<br>जि. कोल्हापूर | ४ |

■ **संपादक** ■

**डॉ. संघमित्रा सरवदे**
मा. श्री आण्णासाहेब डांगे आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज,
हातकणंगले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | स्त्रियांच्या इतिहासाचे लेखन | १ |
| २. | स्त्रियांच्या इतिहास लेखनातील प्रवाह | ३९ |
| ३. | भारतीय स्त्रियांचा रुढीगत व वैधानिक दर्जा | ७९ |
| ४. | विविध चळवळीतील स्त्रियांची भूमिका | १२२ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

---

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२४-२५ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

## घटक १
# स्त्रियांच्या इतिहासाचे लेखन

**अनुक्रमणिका**


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

    १.२.१ स्त्रियांच्या इतिहास लेखनाचे महत्त्व

    १.२.२ इतिहासातील दृश्यमान स्त्रिया

    १.२.३ साधने आणि स्त्रियांचा इतिहास लिहिण्याच्या पद्धती

१.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ आधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## १.० उद्दिष्टे

१) मुळ प्रवाही इतिहास लेखनामध्ये स्त्रियांसंबंधीच्या लेखनाचा चिकित्सा करता येईल.

२) इतिहासातील स्त्रियांच्या दृश्यमानते संबंधी मिमांसा करता येईल.

३) स्त्रियांच्या इतिहास लेखनाच्या महत्त्वासंबंधी विवेचन करता येईल.

४) इतिहासाच्या अभ्यासातील लैंगिक दृष्टिकोनाची ओळख होईल.

५) स्त्रियांच्या इतिहासाच्या साधनांची ओळख होईल.

६) स्त्रियांच्या इतिहास लेखन करण्याच्या पद्धतीचे वेगळेपण लक्षात येईल.

## १.१ प्रास्ताविक

स्त्रीवादी इतिहासाची स्वतंत्र शाखा विकसित होत आहे. स्त्रियांचा इतिहास या शाखेने इतिहासाला प्रभावित केले आहे. इतिहासातील स्त्रियांचे स्थान शोधण्याचा प्रयत्न या शाखेमार्फत केला जातो. समाजातील त्याच्या दुय्यम स्थानाविषयी चिकित्सा केली जाते. ही शाखा केवळ स्त्रियांच्या दुय्यम स्थानाची चिकित्सा करून थांबत नाही तर त्यांच्या उत्थानासाठी इतिहासात घडून गेलेल्या स्त्रियांचा इतिहास स्त्रियांच्या प्रगतीस कसा प्रेरणादायी होईल, यांची मांडणीही करते. तसेच, ही शाखा समाज निर्मितीमध्ये स्त्रियांची भूमिका

शोधण्याचा प्रयत्न करते. स्त्रियांचा इतिहास म्हणजे स्त्रियांनी इतिहासात त्यांच्या दुय्यम स्थानाविरूद्ध दिलेला लढा असे आपणाला म्हणता येईल. त्यांना मिळालेल्या संधीचा उपयोग करून स्वतःचे व समाजाचे जीवन उजळून टाकले. त्यांच्या या संघर्षाचा इतिहास आपणांस मांडावा लागतो. हा इतिहास मांडताना तिच्या संघर्षाचा स्त्रीवादी दृष्टिकोनातून अभ्यास करून इतिहासाचे पुनर्लेखन होणे गरजेचे आहे. भारतात वासाहतिक काळापासून इतिहास लेखन शास्त्रीय पद्धतीने होऊ लागले.

स्त्रियांच्या इतिहास लेखनाचा विकासाचा अभ्यास करताना स्त्रियांच्या इतिहास लेखनाच्या प्रक्रियेचे तीन टप्पे करावे लागतात. जॉन स्कॉट यांच्या मते, स्त्रियांच्या इतिहासाचा अभ्यास तीन पद्धतीने करता येऊ शकतो.

**१. समावेशनाचा इतिहास :** या टप्प्यात कर्तृत्ववान स्त्रियांचा इतिहासामध्ये समावेश करण्यात आला. स्त्री योद्धा व कवयित्री यांवर प्रकाश टाकत, स्त्रियांना अवकाश मिळाल्यास त्याही पुरुषांप्रमाणे कृती करू शकतात हे सिद्ध करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

**२. योगदानाचा इतिहास :** या पद्धतीमध्ये अशी मांडणी करण्यात आली आहे की, स्त्रिया या केवळ इतिहासामध्ये उपस्थित नव्हत्या तर इतिहास निर्माण करणाऱ्या होत्या जसे की, क्रांतिकारी व राष्ट्रवादी चळवळीतील स्त्रियांचे योगदान.

**३. दडपणूकीचा इतिहास :** यामध्ये दडपणुकीतूनच आदर्श स्त्रीची प्रतिमा उभी केली जाते. स्त्रिया हा इतिहासातील विश्लेषणाचा स्वतंत्र कोटीक्रम म्हणून ओळखला जाऊ लागला. या टप्प्यावर लिंग-भावाची जाणीव निर्माण झाली. स्त्री म्हणून तिची जडण-घडण कशी होते, हे समजावून घ्यावे लागणार आहे. तिची ही जडण-घडण कळल्याशिवाय पुरूषसत्ताक व्यवस्था जीवनाच्या सर्व क्षेत्रात कशी कार्यरत आहे, हे समजणार नाही.

## १.२ विषय विवेचन

### भारतीय स्त्रियांच्या इतिहास लेखनाची परंपरा

भारतामध्ये शास्त्रशुद्ध इतिहास लेखनाची परंपरा १८ व्या शतकात इंग्रजांच्या काळात सुरू झाली. अनेक इंग्रज अधिकाऱ्यांनी भारतीय समाजातील चालिरीती, परंपरा, धर्म संस्कृती जाणून घेण्यासाठी भारताचा इतिहास लिहिण्याचे प्रकल्प हाती घेतले.

### स्वातंत्र्यपूर्व काळ

स्वातंत्र्यपूर्व काळात वसाहतवादी इतिहासकारांनी ब्रिटिशांच्या वसाहतवादी, साम्राज्यवादी धोरणाला नैतिक अधिष्ठान देण्याचा प्रयत्न केला. या वसाहतवादी इतिहासकारांनी भारतातील स्त्रियांचे दयनीय स्थान अधोरेखित केले. त्यांनी भारतीय स्त्रियांच्या दयनीय स्थितीची तुलना तत्कालीन ब्रिटीश स्त्रियांच्या उच्च सामाजिक दर्जाशी करण्यात आली.

या साम्राज्यवादी इतिहास लेखनाला प्रत्युत्तर देत राष्ट्रवादी इतिहास लेखकांनी आर्य स्त्रीची प्रतिमा पुढे करून प्राचीन हिंदू संस्कृतीत स्त्रियांचा उच्च दर्जा होता हे सिद्ध केले. पण जातीत विभागलेल्या सामान्य स्त्रियांविषयी मौन राखले. आळतेकरांच्या लिखाणात स्त्रियांच्या कुटुंबातील स्थानाला महत्त्व देण्यात आले. वैदिक कालातील स्त्रियांच्या सुवर्णयुगाचे वर्णन ते भरभरून करतात आणि या सुवर्ण युगाचा अंत आर्य पुरूष व अनार्य स्त्रिया एकत्र आल्याने या युगाचा अंत झाला असा दावा करतात. थोडक्यात, हिंदू ब्राम्हणी मध्यमवर्गीय संस्कृती म्हणजे भारतीय संस्कृती असे समीकरण मांडण्यात आले. या संदर्भात उमा चक्रवर्ती Whatever happened to the Vedic Dasi या निबंधात लिहितात, 'पौर्वात्यवादी व राष्ट्रवादी इतिहास लेखक आर्य स्त्रीच्या प्रतिभेला उंचावून वैदिक दासीला इतिहास लेखनातून पुसून टाकतात'.

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील इतिहास लेखनातही स्त्रियांच्या इतिहास लेखनाला दुर्लक्षित करण्यात आले. सन १९५० ते ६० च्या दशकामध्ये डाव्या विचारसरणीच्या इतिहासकारांनी इतिहास मांडताना भौतिकवादी विश्लेषण पद्धतीचा वापर करण्यात आला. पण या प्रकारच्या इतिहास लेखनामध्ये राजकीय व आर्थिक प्रश्नांवर भर दिला गेला. या प्रकारच्या इतिहास लेखनाच्या सैद्धांतिक चौकटीत लिंग-भावा संदर्भात मांडणी होणे स्वाभाविक होते. पण कोसंबी व रोमिला थापर यांच्या लेखनातही ही चौकट दिसत नाही. या प्रकारात जाती व्यवस्था व पुरूषप्रधान व्यवस्थेच्या भौतिक पायाकडे दुर्लक्ष झाले असे म्हणावे लागेल.

'रिकास्टिंग विमेन: एसेस इन कोलोनियल हिस्ट्री' या कुमकुम संगारी आणि सुदेश वैद यांनी संपादित केलेल्या ग्रंथात पार्थ चटर्जी यांनी राष्ट्रवाद व लिंग-भावाची जडण-घडण यांवर प्रकाश टाकला. एकोणिसाव्या शतकाच्या केंद्रस्थानी असलेला स्त्री-प्रश्न विसाव्या शतकाच्या सुरुवातीला मागे पडला. त्यांच्या मते, राष्ट्रवादाच्या मांडणीमध्ये भारतीय समाज सांस्कृतिक व भौतिक क्षेत्रामध्ये विभागला गेला. भौतिक क्षेत्रामध्ये वसाहतवाद्यांचे आधुनिकीकरण स्वीकारले पण सांस्कृतिक क्षेत्रात मात्र आपली संस्कृती राखावी असा आग्रह राष्ट्रवाद्यांनी धरला. त्यामुळे नव-भारतातील स्त्रियांच्या प्रतिभेची जडण-घडण सांस्कृतिक चौकटीतच झाली. या चौकटीत दलित कष्टकरी वर्गातील स्त्रियांपेक्षा तिचे वेगळेपण अधोरेखित करण्यात आले. या स्त्रियांचे प्रश्न घराअंतर्गत बनले. अशा प्रकारे राष्ट्रवाद्यांनी पुरूषप्रधानता स्वाभाविकपणे पुन: प्रस्थापित केली. थोडक्यात, लिंग-भावाच्या जडण-घडणीचा इतिहास मांडताना राष्ट्रवादी इतिहासकारांनी पुरूषप्रधान व्यवस्थेतील प्रक्रियांचे आधुनिकीकरण केले असे विश्लेषण करावे लागेल.

सबाल्टर्न इतिहास प्रवाहात खरे तर वंचित म्हणून स्त्रियांच्या स्थानाबद्दल भाष्य करावयाला पाहिजे होते. पण सबाल्टर्नच्या पाचव्या खंडापर्यंत सर्व इतिहासकार पुरूषच आहेत. ते स्त्रियांच्या वंचित स्थानाबद्दल भाष्य करत नाहीत. एकंदरीत सबाल्टर्न इतिहास प्रवाहात म्हणावे तसे लिंग-भावाच्या प्रश्नांवर प्रकाश टाकला नाही.

सन १९८५ नंतर व मुख्यत: १९९० नंतरच इतिहास लेखनामध्ये विश्लेषणात्मक पातळीवर मोठा बदल झाल्याचे आढळते. हा बदल म्हणजे विश्लेषणाचा विषय स्त्री न राहता लिंग-भाव ही संकल्पना पुढे आली.

या दशकात जागतिक पातळीवर काळ्या व तिसऱ्या जगातील स्त्रियांनी प्रमुख प्रवाही असलेल्या स्त्रीवादावर टीका केली व स्त्रिया- स्त्रियांमधील वर्ग, वर्ण, राष्ट्र यावरून भेद केला जातो यावर लक्ष केंद्रित केले गेले.

भारतात रूपकुंवर व शहाबानो प्रकरणानंतर व त्याचप्रमाणे नवहिंदुत्त्ववादामध्ये स्त्रियांचा सहभाग वाढल्यानंतर स्त्रीवादाच्या भगिनीभावाच्या संकल्पनेला धक्का बसला. आणि याच पार्श्वभूमीवर स्त्रीवादी इतिहास लेखनशास्त्र लिंग-भाव या कोटीक्रमाकडे वळल्याचे दिसते. पुरूषप्रधानता ही एकसंघ नसून एकाच वेळी अनेक वर्ग, धर्म, जातीधिष्ठित पुरूषप्रधानता कार्यरत असते, असे प्रतिपादन करण्यात आले. तसेच, पुरूषप्रधान व्यवस्था व राजकारण, अर्थकारण, कायदा व संस्कृती यांच्या परस्पर जडण-घडणीवर प्रकाश टाकला गेला.

एकंदरीत इतिहासाच्या विविध प्रवाहांमध्ये स्त्रियांकडे कोणत्या दृष्टिकोनातून पाहिले गेले, हे आपल्या लक्षात आले. संयुक्त राष्ट्राच्या प्रयत्नातून १९७५ हे महिला वर्ष व १९७५ ते १९८५ हे महिला दशक साजरे केले गेले आणि जगभरातून स्त्रियांच्या स्थानाची चिकित्सा केले जाऊ लागली व स्त्रियांसंबंधित अभ्यास होऊ लागला. तसेच, त्यांची स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न केले जाऊ लागले.

**स्त्री अभ्यासास प्रारंभ व विकास**

स्त्री अभ्यासाची सुरुवात अमेरिकेत झाली तेथून ती संपूर्ण जगभर पसरली. एकोणिसाव्या शतकापासूनच मतदानाच्या हक्कासाठी इंग्लंड व अमेरिकेतील स्त्रियांनी चळवळी सुरू केल्या. पाश्चात्य देशातील स्त्रीवादी चळवळीची वाटचाल तीन टप्प्यांमध्ये सांगता येते. पहिला टप्पा १९२० पर्यंतचा कालखंड होय! या काळात स्त्रियांनी मतदानाच्या हक्कासाठी चळवळी केल्या. १९२० ते १९६० चळवळीचा दुसरा टप्पा सांगता येतो. या काळात स्त्री-चळवळीची पीछेहाट झाली. या काळात सर्व जग युद्धोत्तर पुनर्रचनेत गुंतले होते. १९६० नंतर तिसरा टप्पा सांगता येतो. या कालखंडात स्त्रीवादी चळवळीने गती पकडलेली दिसून येते. १९६० नंतर अमेरिकेत युद्ध विरोधी चळवळी, विद्यार्थी चळवळी, निग्रो गुलामांच्या चळवळी यांच्या प्रभाव वाढला. बेटी फिडन, टी. जर्मन गिअर, केट मिलेट. फायरस्टोन या स्त्रीवादी लेखिकेच्या लेखनाला महत्त्व प्राप्त झाले. यांच्या लिखाणामुळे स्त्रियांनी गृहिणीची प्रतिमा नाकारून त्यांनी त्यांच्या आवडीचे क्षेत्र निवडण्यासाठी बाहेर पडावे, असे विचार वाढू लागले. पितृसत्ताक व्यवस्था स्त्रियांचे शोषण कसे करते याबद्दल जाणीव निर्माण होऊ लागली.

स्त्रीवादाचे विचार हळूहळू भारतासारख्या विकसनशील देशातही येऊन पोहचले. भारतातील सुशिक्षित व विचारवंतानी आपली मते मांडण्यास सुरुवात केली. भारतात स्वातंत्र्यानंतर १९५० साली भारतीय संविधान अंमलात आले. संविधानाने सर्व क्षेत्रात स्त्रियांना समान संधी दिली. या संधीचा फायदा महिलांना होईल, अशी आशा होती, पण तसे झाले नाही. भारतातील महिलांच्या स्थितीचा व दर्जाचा अभ्यास करण्यासाठी १९७१ मध्ये श्रीमती फुलरेणु गुहा यांच्या अध्यक्षतेखाली एका समिती नेमण्यात आली. या समितीने 'समानतेच्या दिशेने' (Towards Equality) हा अहवाल सादर केला. यामधून स्त्रियांच्या स्थितीबद्दल धक्कादायक माहिती पुढे आली. आरोग्य, शिक्षण, रोजगार राजकीय सहभाग यामध्ये स्त्रियांची पीछेहाट

दिसून आली. १९५० ते १९७५ या कालखंडातील बरेच स्त्री विषय अभ्यास अभिजन वर्गापुरते मर्यादित होते. सातव्या पंचवार्षिक योजनेपासून ९ व्या पंचवार्षिक योजनेपर्यंत अनेक सरकारी मान्यताप्राप्त स्त्री अभ्यास केंद्राची स्थापना झाली. त्यानंतर भारतातील प्रमुख संशोधन संस्था आय.सी.एस.एस.आर. (Indian council of Scientific and Social Research) या संस्थेने निर्धन स्त्रियांच्या सामाजिक दर्जाविषयी अभ्यासाला चालना दिली. १९७३ मध्ये मुंबईत एस.एन.डी.टी. या महिला विद्यापीठात पहिल्या स्त्री-अभ्यास केंद्राची स्थापना झाली.

१९७९ मध्ये मथुरा बलात्कार प्रकरण घडले. पोलीस ठाण्यातच आदिवासी स्त्रीवर बलात्कार झाल्याचे सत्य बाहेर आले आणि महिलांच्या सामाजिक सुरक्षेचा प्रश्न पुढे आला. यानंतर मात्र स्त्रियांचे स्वतंत्र गट संघटित होऊन स्त्रियांच्या वेगवेगळ्या प्रश्नांवर चळवळी करू लागले. प्रामुख्याने हुंडाबळी, कौटुंबिक अत्याचार, स्त्री आरोग्य, प्रसारमाध्यमातील स्त्री देहाचे विकृत प्रदर्शन या विरूद्ध विविध महिला संघटनांनी आवाज उठवला. त्यांनी अन्यायाविरूद्ध मोर्चे, धरणे, जाणीवा व जागृतीचा कार्यक्रम हाती घेतला. याची दखल सरकारने घेतली व स्त्रियांविषयीचे कायदे मंजूर केले. स्त्रीविषयक आंदोलने व स्त्री अभ्यास एकाच वेळी सुरू झाला. त्यामुळे स्त्रियांवरील अन्याय व अत्याचाराच्या व्यापकतेची जाणीव होऊ लागली. यातूनच स्त्रियांच्या या दुर्दशेबद्दलचे तात्त्विक व सैद्धांतिक विश्लेषण करणे सुरू झाले. याचाच परिणाम म्हणून अनेक विद्याशाखेतील तज्ञ विचारवंत एकत्र येऊ लागले. मुंबईत महिला अध्ययन विषयक राष्ट्रीय संमेलनाचे आयोजन एप्रिल १९८१ मध्ये केले व त्यामध्ये 'अखिल भारतीय स्त्री परिषद' (All Indian Women's Studies Association) ची स्थापना झाली. अशाच संघटना अनेक राज्यातून स्थापन झाल्या. विद्यापीठ अनुदान आयोगाने (U.G.C) काही विद्यापीठातून स्त्री अभ्यास केंद्राची स्थापना करण्यासाठी अनुदाने देऊ केली. पुण्यात 'आलोचना', 'दृष्टी' तर मुंबईत 'अक्षरा' सारखी स्वायत्त स्त्री अभ्यास केंद्रे व माहिती संगणक केंद्रे कार्यरत झाली.

थोडक्यात, या सर्व प्रयत्नांमुळे स्त्री अभ्यासास गती मिळाली व स्त्री प्रश्नांच्या मुळापर्यंत जाऊन ती मिटवण्याची उत्तरे कायद्या मार्फत व प्रबोधना मार्फत सोडवली जाऊ लागली. स्त्री-अभ्यासास समाजशास्त्र, राज्यशास्र, अर्थशास्त्र, पर्यावरण शास्त्राबरोबरच इतिहासातही स्त्री अभ्यासाला गती मिळाली. इतिहासाने भूतकाळातील स्त्रियांच्या स्थितीचा अभ्यास करून स्त्रियांना आजपर्यंत मिळालेल्या विषम वागणुकीबद्दल वाचा फोडली. स्त्रियांचा अभ्यास करताना अभ्यासकांना लक्षात आले की, स्त्रिया इतिहासातून अदृश्य राहिल्या आहेत याची कारण मिमांसा सुरू झाली व स्त्रीवादी इतिहास लेखनाच्या प्रवासाला सुरुवात झाली. या स्त्रियांच्या इतिहास लेखन प्रवाहाने स्त्रियांच्या प्रश्नांची चर्चा सुरू झाली. तिच्या सबलीकरणावर बोलले, लिहिले जाऊ लागले. एकंदरीत तिचा माणूस बनण्याचा प्रवास सुरू झाला, असे म्हणावे लागते. म्हणूनच स्त्रियांच्या इतिहासाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

### १.२.२ स्त्रियांच्या इतिहास लेखनाचे महत्त्व

आजवरचा इतिहास हा पुरुषकेंद्री आहे. History या शब्दातच His Story म्हणजे त्याचा/पुरुषांचा इतिहास हा अर्थ प्राधान्याने येतो. इतिहासाने Her म्हणजे तिची उपेक्षा केली आहे. मानवी इतिहासाच्या जडण-घडणीत पुरुषांपेक्षा स्त्रियांना दुय्यमत्व का आणि कसे आले याचे विश्लेषण, स्पष्टीकरण व ते नष्ट करण्यासाठी अवलंबावयाचे मार्ग, आव्हाने व चळवळी यांची मांडणी व अभ्यास स्त्रियांच्या इतिहास लेखनामध्ये केला जातो. तेव्हा या इतिहासाचे महत्त्व आपण लक्षात घेऊन एकंदरीत, सर्व प्रकारच्या इतिहास लेखनामध्ये स्त्रीवादी दृष्टिकोन वापरून त्याचे पुनर्लेखन झाले पाहिजे. तरच मानवजातीचा समग्र इतिहास लिहिला जाऊ शकतो.

**१) स्त्रियांसंबंधीचे शतकानुशतके दडले गेलेले प्रश्न ऐरणीवर येऊ लागले**

स्त्रीवादी इतिहास लेखन हा सवतासुभा नाही तर इतिहासाच्या मुख्य प्रवाहामध्ये स्त्रिया अदृश्य राहिल्या आहेत, त्यांना या प्रवाहात आणणे व एक व्यक्ती म्हणून त्यांच्या स्थानाची चिकित्सा करणे आवश्यक आहे. हे कार्य स्त्रीवादी इतिहास लेखनाच्या माध्यमातून केले जात आहे. या स्त्रीवादी इतिहास लेखनाच्या माध्यमातून स्त्रियांसंबंधीचे शतकानुशतके दडले गेलेले प्रश्न ऐरणीवर येऊ लागले व स्त्रियांच्या विषम वागणुकीबद्दल वाचा फोडली.

**२) स्त्रिया संबंधीच्या आकलनामध्ये भर पडली**

समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, पर्यावरणशास्त्र इ. अनेक विषयाबरोबरच इतिहास विषयाच्या अभ्यासामुळे स्त्रियांसंबंधीच्या आकलनामध्ये भर पडत आहे. या मुळे स्त्रियांसंबंधीचा पारंपारिक दृष्टिकोन बदलण्यास मदत होणार आहे. भारतात ठिकठिकाणी उत्खनने झाली, त्यातून पुरातत्त्व अवशेषावरून स्त्रियांसंबंधीचे आकलने बदलली. डॉ. इरावती कर्वे, डॉ. दा. ध. कोसंबी, डॉ. शरद पाटील, पुरातत्त्वज्ञ डॉ. ह. दी. सांकलिया यांच्या संशोधनाने आर्यांच्या आगमनापूर्वी भारतात मातृसत्ताक व्यवस्था प्रचलित होती, हे सिद्ध केले. प्राचीन आदिम समाजात स्त्रिया पुरूषांच्या वर्चस्वाखाली नव्हत्या. त्या उत्पादन कार्यात महत्त्वाची भूमिका बजावत होत्या. या प्राचीन समूहांमध्ये स्त्रिया काठीच्या सहाय्याने शेती करत होत्या. भांडी बनविणे, बुरूड कामही त्या करत होत्या, धार्मिक कार्याचे पौरोहित्य देखील त्या करत होत्या. स्त्रियांच्या जनन क्षमते बद्दल या समूहांमध्ये मोठा आदर होता. रा. ची. ढ़ेरे यांनी 'लज्जागौरी' हा ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथात त्यांनी भारतातील मातृदेवतांच्या मूर्तींचा अभ्यास करून विश्व सर्जनाची देवता म्हणून वेद पूर्व काळापासून भारतात मातृ देवतांची उपासना अस्तित्वात होती, हे महत्त्व पूर्ण संशोधन केले.

**३) स्त्रीवादी इतिहास लेखनामुळे इतिहासाकडे पाहण्याची नवी दृष्टी**

स्त्रीवादी दृष्टिकोनातून इतिहासाचा अन्वयार्थ काढला तर भूतकाळाचे वेगळे आकलन होईल. ज्ञान हे वस्तुनिष्ठ असते हे प्रमेय स्त्रीवादी इतिहासकारांनी नाकारले. संशोधकाच्या सामाजिक स्थानानुसार वास्तवाचे आकलन बदलते, असे त्यांनी सिद्ध केले. यालाच 'भूमिदृष्टी' सिद्धांत म्हटले जाते. थोडक्यात, समग्र

वास्तवाच्या आकलनासाठी विविध सामाजिक स्थानावरून झालेले आकलन लक्षात घेतले पाहिजे, अशी भूमिका स्त्रीवादी विचारवंत घेतात आणि स्त्रियांचा इतिहास लिहिताना स्त्रियांचे अनुभव केंद्रस्थानी असले पाहिजेत असा आग्रह धरतात. या पद्धतीने केलेले संशोधन आपणास भारतीय इतिहासासंबंधी नवी दृष्टी देणारे ठरणार आहे.

पुरूषसत्ताक व्यवस्थेला पोषक असलेली लिंग-भाव जडण-घडणीची प्रक्रिया अव्याहतपणे सुरू असते, हे भारताच्या सांस्कृतिक इतिहासाच्या स्त्रीवादी अभ्यासातून पुढे आले. लिंग-भावाच्या जडण-घडणीवर मोठ्या प्रमाणात संशोधने झाली. लिंग-भावाचा इतिहास हा शब्द 'लिंग-भाव इतिहास म्हणजे स्त्रियांच्या/स्त्रीत्त्वाच्या जडण-घडणीचा इतिहास' अशा अर्थाने अभ्यास-विश्वात रूढ झाला आहे.' कोणत्याही समाजातील वर्गव्यवस्था, उत्पादन व्यवस्था, पितृसत्ता आणि लिंग-भावनिर्मितीची प्रक्रिया यांच्यातील अंतर-संबंध तपासले पाहिजेत, ही दृष्टी स्त्रीवादी इतिहास लेखनाने दिली.

### ४) स्त्रियांना न्याय देणाऱ्या कायद्याची निर्मिती

या अभ्यासातून स्त्रियांच्या अन्याय व अत्याचाराच्या व्यापकतेची जाणीव होऊ लागली. प्रामुख्याने हुंडा बळी, कौटुंबिक अत्याचार, स्त्री-आरोग्य, प्रसारमाध्यमातील स्त्रीदेहाचे विकृत प्रदर्शन या अन्याया विरूद्ध मोर्चे, धरणे, आंदोलने होऊन जाणीव-जागृती होऊ लागली. सरकारला व समाजाला स्त्रियांच्या प्रश्नांची जाणीव होऊ लागली, त्यातील क्रौर्य कळू लागले. या सर्व प्रकारच्या चळवळीच्या माध्यमातून सरकारवर दबाव निर्माण होऊन स्त्रियांना न्याय देणारी कायदे अधिक कठोर कायदे निर्माण झाले. स्त्रियांच्या चळवळीचा इतिहास लिहिला जाऊ लागला. हा स्त्रियांच्या कर्तेपणाचा इतिहास आहे.

भारतीय संविधानाने स्त्रियांना समानतेचा अधिकार बहाल केला. तरी प्रत्यक्षात मात्र या अधिकाराचा फायदा स्त्रियांना मिळत नव्हता. कारण अजूनही स्त्रिया धर्म व परंपरेच्या ओझ्याखाली जगत होत्या. हुंड्यासाठी स्त्रियांचा छळ केला जायचा, प्रसंगी त्यांना जाळूनही मारले जायचे. या विरोधात स्त्रियांच्या गटाने चळवळी केल्या. हुंडा प्रतिबंध कायदा १९६१ साली मंजूर करण्यात आला. स्त्रियांचे अश्लील प्रदर्शन प्रतिबंध कायदा १९८६, गर्भलिंग चाचणी प्रतिबंध कायदा १९९४ साली, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २६ ऑक्टोबर २००६ पासून लागू केला. अशा विविध प्रकारचे कायदे स्त्रियांच्या चळवळींमुळे अस्तित्वात आले. स्त्रियांच्या चळवळीचा इतिहास चळवळीतील कार्यकर्तीचा इतिहास लिहिला जाऊ लागला. हा स्त्रियांच्या कर्तेपणाचा इतिहास आहे. यातून स्त्रियांमध्ये नवीन विचारांची व आचारांची जाणीव-जागृती होऊ लागली.

### ५) स्त्रीवादी इतिहास लेखन वर्तमान कालीन स्त्रियांची परिस्थिती बदलण्याचे दृष्टीने महत्त्वपूर्ण

विविध विषयाच्या अभ्यासातून स्त्रियांसंबंधी विविध आकलने समोर येत आहेत. याचा उपयोग करून स्त्रियांचे दुय्यमत्व का व कसे निर्माण झाले व ते नष्ट करून स्त्री पुरूष समानता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने स्त्रीवादी इतिहास लेखन उपयोगी होणार आहे. आज स्त्रियांचा दर्जा उंचावण्यासाठी विविध अभ्यास येत आहेत. या अभ्यासाचा उपयोग करून स्त्री-सक्षमीकरणासाठी धोरणात्मक पातळीवर प्रयत्न केले जात आहे.

राष्ट्रीय महिला आयोगाच्या धर्तीवर २५ जानेवारी १९९३ रोजी महाराष्ट्र महिला आयोगाची स्थापना झाली. महिलांसाठी असलेल्या संरक्षणात्मक कायद्याचा भंग झाल्यास, स्त्रीवर अत्याचार झाल्यास अशा महिला राज्य महिला आयोगाकडे दाद मागू शकतात. आयोगाने एक कायदे तज्ञ समिती स्थापन केली आहे. ही समिती हुंडाबळी, बलात्कार, कुटुंब न्यायालयातील खटल्यातील प्रकरणावर सल्ले देते. ही समिती महिलांसाठी तयार करण्यात आलेल्या विविध कायद्यातील तरतुदींचे परीक्षण करते आणि त्यात सोईस्कर बदलही सुचवते. तसेच, स्त्रियांचे हक्क सुरक्षित राहण्यासाठी नवीन कायदे सुचवण्याचे कामही ही समिती करते. थोडक्यात, स्त्रियांचे कायदेशीर हक्क सुरक्षित ठेवण्याचे काम महिला आयोग करतो. कायदेशीर हक्कांबरोबरच शासन महिलांचा दर्जा सुधारण्यासाठी विविध योजनांची अंमलबजावणी करते. स्त्रियांचा दर्जा सुधारण्याच्या कामी स्त्रीवादी इतिहासाचा अभ्यास महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे.

स्त्री-पुरूष समानता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने स्त्रीवादी इतिहास लेखन उपयोगी होणार आहे. इतिहासाचा अभ्यास करताना आपण आजच्या काळातील परिपेक्ष वापरतो. त्यामुळे इतिहासाच्या आकलनात मोठे घोळ निर्माण होतात. इ.स. पूर्व ५००० मध्ये कोरलेल्या भीमबेटका येथील गुहा-चित्रातून शिकार करणाऱ्या स्त्रिया चित्रित केल्या आहेत. आपण मात्र आजच्या परिपेक्षामध्ये त्या काळाच्या स्त्रियांचे चित्र रंगवतो की, स्त्रियांचे कार्य चूल आणि मुल होते.

### ६) स्त्रीवादी इतिहास लेखनाची नवसमाज निर्मितीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका

स्त्रियांच्या दडपणूकीची कारणे समजावून घेताना समाज एका मानवतावादी सामाजिक बदलाच्या दिशेने मार्गक्रमण करीत आहे. हा प्रवास मात्र निरंतर चालू आहे. लिंगभेद स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या जीवनातून हद्दपार झाला पाहिजे. त्यासाठी नव्या मानवतावादी मुल्यावर उभ्या असणाऱ्या समाजाच्या निर्मितीमध्ये स्त्रीवादी इतिहास लेखन उपयोगी होणार आहे.

### ७) स्त्री-पुरुषांना लिंगभेदाच्या चौकटीतून मुक्त करणे

स्त्रीत्व व पुरूषत्व समाजरचित असते. समाजरचित या भूमिकेत स्त्रियांची दडपणूक होते तर पुरुषांना अर्थाजनाचा व सीमेवर लढण्याचा अतिरिक्त भाग सोसावा लागतो. या कामातून पुरुषांची मुक्ती होऊन जीवनाची सर्व क्षेत्रे स्त्री आणि पुरुषांसाठी खुली असणार आहेत. तुमच्या आवडी निवडी व योग्यतेनुसार व्यक्ती म्हणून घडण्याची संधी प्राप्त होऊन स्त्री आणि पुरूष हे दोघेही लिंगभेदाच्या चौकटीतून मुक्त होणार आहेत. यासाठी स्त्रीवादी सिद्धांकन व स्त्रीवादी इतिहासाचे महत्त्व असणार आहे.

### ८) स्त्रीवादी इतिहासामुळे स्त्री-चळवळीची चिकित्सा करणे शक्य

स्त्री-चळवळ व स्त्री अभ्यास ही दोन्ही क्षेत्रे एकाच टप्प्यावर सन १९७४-७५ च्या सुमारास विकसित होण्यास सुरुवात झाली. स्त्रियांच्या चळवळी एकसंघ, एकसाची व एकसूरी नाहीत. स्त्रियांच्या विविध प्रश्नांवर स्त्रियांच्या विविध संघटना झगडत असतात. स्त्री-चळवळीसंबंधी मासिके वर्तमानपत्रे, माध्यमे यातून जे काही स्त्री-चळवळ म्हणून मांडले जाते तसेच, स्त्रियांसंबंधी अनेक घटना आपल्या आजूबाजूला घडत

असतात त्यांच्याकडे चिकित्सकपणे पाहिले पाहिजे. स्त्री अभ्यासकाने या संबंधी चिकित्सक प्रतिसाद देणे गरजेचे आहे. स्त्री-प्रश्नांसंबंधित स्त्रीवादी सिद्धांकनाद्वारे ही चिकित्सा केली जाते. काळाच्या विविध टप्प्यावर निर्माण झालेले स्त्रीवादी सिद्धांकनाचा इतिहास यासाठी उपयोगी ठरतो.

**९) स्त्रीवादी इतिहासातून स्त्री-चळवळीचा इतिहास म्हणजे स्त्रियांच्या कर्तेपणाच्या इतिहासाची मांडणी**

स्त्रियांच्या प्रश्नाला पुरूषसत्ताक समाजामध्ये दुर्लक्ष केले जाते. या संदर्भात डॉ. विद्युत भागवत म्हणतात, ''जर आपण निवड करून स्त्री-चळवळ आणि स्त्री अभ्यास ही क्षत्रे निवडली तर त्यासाठीचे मेहनतीने अभ्यास करणे, काम करणे मग त्याच्यातही अदृश्यता सुद्धा स्वीकार करावी लागते. म्हणजे माझ्या सारखीला लाईम-लाईट कधी मिळाला नाही. आवार्ड कधी मिळाले नाही. पण मग मी असा विचार केला की, मी जे काम करते ते इतके महत्त्वाचे आहे की, आवाज आणि लाईम-लाईट पेक्षा अदृश्य राहून विचार पुढे नेणे माझे काम आहे.'' अशा स्त्रियांचा दर्जा उंचावण्यासाठी कार्य करणाऱ्या समाजाने त्याची दखल घेतलेली नसते. अशा स्त्रियांचा इतिहास लिहिण्याचे कार्य स्त्रीवादी इतिहास लेखनाची शाखा करते स्वतंत्र चळवळीतील स्त्रियांच्या सहभागाचा इतिहास असेल, आंबेडकरी चळवळीतील स्त्रियांचा इतिहास असेल, अशा प्रकारच्या स्त्रियांच्या इतिहासावर प्रकाश टाकण्याचे काम स्त्रीवादी इतिहास लेखन करत आहे.

स्त्रीवादी इतिहास लेखन आपल्या स्त्रियांच्या प्रश्नांवर काम करणाऱ्या अनेक अभ्यास शाखांची मदत घ्यावी लागणार आहे. स्त्रियांच्या इतिहास लेखनातून स्त्रियांच्या कर्तेपणाच्या इतिहास लेखनाबरोबरच त्यांच्या दडपणूकीचा इतिहासही मांडावा लागणार आहे. जेणे करून स्त्रियांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलण्यास मदत होणार आहे. स्त्रियांचा इतिहास हा राष्ट्राच्या जडण-घडणीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावू शकतो.

स्त्रीवादी इतिहास लेखन स्त्रियांच्या प्रश्नांवर काम करणाऱ्या अनेक अभ्यास शाखांच्या मदतीने आकाराला येत आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न १**

**अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा.**

१) मुंबईत महिला अध्ययन विषयक राष्ट्रीय संमेलनाचे आयोजन ........ साली झाले.

अ) १९९१ ब) १९८१ क) १९८० ड) १९८४

२) महिला स्त्री अभ्यास केंद्राची स्थापना सर्वप्रथम ............ विद्यापीठात झाली.

अ) शिवाजी विद्यापीठ ब) अमरावती विद्यापीठ

क) एस.एन.डी. टी. विद्यापीठ ड) सावित्रीबाई फुले विद्यापीठ

३) पुण्यात स्थापन झालेल्या स्वायत्त स्त्री-अभ्यास केंद्राचे नाव ............ आहे.

अ) आलोचना, दृष्टी ब) गांधारी क) माहेर ड) क्षितिज

४) मुंबईत स्थापन झालेल्या साहित्य स्त्री केंद्राचे नाव टिंब ...... आहे.

अ) अक्षरा ब) स्पॅरो क) भारती ड) दृष्टी

५) मथुरा बलात्कार प्रकरण ....... साली झाले.

अ) १९७१ ब) १९८१ क) १९७९ ड) १९८५

६) जॉन स्कॉट यांच्या मते स्त्रियांचा अभ्यास ........ पद्धतीने करता येतो.

अ) समावेशनाचा इतिहास ब) योगदानाचा इतिहास

क) दडपणूकीचा इतिहास ड) वरील सर्व

७) पाश्चात्य देशातील स्त्री-चळवळीच्या वाटचालीचे .......... टप्पे आहेत.

अ) ३ ब) ४ क) २ ड) ५

८) भारतीय महिलांच्या स्थितीचा व दर्जाचा अभ्यास करण्यासाठी सन १९७१ साली नेमलेल्या समितीचे अध्यक्ष ............ या होत्या.

अ) श्रीमती फुलरेणू ब) दुर्गा देशमुख

क) विद्युत भागवत ड) निलम गोऱ्हे

९) श्रीमती फुलरेणु यांनी महिलांसंबंधी दिलेल्या अहवालाचे नाव........... असे होते.

अ) समानतेच्या दिशेने ब) सक्षमीकरणाच्या दिशेने

क) उत्थानाच्या दिशेने ड) या पैकी नाही

१०) महाराष्ट्र महिला आयोगाची स्थापना ............. साली झाली.

अ) १९९३ ब) १९८५ क) १९७५ ड) १९५०

**ब) विधान चूक की बरोबर ओळखा.**

विधान १ लिंग-भावाचा इतिहास म्हणजे स्त्रियांच्या सांस्कृतिक जडण-घडणीचा इतिहास होय!

विधान २ स्त्रीवादी इतिहास म्हणजे केवळ स्त्रियांच्या कर्तेपणाचा इतिहास होय!

अ) पहिले विधान बरोबर दुसरे चूक ब) पहिले विधान चूक दुसरे बरोबर

क) दोन्ही विधाने चूक ड) दोन्ही विधाने बरोबर

विधान १- विविध विषयाच्या अभ्यासातून स्त्रियांचे विविध आकलन पुढे येते आहे.

विधान -२ केवळ इतिहास विषयच स्त्रियांचा अभ्यास करतो.

अ) पहिले विधान बरोबर दुसरे चूक ब) पहिले विधान चूक दुसरे बरोबर

क) दोन्ही विधाने चूक ड) दोन्ही विधाने बरोबर

क) योग्य जोड्या जुळवा.

| | अ | | ब |
|---|---|---|---|
| १ | हुंडा विरोधी कायदा | अ | १९८६ |
| २ | स्त्रियांचे अश्लील प्रदर्शन प्रतिबंध कायदा | ब | १९९४ |
| ३ | गर्भलिंग चाचणी प्रतिबंध कायदा | क | २००६ |
| ४ | कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे रक्षण करणारा कायदा | ड | १९६१ |

अ) १-ड, २-अ, ३-ब, ४-क

ब) १-ब, २-ड, ३-क, ४-अ

क) १-क, २-ड, ३-ब, ४-अ

ड) १-ड, २-ब, ३-अ, ४- क

### १.२.१ इतिहासातील दृश्यमान स्त्रिया

सर्व जगभर स्त्रीविषयक ज्ञान शाखेचा अभ्यास व चर्चा सुरू आहे. स्त्रियांविषयीच्या या अभ्यासाच्या चर्चांमध्ये प्रामुख्याने कन्या, पत्नी, माता, भगिनी, प्रेयसी, इत्यादी भूमिकांतून स्त्रियांचे समाजातील स्थान, समस्या, आरोग्य, शिक्षण, गरजा, आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक, राजकीय क्षेत्रातील समानतेसाठी त्यांनी केलेला संघर्ष या सर्वांचा अंतर्भाव होतो. अर्थात या विषयाचा अभ्यास त्यांनी केलेल्या चळवळीच्या माध्यमातूनही करता येतो. मानवी इतिहासाच्या जडण-घडणीत स्त्रियांना दुय्यम स्थान मिळाले. या स्थानाची, ही आदर्श मुल्ये, प्रमाणके ही पितृसत्ताक होती. ती पुरुषांना अनुकूल होती. तेव्हा इतिहासात स्त्रिया दृश्यमान का झाल्या नाहीत, त्याची शहानिशा करावी लागणार आहे. हे काम मानव्य शाखा करत आहे व सर्व पातळीवर स्त्रियांविषयीचे संशोधन मोठ्या प्रमाणात होत आहे. इतिहास या ज्ञान शाखेलाही या विषयाने प्रभावित केले आहे व त्या संबंधात मोठ्या प्रमाणात संशोधनेही पुढे येत आहेत. यातून स्त्रीवादी इतिहास लेखन परंपरांचा विकास होत आहे.

थोडक्यात, आधुनिक काळात स्त्रियांच्या दुय्यम स्थानाविषयी अभ्यास होऊ लागले. यातूनच लिंग-भावाची ओळख होऊन स्त्रियांना दुय्यमत्व देणाऱ्या, स्त्री-पुरूष असमानता अधोरेखित करणाऱ्या रूढी-परंपरा, संस्कृतीचा अभ्यास होऊन इतिहासातील स्त्रियांचे स्थान शोधनाचा प्रयत्न होऊ लागला. स्त्रीवादी सिद्धांत व संकल्पनेची मदत घेऊन स्त्रीविषयक इतिहासाचे पुनर्लेखन व पुनर्बांधणी करण्याचा प्रयत्न झाला. या प्रयत्नात स्त्रिया इतिहासातून अदृश्य असल्याचे लक्षात आले. भारतीय इतिहासात आणि एकूणच जगाच्या इतिहासातही स्त्रिया अदृश्य राहिल्या आहेत. त्या इतिहासातून अदृश्य का राहिल्या याची कारणमिमांसा करावी लागणार आहे. त्याच्या कारणांचा शोध घेतल्यास खालील कारणे दृष्टीक्षेपात येतात.

जसे इतिहासातून स्त्रिया अदृश्य का आहेत याची कारणमिमांसा केली जाते तसे स्त्रीविषयक अभ्यासातून इतिहासात दृश्यमान स्त्रियांच्या कार्यकर्तृत्त्वाची पुनर्मांडणी स्त्रीवादी सिद्धांकन समोर ठेवून केली जात आहे. इतिहासात त्यांचे स्थान व्यक्ती म्हणून ठळक होत आहे. भारतीय इतिहासात प्राचीन, मध्ययुगीन, व आधुनिक कालखंडातील स्त्रियांविषयीचे संशोधन सुरू झाले आहेत. उदा. कल्हणच्या 'रजतरंगिणी' मधील स्त्रीविषयक दृष्टिकोन, ताराबाई शिंदे यांचे 'स्त्रीपुरूष तुलना', संत कवयित्रींचे लिखाण, लक्ष्मीबाई टिळक यांचे आत्मचरित्र, वेगवेगळ्या प्रांतातील स्त्रियांचा स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग, आंबेडकरी चळवळीत स्त्रियांचा सहभाग असे सहभागाचे इतिहास लिहिले जात आहेत. तर धर्म, तत्त्वज्ञान, साहित्य यामध्ये स्त्रियांना कसे दुय्यमत्व दिले गेले याचा लिंग-भाव तपासून पाहण्याचे काम इतिहास ही ज्ञान शाखा करीत आहे व स्त्रियांच्या इतिहासाकडून स्त्रीवादी इतिहास लेखनाकडे ती सरकत आहे.

**इतिहासातून स्त्रिया दृश्यमान झाल्या नाहीत याची कारणे**

**१) धर्माचा प्रभाव**

भारतातीलच नव्हे तर जगातील स्त्रियांचा दर्जा ठरविण्यात धर्माची अहम भूमिका दिसून येते. धर्माची तत्त्वे, कल्पना, रूढी, परंपरा, आचार-विचार यांचा प्रभावातून स्त्रियांना अंकित करण्याचा धर्माचा प्रयत्न असतो. त्यानुसार त्या-त्या धर्मात रूढी परंपरांचा जन्म होतो. या रूढी परंपराचे वहन हाच स्त्रियांचा धर्म बनतो. तर पुरूषार्थ गाजविणे हा पुरुषांचा धर्म ठरतो. पुरूषार्थ धर्मात मात्र नव-नवे ज्ञानाची क्षेत्र पादाक्रांत करणे, पराक्रम गाजविणे अंतर्भूत असते.

**२) स्त्रियांच्या कामाला उत्पादक मूल्य नाही**

स्त्रियांचा स्वाभाविक कल व आवड पुरूषांच्या क्षेत्रात नसतो म्हणून स्त्रिया इतिहासाच्या पुस्तकातून अदृश्य असतात, असा समज निर्माण केला जातो. पण वस्तूत: ही कर्तृत्व गाजवण्याची सर्व क्षेत्रे धार्मिक कायद्यानुसार पुरूषांच्या मालकीची आहेत. त्याच्याकडे ही मालकी जाण्याचे कारण पितृप्रधान समाजव्यवस्था, हे आहे. म्हणून या व्यवस्थेमध्ये त्यांच्या कार्याला एक मूल्य आहे. स्त्रियांच्या कार्याचे क्षेत्रे वेगळी आहेत. या क्षेत्राला पुरूषप्रधान व्यवस्थेत अजिबात मूल्य नाही. म्हणून स्त्रिया इतिहासातून अदृश्य असण्याचे कारण पितृप्रधान समाज व्यवस्थेत शोधावे लागेल न की त्यांच्या स्वाभाविक कल वा आवड यामध्ये. त्यांना जीवनाच्या सर्व क्षेत्रामध्ये संधी का दिली गेली नाही या प्रश्नाचे उत्तर शोधावे लागेल. म्हणून सामाजिक व सांस्कृतिक इतिहास स्त्रीवादी दृष्टिकोनातून अभ्यासने व त्याचे पुनर्लेखन होणे गरजेचे आहे.

**३) सर्व ज्ञान क्षेत्रावर पुरुषांची मक्तेदारी**

स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नाही. कामाच्या विभागणीमध्ये तिच्या वाट्याला अनुत्पादक कार्य आले. पुरुषांकडे मात्र सर्व ज्ञान क्षेत्राची मक्तेदारी आली आहे. इतिहास लेखनाचे काम प्रामुख्याने पुरुषांनी केले. पुरुषांच्या कार्याचे तेही राजकीय असे लेखन केले आहे. या लेखनाचे विषय राजाने केलेले युद्ध, त्याची मुत्सदेगिरी, त्याचे प्रशासन, त्याची प्रेम कहाणी असे आहेत.

### ४) स्त्रियांची सर्व क्षेत्रातील निर्णय प्रक्रियेतील अनुपस्थिती

सार्वजनिक व खाजगी आयुष्यातही स्त्रिया निर्णय प्रक्रियेपासून दूर राहतात. त्यामुळे ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये त्यांच्या नोंदी आढळत नाहीत. तेव्हा स्त्रियांच्या कार्यकर्तृत्वाच्या इतिहासाची नोंद घेण्याच्या दृष्टीने ऐतिहासिक साधनांचा अभ्यास झाला नाही. समाजाने तिच्यावर घातलेल्या बंधनाचा तिच्या कार्यकर्तृत्वावर झालेला परिणाम या दृष्टीनेही ऐतिहासिक साधनांचे परीक्षण होणे गरजेचे आहे. पुरूषप्रधान संस्कृतीने निर्माण केलेल्या ऐतिहासिक साधनांतून स्त्रिया अदृश्य आहेत पण जे काही त्रोटक संदर्भ या साधनांमधून येतात त्याचा अभ्यास लिंगभेदात्मक दृष्टिकोनातून होणे गरजेचे आहे. ही सर्व साधने उपयोगात आणता येतील अशी नाहीत. पण जरूर तेथे व जरूर तेवढ्याच साधनांचा उपयोग शक्य होणार आहे. साधनांची चिकित्सा करताना स्त्रीवादी दृष्टिकोनाचा अभ्यास मात्र इतिहास संशोधकाला गरजेचा आहे.

### ५) संदर्भ साधने ही पुरुषांची निर्मिती आहे

राष्ट्रीय व स्थानिक इतिहासाच्या पुस्तकातून स्त्रिया अदृश्य आहेत. कारण संशोधकाला प्राथमिक साधनांमधून स्त्रिया विषयीची माहिती अतिशय त्रोटक उपलब्ध होते. कारण इतिहास ज्या गोष्टीची चर्चा करतो त्या गोष्टीपासून (हुद्याच्या व मानाच्या/अधिकाराच्या जागेपासून) स्त्रिया दूर होत्या. तर इतिहास या सर्व अधिकाराच्या मानाच्या जागांची/व्यक्तींची त्यांच्या कर्तृत्वाची महती गातो. इतिहासात अशा अधिकाराच्या जागेवर स्त्रिया क्वचित दिसतात. त्याचे कारण ही त्यांच्या पुरूष जोडीदार त्यांच्या सोबत नसतो त्याचा मृत्यू झालेला असतो किंवा काही कारणास्तव तो त्या पदाला न्याय देऊ शकत नाही. त्या वेळी अशा स्त्रियांनी पुरूषप्रधान संस्कृतीला डावलून घराण्याच्या गरजेपोटी पुरुषांसारखे कार्यकर्तृत्व करून दाखविले. हा इतिहासाचा वर्ण्यविषय आहे म्हणून इतिहासात अशा स्त्रियांच्या नोंदी मिळतात. या स्त्रियांची वर्णने मर्दानी असे केले जाते.

### ६) स्त्रियांची कार्यकर्तृत्वाची/संघर्षाची क्षेत्र भिन्न आहेत

पितृप्रधान समाज व्यवस्थेत स्त्रियांच्या वाट्याला आलेले दुय्यम स्थान, या दुय्यम स्थानाविरूद्ध तिने दिलेला लढा हे विषय स्त्रियांच्या इतिहासाचा असणार आहेत, हे आपण लक्षात घ्यायला हवे. त्याच्या जीवन संग्रामाचे विविधांगी चित्रण इतिहासाचा विषय होऊ शकतो, हे आपण जाणले पाहिजे व त्या दृष्टीने स्त्रियाच इतिहासामधून अदृश्य असणे म्हणजे काय? याचा अर्थ समजून घेणे गरजेचे आहे. तरच आपण स्त्रिया इतिहासातून अदृश्य का आहेत याचा इतिहास मांडू शकतो.

### ७) इतिहास लेखनामध्ये राजकीय व आर्थिक प्रश्नांवर भर

इतिहास लेखनामध्ये राजकीय व आर्थिक प्रश्नांवर भर दिल्याने सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रे दुर्लक्षित राहिली. या सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रामध्ये स्त्रियांचा वावर आहे. कदाचित या कारणास्तव या इतिहासाला महत्त्व नसावे किंवा याकडे दुर्लक्ष झाले असावे म्हणूनही या क्षेत्रातही स्त्रिया इतिहासामधून अदृश्य राहिल्या.

## ८) इतिहास लेखनातील सर्व इतिहास प्रवाह हे पुरुषप्रधान संस्कृतींतून निर्माण

इतिहास लेखनातील सर्व इतिहास प्रवाह हे पुरुषप्रधान संस्कृतींतून निर्माण झाल्यामुळेही स्त्रिया इतिहासातून अदृश्य राहिल्या. पुरुषप्रधान व्यवस्थेमध्ये वाढलेल्या इतिहासकारांना स्त्रियांचे इतिहासातील स्थानावर त्यांच्या इतिहासातील कामगिरीवर लक्ष गेले नाही. म्हणून त्या इतिहासात अदृश्य राहिल्या म्हणून या विचार प्रवाहांनी लिहिलेले स्त्रियांचे इतिहास ही स्त्रीवादी सिद्धांकन वापरून तपासून घ्यावे लागतील.

थोडक्यात, स्त्रिया इतिहास लेखनाचा विषय होऊ शकतात. त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा इतिहास लिहिला जाऊ शकतो. यासाठी आपणांस स्त्रिया इतिहासात दृश्यमान का झाल्या नाहीत त्या अदृश्य का राहिल्या या गोष्टीची कारण मिमांसा मात्र करावी लागणार आहे. ही कारण मिमांसा केल्याशिवाय आपण स्त्रियांचा इतिहास लिहू शकणार नाही.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न २**

**अ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१) ........... काळात स्त्रियांच्या दुय्यमत्त्वाचा (दुय्यम स्थानाचा) अभ्यास होऊ लागला.

अ) आधुनिक काळ ब) प्राचीन

क) मध्ययुगीन ड) वरील पैकी सर्व काळात

२) पितृसत्ताक पद्धतीमध्ये स्त्रीचे .......... स्थान होते.

अ) दुय्यम ब) प्रथम दर्जाचे क) वैभवाचे ड) कष्टाचे

३) इतिहासात स्त्रियांच्या कार्यकर्तृत्वाची पुनर्मांडणी ........... सिद्धांकन समोर ठेवून केली जाते.

अ) स्त्रीवादी ब) मार्क्सवादी क) राष्ट्रवादी ड) साम्राज्यवादी

४) 'स्त्री-पुरूष तुलना' हा ग्रंथ ........ यांनी लिहिला.

अ) ताराबाई शिंदे ब) अनुताई वाघ क) लक्ष्मीबाई टिळक ड) विद्युत भागवत

५) ........... धर्मात मात्र नव-नवे ज्ञानाची क्षेत्र पादाक्रांत करणे, पराक्रम गाजवणे अंतर्भूत असते.

अ) पुरुषार्थ ब) स्त्री धर्म क) वर्णाश्रम धर्म ड) वरील पैकी कोणतेही नाही

६) कर्तृत्व गाजवण्याची सर्व क्षेत्रे धार्मिक कायद्यानुसार ........... च्या मालकीची आहेत.

अ) पुरुष ब) स्त्रिया क) अस्पृश्य ड) वरील पैकी कोणीही नाही

७) स्त्रिया इतिहासात अदृश्य आहेत याची कारणे ............ दृष्टिकोनातून इतिहास अभ्यासणे त्याचे पुनर्लेखन होणे गरजेचे आहे.

अ) सामाजिक ब) सांस्कृतिक

क) स्त्रीवादी दृष्टिकोनातून   ड) वरील पैकी सर्व बरोबर

८) ........... क्षेत्रामध्ये स्त्रियांचा वावर आहे.

अ) सामाजिक व सांस्कृतिक   ब) राजकीय

क) कला   ड) आर्थिक

**ब) विधान चूक की बरोबर ओळखा.**

विधान १ पुरुषप्रधान संस्कृतीने निर्माण केलेल्या ऐतिहासिक साधनांतून स्त्रिया अदृश्य राहिल्या आहेत.

विधान २ निर्णय प्रक्रियेतून स्त्रिया दूर राहिल्यामुळे इतिहासाने त्यांची नोंद घेतली नाही.

अ) पहिले विधान बरोबर दुसरे चूक   ब) पहिले विधान चूक दुसरे बरोबर

क) दोन्ही विधाने चूक   ड) दोन्ही विधाने बरोबर

विधान १ पुरूषप्रधान व्यवस्थेमध्ये वाढलेल्या इतिहासकारांना स्त्रियांचे इतिहासातील स्थानावर त्यांच्या इतिहासातील कामगिरीवर लक्ष केले नाही.

विधान २ पितृप्रधान समाज व्यवस्थेमध्ये स्त्रियांच्या वाटेला आलेले दुय्यम स्थान व या स्थानाविरूद्ध तिने दिलेला लढा हे विषय स्त्रियांच्या इतिहासाचे असणार आहेत.

अ) पहिले विधान बरोबर दुसरे चूक   ब) पहिले विधान चूक दुसरे बरोबर

क) दोन्ही विधाने चूक   ड) दोन्ही विधाने बरोबर

### १.२.३ साधने आणि स्त्रियांचा इतिहास लिहिण्याच्या पद्धती

इतिहास या वर्ण्य विषयाचा संबंध भूतकाळाशी असतो. एखाद्या गोष्टीचा इतिहास लिहायचा तर आपणाला पुरावा द्यावा लागतो. पुरावा न देता जे काही आपण लिहू/बोलू तो अंदाज होईल किंवा काल्पनिक कथन/लिखाण होईल. इतिहासात काल्पनिकतेला स्थान नसते. जे जसे घडले तसे पुराव्याच्या आधारे मांडणे याला इतिहास म्हटले जाते. प्रो. बॅरलॉशच्या मते, 'इतिहासकार भूतकाळातील घटना आपल्याला असणाऱ्या तुटपुंज्या ज्ञानाच्या व पुराव्याच्या आधारे लिहिण्याचा प्रयत्न करत असतो. हा तुटपुंज्या पुरावा म्हणजे इतिहासाची साधने होत.' ऐतिहासिक संशोधनाचे मूल्य हे त्या इतिहासकाराने कोणत्या प्रकारची साधने वापरलेली आहेत त्यांवर अवलंबून असते. साधनांशिवाय इतिहास लिहिता येत नाही म्हणून इतिहास संशोधन क्षेत्रात 'नो डॉक्युमेंट नो हिस्ट्री' हे वाक्य सुपरिचित आहे.

गतकाळातील घडामोडीचे इतिहासकाराला अप्रत्यक्ष ज्ञान तत्कालीन कागदपत्रे अगर वस्तूच्या रूपाने मिळते. ह्या सामग्रीच्या आधारे त्याला गतकाळाची पुनर्निर्मिती करावयाची असते. म्हणजेच इतिहास लेखकाचा कच्चा माल ही ऐतिहासिक सामग्री असते. ही सामग्री तो निरनिराळ्या ठिकाणाहून गोळा करतो. या संकलित साधनांमधून विश्वासाहार्य साधनांची निवड करतो. संशोधकाला ऐतिहासिक पुरावा संकलित

करण्याचे काम अतिशय जिकिरीचे असते. इतिहास संशोधनासाठी वापरावयाच्या साधन-सामग्रीचा उहापोह अर्थर मार्विक यांनी 'द नेचर ऑफ हिस्ट्री' या ग्रंथात तपशीलात केला आहे. साधन-सामग्रीच्या अभावी इतिहास लिहिता येत नाही का? या प्रश्नाचे उत्तर मार्मिकपणे अतिशय मार्मिकपणे दिले आहे. ते म्हणतात 'केवळ साधनांचा अभ्यास इतिहास लेखनासाठी पुरेसा नाही मात्र त्याखेरीज इतिहास आकार घेत नाहीत हेही तितके सत्य आहे.'

१९ व्या शतकापासून इतिहासाचा अभ्यास शास्त्रीय पद्धतीने करण्यावर इतिहासकाराने भर दिला आहे. त्या अनुषंगाने ऐतिहासिक साधनांची वर्गवारी केली. या साधनांचा वापर कसा करावयाचा त्यातील सत्याचा शोध कसा घ्यायचा याविषयी स्थूल मानाने काही नियम काही निकष ठरवून दिले आहे. काळाच्या ओघात नव-नवीन साधने उपलब्ध होत आहे. विविध मानव्य शास्त्राच्या सिद्धांतांचा उपयोगही इतिहासकाराला होत आहे. इतिहासाच्या विविध सहाय्यकारी शास्त्राचा विकासही झपाट्याने होत आहे.

**इतिहास साधनांचे वर्गीकरण**

इतिहास संशोधन प्रक्रियेचा सखोल अभ्यास केलेल्या तज्ञांनी स्त्रोत साधनांचे वर्गीकरण स्थुलमानाने दोन मुख्य गटात केले आहे. १) मूळ किंवा प्राथमिक साधने २) दुय्यम साधने या प्रमुख प्रकाराचे अनेक उपप्रकारही आहेत.

**मूळ साधने प्राथमिक साधने**

संशोधक ज्या काळातील विषयाचा अभ्यास करीत असेल त्या काळातील समकालीन साधने ही प्राथमिक दर्जाची मानली जातात. प्रा. कार्ल गुस्तावसन यांनी त्यांच्या 'The Preface to History' या ग्रंथात मूळ कागदपत्राची व्याख्या केली आहे. 'केवळ एका ठिकाणी सापडणारी, त्याखेरीज इतरत्र न सापडणारी मूळ स्वरुपातील, त्यात कोणतेही बदल न झालेली, किंवा त्यावर कोणतेही प्रक्रिया न झालेली समकालीन साधने' म्हणजे मुळ साधने होत.

**दुय्यम साधने**

एखादी घटना घडून गेल्यानंतर अनेक वर्षांनी केवळ स्मरणशक्तीच्या आधारे लिहिलेले ग्रंथ, केवळ ऐकीव माहितीच्या आधारे लिहिलेले ग्रंथ, व प्राथमिक स्वरुपाच्या साधनांची चिकित्सा करून विश्वासाहार्य ठरलेल्या पुराव्याच्या आधाराने विषयाची तर्कसंगत मांडणी करून लिहिलेले ग्रंथ हे सर्व दुय्यम साधनांच्या वर्गात मोडतात. अशा मूळ साधनांच्या आधारे लिहिण्यात येणारे संशोधनपर ग्रंथ ही या वर्गात समाविष्ट करण्यात येतात. अशा ग्रंथामध्येच इतिहास लेखक डोकावत असतो. इतिहासकार त्याचा अर्थ आपल्या मतानुसार व विचार धारणेनुसार लावतो. मूळ साधने स्वायत्त स्वरुपाची नसतात. त्यांना स्वायत्त मूल्य नसते. या संदर्भात प्रा एडवर्ड कार म्हणतात की, ''घटीते स्वत: बोलत नाहीत तर त्यांना बोलते करणारा इतिहासकार असतो.''

आधुनिक काळात ऐतिहासिक साधनांचे क्षेत्र अधिकाधिक विस्तारत आहे. इतिहास लेखनात ॲनल्स, सबाल्टर्न, संपूर्ण इतिहास, सामाजिक इतिहास, तुलनात्मक इतिहास, संरचनावादी इतिहास, स्त्रीवादी इतिहास असे नानाविध प्रवाह प्रचारात आले आहेत. त्यांनी नव्या ऐतिहासिक साधनांचे महत्त्व, किंवा प्रचलित साधनांचा नव्या पद्धतीने वापर केला आहे. त्यामुळे लोककथा, लोकगीते, पौराणिक कथा, मिथक कथा, अशा पारंपारिक साधनांचा वापर संशोधक करीत आहे. स्त्रियांचा इतिहास लिहिण्यासाठी वरील साधनांचा उपयोग करावा लागतो.

स्त्री अभ्यासासाठी कालखंडानुसार प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक कालखंडातील स्त्री संदर्भ साधनांचा आढावा घेऊ.

**प्राचीन इतिहासाची साधने**

**पुरातत्त्वीय साधन**

प्राचीन कालखंडातील लिखित पुरावे उपलब्ध होण्यापूर्वीच्या संस्कृतीचा अभ्यास हा पुरातत्त्वीय साधनांच्या आधारे केला जातो. हडप्पाकालीन स्त्री जीवनाची माहिती तेथे सापडलेल्या पुरातत्त्वीय अवशेषावरून कळून येते. स्त्रियांच्या पोशाखात घागरा, दुपट्टा तसेच, आरसे, फण्या, दागिन्याचे विविध प्रकार आढळतात. अनेक प्रकारच्या खड्यांचा व मण्यांचा दागिन्यात वापर केला जाई. मातृदेवताच्या अनेक मूर्ती आढळतात. दगडी हत्यारे, अस्थींचे अवशेष, मातीची भांडी, धातुची भांडी, धातुची अवजारे, धान्याचे प्रकार, खेळणी, मणी, वेगवेगळ्या प्रकारचे अलंकार, भिन्न प्रकारची आकाराची धातुंची नाणी, इमारतीचे अवशेष, मूर्तींचे अवशेष, गुहाचित्रे, शिलालेख ताम्रपट इत्यादी साधनांच्या आधारे प्राचीन काळातील समाजाच्या संस्कृतीचा अभ्यास केला जातो.

प्राचीन काळी देखील महिला अलंकार व सौंदर्य भूषणे वापर करत त्याची कथा दागदागिने सांगतात. शिल्प, मूर्ती, मंदिराची घडण व आतील कोरीव काम तात्कालीन कलेच्या अभिव्यक्तीची पुरावे असतात. त्या काळातील समाजाचे चित्र उभे करता येते.

**प्राचीन साहित्य कृती**

पुराणे, महाकाव्य, धर्मशास्त्रीय ग्रंथ, बौद्धांच्या जातक कथा, जैनांच्या जातक कथा, संगम साहित्य इत्यादी. या साहित्यामधून प्राचीन कालीन स्त्रियांच्या स्थितीची माहिती मिळते.

**वैदिक साहित्य**

इ.स. पूर्व २५०० ते इ.स. पूर्व १००० हा वैदिक साहित्याचा काळ आहे. वैदिक साहित्यात वेद, उपनिषदे, अरण्यके, संहिता, ब्राह्मण ग्रंथ, इ. साहित्याचा समावेश करता येतो. वैदिक संस्कृती पुरुषप्रधान होती. तरीही वेदकाळामध्ये स्त्रियांचा दर्जा उच्च होता असे म्हटले जाते. त्यांना पुरुषांबरोबर गौरवाचे स्थान प्राप्त होते. पण मनुस्मृतीच्या काळापासून पुढे स्त्रीच्या दर्जाचा ऱ्हास व अवनती झाल्याची दिसून येते. वेदांमधील अनेक सुक्ताच्या रचना स्त्रियांनी केलेल्या दिसतात. त्यामध्ये कपाला, घोषा, सूर्या, गोधा,

अदिती, विश्ववारा, मैत्रेयी, वागम्भृणी, वाक्श्रद्धा, इंद्राणी, विश्वला, मुदूगलानी, व्रतृमाता, दनू, सरस्वती या लढाऊ लष्करी शिक्षण घेतलेल्या स्त्रिया म्हणून उल्लेखल्या जातात. ऋग्वेद कालीन स्त्री विषयक मर्यादित संदर्भ मिळतात. त्यातील काही ऋचा स्त्रियांनी लिहिलेल्या असाव्यात पण भक्कम पुरावे मिळत नाहीत.

**उपनिषद कालीन स्त्रिया**

उपनिषद कालीन स्त्रियांमध्ये गार्गी, मैत्रेयी, कात्यायानी या स्त्रिया ज्ञान संपादन केलेल्या स्त्रिया म्हणून ओळखल्या जातात. जबाला ही शूद्र स्त्री होती. तर इतरा ही ब्राह्मण ऋषीची शूद्र पत्नी होती. तिला समाजात वर्ण भेदाच्या प्रभावाने कोणताही मानसन्मान नव्हता. तिच्या मुलाने ऐतरेय उपनिषद व ऐतरेय ब्राह्मणे लिहिली.

वैदिक काळातील हिंदू साहित्य संस्कृत भाषेमध्ये आहे. वेदापूर्वीचे साहित्य मिळत नाही. स्मृती, मनुस्मृती, याज्ञवल्क्य स्मृतीचा, इ.स. पूर्व २ रे ते इ.स. ३ रे शतक निर्मितीचा काळ मानला जातो. त्यात स्त्रीविषयक कायदे, स्त्रियांवरील निर्बंध, मौखिक परंपरा व स्त्रीविषयक हस्तलिखितांचे संकलन मोठ्या प्रमाणात ब्रिटिश काळात व तत्पूर्वी काही प्रमाणात मोगल काळात झाले होते.

**उत्तर वैदिक कालखंड**

उत्तर वैदिक कालखंड इ. स. पूर्व ८०० ते इ.स. ३०० या कालखंडात निरुक्त, श्रोतसूत्रे, धर्मसूत्रे, पाणिनीचा अष्टाध्यायी, इ. ग्रंथांचा आहे.  इ.स. पूर्व ३०० ते इ.स. ९०० या काळात इतर स्मृतीग्रंथ व पुराणे तयार झाली. याच काळात रामायण व महाभारत या ग्रंथाची रचना झाली. इ.स. ९०० ते इ.स. १८०० या काळात स्मृती वरील टीका आणि धर्मविषयक निबंध म्हटले जाणारी संकलनात्मक ग्रंथ निर्माण झाले. या सर्व ग्रंथांमधून स्त्रीविषयक संदर्भ मिळतात. स्त्री विषयक कायदे स्त्रियांवरील निर्बंध इत्यादी पुरावे मिळतात.

**रामायण व महाभारत**

रामायण व महाभारत या ग्रंथामध्ये स्त्री जीवनाविषयी विपुल माहिती उपलब्ध आहे. या ग्रंथांमध्ये वेगवेगळ्या काळात भर पडत गेली. त्यामुळे स्त्री चित्रण विरोधाभासात्मक आढळते. या ग्रंथांमधून स्त्रियांचे जीवन, रहाणीमान, समाजातील त्यांचे स्थान याविषयी माहिती मिळते. स्त्रियांच्या वैदिक शिक्षणावर बंधने येण्यास सुरुवात झाली तरीही  स्त्रियांचे शिक्षण पूर्ण बंद झाले नव्हते. कारण महाभारतातील वनपर्वामध्ये एका ब्राह्मणाने माता कुंतीला अथर्व वेदातील अनेक मंत्र शिकवल्याचा उल्लेख येतो. वरिष्ठ वर्गातील मुलींना विविध विषयात नैपुण्य मिळवण्याची संधी होती. महाभारतातील सत्यवती, अंबा, अंबालिका, गंधारी, कुंती, द्रौपदी, दु:शाला, सुभद्रा, रुक्मिणी, सत्यभामा, राधा, गंगा, शर्मिष्ठा, देवयानी, दमयंती, इ. चे संदर्भ व कार्य मिळते. तर रामायणातील अहिल्या, सीता, रंभा, कौशल्या, सुमित्रा, कैकयी व कालिंदी, अनुसया, शबरी, मंथरा, त्राटिका, शूर्पणखा, मंदोदरी, तारा, ताटका, इ. चे संदर्भ मिळतात.

या काळात मुलींचे विवाह ऋतुमती होण्याच्या सुमारास करावे यावर भर देण्यात आला. महाभारतात तर दहा वर्षाच्या कन्येने तीस वर्ष वयाच्या वराशी विवाह करावा असे म्हटले आहे. रामायण व महाभारतात

क्षत्रिय कन्येला स्वयंवर हा उत्तम मार्ग सांगितला आहे. या काळात नियोगाला मान्यता होती. उदा. महाभारतात सत्यवतीच्या आदेशानुसार व्यासाने विचित्रवीर्याच्या पत्नीच्या ठिकाणी धृतराष्ट्र व पांडू हे दोन पुत्र नियोगाद्वारे उत्पन्न केले. पुत्र प्राप्ती हाच नियोगाचा उद्देश होता. वैदिक काळात सती प्रथेचा अभाव दिसतो. मात्र रामायण महाभारत सती प्रथेचा उल्लेख आढळतात. पांडूची पत्नी माद्री, वासुदेवाच्या चार स्त्रिया सती गेल्याचे म्हटले आहे. थोडक्यात, वेद काळानंतर स्त्री जीवनाविषयीची पुरावे रामायण व महाभारतात या महाकाव्यात आढळतात.

**कौटिल्याचे अर्थशास्त्र**

कौटिल्याचे अर्थशास्त्र (इ.स. पूर्व ४ थे शतक) यामध्ये पारंपारिक पुरुषसत्ता पद्धती, विवाह, दासी यांचे विषयीची माहिती मिळते. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात पारंपारिक पुरूषसत्ताक कुटुंब पद्धती, विवाह पद्धती दासी प्रथा याविषयी माहिती मिळते. विवाहाचे आठ प्रकारांमध्ये ब्रह्म, दैव, आर्ष, प्रजापत्य हे चार प्रकार धर्म्य आहेत, असे कौटिल्याने म्हटले आहे. नियोगाच्या बाबतीत कौटिल्य निपुत्रिक राजाला आपल्या राणीच्या ठिकाणी मातृबंधू किंवा सामंत राजाकडून पुत्रोत्पत्ती करून घेण्याचा सल्ला देतो. घटस्फोटाबाबत कौटिल्य म्हणतो पती-पत्नी परस्परांचा द्वेष करीत असतील तर त्यांचा घटस्फोट होऊ शकतो. थोडक्यात, मौर्यकालीन स्त्री जीवनाचा अभ्यास करण्यास कौटिल्याचे अर्थशास्त्र उपयोगी पडते.

**मनुस्मृती**

सातवाहन काळ इ.स. पूर्व ३ रे शतक ते इ.स. २ रे शतक या कालखंडात मनुस्मृतीचे लेखन झाले. यात मानव धर्म सूत्राविषयीची माहिती मिळते. याचा लेखक एक नाही. कायदा, सामाजिक गोष्टीविषयक स्पष्ट मांडणी यात दिसते. वर्ण-व्यवस्था, जाती-व्यवस्था याचे उल्लेख मिळतात. त्यामुळे स्त्रियांचा दर्जा व त्यांना कशा पद्धतीने वागणूक दिली जात होती हे लक्षात येते. स्त्रियांची कर्तव्य सांगताना मनु म्हणतो, ''पतीच्या मृत्यूनंतर स्त्रीने शुभ अशी फुले, कंदमुळे आणि फळे खाऊन शरीर सुकवून टाकणे चांगले, पण तिने दुसऱ्या पुरुषाचे नावही घेऊ नये.'' म्हणजे पती मृत्यू नंतर पत्नीला पुनर्विवाहाची परवानगी नव्हती. मात्र वैदिक वाङ्मय, सूत्र ग्रंथ, मनुस्मृती, याज्ञवाल्क्यस्मृती या ग्रंथातून विधवा केशवपनाचे उल्लेख आढळत नाहीत. फक्त स्कंद पुराणात विधवा केशवपनाचा प्रथम उल्लेख आढळतो. त्यावरून इ.स. दहाव्या शतकानंतर मुस्लिम आक्रमणाचा काळात समाजात ही प्रथा रूढ होऊन लागली.

त्याच बरोबर, वात्स्यायनाचे 'कामसूत्र' सांस्कृतिक इतिहासाची मौलिक साधन आहेत. निरनिराळे नाटके व काव्य यावरूनही तात्कालीन सांस्कृतिक स्थिती समजते.

**गुप्त व वाकाटकांचा कालखंड**

या काळात १८ पुराणे स्मृती ग्रंथ लिहिले गेले. यामधील नारदस्मृतीमध्ये स्त्रियांना विशिष्ट परिस्थितीत पुनर्विवाहाची परवानगी दिली आहे. गुप्तोत्तर कालखंडात मूळ स्मृतीवर टीका ग्रंथ तयार झाली. मीताक्षर, मनुस्मृतीवरील टीका, दायभाग यामध्ये स्त्रियांसंबंधी कायदे आहेत. बंगालमधील स्त्री जीवनावर त्याचा प्रभाव

आढळतो. सती, केशवपन, वारसा हक्क यासाठी यातील नियम प्रमाण मानले जात. १८ व्या व १९ व्या शतकामध्ये मिताक्षर व दायभाग यांचाच आधार स्त्री विषयक प्रथांना मानला जात असे. १२ व्या शतकापर्यंत या ग्रंथाचा प्रभाव स्त्री विषयक रूढी व चाली-रीतीवर होता. १२ व्या शतकात यादव काळात हेमाद्रीने 'चातुर्वर्ण्यचिंतामणी' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात वर्ण व्यवस्थेचे समर्थन केले आहे. यावेळीही वर्णव्यवस्थेचा पगडा समाज जीवनावर होता. त्यामुळे स्त्रियांचा दर्जा व स्थानात फारसा फरक झाला नाही. उलट मुस्लिम संस्कृतीने संस्कृतीच्या प्रभावाने स्त्रिया वरील बंधने, पडदा पद्धती यांचे प्रस्थ वाढले.

गुप्त व वाकाटकांच्या काळात मनुस्मृती नंतरचे स्मृतीग्रंथ, म्हणजे याज्ञवल्क्य स्मृतीग्रंथ, १८ पुराणे, नारद, बृहस्पती, कात्यायन, व्यास इ. स्मृती ग्रंथ लिहिले गेले. त्यामध्येही स्त्रीजीवन, सती प्रथा, बालविवाह, वारसा, केशवपन, स्त्री शिक्षण यासंबंधी माहिती मिळते.

**प्राचीन शिलालेखातील महिला**

अनेक जुन्या वास्तु मंदिर शिलालेख, स्तंभलेख, तोरणे, मूर्तींची बैठक यावर स्त्रियांच्या यशोगाथा कोरलेल्या मिळतात. हे कोरीव अभिलेख भारतीय स्त्रीविषयक इतिहासाची विश्वसनीय साधने आहेत. शिलालेख व ताम्रपट यामधून राजवंशीय स्त्रियांनी दिलेले आर्थिक दान याची माहिती मिळते. यावरील तिथी निर्देशका नुसार कालनिर्णयास मदत होते. सामाजिक रिवाज, धर्म समजुती याची माहिती मिळते. उदाहरणार्थ, वाकाटक राणी प्रभावती गुप्ता हिची माहिती इ.स. चौथ्या शतकातील अकोल्या जवळील वाशिम येथील शिलालेखातून मिळते. या लेखात तिने केलेल्या यज्ञदान, शिक्षण घेण्याचा, स्वयंवराचा अधिकार याची माहिती मिळते. श्रवणबेळगोळ येथील 'आयागपट्ट' या चंद्रगिरी येथील डोंगरावर आहे. तेथील शिलालेखातून तत्कालीन स्त्रियांविषयीची माहिती मिळते.

**जैन साहित्यातील स्त्री संदर्भ व साहित्य साधने**

महावीरांनी केलेला उपदेश त्यांचे शिष्य गणधर यांनी आगम ग्रंथातून सूत्रबद्ध केले. महावीराच्या निर्वाणानंतर ६८३ वर्ष हे आगम ग्रंथ सूत्र ग्रंथ सूत्रबद्ध होत राहिले. श्वेतांबर परंपरेनुसार त्याची संख्या १२ आहे. पण त्यापैकी १२ वा दृष्टिवाद हा काळाच्या ओघात नष्ट झाला. ११ अगं ग्रंथ पुढील प्रमाणे आचारांग, सूत्रकृतांग, स्थानांग, समयवायंग, भगवती, ज्ञाताधर्म कथा, उपासक दशा, अन्तकृदशा, अनुत्तरोप्पतिकदशा, प्रश्नव्याकरण, विपाकश्रुत.

**आचारांग** - मध्ये भिक्षुच्या आचरणा संदर्भात भिक्षुणीचा उल्लेख येतो.

**सूत्रकृतांग** - यामध्ये सूत्रकृतांगातील स्त्रीपरिज्ञा अध्यायात मोक्षमार्गी पुरूषांना स्त्रिया, काया, वाचा, मने कसे भुलवितात, तसेच, भिक्षुला वश करून घेतलेल्या स्त्रिया भिक्षुकडून कशी चाकरी करून घेतात याचे वर्णन मिळते. तसेच, यात स्त्रिया वापरत असलेल्या गृहोपयोगी वस्तूंची माहिती मिळते.

**भगवती** - मध्ये जयंती नावाची श्रमणोपासिका धर्मसभेत महावीरांना कर्मबंध, सिद्धगती या विषयी मौलिक प्रश्न विचारते व प्रवृज्या स्वीकारून सिद्धगतीस जाते.

**ज्ञाताधर्म कथा** – धारिणी व तिचे शयन गृह, सार्थवाही, देवदत्त, गणिका, श्राविका, विदेह राजकन्या, भृत्वी, नागश्री, द्रौपदी, यांचे उल्लेख कथेच्या ओघात येतात. त्यांची कौटुंबिक, सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक जीवन या विषयी माहिती देतात.

**अन्तकृदशा –** यामध्ये साधु–साध्वींचे जीवन, तप याविषयी माहिती मिळते.

अशा पद्धतीने आगम ग्रंथातून स्त्री–जीवनासंबंधित माहिती मिळते.

**बौद्ध साहित्यातील स्त्री संदर्भ व साहित्य साधने**

बौद्ध काळात निर्माण झालेले साहित्य हे पाली भाषेत आहे. बौद्ध काळातील स्त्रियांच्या आध्यात्मिक उन्नती बाबत माहिती देणारा पाली भाषेतील थेरी गाथा हा अतिशय महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. पाली त्रिपिटक साहित्याला बुद्ध वचन मानतात आणि थेरी गाथा हा ग्रंथ पालिकेटकांचा एक ग्रंथ आहे.

**विनयपिटक**

गौतम बुद्धाचा संघ भिक्षू, भिक्षुणी, उपासक, उपासिका असा चतुर्विध होता. बौद्ध भिक्षूंचे एकंदरीत आजच्या आचरणाचे नियम भिक्षुंच्या तुलनेत भिक्षुणीचे स्थान या सर्वांचे दर्शन विनयपिटक ग्रंथातून होते. धुलनंदा चंडकाली, सुंदरीनंदा, भद्रा कपालिनी या शिष्य व छन्नाग्गीया, भिक्षुणी या प्रमुख भिक्षुणींचे जीवन व त्यांचा उपदेश व संवाद विनयपिटकात आढळतात.

**थेरीगाथा**

थेरीगाथा या ग्रंथात ७३ बौद्ध भिक्षुणीने आपले जीवन चरित्र वर्णन केले आहे. त्यात ५२२ गाथा आहेत. त्यांच्या जीवनाची माहिती या ग्रंथातून मिळते. स्त्रीचे जीवन कसे कष्टप्रद होते याचे चित्रण यातून येते. थेरी ही पौराणिक पात्र नाही, त्या ऐतिहासिक आहेत. बुद्ध वचनाचे स्थान थेरी गाथेला प्राप्त झाले आहे. जीवनात दुःख आहे ते समजून घ्या व ते दूर करण्यासाठी रस्ताही आहे हे बुद्धाचे तत्त्वज्ञान थेरीने प्रत्यक्ष आपल्या जीवनात अनुभवले त्या दुःख मुक्त झाल्या. परम शांतीचा जो अनुभव त्यांनी घेतला तो त्यांनी व्यक्त केला. या भिक्षुणीने सांगितले की, त्यांचे जीवन अंधःकार युक्त होते. पण बुद्धाचा मार्ग मिळाल्यानंतर त्यांच्या जीवनात नवीन अशा पल्लवी झाल्या. श्रद्धेचे व अस्थेचे प्रतीक म्हणून स्त्रीकडे बघितले जाते. पण धम्मामध्ये मात्र यापुढे जाऊन ती बुद्धिवादी, विवेकवादी बनते हे आपल्याला थेरी गाथेतून लक्षात येते.

**नाटके व काव्य**

तसेच, नाटके व काव्य या कलाकृतीतूनही व स्त्रियांच्या परिस्थितीची माहिती उपलब्ध होते. कालिदासाने रघुवंश, व कुमारसंभव ही महाकाव्ये तसेच, ऋतूसंहार, मेघदूत, शाकुंतल, मालविकाग्निमित्र, विक्रमोर्वशीयम, ही नाटके लिहिली. 'अभिजात शाकुंतल' ही जागतिक साहित्यातील नावाजलेली अभिजात कलाकृती आहे. या नाटकात शकुंतलेचे विशुद्ध प्रेम, उदात्त त्यागाचे चित्रण त्याने केले आहे. शूद्रक राजाचे 'मृच्छकटिकम' सामाजिक नाटक आहे. यात वसंतसेना व चारुदत्त यांच्या प्रेमाची कथा आहे. भास हा

संस्कृत नाटककार होता. त्याची तेरा नाटके उपलब्ध आहेत. त्यापैकी 'स्वप्नवासवदत्ता' हे नाटक स्त्री संदर्भाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

भवभूति याची 'उत्तररामचरितम', 'महावीरचरितम', 'मालतीमाधवम' ही नाटके प्रसिद्ध आहेत. भट्टनारायणाचे 'वेणीसंहारम', सम्राट हर्षाचे 'रत्नावली', 'प्रियदर्शिका' व 'नागनंद' या नाटकांतून तात्कालीन स्त्रियांची माहिती मिळते. या संस्कृत भाषेतील नाटकातील स्त्री पात्रे प्राकृत भाषा बोलतात.

भारवीने लिहिलेले 'किरातार्जुनीयम', सुबंधूचे 'वासवदत्ता', 'शिशुपालवधम' हे माघाचे महाकाव्य यासारख्या महाकाव्यातून स्त्री जीवनाचे संदर्भ मिळतात. याच काळात भर्तृहरीने लिहिलेले 'शृंगार', 'नीति' 'वैराग्य' शतकत्रय हे सुंदर काव्य आहे. बाराव्या शतकात बंगालच्या लक्ष्मणसेनचा सभाकवी जयदेव यांने 'गीत गोविंद' हे भाव काव्य लिहिले. यात शृंगाररस कृष्णभक्ती आणि नादमाधुर्य यांचा मिलाप आढळतो. नवव्या शतकात विकटनितंबा, विजयांका, शीलाभट्टारिका इत्यादी कवयित्रींची नावे आढळतात.

**गाथा सप्तशती**

गाथा सप्तशती सातवाहन राजा हाल यांनी स्वत: काही रचलेल्या गाथा व लोककाव्यातील काही गाथा यांना एकत्र करून गाथा सप्तशती हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ महाराष्ट्री प्राकृत भाषेत लिहिलेला आहे. या ग्रंथात निसर्ग वर्णनाबरोबर स्त्री-पुरुषांचे विलासपूर्ण व्यवहार आणि प्रणय भावनेचे विलोभनीय आविष्कार या ग्रंथात आढळतात. महाराष्ट्रातील तात्कालीन समाज जीवनाचे प्रतिबिंब या गाथांमधून आढळून येते. या ग्रंथात ७०० गाथांचा संग्रह आहे.

**मध्ययुगीन साधने**

मध्ययुगीन साधनांमध्ये शिलालेख, ताम्रपट, स्थापत्य, हस्तलिखित पोथ्या, मंदिरे व मूर्ती शिल्पे, शासकीय कागदपत्रे, दरबारातील कामाच्या नोंदी, वतनपत्रे, दानपत्रे, आज्ञापत्रे, फर्माने, बातमीपत्रे, आत्मवृत्ते, रोजनिशा, तवारिख, लष्करी मोहिमांची इतिवृत्त, जमाखर्चाचे हिशोब, बखरी, शकावल्या, वंशावळ्या, महजर, करीने, याशिवाय मध्ययुगीन प्रवास वर्णने, धर्मशास्त्रीय ग्रंथ, ऐतिहासिक ग्रंथ, वाड्.मय, लोककथा, पोवाडे, लोकगीते, इ. साधने येतात.

**मध्ययुगीन स्त्रीविषयक शिलालेख व ताम्रपट**

मध्ययुगीन स्त्रियांच्या अभ्यासासाठी काही शिलालेख व ताम्रपट उपलब्ध आहेत.

**चित्तोड शिलालेख** : हा शिलालेख पार्श्वनाथच्या मंदिरात असून राणी जयतुल्ला देवी हिच्या आज्ञेने केला आहे. या शिलालेखात मंदिरात दान दिल्याच्या आढळते.

**दिलवाडा शिलालेख** : इ.स. १३३४ मधील या शिलालेखात स्त्री विषयक धार्मिक व सामाजिक माहिती मिळते. हा शिलालेख संस्कृत व स्थानिक भाषेत आहे.

**कुंभलगड शिलालेख**: या शिलालेखातून राजस्थान मधील स्त्रियांची, आश्रम व्यवस्था, शिक्षण, सण, उत्सव, शिवरात्रि, वसंतोत्सव याविषयी माहिती मिळते. हा शिलालेख १५ व्या शतकातील आहे.

**विजयनगर कालीन ताम्रपट** : विजयनगर कालीन स्त्रियांची स्थिती समजण्यासाठी शासनम, जयपत्रम, आज्ञापत्रम, प्रज्ञापत्रम असे ताम्रपट मिळतात. यातून तात्कालीन राजाचे जाहीरनामे व स्त्रीविषयक माहिती मिळते.

**सुलतानशाही शिलालेख** : सुलतानशाहीतील स्त्रियांचा उल्लेख असलेले शिलालेख व त्याची माहिती इपिग्राफिक इंडिया, इपिग्राफिक कर्नाटिका, इंडो-इस्लामी या ग्रंथातून प्रसिद्ध झालेल्या लेखातून मिळते.

**सुलतानशाहीतील प्रवास लेखन**

**अल्बेरुनी :** अलबेरूनी हा जन्माने तुर्क होता. हा ११ व्या शतकात भारतात आला. त्याने 'अलबेरूनीचा भारत' हा ग्रंथ लिहिला या ग्रंथामध्ये तात्कालीन समाजाची माहिती मिळते.

**इब्न बतूता** हा इ.स. १३३३ मध्ये सिंधमध्ये आला. हा आठ वर्ष भारतात राहिला. याने 'रेहला' नावाचे प्रवासवर्णन लिहिले. त्यात त्यांनी सिंधच्या स्त्रियांविषयीची माहिती दिली आहे.

**रजिया सुलतान** हिने 'चाचनामा' हा ग्रंथ लिहिला. (११९२) या ग्रंथात सिंधचा इतिहास लिहिला आहे. तसेच, सिंधच्या स्त्रियांची माहिती या ग्रंथातून मिळते.

**चंदवरदाई** हिने 'पृथ्वीराजरासो' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात तिने संयोगिता व पृथ्वीराज यांची प्रेम कथेचे वर्णन केले आहे. या ग्रंथात तात्कालीन जीवन-पद्धती याची माहिती मिळते तसेच, विवाह व त्यातून झालेले युद्ध याची माहिती मिळते.

**अमीर खुस्त्रो** या परकीय प्रवाशांनी लिहिलेल्या ग्रंथात 'पर्शियन गल्फ' तसेच, देवल देवी ख्रिजखानी हिची व समकालीन स्त्रियांची माहिती मिळते.

**महमद जायसी** यांनी लिहिलेल्या 'पद्मावत' या ग्रंथात राजस्थानी स्त्रियांची माहिती मिळते.

**इजाज-ए-फुसवी** यांच्या लिखाणातून स्त्रियांच्या गुलामगिरी विषयी माहिती मिळते. त्याच्या मते, तुर्की मुली गोऱ्या व नाजूक असतात. चिनी मुली सुगंधित असतात. भारतीय मुली सौम्य स्वभावाच्या असतात. असे उल्लेख सापडतात.

**मिनहाज-उल-सिराज** याच्या तबकाद-ए-नासिरी या ग्रंथात दिल्लीतील एक प्रमुख मदरसा होता. या मदरश्याची प्रमुख अध्यापक ही महमअनगा ही स्त्री असल्याचे उल्लेख मिळतात.

**मुघलकालीन स्त्री संदर्भ साधने**

प्रेषित महमद स्त्री पुरूष यांना समान मानत असे. स्त्रियांचा दर्जा कायदेशीरपणे कुराणाने उंचावला असला तरीही मुघलकालीन स्त्रियांना पुरुषांबरोबरचा दर्जा दिला गेला नाही, याचे उल्लेख मिळतात.

**'बाबरनामा' व 'तुझीक-ई-बाबरी'** या बाबरने लिहिलेल्या ग्रंथातून मध्ययुगीन स्त्रिया विषयी व त्यांच्या स्तुती विषयी उल्लेख मिळतात. खानजहॉन ही बाबरची बहीण तिने लिहिलेल्या लिखाणातून स्त्रियांना शिक्षण दिले जात असे, उल्लेख मिळतात. सम्राट अकबरची दाई महाम-अनगा राजकारणात प्रभावशाली स्त्री होती. तिचे अकबराच्या दरबारात वर्चस्व होते. तिने दिल्लीत मदरसा-ए-बेगम चालू केल्याची उल्लेख मिळतात. जहांगीरने लिहिलेल्या 'तुझक-इ-जहांगीर' या ग्रंथात नुरजहाँची आवड, आत्तरे, कापड, अलंकार, तिने लावलेल्या बागा व फुले या विषयी माहिती मिळते.

अब्दुल हमीद लाहोरी यांनी लिहिलेल्या 'पातशहानामा' या ग्रंथात राजघराण्यातील स्त्रिया तसेच, शहाजहान व मुमताज यांच्या विषयी माहिती मिळते.

झेब-ऊन-निसा व झीनत-ऊन-निसा या औरंगजेबाच्या मुली होत्या. यांचा आपल्या पित्यावर प्रभाव होता. याचे उल्लेख त्यांनी लिहिलेल्या काव्यातून मिळतात. तसेच, छत्रपती शाहू (सातारा) व येसूबाई छत्रपती संभाजीची पत्नी यांचे प्राण वाचवण्यात झीनत-ऊन-निसाला यश मिळाले याचेही उल्लेख मिळतात.

'मासीर-ई-आलमगिरी' हा ग्रंथ साकी मुस्तैद खाँ याने लिहिला. यामध्ये औरंगजेबाच्या जनानखान्यात जन्मलेल्या मुली कुराणाचा अभ्यास करून त्याची भाषांतर करत. त्या ईश्वर उपासना यात मग्न असत, याचे उल्लेख सापडतात.

अहमदनगर येथील हुसेन निजामशहा याची कन्या व अली आदिलशहाची पहिला याची पत्नी चांदबीबी हिने राज्याच्या रक्षणासाठी युद्धात मृत्यु पत्करला याची उल्लेख मिळतात.

विजापूर मधील आदिलशहा याची बहिण दिलशादआघा व राजमाता पुंजीखातुन या इस्माईल आदिलशहा करीता लढला होत्या.

**विजयनगरकालीन स्त्री संदर्भ साधने**

विजयनगरकालीन स्त्रीविषयक लिखित पुरावे प्रवासवर्णने व ऐतिहासिक लिखाणतून स्त्री विषयक माहिती मिळते.

**निकोलो काउंटी**

या इटालियन प्रवाशाने देवराय प्रथम याच्या काळात त्याने विजयनगरला भेट दिली होती. याच्या ऐतिहासिक वर्णनात व प्रवास वर्णनात स्त्रीविषयक माहिती मिळते. गुजरातमध्ये त्याला सतीची चाल पहावयास मिळाली.

**डोमिंगो पेस**

या पोर्तुगीज प्रवाशांनी विजयनगर राज्याला भेट देऊन त्यांनी विस्तृत वर्णन लिहून ठेवले. समकालीन सती प्रथेचे वर्णन त्याच्या लिखाणातून मिळते. तसेच, 'नॅरेटीव्हज ऑफ डोमिंगो पेस' या ग्रंथात स्त्रियांच्या समाजातील स्थानाविषयी माहिती मिळते. समाजातील दुसऱ्या वर्गात वारांगनांचा समावेश होत असे. त्यात

देवळातील देवदासी व स्वतंत्र राहणाऱ्या गणिका होत्या. यांना मुख्य गृहस्थांच्या पत्नीसारखी वागणूक मिळत असे. कोणताही पुरूष वारांगनेच्या घरात जाई. त्याला दोष दिला जात नसे. स्त्रिया या स्वैर नितिमत्तेच्या होत्या, याचीही उल्लेख मिळतात.

**एडोरेडा बारबोसा**

यानेही विजयनगर साम्राज्याला भेट दिलेली होती. त्याच्या वृत्तांतातही स्त्रीविषयक माहिती मिळते. पतीच्या निधनानंतर ज्या स्त्रिया सती जात नाहीत त्यांना अवमानित जीवन जगावे लागे. त्यांचे केशवपन करत. कुटुंबातील लाजिरवाणी व्यक्ती म्हणून तिला घराबाहेर घालवत. जर विधवा स्त्रिया तरुण असतील तर तिचे शरीरविक्रय करून देवळासाठी पैसा गोळा करीत.

विजयनगरचा राजा कृष्णदेवराय यांनी लिहिलेल्या काव्यसंग्रहात समकालीन स्त्रियांची माहिती मिळते. होनाई ही बुक्काची पत्नी हिने विजयनगरच्या विठ्ठल मंदिरातील संस्कृत आलेखाची रचना केल्याचे व राजकारणात भाग घेतल्याचे उल्लेख मिळतात. गंगादेवी ही पहिल्या बुक्काची सून व कंपनाची पत्नी होती. 'कंपनविजयम' मधून तिची माहिती मिळते.

**काव्य**

कृष्णदेवरायाची पत्नी जगमोहिनी हिने लिहिलेल्या 'तुल्कपंचकाय' या विरहकाव्यात तत्कालीन स्त्री जीवनाची माहिती मिळते. रामदेवरायाची पत्नी मोहनानगी हिने 'मोराची-परिनयन' हे प्रेम काव्य लिहिले. पण आज ते उपलब्ध नाही.

तिरुमलंब्बा ही अच्युत राजाची राणी तिने 'वरदबिंकापरिनयन' हे चंपूकाव्य लिहिले. त्यात समकालीन जीवनातील सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक संदर्भ मिळतात. तिने रचलेल्या काव्यात राजाने ब्राह्मणास सुवर्णमेरू दान केल्याचे उल्लेख मिळतात. तिरूमलंब्बा ही विजयनगरच्या रॉयल कोर्टमध्ये 'वोदुआ' (वाचणारी स्त्री) होती. ती नंतर राजमहिषी 'को क्वीन' म्हणून मान्यता पावली.

**मध्ययुगीन संत स्त्रियांसंबंधीची संदर्भ साधने**

मराठीतील पहिले स्त्री रचित काव्य म्हणून महानुभाव पंथातील महादाईसेच्या ढवळ्यांना मान दिला जातो. नवरदेवाला उद्देशून गायलेली वर प्रशस्तीची ही विवाह गीते होत. या मराठी कथा काव्याची रचना शके १२०८ ची आहे. त्याचे संपादन वि. भ. कोलते यांनी केले आहे. मुक्ताबाईचे ताटीचे अभंग डॉ. सुवासिनी इर्लेकर यांनी 'प्राचीन मराठी संत कवयित्रींचे वाङ्मयीन कार्य' या पुस्तकात समीक्षात्मक दृष्टीने लिहिलेले आहे. तर शो. गो. तुळपुळे यांनी 'मराठी वाङ्मयाचा इतिहास'मध्ये त्यावर सुंदर भाष्य केले आहे. इंदुमती शेवडे यांनी 'संत कवयित्री' या पुस्तकात सर्वच मराठी संत कवयित्रींचे चरित्र व लेखन संपादित केले आहे. त्यामध्ये नामदेवाची जनाबाई व तुकोबाची बहिणाबाई यांच्या लिखाणाचा परामर्शही घेतला आहे. डॉ. शालिनी जावडेकर यांनी 'संत बहिणाबाईची गाथा' तर डॉ. सुवासिनी इर्लेकर यांनी 'जनाबाईचे निवडक

अभंग' समीक्षेसह प्रसिद्ध केले आहे. रामदासी वेणुबाई विषयी बरेच लिखाण मराठीत वाङ्मयात इतिहासात प्रसिद्ध झाले आहे.

**आधुनिक कालखंड**

आधुनिक कालखंडात स्त्रीविषयक ऐतिहासिक लिखाणासाठी निगडित शासकीय अभिलेख, वृत्तपत्रे, भाषणे, कायदेविषयक लेख, याचे संदर्भ, अहवाल, इतिवृत्ते, आठवणी, व आत्मचरित्रे, मौखिक इतिहास, वैयक्तिक पत्रव्यवहार, दैनंदिनी, लोकगीते, तसेच, एक विषय लेख मोनोग्राम्स (Monograms) आणि लेख यांचा उपयोग केला जातो. स्त्रियांबाबत इंग्रजीत उपलब्ध असलेल्या साहित्याच्या सन १९७६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या सूचीमध्ये १०० संदर्भाचा अंतर्भाव होतो. ४ वर्षानी कॅरोलोसाका यांनी Women of South Asia Guide to Resources (Millwood, New York, Cross International Publications 1980) या सूचीत ४,६२७ स्त्री विषयक संदर्भाची नोंद करण्यात आली होती. यानंतर प्रचंड प्रमाणात लिंगभेद आधारित लिखाण इंग्रजीसहित सर्व भारतीय भाषांतील नियतकालिकांमधून प्रसिद्ध होत आहे.

आधुनिक कालखंडात अशी साधने मोठ्या प्रमाणात उपलब्ध होतात. आता स्त्रियांचा इतिहास लिहिताना वर्ग जात वंश आणि लिंगभेद या दृष्टिकोनाचा वापर करून विश्लेषण केले जाते. स्त्रियांच्या आयुष्याच्या नित्य नवीन पैलूंवर प्रकाश टाकणारे आणि लिंगभेदाचे सामाजिक व राजकीय संदर्भात होणारे व्यापक परिणाम दर्शवणारे लेख व पुस्तके नित्यनियमाने प्रसिद्ध होत आहेत. मानव्यशास्त्राच्या सर्वच शाखांमधून स्त्री-विषयक संशोधने मोठ्या प्रमाणात होऊ लागले आहे, हे संशोधनही स्त्रियांचा इतिहास लिहिण्यास उपयोगी होणार आहे.

**रोजनिशी, आत्मवृत्ते, चरित्रे, आठवणी**

स्त्रियांनी लिहिलेल्या रोजनिशी, आत्मवृत्त, चरित्रे व आठवणी हे साहित्य स्त्री संदर्भ साधने म्हणून इतिहास लेखनामध्ये महत्त्व पूर्ण दस्तऐवज ठरतात. रोजनिशी डायरी या स्त्रियांच्या दबलेल्या आवाजातील सत्य उभे करून सांगणारे साधन म्हणून वापरले जाते. १९ व्या व २० व्या शतकांमध्ये फार थोड्या स्त्रियांच्या रोजनिशी उपलब्ध होतात. त्यामुळे स्त्रियांच्या जीवनात डोकावणे शक्य होते. रोजनिशींमध्ये स्त्रियांच्या वैयक्तिक जीवनाबरोबरच सभोवतालचे जग चित्रित झालेले असते. त्यातून त्यांचे खाजगी जीवन भावनिक गोष्टी समजतात. रोजनिशी पुढील पिढ्यांसाठी महत्त्व पूर्ण ठरतात.

आधुनिक काळातील स्त्रियांनी शिक्षण घेतल्यानंतर स्वत:चे आत्मवृत्ते, इतरांची चरित्रे व आठवणी अशा प्रकारचे लेखन प्रसिद्ध केले. अशा लिखाणांमधून समकालीन स्त्रियांचे कौटुंबिक जीवन, समाजातील स्थान, दर्जा, भूमिका, रूढी,  परंपरा यांचे उल्लेख मिळतात. 'माज्या जल्माची चित्तरकथा' हे शांताबाई कांबळे, 'जिणं आमुचं' हे बेबी कांबळे यांचे, सुनिता देशपांडे यांचे 'आहे मनोहर तरी', रमाबाई रानडे यांचे 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' असे काही उदाहरणे देता येतील.

**वृत्तपत्रे**

स्त्रीवादी इतिहास लेखनात समकालीन संदर्भ म्हणून वृत्तपत्रांचा वापर केला जातो, पण वृत्तपत्रीय लिखाण हे बऱ्याच वेळेला एकतर्फी व अतिरंजित असू शकते. त्या वेळेला वृत्तपत्रे लिखाण प्राथमिक संदर्भ साधनांशी पडताळून पाहिल्यास इतिहास लेखनात वापरता येते. वृत्तपत्रातून व्यंगचित्रे, जाहिराती, वृत्तविशेष, जागतिक बातम्या, आर्थिक घडामोडी याची माहिती मिळत असते. यामधून सामाजिक, आर्थिक जीवन, चळवळी, व्यक्ती व त्यांचे लिखाण यातून तात्कालीन स्त्रियांविषयी माहिती व अचूक संदर्भ मिळतात. अशी संदर्भ साधने स्त्रीविषयक दस्तऐवज संग्रहात एकत्रित केलेली असतात. 'स्पॅरो' मुंबई, 'अस्मितादर्श' व 'अलोचना' पुणे या ठिकाणी अशी संदर्भ साधने संग्रहित केलेली आहेत. त्याच प्रमाणे नियतकालिकाचे स्त्रीविषयक विशेष अंक सुद्धा बरीच माहिती पुरवतात.

**अपुराभिलेखीय साधने**

**मौखिक इतिहास**

मौखिक संदर्भ साधने ही दुय्यम संदर्भ साधने म्हणून ओळखली जातात. अशी साधने पाठांतराच्या, मुलाखतीच्या व भाषणाच्या माध्यमातून एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित झालेली असतात. 'नो डॉक्युमेंट नो हिस्ट्री' असे आधुनिक इतिहास लेखनशास्त्राचा प्रणेता लिओपोल्ड रांके म्हणतो. पण कागदपत्राच्या बाहेरच्या इतिहासाचे संकलन करायचे ते मौखिक साधनांच्या द्वारेच करावे लागेल. स्त्रियांचा इतिहासासाठी मौखिक संदर्भ साधने खूप उपयोगाची आहेत. स्त्रियांचा इतिहास लिहायचा तर त्यांनी निर्माण केलेल्या साहित्याचा उपयोग केला पाहिजे.

**स्वतंत्र चळवळीतील गीते**

भारतामध्ये सर्व भाषेमध्ये लोकगीतांची परंपरा प्राचीन आहे. लोकगीते आणि स्त्री गीते हे संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. ते संस्कृतीचे लेणे आहे, लोक समूहाने राहू लागले तेव्हाच लोकगीतांचे प्रचलन सुरू झाले असावे. ऋग्वेदकालीन यज्ञ विधी प्रसंगी गायली जाणारी सुक्ते लोकगीत परंपरेची जवळची वाटतात. वेद वाङ्मयात संहिता, अरण्यके, उपनिषदे यातून पारंपारिक लोकगीतांची मुळे पहावयास मिळतात. प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक लोकजीवनाचे संदर्भ स्वीकारत आजही लोकगीतांची परंपरा अस्तित्वात आहे. या लोकगीताच्या निरंतर प्रवाहात तत्कालीन समाजाचे बदलते स्वरूप प्रतिबिंब झालेले असते. लोकगीते व स्त्रीगीते लोक जीवनाचा भाग असल्याने अनेक उल्लेख संस्कृत वाङ्मयात आढळतात. महाकवी कालिदासाने जन्मोत्सव प्रसंगाच्या वर्णनात स्त्रियांच्या नृत्य गायनाचे उल्लेख केले आहे. जैन वाङ्मयातही 'बृहदकल्पसूत्र' ग्रंथात दळणकांडणा प्रसंगी स्त्रिया ओव्या गात याचा उल्लेख आहे.

घराघरातून रोज पहाटे जात्यावर दळण दळताना जात्यावर ओव्या गायला जायच्या. या ओव्यांमधून स्त्रियांचे सुखदुःख जसे दिसून येते तसे विविध काळात ज्या लोक चळवळी झाल्या त्या चळवळीचे प्रतिबिंबही या ओव्यांमधून दिसून येते. मग ती आंबेडकरी चळवळ असेल, स्वातंत्र्याची चळवळ असेल

अशा विविध चळवळीत स्त्रियांचे योगदान राहिले आहे त्यांनी हे योगदान जात्यावरील ओव्या मध्ये घुमलेले आहे.

गांधी माझा सखा ग, ओवी मी गाईन
तुरुंगात जाऊन, स्वराज्य मी मिळवीन
जवाहर माझा बंधू गं, ओवी त्याला गाऊया
उठा-उठा पतीराजा हो स्वराज्य आता मिळवूया

**आंबेडकरी चळवळीतील ओवी**

पहिली माझी ओवी ग, भगवान बुद्धाला
जगाच्या हितासाठी, बौद्ध धम्म काढायला
दुसरी माझी ओवी ग, बाबा भिमरायाला
दलिताच्या कुळात, हिरा ग जन्मला
तिसरी माझी ओवी ग, रमाबाई पूजीन
धन्य-धन्य माऊली, गेली एक होऊन

स्त्रिया स्वत:च्या भाव-भावनांना जात्यावरच्या ओवीतून वाट मोकळी करून द्यायच्या. या ओवीमधून स्त्रियांच्या दु:खापासून ते त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक परिस्थिती, त्यांच्या इच्छा-आकांक्षा मांडायच्या. स्त्रियांच्या अभिव्यक्तीचं हे सशक्त माध्यम होतं. स्त्रियांचा इतिहास लिहायचा तर त्यांनी निर्माण केलेल्या या मौखिक साहित्याचा अभ्यास करावा लागणार आहे.

यादव काळातील लोकगीतांचे अनेक उल्लेख तात्कालीन वाङ्मयात येतात. महानुभाव वाङ्मयातील 'ढवळे' मौखिक स्त्री गीतांच्या परंपरेत एक टप्पा मानला जातो. यादव काळापासून ब्रिटिश काळापर्यंत व आजही संस्कार विधी, धार्मिक मनोरंजनात्मक लोकगीते जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. ह्या लोकगीतांची परंपरा जतन करून समृद्ध करण्यात भारतीय स्त्रियांचा फार मोठा वाटा आहे. स्त्रियांच्या जीवनातील सुख दु:खाचे भाव-भावनांचे, त्याच्या जीवनशैलीचे प्रतिबिंब लोकगीतात दिसते. स्त्रियांची सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी जाणून घ्यायची असेल तर स्त्री गीताशिवाय अन्य साधने दुर्मिळ आहेत, असे म्हणावे लागेल. त्यामुळे स्त्री जीवनाच्या अभ्यासात स्त्री गीताचे महत्त्व वाढले आहे. स्त्री गीतातून स्त्रियांच्या वैयक्तिक जीवनाच्या आविष्कारांबरोबरच समाज जीवनाचे ही विविध पैलू पुढे येतात.

लेकीचा ग जन्म । घातला कुणा येड्यानं ।
माझे ग सखे बाई । बैल राबतो भाड्याने ।
लेकीचा ग जन्म । जसा बाभळीचा पाला ।
धनी कोणाचा ग । कोण झाला ।

या गीतातून मुलीच्या जन्म हा भाड्याने राबणाऱ्या बैलासारखा आहे. तर पुरूषप्रधान  संस्कृतीत तिला आलेल्या गौण स्थान, तिचे नाकारलेले अस्तित्व बाभळीच्या पाल्याप्रमाणे माती-मोल आहे. अशा क्लेशकारक भावना स्त्री आपल्या काव्यातून व्यक्त करत आली आहे.

अशा अनेक स्त्री गीतांचे समाजशास्त्रज्ञांनी व लोकसाहित्याच्या अभ्यासकांनी वेगवेगळे वर्गीकरण केले आहे. त्यामध्ये धर्म गीते, संस्कार गीते, देव-देवता विषयक उपासना गीते, सण उत्सवा प्रसंगी गायली जाणारी स्त्री गीते, श्रम गीते, ओवीगीते असे विविध प्रकार पडतात. काही विशिष्ट कारण प्रसंगाने तर काही वेळेस भावना उद्रेकामुळे गायलेली ही गीते आज मौखिक परंपरेतून इतिहासाची साधने बनली आहे. मौखिक परंपरेतील  उखाण्यांचा अभ्यासही आपणांस करता येईल.

**मुलाखती**

मुलाखती ही समकालीन बाबींची माहिती मिळवण्याची पद्धती आहे. मुलाखतीतून मिळालेली माहिती संशोधकाला पुरावा म्हणून वापरायचे असल्यामुळे मिळालेल्या माहितीची विश्वसनीयता पडताळून पाहणे गरजेचे असते. त्याची सत्यता इतर पुराव्याच्या आधारे पडताळून पाहता येते. मुलाखत हे मौखिक इतिहासाचे साधन आहे, संपूर्ण इतिहास नव्हे हे आपण लक्षात घ्यायला हवे. मुलाखतीचे चिकित्सक विश्लेषण करावे लागते. मुलाखतदाराच्या व्यक्तिमत्वाच्या छटा माहीत असल्यास त्याच्या मानसिकतेची, वैचारिक भूमिकेची, राजकीय व सामाजिक निष्ठांची पूर्वग्रहांची अगोदर माहिती असल्यास त्या पार्श्वभूमीवर त्यांनी केलेल्या विधानांचा अर्थबोध/अन्वयार्थ लावता येतो. तसेच, त्यांनी काही मुद्द्यावर बाळगलेल्या मौनाचाही अर्थ लावता येतो. तो अशा प्रकारे की बोलण्याच्या ओघात परस्पर विसंगत विधाने आली काळाच्या निर्देशात चूक आढळली किंवा माहिती देताना गोंधळ झाल्यासारखे वाटले तर त्या गोंधळाची कारणे शोधणे आणि एकूणच माहितीचे विश्वासार्हतेची खात्री करून घेणे श्रेयस्कर ठरते. स्त्रियांचा इतिहास आणि वंचितांचा इतिहास लिहिण्यासाठी मौखिक परंपरा उपयुक्त ठरतात. अनुल्लेखितांच्या योगदानाची व कर्तृत्वाची नोंद आपण मौखिक इतिहासाच्या मुलाखती द्वारे करू शकतो.

इतिहास लेखन करत असताना अनेक संशोधकांनी आपल्या लिखाणासाठी समकालीन व्यक्तींच्या मुलाखती घेतलेल्या असतात. अशा मुलाखती संदर्भात त्यांच्या लिखाणातून मिळतात. जेराल्डिन फोर्ब्स हिचे 'वुमन इन मॉडर्न इंडिया' हे पुस्तक  केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेसने १९९८ मध्ये प्रसिद्ध केले. या पुस्तकाच्या लिखाणांसाठी स्वतंत्र चळवळीच्या संदर्भात घेतलेल्या मुलाखती तिने आपल्या पुस्तकात प्रसिद्ध केल्या आहे. यात लक्ष्मी स्वामीनाथन सहगल, गोदावरी परुळेकर, सुमती चौधरी, सुचिता कृपलानी, दुर्गाबाई देशमुख यांच्या मुलाखती या पुस्तकात नोंदवलेल्या आहेत. अशा अनेक मुलाखतीतून स्त्री विषयक माहिती उपलब्ध होते.

स्त्रियांचे इतिहास लिहिण्यासाठी मुलाखत तंत्राचा उपयोग मोठ्या प्रमाणात केला जात आहे 'आम्ही ही इतिहास घडवला' हे उर्मिला पवार व मिनाक्षी मून यांनी या पुस्तकात आंबेडकरी चळवळीतील स्त्रियांच्या योगदान स्पष्ट केले आहे. उर्वशी बुटालिया यांचे 'द आदर साईड ऑफ सायलेन्स' या पुस्तकात देशाच्या

फाळणी नंतर स्त्रियांना भोगाव्या लागलेल्या यातनांचे वर्णन मुलाखतींद्वारा संकलित केले आहे. आज मोठ्या प्रमाणात स्त्रियांच्या विविध चळवळीतील योगदानाचा इतिहास मुलाखतींद्वारा संकलित करण्याचा प्रयत्न केले जात आहे.

**जनगणना अहवाल**

वसाहत काळात किंग्जले डेव्हिस या लोकसंख्या शास्त्रज्ञाने १८७१ ते १९४१ या कालखंडात भारतीय जनगणना अहवाल तयार केला. त्याच प्रमाणे १८८२, १९०७, १९०९ मध्ये 'इपीरियल गॅझेटियर्स' प्रसिद्ध करण्यात आले. स्वातंत्र्योत्तर कालखंडातही १९५१ पासून दर दहा वर्षांनी जनगणना केली जाते. या जनगणना अहवालातून स्त्रीविषयक माहिती उपलब्ध होते. जनगणना अभ्यासाचे लिंगभेद हे सहजपणे ओळखता येणारी गुण वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळे भारतातील एकूण लोकसंख्येत पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण, साक्षरता, शिक्षण, ग्रामीण, शहरी भागात राहणाऱ्या स्त्रिया यांची आकडेवारी उपलब्ध होऊ शकते. तसेच, तुलनात्मक दृष्ट्या कोणत्या राज्यात स्त्रियांचे प्रमाण सर्वात जास्त किंवा कमी आहे, तसेच, साक्षरता, शिक्षण, स्त्रीभृणहत्या, एड्स, वेश्याकाम करणाऱ्या स्त्रिया यांची आकडेवारी ही मिळते. स्त्री अभ्यास यामध्ये जनगणनेतून मिळणाऱ्या स्त्रीविषयक संख्येचे महत्त्व वाढू लागले आहे. स्त्रियांची संख्या पुरुषांच्या तुलनेत कमी आढळल्याने स्त्री भृणहत्या रोखणारा विशेष कायदा करावा लागला. स्त्रियांच्या सन्मानाची जाणीव-जागृती करण्यावर शासनाला भर द्यावा लागला. अशा अनेक प्रकारे जनगणना अहवाल इतिहास लेखनासाठी उपयोगी ठरू शकतात.

**स्त्रियांचा इतिहास लिहिण्याच्या पद्धती**

स्त्रियांचा इतिहास हा बहुआयामी व सर्व मानवी जीवनाशी संबंधित आहे. आधुनिक काळातील १९ व्या शतकापासून स्त्रियांच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक सहभाग, तिचे कर्तेपण, तिच्या समस्या याची दखल घेतली गेली आहे. इतिहास संशोधकाला प्रारंभ करताना संशोधनकर्त्याला आपण संशोधन कोणत्या विषयात करायचे? कोणत्या दृष्टिकोनातून करायचे? त्याविषयी कोणती स्त्रोत साधने वापरावी लागतील? ती कुठे सापडतील? याविषयी माहिती संकलित करण्याच्या पद्धती कोणत्या? त्यापैकी कोणत्या पद्धतीचा वापर आपल्या संशोधनासाठी लाभदायक ठरेल? अशा विविध प्रकारचे प्रश्न संशोधकांसमोर असतात. त्याची उत्तरे त्याला शोधावी लागतात.

**संशोधनाचे प्रकार**

संशोधन कार्याचे स्वरूप सामान्यत: तीन प्रकारे प्रकारचे असते.

**कथनात्मक किंवा निवेदनात्मक**

एखाद्या घटनेबाबत प्रसंगाबाबत अगर विषयासंबंधी नवीन माहिती किंवा अज्ञात असलेली माहिती मिळून ती सुसूत्र पद्धतीने मांडणे हा संशोधनाचा पहिला प्रकार होय! या प्रकाराचा उद्देश गतकालीन अज्ञात बाबींवर प्रकाशझोत टाकणे, गतकाळा संबंधीच्या ज्ञानात नवीन भर टाकणे, ज्ञानाचे नवे दालन खुले करणे हे

असते. यात नव्या माहितीच्या संशोधनावर व त्याच्या पद्धतशीर सुसंगत मांडणीवर भर असतो. या प्रकारात जगभरातील स्त्रियांच्या कार्यकर्तृत्वाच्या इतिहास लिहिला जाऊ लागला आहे.

**विश्लेषणात्मक लिखाण**

यात वर्ण्य विषयासंबंधी नवीन माहिति प्रकाशात आणण्यापेक्षा उपलब्ध ऐतिहासिक माहितीचा, ऐतिहासिक साधनांचा, नव्या दृष्टिकोनातून अभ्यास करून प्रस्थापित प्रमेयाहून भिन्न प्रमेय मांडणे हा उद्देश असतो. उपलब्ध साधन-सामग्रीचे पुन्हा परीक्षण करून प्रचलित मतापेक्षा वेगळे निष्कर्ष काढण्याचा अशा संशोधनाचा प्रयत्न असतो. जुन्या नव्या पुराव्यांचा मेळ घालत उपलब्ध माहितीचा नवा अन्वयार्थ संशोधक लावत असतो. आज पर्यंतच्या इतिहासाच्या साधनांतील स्त्रियांचा शोध घेऊन स्त्रीवादी दृष्टिकोन वापरून इतिहासाचे मूल्यमापन केले जात आहे.

**मूलगामी संशोधन**

हे संशोधन वरील दोन प्रकारापेक्षा अधिक मौलिक व तात्विक स्वरुपाचे असते. इतिहास विषयाच्या सखोल व प्रदीर्घ चिंतनापासून त्याबाबत काही नवे सिद्धांत मांडण्याचा प्रयत्न असतो. यात उपलब्ध ऐतिहासिक माहितीचा, साधन-सामग्रीचा वापर करण्यात येत असला तरी त्यातून काही सर्वसामान्य मूलगामी सिद्धांत मांडले जातात. त्यामुळे इतिहास विषयाला नवी तात्विक बैठक दिली जाते. अशा प्रकारच्या संशोधनासाठी केवळ एखाद्या घटनेचा अगर व्यक्तीच्या कार्यांच्या अभ्यास पुरेसा नसतो. तर दीर्घ कालखंडातील घटना, प्रवाहांचा, विविध मानवी समूहांचा जीवन प्रवाहांचा, अगर गतकालीन मानवी जीवनाच्या विविध घटकांचा अभ्यास करून त्यातील अंतस्थ सूत्र उलगडून दाखवण्याचा संशोधकाचा प्रयत्न असतो. ओसवाल्ड स्पेन्गलर, अर्नाल्ड टॉयन्बी यांनी विविध मानवी संस्कृतीचा केलेला अभ्यास या वर्गात मोडतो. तसेच, इतिहास विषयाच्या कार्यपद्धती संबंधी, ऐतिहासिक लेखन प्रक्रियेसंबंधी सखोल चिंतन करून त्याबाबत मांडलेले नवीन प्रमेयाचा या प्रकारात समाविष्ट होतात. अशा संशोधनाला केवळ बौद्धिकच नव्हे तर भक्कम तात्विक बैठक असते. आणि मांडलेले सिद्धांत मूलगामी स्वरुपाचे असतात.

उदा. शरद पाटील यांनी स्त्रीवादी ऐतिहासिक मांडणी भारतीय पुरूषप्रधान व्यवस्थेच्या जडण-घडणीसंबंधी भाष्य करताना जाती व्यवस्था आणि लिंग-भाव यांना केंद्रस्थानी ठेवावे लागते, ब्राह्मणी पुरूषसत्तेचे स्वरूप, संरचना (ब्राह्मणी संस्कृतीकरणाचा सिद्धांत), प्रक्रिया, स्त्रीवादी इतिहास लेखनातून जाती व्यवस्थेविषयीच्या ज्ञान विश्वाचा उगम झाला नाही. जात व स्त्री शोषण यावर अजूनही ऐतिहासिक कार्य होणे बाकी आहे. हा विषय समाजशास्त्रीय ज्ञान विश्वात जात व वर्ग या वादविवादात सापडला आहे.

स्त्रियांचा अभ्यास करताना भिन्नत्वाची संकल्पना (जातीनुसार स्त्रियांच्या शोषणाचा विचार) केंद्रस्थानी ठेवावी लागणार आहे, ही महात्मा फुले याची सैद्धांतिक मांडणी होय!

एकंदरीत स्त्रीवादी सैद्धांतिक मांडणी पाहता यामध्ये झालेले संकल्पनात्मक बदल लक्षात घ्यावे लागतील. भारताच्या संदर्भाने जातीनिष्ठ आणि परंपरांमध्ये गुंतलेल्या पुरुषप्रधान व्यवस्थेचा विचार करणे आवश्यक आहे.

हे संशोधन प्रकार लक्षात घेतल्यानंतर स्त्रियांच्या इतिहास संशोधनासाठी कोणत्या प्रकारची संशोधन पद्धती उपयोगात येतील याचा विचार संशोधन करताना करावा लागणार आहे. हा विचार विषयाच्या अनुषंगाने करावा लागणार आहे. स्त्रियांसंबंधीचे संशोधन विविध अभ्यास शाखेमधून होत आहे. त्या अभ्यास शाखा आपापल्या विषयाच्या अनुषंगाने त्या अभ्यास शास्त्राच्या संशोधन पद्धती वापरून संशोधन करत असतात. इतिहास विषयाच्या संशोधनकर्त्याला मात्र स्त्रियांचा इतिहास लिहित असताना त्याच्या विषयाच्या अनुषंगाने विविध शाखेमधील झालेल्या स्त्री अभ्यास उपयोगी पडतो. तसेच, त्या शाखांमधून वापरले गेलेल्या संशोधन पद्धतीही तो इतिहासासाठी वापरू शकतो. संपूर्ण मानवी जीवनाचा अभ्यास करणारे मिशेल फूकोसारखे इतिहासाचे अभ्यासक एखाद्या लहान खेड्याच्या जीवनातील परिवर्तनाचा सखोल अभ्यास करण्यासाठी वेगवेगळ्या ज्ञानशाखांचा वापर करत आहेत व त्यासाठी नवी साधने वापरत आहेत.

अलीकडच्या काळात ऐतिहासिक साधनांचे क्षेत्र अधिकाधिक विस्तारत आहे. इतिहास लेखनात ॲनल्स, सबाल्टर्न, संपूर्ण इतिहास, सामाजिक इतिहास, तुलनात्मक इतिहास, संरचनावादी इतिहास, स्त्रियांचा इतिहास, स्त्रीवादी इतिहास लेखन अशा विविध प्रवाहातून इतिहास लेखन होत आहे. या प्रवाहांनी नव्या ऐतिहासिक साधनांचे महत्त्व किंवा प्रचलित साधनांचा नव्या पद्धतीने वापर केला जात आहे. त्यामुळे स्त्रियांचा इतिहास लिहायचा तर लोकगीते, लोककथा, दंतकथा, पौराणिक कथा, मिथक कथा अशा अपारंपारिक साधनांचा वापर संशोधक करीत आहेत. लेवी स्ट्रॉस सारखे पुरातत्त्व विशारद मिथकांचा शास्त्रीय अभ्यास करून त्यातील आंतरिक रचना प्रकाशात आणत आहेत.

**स्वयं अध्ययन प्रश्न ३**

१) लिखित साधने निर्माण होण्यापूर्वीचा इतिहास ....... साधनांच्या आधारे लिहिला जातो.

अ) पुरातत्त्वाच्या ब) धार्मिक साहित्य क) लोकसाहित्य ड) वरील सर्व

२) ............. काळात स्त्रियांना पुरुषांबरोबरचे गौरवाचे स्थान प्राप्त होते.

अ) वेदकाळ ब) उत्तर वैदिक काळ क) मध्ययुग ड) वरील सर्व

३) वेदकाळातील साहित्याची भाषा ............ आहे.

अ) संस्कृत ब) पाली क) प्राकृत ड) मराठी

४) मौर्यकालीन स्त्री जीवनाचा अभ्यास करण्यासाठी ............ याच्या अर्थशास्त्र ग्रंथाचा उपयोग होतो.

अ) कौटिल्य ब) हेमाद्री क) कालिदास ड) भवभूती

५) ................ स्मृतीमध्ये विशिष्ट परिस्थितीत पुनर्विवाहाची परवानगी दिली आहे.

अ) नारदस्मृति ब) मनुस्मृती क) याज्ञवल्क्य स्मृती ड) वरील सर्व

६) ............ याने 'चातुर्वर्णचिंतामणी' हा ग्रंथ लिहिला.

अ) कौटिल्य ब) हेमाद्री क) कालिदास ड) भवभूती

७) वाकाटक राणी प्रभावती गुप्ता हिची माहिती अकोल्यातील .......... येथील शिलालेखातून मिळते.

अ) वाशिम ब) गिरनार क) ऐहोळ ड) यापैकी नाही

८) थेरी गाथा या ग्रंथात .......... बौद्ध भिक्षुणीने आपले जीवन चरित्र वर्णन केले आहे.

अ) ७३ ब) ७० क) ७५ ड) ८०

९) गाथा सप्तशती हा ग्रंथ ........ यांनी लिहिला.

अ) हाल ब) कालिदास क) भास ड) भावी

१०) राजस्थानामधील स्त्रियांची स्थिती ............ शिलालेखातून मिळते.

अ) कुंभलगड ब) चित्तोड क) दिलवाडा ड) वरील सर्व

११) रजिया सुलतान हिने .......... हा ग्रंथ लिहिला.

अ) चाचनामा ब) रेहला क) पृथ्वीराजरासो ड) वरील सर्व

१२) नुरजहाँची माहिती ............ ग्रंथातून मिळते.

अ) चाचनामा ब) तुझक- ई- जहांगीरी

क) पातशहानामा ड) बाबरनामा

१३) कंपनीविजयम या ग्रंथामधून ......... हिची माहिती मिळते.

अ) गंगादेवी ब) अनुसया क) जगमोहिनी ड) होणाई

१४) विजयनगरच्या रॉयल कोर्टमध्ये ....... ही 'वोदुआ' (वाचणारी स्त्री) होती.

अ) जगमोहिनी ब) गंगादेवी क) तिरूमलंबा ड) होनाई

१५) मराठीतील पहिले स्त्रीरचित काव्य ......... आहे.

अ) ढवळे ब) ताटीचे अभंग क) जनाबाईचे अभंग ड) बहिणाबाईची गाथा

१६) स्त्रियांच्या दबलेल्या आवाजातील सत्य सांगणारे साधन म्हणून ........ ओळखले जाते.

अ) डायरी ब) अर्काईज क) इंटरनेट ड) हस्तलिखित

१७) जोराल्डिन फोब्र्स हिने............. हे पुस्तक लिहिले.

अ) वुमेन इन मॉडर्न इंडिया ब) वुमेन इन मिडिवल इंडिया

क) वुमेन एशंट इंडिया ड) वुमन इन मॉडर्न वर्ल्ड

१८) नवे सिद्धांत मांडण्याचा प्रयत्न .......... संशोधनांमध्ये केला जातो.

अ) मूलगामी संशोधन ब) विश्लेषणात्मक संशोधन

क) निवेदनात्मक संशोधन ड) वरील कोणतेही नाही.

**ब) योग्य जोड्या जुळवा.**

१)

| | अ | | ब |
|---|---|---|---|
| १ | वेदात उल्लेख असणाऱ्या स्त्रिया | अ | कौशल्य, सुमित्रा, कैकयी |
| २ | महाभारतातील स्त्रिया | ब | आपला, घोषा, गोधा |
| ३ | रामायणातील स्त्रिया | क | द्रौपदी, सुभद्रा, सत्यभामा |
| ४ | उपनिषदातील स्त्रिया | ड | गार्गी, मैत्रेयी |

अ) १-ड, २-अ, ३-ब, ४-क        ब) १-ब, २-क, ३-अ, ४-ड

क) १-क, २-ड, ३-ब, ४-अ        ड) १-ड, २-ब, ३-अ, ४-क

२)

| | अ | | ब |
|---|---|---|---|
| १ | विजयनगर कालीन ताम्रपत्र | अ | राजस्थानमधील स्त्रियांची माहिती मिळते. |
| २ | कुंभलगड शिलालेख | ब | राणी जय तुल्लादेवीच्या आज्ञेने लिहिला. |
| ३ | चित्तोडगढ चा शिलालेख | क | स्थानिक व संस्कृत भाषेत आहे. |
| ४ | भिलवाडा शिलालेख | ड | शासनम, जयपत्रम, आज्ञापत्रम, प्रज्ञापत्रम, इ. |

अ) १-ड, २-अ, ३-ब, ४-क        ब) १-ब, २-क, ३-अ, ४-ड

क) १-क, २-ड, ३-ब, ४-अ        ड) १-ड, २-ब, ३-अ, ४-क

३)

| | अ | | ब |
|---|---|---|---|
| १ | कृष्णदेवरायाची पत्नी जगमोहिनी | अ | 'मोराची परिणयन' प्रेम काव्य |
| २ | रामदेवरायाची पत्नी मोहनानगी | ब | विजयनगरच्या विठ्ठल मंदिरातील आलेखाची रचना केली |
| ३ | अच्युत राजाची राणी तिरुमलंबा | क | वरदबिंका परिणयन चंपू काव्य |
| ४ | बुक्काची पत्नी होनाई | ड | तुलकपंचकाय विरहकाव्य |

अ) १-ड, २-अ, ३-क, ४-ब        ब) १-ब, २-क, ३-अ, ४-ड

क) १-क, २-ड, ३-ब, ४-अ        ड) १-ड, २-ब, ३-अ, ४-क

## १.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१) अभिजात – उच्च दर्जाचे सुसंस्कृत

२) ऋतुमती – रजस्वला स्त्री ( मुलगी वयात येणे)

३) स्वयंवर – स्वत:च्या आवडीने इच्छेने पतीची निवड करणे

४) नियोग – संतती प्राप्तीसाठी अवलंबलेली एक पद्धती या पद्धतीत (पतीचा मृत्यू, असाध्य रोग, नपुंसकता इ. कारणांमुळे स्त्री निपुत्रिक असेल तर तिने केवळ पुत्र प्राप्ती साठी आपद्धर्म म्हणून अन्य पुरुषापासून विधिवत संतती प्राप्त करून घेणे.

५) ब्रह्म विवाह – मुलीचे वडील वेद अध्ययनात पारंगत असलेल्या मुलास आपल्या मुली बरोबर विवाह करण्यास आमंत्रित करतात.

६) दैव विवाह – यज्ञाच्या ऋत्विजाला कन्यादान केले जाते.

७) आर्ष विवाह – वरपक्षाकडून वधू पक्षाला गाय व बैल दिला जातो.

८) प्रजापत्य विवाह – या विवाहात पत्नी जिवंत असताना दुसरा विवाह करू नये तसेच, गृहस्थाश्रमाचा त्याग करून वानप्रस्थ किंवा संन्यास आश्रम स्वीकार करू नये. पत्नीच्या मृत्यू नंतर मात्र या गोष्टीचे स्वातंत्र्य होते.

९) चंपूकाव्य – हा श्रव्यकाव्याचा प्रकार असून ते गद्य व पद्य मिश्रीत काव्य आहे.

१०) राजमहिषी – पट्टराणी

## १.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयं अध्ययन प्रश्न १**

अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा.

| | | |
|---|---|---|
| १) १९९१ | २) एस.एन.डी.टी. | ३) अलोचना दृष्टी |
| ४) अक्षरा | ५) १९७९ | ६) वरील सर्व |
| ७) ३ | ८) श्रीमती फुलरेणू | ९) समानतेच्या दिशेने |
| १०) १९९३ | | |

ब) विधान चूक की बरोबर ओळखा

१) पहिले विधान बरोबर दुसरे चूक

२) पहिले विधान बरोबर दुसरे चूक

क) योग्य जोड्या जुळवा.

१–ड, २– अ, ३–ब. ४–क

**स्वयं अध्ययन प्रश्न २**

अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा.

१) आधुनिक काळ २) दुय्यम ३) स्त्रीवादी

४) ताराबाई शिंदे ५) पुरूषार्थ ६) पुरूष

७) स्त्रीवादी दृष्टिकोनातून ८) सामाजिक व सांस्कृतिक

ब) विधान चूक की बरोबर ओळखा

१) दोन्ही विधाने बरोबर

२) दोन्ही विधाने बरोबर

**स्वयं अध्ययन प्रश्न ३**

अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा.

१) पुरातत्त्व २) वेदकाळ ३) संस्कृत ४) कौटिल्य

५) नारदस्मृती ६) हेमाद्री ७) वाशिम ८) ७३

९) हाल १०) कुंभलगढ ११) चाचनामा १२) तुझक-ई-जंहागीरी

१३) गंगादेवी १४) तिरूमलंबा १५) ढवळे १६) डायरी

१७) वुमेन इन मॉडर्न इंडिया १८) मूलगामी संशोधन

क) योग्य जोड्या जुळवा.

१-ड, २- अ, ३-ब. ४-क

## १.५ सारांश

स्त्रीवादी इतिहासाची स्वतंत्र शाखा विकसित होत आहे. स्त्रियांचा इतिहास या शाखेने इतिहासाला प्रभावित केले आहे. इतिहासातील स्त्रियांचे स्थान शोधण्याचा प्रयत्न या शाखेमार्फत केला जातो. समाजातील त्याच्या दुय्यम स्थानाविषयी चिकित्सा केली जाते. ही शाखा केवळ दुय्यम स्थानाची चिकित्सा करून थांबत नाही तर स्त्रियांच्या उत्थानासाठी इतिहासात घडून गेलेल्या स्त्रियांचा इतिहास स्त्रियांच्या प्रगतीस कसा प्रेरणादायी होईल यांची मांडणीही करते. समाज निर्मितीमध्ये स्त्रियांची भूमिका शोधण्याचा प्रयत्न करते. स्त्रियांचा इतिहास म्हणजे स्त्रियांनी इतिहासात त्यांच्या दुय्यम स्थानाविरूद्ध दिलेला लढा असे आपणांस म्हणता येईल. त्यांना मिळालेल्या संधीचा उपयोग करून स्वतःचे व समाजाचे जीवन उजळून टाकले. त्यांच्या या संघर्षाचा इतिहास आपणांस मांडावा लागतो. हा इतिहास मांडताना तिच्या संघर्षाचा स्त्रीवादी दृष्टिकोनातून अभ्यास करून इतिहासाचे पुनर्लेखन होणे गरजेचे आहे.

मानवी इतिहासाच्या जडण घडणीत पुरुषांपेक्षा स्त्रियांना दुय्यमत्व का आणि कसे आले याचे विश्लेषण, स्पष्टीकरण व ते नष्ट करण्यासाठी अवलंबायचे मार्ग, आव्हाने व चळवळी याची मांडणी व

अभ्यास स्त्रियांच्या इतिहास लेखनामध्ये केला जातो. आधुनिक समाजाच्या निर्मितीमध्ये स्त्री-पुरूष समानता प्रस्थापित करण्यामध्ये स्त्रीवादी, स्त्रियांच्या इतिहासाचे महत्त्व आपणास अधोरेखित करावे लागेल. एकंदरीत सर्व प्रकारच्या इतिहास लेखनामध्ये स्त्रीवादी दृष्टिकोन वापरून त्याचे पुनर्लेखन झाले पाहिजे. तरच मानवजातीचा समग्र इतिहास लिहिला जाऊ शकतो.

आधुनिक काळात स्त्रियांच्या दुय्यम स्थानाविषयी अभ्यास होऊ लागले यातूनच लिंग-भावाची ओळख होऊन स्त्रियांना दुय्यमत्व देणाऱ्या, स्त्री-पुरूष असमानता अधोरेखित करणाऱ्या रूढीपरंपरा संस्कृतीचा अभ्यास होऊन इतिहासातील स्त्रियांचे स्थान शोधनाचा प्रयत्न होऊ लागला. स्त्रीवादी सिद्धांत व संकल्पनेची मदत घेऊन स्त्रीविषयी इतिहासाचे पुनर्लेखन व पुनर्बांधणी करण्याचा प्रयत्न झाला. या प्रयत्नात स्त्रिया इतिहासातून अदृश्य असल्याचे लक्षात आले. भारतीय इतिहासात आणि एकूणच जगाच्या इतिहासातही स्त्रिया अदृश्यमान राहिल्या याची कारण मिमांसा केली गेली.

इतिहास या वर्ण्य विषयाचा संबंध भूतकाळाशी असतो. एखाद्या गोष्टीचा इतिहास लिहावयाचा तर आपणाला पुरावा द्यावा लागतो. पुरावा न देता जे काही आपण लिहू/बोलू तो अंदाज होईल. किंवा काल्पनिक कथन/लिखाण होईल. इतिहासात काल्पनिकतेला स्थान नसते. जे जसे घडले तसे पुराव्याच्या आधारे मांडणे, याला इतिहास म्हटले जाते. स्त्रियांच्या इतिहासाची साधने ही नवीन नाहीत. जी इतिहासाची साधने आहेत त्या साधनांमधील स्त्रियांचा नोंदी आपणाला शोधाव्या लागतात. त्या आधारे समाजातील स्त्रियांचे स्थान, त्याचे कार्य कर्तृत्वाचा इतिहास आपणास मांडावा लागेल.

आधुनिक काळात मात्र ऐतिहासिक साधनांचे क्षेत्र अधिकाधिक विस्तारत आहे. इतिहास लेखनात ॲनल्स, सबाल्टर्न, संपूर्ण इतिहास, सामाजिक इतिहास, तुलनात्मक इतिहास, संरचना वादी इतिहास, स्त्रीवादी इतिहास असे नानाविध प्रवाह प्रचारात आले आहेत. त्यांनी नव्या ऐतिहासिक साधनांचे महत्त्व, किंवा प्रचलित साधनांचा नव्या पद्धतीने वापर केला आहे. त्यामुळे लोककथा, लोकगीते, पौराणिक कथा, मिथक कथा, अशा पारंपारिक साधनांचा वापर संशोधक करीत आहे. तसेच, मुलाखती सारख्या तंत्राचा उपयोग स्त्रियांचा इतिहास लिहिण्यासाठी मोठ्या प्रमाणात केला जात आहे.

आधुनिक कालखंडात स्त्री विषयक ऐतिहासिक लिखाणासाठी निगडित शासकीय अभिलेख, वृत्तपत्रे, भाषणे, कायदेविषयक लेख, याचे संदर्भ, अहवाल, इतिवृत्ते, आठवणी, व आत्मचरित्रे, मौखिक इतिहास, वैयक्तिक पत्रव्यवहार, दैनंदिनी, लोकगीते, तसेच, एक विषयलेख, मोनोग्राम्स (Monograms) आणि लेख यांचा उपयोग केला जातो.

पुरूषसत्ताक समाज व्यवस्थेत स्त्रिया इतिहासातून अदृश्य राहिल्या. जी काही संदर्भ साधने आहेत त्या संदर्भ साधनांमध्ये स्त्रियांचे त्रोटक ओझरते उल्लेख येतात. पण आधुनिक काळात इतिहास विषयाची व्याप्ती वाढली तसे इतिहासाच्या साधनांसंबंधित नवा विचार होऊ लागला. स्त्रीवादी सिद्धांकनाने पारंपारिक इतिहास साधनांकडे पाहण्याची, त्याची चिकित्सा करण्याची नवी दृष्टी दिली. स्त्रियांचे कार्य कर्तृत्व मांडायचे तर

पारंपारिक साधनांबरोबरच लोकसाहित्याचा उपयोग मोठ्या प्रमाणात होऊ लागला. या सर्व साधनांचा उपयोग करून स्त्रियांचा इतिहास लिहिला जातो आहे.

### १.६ सरावासाठी स्वाध्याय

**अ) टिपा लिहा**

१) स्त्रियांच्या इतिहास लेखनाचे महत्त्व

२) इतिहासातील दृश्यमान स्त्रिया

३) वैदिक कालीन स्त्री संदर्भ साधने

४) बौद्धकालीन स्त्री संदर्भ साधने

५) जैन साहित्यातील संदर्भ साधने

**ब) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) स्त्रियांच्या इतिहास लेखनाचे महत्त्व स्पष्ट करा.

२) 'इतिहासात स्त्रिया दृश्यमान का नाहीत' निबंध लिहा.

३) स्त्रियांच्या इतिहासाची साधने स्पष्ट करा.

४) स्त्रियांच्या इतिहासाची प्राचीन साधने स्पष्ट करा.

५) स्त्रियांच्या इतिहासाची मध्ययुगीन साधने स्पष्ट करा.

६) स्त्रियांच्या इतिहासाची आधुनिक साधने स्पष्ट करा.

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१) भारतीय इतिहासातील स्त्रिया- डॉ. पद्मजा पाटील, डॉ. सौ. शोभना जाधव, फडके प्रकाशन कोल्हापूर, प्रथमावृत्ती २००७

२) स्त्रीवाद, सुमती लांडे व श्रुती तांबे, शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर प्रथमावृत्ती, २००७.

३) भारतीय स्त्रीजीवन, गीता साने, मौज प्रकाशन, मुंबई, १९९७

४) स्त्रियांचे खेळ आणि गाणी, बाबर सरोजिनी, महाराष्ट्र राज्य लोक साहित्य समिती, पुणे, प्रथमावृत्ती १९७७

५) महाराष्ट्रातील स्त्रीविषयक सुधारणावादाचे सत्ताकारण डॉ. नारायण भोसले, द. ताईची प्रकाशन, प्रथमावृत्ती २००८


❑❑❑

# घटक २
# स्त्रियांच्या इतिहास लेखनातील प्रवाह

**अनुक्रमणिका**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

  २.२.१ वसाहतवादी व राष्ट्रवादी

  २.२.२ मार्क्सवादी व सबाल्टर्न

  २.२.३ स्त्रीवादी व अब्राह्मणी

२.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.५ सारांश

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## २.० उद्दिष्टे

- विविध इतिहास लेखन प्रवाहातील स्त्रियांसंबंधीच्या दृष्टिकोनांची ओळख होईल.
- वसाहतवादी दृष्टिकोनात भारतीय स्त्रियांच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीला कसे हीन लेखले हे समजून घेता येईल.
- राष्ट्रवादी इतिहास लेखनातून भारतीय स्त्रिया जगाच्या तुलनेत जास्त स्वातंत्र्य भोगत होत्या, या संबंधाने चिकित्सक विवेचन समजेल.
- मार्क्सवादी इतिहास लेखनात समाजवादी समाजरचना अस्तित्वात आल्यास आपोआपच स्त्रिया स्वतंत्र होतील ही विचारसरणी लक्षात येईल.
- सबाल्टर्न इतिहास लेखनामध्ये स्त्रियांच्या संबंधाने लिंग-भावाचे प्रश्न अनुपस्थित राहिले हे ओळखता येईल.
- स्त्रीवादी इतिहास लेखनामध्ये विविध स्त्रियांच्या प्रश्नांपासून ते लिंग-भावाच्या इतिहासापर्यंतचा प्रवास लक्षात येईल.
- अब्राह्मणी इतिहास लेखन प्रवाहाने स्त्रियांच्या स्थानाची केलेली चिकित्सा, जात व्यवस्था स्त्रियांच्या शोषणास कशी जबाबदार आहे. खालच्या स्तरातील स्त्रियांच्या प्रश्नांना संशोधनाच्या कक्षेत आणले.

## २.१ प्रस्तावना

स्त्रियांचा इतिहास लिहिताना किंवा स्त्रीवादी इतिहास लेखन करताना प्रचलित इतिहास लेखन प्रवाहातील स्त्रियांसंबंधित लिखाणातील विविध दृष्टिकोन लक्षात घेणे गरजेचे आहे. या विविध प्रवाहांनी स्त्रियांच्या प्रश्नांकडे कोणत्या भूमिकेतून बघितले. त्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी कोणत्या सैद्धांतिक मांडण्या केल्या. या सिद्धांताच्या जमेच्या बाजू, त्यांच्या मर्यादा समजून घेता येतील.

## २.२ विषय विवेचन

स्त्रियांच्या इतिहास लेखनासंबंधी विचार करताना विविध इतिहास लेखन प्रवाहांनी स्त्रियांसंबंधित प्रश्नांकडे कोणत्या दृष्टिकोनातून पाहिले, तसेच त्या प्रश्नांची चिकित्सा कशा पद्धतीने केली, हे आपणास या प्रकरणात पहावयाचे आहे. स्त्रियांकडे पाहण्याचा त्यांच्या दृष्टिकोनातील मर्यादा कशा आहेत? हे आपणांस स्पष्ट करता येणार आहे. या मर्यादा लक्षात घेऊन स्त्रीवादी इतिहास लेखनाची सुरूवात होते. भारतात वासाहतिक काळापासून शास्त्रीय पद्धतीने इतिहास लेखन केले जाऊ लागले. राष्ट्रवादी विचार प्रणालीने तिला राष्ट्रीय स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. मार्क्सवाद्यांनी तिला वर्गीय स्वरुपात रूपांतरित केले. सबाल्टर्न प्रणालीने उपेक्षितांच्या प्रश्नांना अग्रक्रम दिला तर वरील सर्व प्रश्नांचे परीक्षण करून स्त्रीवादी प्रवाह आणि लिंग-भावाचा संघर्ष अधोरेखित केला. या विचार प्रवाहांनी आपापल्या पद्धतीने भारतीय स्त्रियांच्या दुय्यम स्थानाचा शोध घेतला.

### २.२.१ वसाहतवादी, राष्ट्रवादी

#### अ) वसाहतवादी, साम्राज्यवादी इतिहास लेखन प्रवाह

भारतात इंग्रजांची राजवट स्थिर झाल्यानंतर वसाहतवादी राज्यप्रणालीने भारतीय सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करणारे इतिहासकार निर्माण झाले. त्यांनी भारतातील धर्म अध्यात्म साहित्य, कला, विज्ञान व कायदे यांचा अभ्यास केला. या माध्यमातून त्यांनी त्यांच्या राज्याला नैतिक अधिष्ठान देण्याचा प्रयत्न केला. या वसाहतवादी इतिहास लेखनात भारतातील स्त्रियांचे दयनीय सामाजिक स्थान अधोरेखित केले. त्यांनी भारतीय इतिहासाचा अभ्यास केला आणि भारतीय स्त्रियांच्या स्थितीची तुलना तत्कालीन ब्रिटिश स्त्रियांच्या उच्च सामाजिक दर्जाशी करण्यात आली. भारतीय स्त्रियांसंबंधित रानटी अमानुष प्रथा-परंपरा दाखवून भारतीय संस्कृती हीन दर्जाची ठरवली. या मांडणीला प्रत्युत्तर देताना हिंदू राष्ट्रवादी इतिहासकारांनी आर्य स्त्रीची प्रतिमा पुढे करून प्राचीन हिंदू संस्कृतीमध्ये स्त्रियांना असलेल्या उच्च स्थानाचा गौरव केला. हिंदू ब्राह्मणी मध्यमवर्गीय संस्कृती म्हणजे भारतीय संस्कृती, असे समीकरण मांडण्यात आले. या मांडणीत भारतातील इतर वर्णातील स्त्रियांच्या स्थितीबद्दल काहीही बोलले गेले नाही, पण या मांडणीला इतिहास लेखनाच्या प्रकाराला फक्त तमिळनाडू व महाराष्ट्रातील अब्राह्मणी चळवळीने शह दिलेला दिसतो.

राष्ट्रवादी इतिहास लेखनाला आधुनिक भारतामध्ये महत्त्व प्राप्त झाल्याने राष्ट्रवाद केंद्रीभूत ठेवून इतिहास लेखन झाले. वसाहत काळातील स्त्रियांच्या प्रश्नांचे लिखाणही या दृष्टिकोनातून झाले. वसाहत

काळातील स्त्री प्रश्नांचा इतिहास म्हणजे ब्राह्मणी समाज सुधारक चळवळींचा व स्त्रियांच्या राष्ट्रवादी चळवळीतील सहभागांचा इतिहास असे मानले गेले. या प्रकारात सामान्य स्त्रियांच्या प्रश्नांकडे त्यांचे लक्ष गेले नाही. त्या या प्रक्रियेतून दुर्लक्षित राहिल्या. यात स्त्रियांच्या शोषित अवस्थेचा इतिहास लिहिताना सतीप्रथा, सक्तीचे वैधव्य, बालविवाह यांसारख्या प्रथांचे ब्राह्मणी ग्रंथांच्या आधारे विश्लेषण करून इतिहास मांडला गेला. समाजसुधारणा कायदे संमत झाल्याने अनिष्ट प्रथांचा अंत झाला, असे गृहीत धरले गेले. स्त्रीवादी इतिहास लेखनाच्या पहिल्या टप्प्यात रजिया सुलतान, झाशीची राणी, ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई, यांच्या कार्यांची वर्णने केली. ही वर्णने स्त्रियांच्या इतिहासामध्ये समावेश करण्यासाठी महत्त्वाची ठरली.

**वसाहतवादी इतिहास प्रवाहातून स्त्रिया व त्यांनी केलेले स्त्री प्रश्नांचे विवेचन :**

वसाहतवादी इतिहासकारांमध्ये विल्यम जोन्स (१७४६ ते ११७७६) माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन (१७७९ ते १८५९) जेम्स प्रिन्सेप (१७१९ ते १८४०) व्हिन्सेंट स्मिथ (१८४८ ते १९२०) डब्लू. एच. मोरलँड १८६६ ते १९३८), इत्यादी प्रमुख होते. भारताचा इतिहास लिहिताना त्यांनी आपल्या संस्कृतीचे श्रेष्ठत्त्व कायम ठेवले. भारतीयांच्या रानटी प्रथा परंपरा अधोरेखित केल्या. एकंदरीत या इतिहासकारांना भारतीय स्त्रियांचे इतिहासातील स्थान पुढे आणायचे नव्हते, तर स्त्री विषयाच्या क्रूर प्रथा दाखवून भारतीय संस्कृतीचे हीनत्व निर्देशित करायचे होते.

**स्त्रियांच्या स्थिती सुधारण्यासाठी भारतीय राजाने केलेले प्रयत्न गौण ठरवले**

या संबंधाने वसाहतवादी इतिहास लेखकांच्या मते हिंदू व मुस्लिम कालखंडातील एकट्या-दुखट्या राजाने सुधारण्याचे प्रयत्न केले असले तरी संस्थात्मक राज्य पद्धतीने नाकारल्यामुळे सर्व सुधारणा अयशस्वी झाल्या. अशा प्रकारच्या त्यांच्या विवेचनामागे ब्रिटिश पूर्व हुकूमशाहीच्या तुलनेत ब्रिटिश संस्थात्मक राज्य अधिक चांगले कसे आहे हे दाखवून देण्याचा प्रयत्न होता. भारतीय संस्कृतीवरील टीका व त्यातील स्त्रियांचेही हीनत्व दर्शवले. याद्वारे त्यांनी आपली संस्कृती कशी श्रेष्ठ दर्जाची आहे हे त्यांना दाखवून द्यायचे होते. हे त्यांच्या संस्कृतीच्या प्रभुत्वाच्या प्रयत्नाचा एक भाग होता. वसाहतवादी इतिहासकारांनी प्राचीन भारताविषयी लेखन करताना त्यांच्याशी समकालीन स्त्री विषयक दुष्ट प्रथा-परंपरा याची सांगड घालण्याचा प्रयत्न केला. वसाहतवाद्यांना सती प्रथा, बालविवाह, विधवा विवाह बंदी, स्त्रीशिक्षण बंदी या समकालीन प्रश्नांची पाळेमुळे प्राचीन भारताच्या इतिहासात दिसते.

**जेम्स मिल**

जेम्स मिल हा साम्राज्यवादी (वसाहतवादी) इतिहासकार होता. त्याने 'हिस्ट्री ऑफ ब्रिटिश इंडिया' हा ग्रंथ सहा खंडात लिहिला. या खंडातून त्याने भारताच्या इतिहासाचे पूर्वग्रहदुषित व पक्षपाती दृष्टीने त्याने विवेचन केले. हा ग्रंथ साम्राज्यवादाचा बायबल बनला. भारतामध्ये कामाला येणाऱ्या ब्रिटिश अधिकाऱ्यांना हे खंडांचा अभ्यास करावा लागे. या खंडात पाश्चात्य संस्कृतीचे श्रेष्ठत्त्व सिद्ध केले होते.

**मनुस्मृतीच्या आधारे भारतीय स्त्रियांच्या स्थानाची चिकित्सा केली**

ख्रिश्चन नैतिकतेच्या कसोटीवर जेम्स मिल यांनी भारतीय स्त्रियांच्या स्थितीचा अभ्यास केला व त्यांच्या अवनतीला जबाबदार असणाऱ्या बाबींचा ऊहापोह केला. मनुस्मृतीच्या कायद्याच्या आधारे भारतीय समाजाचे चलनवलन होत होते. या ग्रंथाच्या आधारे त्यांने भारतीय स्त्रियांच्या स्थानाची चिकित्सा केली. या ग्रंथाच्या आधारे त्याने भारतीय संस्कृतीमधले स्त्रियांचे स्थान किती हीन दर्जाचे आहे हे मनुस्मृतीतील दाखले देऊन स्पष्ट केले. मनुस्मृतीमध्ये कोणत्या मुलीशी विवाह करावा अथवा कोणत्या मुलीशी करू नये या विषयाचे नियम सांगितले आहे. मनुस्मृतीने विवाह करताना जी बंधने घातली आहेत ते मिलने उद्धृत करत स्त्रियांचा दर्जा स्पष्ट केला आहे. या बंधनांबाबत तो म्हणतो, ''विवाह करताना ते कुटुंब कितीही महान असले तरी, श्रीमंत असले तरी ज्या कुटुंबात मुलगा जन्मत नाही, वेद वाचले जात नाहीत, त्या कुटुंबातील सदस्यांच्या शरीरावर दाट केस आहेत, त्या कुटुंबात कुष्ठरोग, फिट, शरीरावर लाल केस आहेत अशा मुलींशी विवाह करू नये व केस नसलेल्या व अंगावर जास्त केस आहेत अशा मुलींशी विवाह करू नये. बडबड्या, अति बोलक्या, लाल डोळ्यांच्या, तापट स्वभावाच्या मुलीशी विवाह करू नये. झाड, नदी, डोंगर, उडणारे पक्षी, असंस्कृत राष्ट्र, साप, गुलाम यांची नावे धारण केलेल्या मुलींशी विवाह करू नये. अशा मुलींची विवाह करावा जिचे शरीर निर्दोष आहे. जिचे नाव स्वीकार्य आहे. जिच्या चालण्यात सौंदर्य आहे. जिचे केस आणि दात स्वच्छ आहेत. व तिचे शरीर मृदु आहे.'' हे उदाहरण देऊन मनू स्त्रियांना किती हीन लेखतो, त्यांना दुय्यमत्व देतो हे दाखवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**मिलने स्त्रियांच्या संबंधाने हिंदू धर्मशास्त्राच्या कायद्याची चिकित्सा करतो**

तो म्हणतो स्त्री ही भांडकुदळ आहे. पतीच्या आधी भोजन करते. इतक्या तकलादु कारणांसाठी पत्नीला घराबाहेर काढण्याची परवानगी हिंदू कायदा देतो. पुरुषाला बहुपत्नीत्वाचा अधिकार प्रदान करतो. तिला विकण्याचे, दान करण्याचे अधिकार पुरुषाला देतो. असे विवरण करून मिलने हिंदूंच्या धार्मिक कायद्यातील रानटीपणा अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला आहे.

**मिलने मलबारी येथील मातृवंश परंपरेचे केलेले विश्लेषण**

मलबारी येथील मातृवंश परंपरेतील विवाह संस्था जेम्स मिलला खटकते. स्त्रियांच्या मुक्त लैंगिक संबंधातून झालेल्या संततीचा अधिकार तिच्या भावाकडे जातो. स्त्रिया विवाह बंधन न पाळता लैंगिक संबंध प्रस्थापित करतात. या बाबींच्या आधारे अधोरेखित करून हिंदू विवाहाच्या नैतिक संदर्भात असलेल्या विसंगतीवर बोट ठेवतो. जेम्स मिलने मलाबारी मातृवंशक परंपरेची चिकित्सा युरोपियन ख्रिश्चन नैतिकतेच्या कसोटीवर भारतीय स्त्रियांचे लैंगिक संबंध तपासले आहेत. पण मातृवंश परंपरेतील स्त्रियांच्या अधिकाराची व तिच्या सत्तेचे अस्तित्व त्याने दाखविले नाही आणि स्पष्टही केले नाही. तसेच मलाबार येथील समाज व्यवहार धर्मग्रंथांनी रचलेल्या नियमांनी बद्ध नव्हता ही गोष्ट मिलने लक्षात घेतली नाही.

जेम्स मिल याने हिंदू संस्कृतीची निर्भत्सना करताना भारतीय स्त्रियांमध्ये नाजूकपणाचा अभाव असल्याचा आरोप केला आहे. जेम्स प्रमाणे हेन्री आणि विल्किन्सन यांनीही भारतीय स्त्रियांमध्ये स्त्रीत्वाचा अभाव असल्याचे मत व्यक्त केले.

**जेम्स मिलच्या मर्यादा**

१) जेम्स मिलचे भारतीय स्त्रिया संबंधीचे आकलन हे युरोपियन वर्गीय समाजाच्या आकलनातून आले आहे.

२) भारतीय समाजाचे वैशिष्ट्य असलेल्या जाती व्यवस्थेमुळे भारतीय स्त्रियांचे स्थान व शोषणातही भिन्नता आहे. भारतीय स्त्रियांचे जातीव्यवस्थात्मक वेगळेपण मिल युरोपियन वर्गीय समाजाच्या आकलनामुळे लक्षात घेऊ शकला नाही. म्हणजेच जात व्यवस्थेतील स्त्री शोषणाकडे मिल लक्ष देऊ शकला नाही.

३) त्याने फक्त हिंदू धर्मातील तेही फक्त उच्चवर्णीय स्त्रियांचाच विचार केलेला दिसतो.

४) मिलने बौद्ध, जैन व शाक्त या सापेक्षता: समतावादी धर्म, पंथाकडे दुर्लक्ष केले आहे.

या सर्व त्रुटीमुळे मिलचे विश्लेषण हे बऱ्याच अंशी एकांगी आहे. प्राचीन भारतीय स्त्रियांचा अभ्यास करताना जेम्स मिलने भारतीय स्त्रियांचे दुय्यमत्व व हीन स्थान अधोरेखित केले.

**प्राच्यवादी इतिहासकार विल्किन्सन व हंटर**

विल्किन्सन व हंटर यांनी प्राचीन भारत विशेषतः वेद काळ हा स्त्रियांच्या दृष्टीने सुवर्णकाळ असल्याचे प्रतिपादन केले. विल्यम हंटरने प्राचीन, मध्ययुगीन, आणि ब्रिटिश कालीन स्त्रियांच्या उन्नती व अवनतीचा आलेख चित्रित केला आहे. वेद काळ हा स्त्रियांच्या दृष्टीने उन्नत काळ होता. स्त्रियांनी वेदांच्या ऋचा रचल्या आहेत. स्त्रिया यज्ञात व पती सोबत समान दर्जाने सहभागी होत असत. हंटर म्हणतो, 'सती सारख्या अमानुष प्रथेचा उगम या काळात झाला नव्हता.' हे सांगताना हंटर लिहितो. "Women enjoyed a high position and some of the most beautiful hymns were composed by ladies and queens. Marriage was held sacred; husband and wife were both rulers of the house (Dampati) and drew near to the Gods together in prayer. The burning of widows on their husband's funeral-pyre was unknown."

**सती बंदीच्या कायद्याच्या माध्यमातून इंग्रजाचे श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न**

विलियम बेन्टिकने युरोपातील व एत्तदेशियांचा प्रचंड विरोध असताना ४ डिसेंबर १८२९ रोजी सतीची चाल कायद्याने बंद केली. हे तो अभिमानाने सांगताना सम्राट अकबराने बालविवाहास बंदी आणि विधवेचे पुनर्विवाह करण्याची चाल रूढ करण्याचा प्रयत्न केला. पण सती प्रथेला अकबर पाय बंद घालून शकला नाही, हे नमूद करतो. या पार्श्वभूमीवर विल्यम बेन्टिकने सती प्रथा कायद्याने नष्ट करण्याचा प्रयत्न केला. याचा त्याला अभिमान आहे. हा अभिमान ब्रिटीश संस्कृतीच्या श्रेष्ठत्वातून आलेला दिसतो.

एकंदरीत साम्राज्यवादी व पौर्वात्यवादी इतिहास प्रवाहांनी स्त्रीचे समाजवास्तव रेखाटताना साम्राज्यवाद्यांनी प्राचीन व मध्ययुगीन काळातील स्त्रियांच्या दुय्यमत्वावर भर दिला. यासाठी त्यांनी प्रचलित प्रथा परंपरांचा आधार घेत भारतीय संस्कृतीला हीन लेखले, रानटी ठरवले. मात्र पौर्वात्यवादी इतिहासकारांनी वैदिक काळातील हिंदू स्त्रियांच्या उच्च दर्जाच्या स्थानाची चिकित्सा केली. ब्रिटिशांचे राज्य, प्रशासन व्यवस्था, संस्कृतीचे श्रेष्ठत्त्व स्पष्ट करताना ब्रिटीशपूर्व काळ धर्माधिष्ठित व पौर्वात्य हुकूमशाहीचा मानला. या काळात एकट्या-दुकट्या राजाने स्त्री सुधारणेचे प्रयत्न कसे अयशस्वी झाले हे अकबराचे उदाहरण देऊन स्पष्ट केले. अशा प्रकारच्या इतिहास लेखनामागे ब्रिटीशपूर्व हुकूमशाहीच्या तुलनेत ब्रिटीश संस्थात्मक राज्य अधिक चांगले कसे हे दाखवून देण्याचा प्रयत्न होता. तसेच, भारतीय संस्कृतीवरील टीका व त्यातील स्त्रियांचे हीनत्व दर्शवणे हा या प्रकारे सांस्कृतिक प्रभुत्व संपादनाच्या प्रयत्नाचा भाग होता, असे म्हणावे लागते.

### ब) राष्ट्रवादी इतिहास लेखन प्रवाह

वसाहतवादी आणि पौर्वात्यवादी इतिहासकारांनी दाखवलेली हिंदू स्त्रीचे गौणत्व किंवा त्यांनी केलेला गौरव भारतातील औद्योगीकरणाच्या स्थित्यंतरानंतर राष्ट्रवाद्यांनी पुढे नेण्याचा प्रयत्न केला. त्याची जाणीव-नेणीव ब्राह्मणी पितृसत्ताक राष्ट्रवादाने भरलेली होती. स्त्रीच्या दुय्यम स्थानाचा ऐतिहासिक शोध घेण्यापेक्षा वस्तुनिष्ठपणे विशिष्ट स्त्रियांची नावे पुढे करून वसाहतवादाच्या संशोधनाला उत्तर देण्यासाठी 'प्राचीन भारत सुवर्णयुगी आणि पाश्चात्य मात्र रानटी' या गृहीतकाचा उपयोग केला. या इतिहासकारांमध्ये आर. सी. दत्ता आणि ए. एस. आळतेकर महत्त्वाचे इतिहासकार आहेत. प्राचीन भारतातील स्त्रियांच्या स्थानाचा गौरव करून सद्यस्थितीतील स्त्रियांचे स्थान घसरले आहे, असे मत आर. सी. दत्ता यांनी मांडले आहे. ते म्हणतात, ""Absolute seclusion are restrained (of women) were not Hindu customs. They were unknown in India till Mohammedan times. No ancient nation held their women in higher honour than the Hindus."

**आर. सी. दत्त**

आर. सी. दत्ता यांनी मुस्लिम काळ हा हिंदू स्त्रियांच्या अवनतीचा मध्यबिंदू मानला. हिंदू स्त्रियांसारखे स्वातंत्र्य प्राचीन काळात भारता इतके कोणत्याही देशात नव्हते हे सांगताना त्यांनी ग्रीस आणि रोमची उदाहरणे दिली. ते म्हणतात, "The historian of India who has studied the literature of the ancient Hindus will have no hesitation in asserting that never in the most polished day of Greece and Rome were women held in such high regard in those countries as in India three thousand years ago."

थोडक्यात, आर. सी. दत्त सारखे इतिहासकार प्राचीन काळी भारतीय स्त्रियांसारखा उच्च दर्जा, सन्मान जगातील इतर देशात कोठेही आढळत नाही, असे ग्रीक व रोमन देशाच्या आधारे स्पष्ट करतात.

**ए. एस. आळतेकर**

आळतेकरांनी ग्रीस, रोम आणि पॅलेस्टाईन येथील स्त्रियांचा तौलनिक अभ्यास करून वैदिक संस्कृतीच्या काळातील भारतीय स्त्रियांचे स्थान या सर्वांपेक्षा उच्च दर्जाचे होते हे दाखवले. अथेन्स व स्पार्टा मधील स्त्रियांची स्थिती ही प्राण्यांपेक्षा बरी होती. प्राचीन रोममध्ये रोमन कायद्याने पुरुषांना स्त्रियांना अंकित ठेवण्याचे सर्व अधिकार दिले होते. पुरुषांच्या अंकित मुले व स्त्रियांना राहावे लागत होते. तिला कोणतेही स्वातंत्र्य नव्हते. पुरुषांच्या अधिपत्याखाली तिला राहावे लागत होते. पॅलेस्टाईनमध्ये तर स्त्री ही केवळ वस्तु समजली जात होती. तिची खरेदी व विक्री केली जात होती.

मॅक्स वेबरने बालहत्या संबंधाने केलेल्या संशोधनावरही आळतेकरांनी आक्षेप नोंदवत प्राचीन भारतात स्त्री हत्या होत नसत, हे स्पष्ट केले. तसेच जगाच्या सर्वच प्राचीन संस्कृतीमध्ये स्त्रियांना गौण स्थान दिले होते, असेही आळतेकर स्पष्ट करतात. सर्वच संस्कृतीमध्ये मुलींच्या जन्माचे स्वागत केले जात नव्हते. पण मुलाच्या जन्माचे मात्र स्वागत मात्र केले जात होते. प्राचीन काळी भारतात मुलींची हत्या केली जात होती असा कोणताही पुरावा आढळत नाही. तेव्हा वेबरचे म्हणणे चुकीचे आहे, हे त्यांनी दाखवून दिले. आळतेकरांना स्त्रीबालहत्येचे प्रमाण मुघल काळात जास्त असल्याचे आढळते. सुसंस्कृत कुटुंबात बालहत्या नव्हत्या, असे आळतेकर म्हणतात. ब्रिटिशांना खालच्या जातीतच बालहत्या आढळल्या, असे १८९१ ते १९३१ पर्यंतची आकडेवारी देऊन आळतेकर स्पष्ट करतात.

**आळतेकरांनी स्त्रियांच्या अवनतीचे केलेले विश्लेषण (आर्य–अनार्य स्त्रीचे प्रारूप)**

खालच्या जातीत बालहत्या होत्या, हे सिद्ध केल्यानंतर आळतेकर आपोआपच खालच्या जातीच्या स्त्रियांशी उच्चवर्णीयांचा संपर्क असल्याने होणाऱ्या दुष्परिणामांची चर्चा करतात. आर्य स्त्री आणि आर्येत्तर स्त्री असा भेद करून आर्येत्तर स्त्रियांच्या संपर्काने होणारा दुष्परिणाम ठळक करतात. ''आर्य कुटुंबात अनार्य स्त्रीचा प्रवेश हा स्त्रियांच्या सर्वसाधारणपणे अध:पतनास कारणीभूत ठरला. हे इ.स.पूर्व १००० पूर्वी घडले. हे पुढच्या पाचशे वर्षांपर्यंत ठळक अस्तित्वात राहिले. संस्कृत भाषेच्या व हिंदू धर्माविषयीच्या ज्ञानाच्या अभावामुळे अनार्य स्त्री ही आर्य स्त्री प्रमाणे विशेष अधिकार उपभोगू शकली नाही. तिच्या सहवासामुळे आर्य स्त्रीच्या बोलीभाषेच्या शुद्धतेवर परिणाम झाला. बऱ्याच वेळेला अनार्य स्त्री ही नवऱ्याची आवडती असायची. पण अशा प्रकारच्या गंभीर चुकांमुळे परंपरावादी पुरोहितांना मोठा धक्का बसला. शेवटी सर्वच्या सर्व स्त्रिया वैदिक अभ्यासाला व धार्मिक कार्याला अपात्र ठरवण्यात आल्या.'' आर्य पुरूष व अनार्य स्त्री यांच्या संबंधामुळे स्त्रियांच्या स्थानाचा ऱ्हास झाला असा निष्कर्ष आळतेकर काढतात.

आळतेकर प्रतिलोम विवाहामुळे (अनार्य स्त्रीचा आर्य पुरुषांचे विवाह) आर्य स्त्री व पुरुषांचा उच्चार बिघडला आणि आर्यांची उच्च संस्कृती नाश पावली, असा तर्क देतात. अनार्य शूद्र स्त्रियांना कमी लेखून आपली सर्व दृष्टी आर्य स्त्रीवर केंद्रित करतात.

थोडक्यात, आळतेकर वंश श्रेष्ठत्वाचे गृहीतक मांडतात. राष्ट्रवादी परिक्षणातून सांस्कृतिक वर्चस्वाची आणि वंशवादाची भर टाकतात.

**स्त्री शिक्षणासंबंधीचे आळतेकरांचे मत**

स्त्रियांच्या अवनतीचे विश्लेषण करताना आळतेकर तिच्या नाजूकपणावर बोट ठेवतात. महिला सबलीकरणासाठी आळतेकर शिक्षणाचे महत्त्व ओळखतात. पण स्त्रियांच्या जास्त शिक्षणाने भयभीत होताना दिसतात. या संबंधाने ते स्पष्ट करतात की, 'आज असे दिसते की मुलाला ज्या परीक्षेत उत्तीर्ण व्हावे लागते त्याच परीक्षेत मुलींनाही उत्तीर्ण व्हावे लागते आणि घर सांभाळून शिकावे लागते. हे सर्व तिच्या भावापेक्षा कमी शक्ती असतानाही तिला करावे लागते. त्यामुळे स्त्रियांवर खूप ताण पडतो. हे त्यांच्या पुढील पिढ्यांसाठी हानिकारक आहे.' आळतेकर स्त्री शिक्षणाबाबतचा पुरूषप्रधानतेतून विचार करतात. मुले व मुली यांना एकाच प्रकारच्या परीक्षा उत्तीर्ण व्हाव्या लागतात. पण मुलींना या परीक्षा उत्तीर्ण होताना घरकामाचा ताण त्यांच्यावर असतो व त्यांना शक्तीही कमी असते, असे मत मांडून ते मुलीच्या मुलाबरोबरच्या समान शिक्षणावर प्रश्नचिन्ह उभे करतात.

**संपत्तीचा मालकी हक्क**

संपत्तीच्या मालकीचाही प्रश्न आळतेकर पुरुषप्रधानतेतूनच शोधण्याचा प्रयत्न करतात. आर्यांनी शूद्र स्त्रियांबरोबर विवाह केल्याने आर्य स्त्रीचे स्थान घसरू लागले आणि आर्य स्त्रीची सांपत्तिक स्थितीही घसरू लागली, असा तर्क ते काढतात. ''जमीन संपत्ती हे सर्व बाळगू शकत होते जे तिचे अंतर्गत आणि बाह्य शत्रूपासून रक्षण करू शकत. जमिनीच्या सामूहिक मालकीकडून कौटुंबिक मालकी हक्क हस्तांतरित होण्याचा तो काळ होता. कुटुंबातील इतर व्यक्तींच्या, पुरुषांच्या नावाने खाजगी मालकी प्रस्थापित होणे शक्य नव्हते. सहाजिकच पुरुषांप्रमाणे स्त्री सभासद संपत्तीचे मालक होण्यास अपात्र असत.'' येथे आळतेकरांनी निसर्गात हा स्त्री दुर्बल असते हे गृहीत धरल्याने खाजगी मालकी मिळवण्यास स्त्री अपात्र ठरवली गेली.

एकूणच आळतेकरांच्या स्त्रीविषयक दृष्टिकोनाचा राष्ट्रवादी इतिहासकारांवर प्रभाव पडलेला दिसतो. प्राचीन, मध्ययुगीन आणि अर्वाचीन भारतातील आर्य स्त्री उभी करण्याच्या प्रयत्नातून वैदिक काळात आर्य स्त्री स्वतंत्र, आनंदी आणि युरोपियन स्त्रीच्या तुलनेत उन्नत होती, असे दाखवण्याचा प्रयत्न आळतेकरांनी केला. आर्येतर स्त्रियांबाबतचे लेखन हे अनैतिहासिक होते. यातून पुढे मार्क्सवादी इतिहासकारांनी स्त्री शोषणाच्या भौतिक बाबी पुढे आणण्याच्या ऐतिहासिक प्रयत्न केला.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न १**

**अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.**

१) ............. इतिहासकारांनी प्राचीन हिंदू संस्कृतीतील स्त्रियांच्या स्थानांचा गौरव केला.

अ) राष्ट्रवादी ब) साम्राज्यवादी क) मार्क्सवादी ड) स्त्रीवादी

२) हिंदू ब्राह्मणी मध्यमवर्गीय संस्कृती म्हणजे भारतीय संस्कृती असे समीकरण ........... या इतिहास प्रवाह आणि अधोरेखित केले.

अ) राष्ट्रवादी ब) साम्राज्यवादी क) मार्क्सवादी ड) स्त्रीवादी

३) जेम्स मिल याने ......... हा ग्रंथ लिहिला.

अ) हिस्ट्री ऑफ ब्रिटिश इंडिया ब) द पोझिशन ऑफ हिंदू वुमेन

क) हिंदू पोलिटी ड) वरील पैकी सर्व

४) ........... हा ग्रंथ साम्राज्यवादाचा बायबल होता.

अ) हिस्ट्री ऑफ ब्रिटिश इंडिया ब) द पोझिशन ऑफ हिंदू वुमेन

क) हिंदू पोलिटी ड) वरील पैकी सर्व

५) ............. या भारतीय ग्रंथाच्या आधारे जेम्स मिलने स्त्रियांच्या स्थानाची चिकित्सा केली.

अ) मनुस्मृती ब) वेद क) उपनिषदे ड) गीता

६) ............ याने सती सारख्या अमानुष प्रथेचा उगम वेदकाळात झाला नव्हता, असे स्पष्ट केले.

अ) विलियम हंटर ब) जेम्स मिल क) मेकॉले ड) वरील पैकी नाही

७) ........... यांनी सती-बंदीचा कायदा केला.

अ) विल्यम बेन्टिक ब) विल्यम हंटर क) लॉर्ड डलहौसी ड) मेकॉले

८) मध्ययुगात .......... मुस्लिम राजाने बाल विवाह व विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन दिले.

अ) जहांगीर ब) औरंगजेब क) मोहम्मद तुघलक ड) अकबर

९) प्राचीन भारत सुवर्णयुग आणि पाश्चात्य मात्र रानटी या गृहितकावर ........ या इतिहास प्रवाहाने स्त्रियांच्या स्थानाची चिकित्सा केली.

अ) स्त्रीवादी ब) मार्क्सवादी क) राष्ट्रवादी ड) अब्राह्मणी

१०) ............ यांनी मुस्लिम काळ हा हिंदू स्त्रियांच्या अवनतीचा मध्यबिंदु मांडला.

अ) ए. एस. आळतेकर ब) आर. सी. दत्ता

क) शरद पाटील ड) जेम्स मील

११) प्राचीन काळी भारतीय स्त्रियांसारखा उच्च दर्जा व सन्मान इतर कोणत्याही देशात आढळत नाही असे मत ......... यांनी नोंदविले.

अ) ए. एस. आळतेकर ब) आर. सी. दत्ता

क) शरद पाटील ड) जेम्स मील

१२) ............ यांनी ग्रीक व रोमन संस्कृती पेक्षा प्राचीन भारतीय इतिहासाचे स्थान उच्च दर्जाचे होते असे अधोरेखित केले.

अ) ए. एस. आळतेकर ब) आर. सी. दत्ता

क) शरद पाटील ड) जेम्स मील

१३) स्त्रियांच्या अवनतीस जबाबदार असलेले आर्य-अनार्य स्त्रीचे प्रारूप ...... यांनी सांगितले.

अ) ए. एस. आळतेकर ब) शरद पाटील

क) जेम्स मील ड) वरील पैकी सर्व

**ब) खालीलपैकी कोणते विधान योग्य/अयोग्य आहे.**

१) आळतेकरांनी आर्य अनार्य स्त्रीचे प्रारूप उभे केले.

२) आळतेकरांनी राष्ट्रवादी परिक्षणातून सांस्कृतिक वर्चस्ववाद व वंशवाद स्पष्ट केला.

अ) दोन्ही विधाने चुकीची आहेत ब) दोन्ही विधाने बरोबर आहेत

क) पहिले विधान चूक दुसरे बरोबर ड) पहिले विधान बरोबर दुसरे चूक

१) जेम्स मिल याने जातीव्यवस्थेने केलेल्या स्त्रियांच्या शोषणाकडे लक्ष वेधले.

२) जेम्स मिल यांनी हिंदू धर्मातील फक्त उच्चवर्णीय स्त्रियांना समोर ठेवून भारतीय स्त्रियांच्या इतिहासावर भाष्य केले.

अ) दोन्ही विधाने चुकीची आहेत ब) दोन्ही विधाने बरोबर आहेत

क) पहिले विधान चूक दुसरे बरोबर ड) पहिले विधान बरोबर दुसरे चूक

**क) योग्य जोड्या जुळवा.**

| | गट १ | | गट २ |
|---|---|---|---|
| १ | जेम्स मील | अ | आर्य व अनार्य स्त्रीचे प्रारूप उभे केले |
| २ | सम्राट अकबर | ब | ग्रीक व रोमन पेक्षा प्राचीन भारतीय स्त्रीचे स्थान उच्च दर्जाचे होते. |
| ३ | ए. एस. आळतेकर | क | बाल विवाह व विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन दिले. |
| ४ | आर. सी. दत्ता | ड | मनुस्मृतीच्या आधारे भारतीय स्त्रीच्या स्थानाची चिकित्सा केली |

अ) १-ड, २-क, ३-अ, ४-ब ब) १-ब, २-अ, ३-ड, ४-क

क) १-अ, २-ड, ३-क, ४-ब ड) १-ब, २-क, ३-ड, ४-अ

## २.२.२ मार्क्सवादी, सबाल्टर्न

मार्क्सवादी इतिहासकारांमध्ये डी. डी. कोसंबी (१९०७ ते १९६६). आर. एस. शर्मा, रोमिला थापर, देवी प्रसाद चटोपाध्याय, मोहंमद हबीब, इरफान हबीब, एस. ए. डांगे, शरद पाटील यांचा समावेश होतो.

### अ) मार्क्सवादी

वसाहतवादी आणि राष्ट्रवादी विचार प्रणालीने स्त्री शोषणाच्या भौतिक बाबींकडे दुर्लक्ष केल्याने त्यांच्यातील त्रुटींकडे मार्क्सवादी इतिहासकारांनी लक्ष वेधले. कार्ल मार्क्स, एंगल्स व लेनिन यांच्या विचारांतून शासनसंस्था, कुटुंब संस्था, समाज यातील स्त्रीचे स्थान इतिहासाच्या टप्प्यांवर कसे बदलत गेले, हे स्पष्ट केले. कार्ल मार्क्स व एगंल्सने साम्यवादी क्रांतीचे ध्येय समोर ठेवताना स्त्रियांच्या अनुषंगानेही विचार केला. मानवमुक्तीमध्ये स्त्रीमुक्ती विषयासंबंधाने त्यांनी भूमिका घेतलेली दिसते. कार्ल मार्क्स आणि एंगल्सने स्त्री शोषणाच्या भौतिक बाबी पुढे आणल्या. स्त्रीशोषणाच्या वर्गीय स्वरुपातील द्वंद्व पुढे आणून समाजात भौतिक अभ्यासाच्या पद्धती रूढ करण्याचा प्रयत्न केला. एंगल्सने 'कुटुंब संस्था, खाजगी मालमत्ता आणि शासनसंस्था यांचा उगम' १८८४ मध्ये हा ग्रंथ लिहिला. यात त्याने आदिम काळापासून स्त्रियांच्या संबंधीचा इतिहास रेखाटण्याचा प्रयत्न केला. आदिम साम्यवादामध्ये स्त्री-पुरूष समानता होती. त्यांचे हक्क व अधिकार एकसारखे होते. कुटुंब व्यवस्थेच्या निर्मितीनंतर स्त्रियांच्या हक्कांचा संकोच झाला. कुटुंबाचे कर्तेपण पुरुषांकडे गेले. खाजगी मालमत्तेच्या काळात स्त्रीलाही खाजगी मालमत्ता समजले जाऊ लागले आणि तिची स्थिती गुलामांसारखी झाली, हे एंगल्सने मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकतावादाच्या आणि मॉर्गनच्या 'प्राचीन समाज' (१८७७) या ग्रंथाच्या आधारे साधार दाखवण्याचा प्रयत्न केला.

भारतीय मार्क्सवादी इतिहासकारांनी स्त्रियांच्या संदर्भातील लेखन वर्गवादी पद्धतीने करतात. त्यामुळे वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था आणि स्त्रियांचे दुःख सिद्ध करताना त्यांच्या वर्गीय जाणीवा कमी पडलेल्या दिसतात.

### डी. डी. कोसंबी

डी. डी. कोसंबी यांनी स्त्रियांचे प्रश्न हे वरिष्ठ वर्गीय स्त्रिया, मध्यमवर्गीय स्त्रिया, शेतमजूर स्त्रिया अशा वर्गीय स्वरुपात स्त्रियांच्या प्रश्नांकडे बघितले असे दिसते. त्यांनी मार्क्सवादी अन्वेषण पद्धतीने प्राचीन भारतातील स्त्रियांच्या दुय्यमत्त्वाचा ऐतिहासिक शोध घेतला. पुराण कथेतील आणि मिथकांतील दडलेल्या स्त्रित्वाचा शोध घेऊन ब्राह्मणी साधनांची चिकित्सा केली. प्राचीन मातृसत्ताक कुटुंब पद्धतीचा आणि सध्या विविध स्वरुपात पूजल्या जाणाऱ्या स्त्री देव-देवतांचा शोध घेऊन त्यांनी समकालीन स्त्री प्रश्नांची सांगड घालण्याचे ऐतिहासिक कार्य केले. या त्यांच्या कार्याने भारतीय आणि पाश्चात्य स्त्री देवी-देवतांच्या तौलनिक अभ्यासाने धर्मेतिहासाचा नवा पायंडा पाडला.

कोसंबी यांनी पाश्चात्य तत्त्वज्ञान व भारतीय तत्त्वज्ञानातील मूलभूत फरक दाखवून दिले. ते म्हणतात, ''ग्रीक लोकांमध्ये सतीची चाल त्यांच्या इतिहासाच्या प्रारंभात नष्ट झाली. उलट भारतात मात्र विधवा स्त्रियांना जीवंत जाळण्याची अमानुष प्रथा मध्य आणि सरंजामशाही युगात जोरदारपणे चालू झाली होती.'' कृष्ण आणि इंद्र या भारतातील लोकनायकांनी मातृसत्तेचा ऱ्हास करून पितृसत्तेच्या प्रतिष्ठापनेमध्ये महत्त्वाची भूमिका वठवली, हे कोसंबी दर्शवतात. गीता ग्रंथात स्त्रियांचे स्थान शुद्रांसारखे होते, हे स्पष्ट करतात. तसेच

ब्राह्मण वर्णाशिवाय इतर वर्णातील पुरूष किंवा सर्व वर्णातील स्त्रिया या दुय्यमच होत्या. हे कोसंबी यांनी गीता ग्रंथाच्या आधारे स्पष्ट केले.

स्त्रिया या वेशभूषा, भाषा, संस्कृतीच्या वाहक असल्याचे मानले जाते. स्त्रियांची दुय्यमत्व पोशाखावरूनही ओळखून येते. वडार, पारधी, वैदू, रामोशी इत्यादी अस्पृश्य भटक्या जातीच्या स्त्रियांचे दुय्यमत्व पोशाखावरून शोधण्याचा प्रयत्न केला. भारतात भांडवलशाहीच्या विकासाबरोबर पाश्चात्य संस्कृतीतील पेहराव आणि आहाराच्या परंपरा काही प्रमाणात भारतातही मध्यमवर्गाने स्वीकारल्या. पण त्यातील स्त्रियांच्या धार्मिक श्रद्धाचे बाह्य रूप कधीही बदलले नाही. हे दाखवून देताना कोसंबीनी वासाहतिक काळातील परिस्थितीची चिकित्सा केली. पुरूषसत्ताक व्यवस्थेत स्त्रिया या संस्कृतीच्या संवर्धक आणि वाहक असतात हे दाखवले. संस्कृती संवर्धनामध्ये स्त्रियांचा वाटा महत्त्वाचा असतो. त्या आपला भूतकाळ विविध प्रकारच्या प्रथा परंपरेच्या माध्यमातून जीवंत ठेवण्याचा प्रयत्न करतात. स्त्रियांच्या इतिहास समजण्याचे साधन म्हणूनही त्यांचा अभ्यास होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन करतात. या संबंधाने ते स्त्रियांच्या भाषांविषयी लिहितात. ''पुष्कळदा पुरुषांपेक्षा स्त्रियांच्या बोलण्यात पूर्वीची भाषा टिकवून राहते. सामान्यतः स्त्रिया प्राचीनत्व टिकवून धरतात. तर पुरुषांचा आपल्या टोळीबाहेरच्या किंवा जातीबाहेरच्या लोकांशी जास्त वारंवार संबंध येत असल्याने त्यांच्यात सार्वजनिक सौजन्य दिसते.'' प्राचीनत्व स्त्रिया टिकवून धरण्यास आणि पुरूष उत्पादित साधनांच्या वाढीव हव्यासापोटी जातीबाहेर टोळीबाहेर संबंध वाढवतात, हे कोसंबी दर्शवितात. कुंभाराचे वेगाने फिरणारे चाक पुरुषांच्या हातातील उपकरण असले तरी मातीची भांडी तयार करणे, हा स्त्रियांचा विशेष अधिकार होता. कापड विणणे हे स्त्रियांचेच खास काम होते. इत्यादी बाबींविषयी कोसंबी स्त्रियांची ऐतिहासिक सर्जनशील कामगिरी अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला.

**आर. एस. शर्मा**

रामशरण शर्मा यांनी प्राचीन भारतातील राजकीय व सामाजिक संस्थांतील स्त्रियांच्या स्थानाचा शोध घेतला. सभा, समिती, गण, परिषद, यज्ञ, जनपद, पौर, ग्राम, इत्यादी या सभागृहातील स्त्रियांच्या स्थानाची चर्चा केली.

**विदथ**

विदथ या सभागृहातील स्त्रियांच्या स्थानाची चर्चा केली. विदथ हे लौकिक, धार्मिक व सैनिकी प्रश्नांचा विचार करणारी सभागृह होते. ऋग्वेद व अथर्ववेदात विदथमध्ये स्त्रियांची उपस्थिती होती. असे कमीत कमी सात वेळा उल्लेख आलेले आहेत. इतकेच नव्हे तर ती विदथ मधील चर्चेतही सहभागी होत होती. योणा ही विदुशी विदथमध्ये गेली, हे त्यांनी ऋग्वेदातील माहितीवरून दाखवले. वडीलधारी मंडळी धैर्यशील व समाजात मिळून मिसळून वागणाऱ्या तरूणांची विदथमध्ये सभेच्या भल्याकरीता पाठवणी करत. सूर्याला विदथमध्ये बोलण्याची सूचना करण्यात आली होती. लग्न समारंभात मुलीने केवळ गृहिणी म्हणून चमकावे एवढेच नव्हे तर तिने विविध सभेत योग्यता पूर्वक बोलावे, अशी इच्छा प्रदर्शित केली जाई. स्त्रीने आपल्या प्रौढ वयात विदथमध्ये बोलावे, हे शर्मा यांनी ऋग्वेद, मैत्रायणी संहिता, अथर्ववेद आणि यू. एन.

घोषाल यांच्या 'हिस्ट्री ऑफ हिंदू पब्लिक लाईफ' या ग्रंथाच्या आधारे स्पष्ट केले. या सभेमध्ये स्त्रीला पुरुषांपेक्षा वाजवीपेक्षा जास्त अधिकार नव्हते तर पुरुषांइतकाच स्त्रीला स्वतंत्र दर्जा होता. पुढे या सभेच्या संदर्भात ते लिहितात, 'वयात आलेल्या सर्व स्त्री-पुरुषांची समान अधिकार असलेली ही पंचायत म्हणजेच सर्वसाधारण: लोकसभेच्या स्वरुपाची संस्था होती, हे स्पष्ट करतात. उपलब्ध पुराव्यांची छाननी करून ते असा निष्कर्ष काढतात की, विदथ सभा ही इंडो-आर्यनांची प्राचीनतम लोकसभा असून त्यात स्त्री-पुरूष दोघांचीही उपस्थिती असे. ती आर्थिक, लष्करी, धार्मिक व सामाजिक असे सर्व प्रकारचे कार्य करी, अशा प्रकारची तिची प्रतिमा उभी राहते. आदिम समाजाच्या गरजा ती पूर्ण करी. या समाजाला त्या काळात श्रमविभागणी व पुरुषांचे स्त्री वरील स्वामित्व याची पुसटशीही कल्पना नसेल. ते आपल्या उत्पादनाचा बहुधा सामुदायिक उपभोग घेत. विदथ पद्धतीची सहकार ही गुरुकिल्ली होती. लोक या सभेत एकत्र येऊन, एकत्र युद्धे चालवत. एकत्र खात, सामूहिक प्रार्थना करत, एकत्र खेळत, व लिंगभेदाचा विचार न करता एकत्र विचारविनिमय करत. उत्पादन, साधन संपत्तीतील समान वाटा आणि त्यातील लिंग-भाव निरपेक्षता हे विदथचे वैशिष्ट्य स्पष्ट करून शर्माने प्राचीन आदिम समाजातील समता अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला आहे.

**सभा**

शर्मा यांनी स्त्रिया सभेत उपस्थित राहत होत्या, याचा शोध घेताना ऋग्वेदाच्या शेवटी असलेल्या उल्लेखात स्त्रीचा 'सभावती' असा निर्देश आहे. हे स्पष्ट करतात सभा या शब्दाचा अर्थ तेजस्वी लोक एकत्र येणारी संस्था असा देऊन स्त्रियांचा तेजस्विनी असा अर्थ शर्मा देतात.

**गण**

शर्मा यांच्या मते, गण म्हणजे एकाच टोळीतील किंवा जनकुलातील असण्याची अनिवार्यता नसलेल्या कृत्रिमतेने एकत्र आलेल्या लोकांचा जनसमुदाय होय! या गणाचा संबंध शर्मा वैश्य आणि शूद्र यांच्याशी जोडतात. गणातील लोक एकच पूर्वजांची प्रजा होती. आणि अनेक गण मातृवंशीय होते. आदिती या स्त्रीचा आदित्य गण होता. स्कंद अथवा कार्तिकेय या दैत्याशी युद्ध करावयास सात मातृगणांसह गेल्याचे शर्मा दर्शवतात. फक्त पुरूषच युद्ध करू शकतात या पारंपारिक विचारविश्वाला हादरा देऊन गणातील स्त्रियाही युद्ध करत, त्या लढवय्या होत्या, हे स्पष्ट करतात.

**परिषद**

परिषद ही राजाच्या अध्यक्षतेखालील एक जनकुलीय सभा होती. महाकाव्य व पुराणांतील उल्लेखांवरून केवळ जनकुलीय नव्हे तर तिचे लष्करी व अंशतः मातृसत्ताक वैशिष्टे निर्देशित केली आहेत. परिषदेच्या बाबतीत 'परिषदी' या पदाच्या उपयोगावरून परिषदेत स्त्री सभासद असल्याचे सूचित होते. जनप्रदानाच्या मंत्रानुसार ब्रह्मा, रुद्र, विघ्न, स्कंद, विष्णू, वैवस्वत (यम किंवा मनू) आणि धन्वंतरी यांच्याच केवळ परिषदांना नव्हे तर त्यांच्या पत्नींना व परिषदींनाही (सहचरी) जनप्रदान करावे लागे. यांवरून स्त्रिया

परिषदेच्या सभासद असत, असे कळून येते. मातृसत्तेची परंपरा असलेल्या दक्षिण भारतात परिषदेत स्त्रियांना सभासदत्व देण्याची पद्धत होती, असेही त्यांनी दाखविले.

थोडक्यात, उत्पादन साधनांमध्ये वाढ आणि भौतिक प्रगती यांच्या बरोबर मातृसंस्थेच्या ऱ्हासाला प्रारंभ झाला. बहुपत्निकत्वाची चाल रूढ होत जाऊन स्त्रियांचे अधिकार उत्तर वैदिक काळात संकुचित होत गेले, हे राष्ट्रवादी इतिहासकाराप्रमाणे शर्माही मान्य करतात.

**श्रीपाद अमृत डांगे**

श्रीपाद अमृत डांगे यांनीही मार्क्सवादी विचार लिखाणातून स्त्री सत्तेच्या ऱ्हासाची मिमांसा केली. वर्णव्यवस्थेच्या उगमाबरोबरच खाजगी मालमत्ता, कुटुंब संस्था याचा उगम काळ हा स्त्रीसत्तेचा ऱ्हास काळ होय, हे स्पष्ट केले. गोत्र व्यवस्थेत अपत्याचे जनकत्व पित्याकडे गेले. गणव्यवस्थेतही खाजगी मालमत्ता आणि पितृसत्ता वाढीस लागली. आणि स्त्रियांची मातृसत्ता ऱ्हास पावू लागली, हे त्यांनी सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. मातृसत्तेचा पराभव आणि पितृसत्तेचा उदय याचे वैदिक वाङ्मयांमध्ये स्पष्टपणे वर्णन आढळत नाहीत. परंतु, हे संक्रमण कुटुंब संस्थेच्या विकासामध्ये सहज लक्षात येते. गोत्र आपत्याच्या ऐवजी पित्याचे पुत्र पुढे आले. आईचे पुत्र पुढे येण्याची परंपरा संपुष्टात आली. डांगेंना वैदिक साहित्याचा अभ्यास करताना त्यातील कुटुंब संस्थेचा उदय, पुरुषाला आलेले महत्त्व हे मान्य दिसते. परंतु, पितृसत्तेचा उदय व अस्तित्वा संबंधात ते शाशंक दिसतात. वैदिक कालखंडातील प्रजापती व गृहपतीच्या उदयासंबंधी ते मातृसत्ताक गणाच्या ऱ्हासाशी लावताना वैदिकांची टोळ्या करून राहण्याची अवस्था कुटुंबव्यवस्थेच्या निर्माण करण्यास कारणीभूत झाली असावी, असे ते मानतात. पुरुषी गुलामगिरीतून स्त्री मुक्त होण्यासाठी सामाजिक क्रांतीची आवश्यकता डांगे यांनी प्रतिपादली. ते लिहितात, मातृसंस्थेचे उच्चाटन व पितृसत्तेची स्थापना हा स्त्रियांच्या ऐतिहासिक पराभव होता. स्त्रीजातीच्या शरीरावर मालकी व खाजगी मालमत्तेवरील पुरुषांची मालकी प्रस्थापित झाली. त्यामुळे स्त्री नैतिकदृष्ट्या गुलाम बनली. उत्पादन साधनांची खाजगी मालकी आणि वर्गीय सत्ता यांबरोबर त्यांच्या अनुषंगाने स्त्रियांवरील पुरुषांचे वर्चस्व नाहीसे करणारी सामाजिक क्रांतीच स्त्रीची गुलामगिरीतून मुक्तता करील.

**कॉ. बी. टी. रणदिवे**

कॉ. बी. टी. रणदिवे यांनीही मार्क्सवादी दृष्टीने स्त्री कामगारांची लढाई उभारताना सरकार, मालक वर्ग आणि कामगार संघटना यापैकी कोणीही स्त्रियांच्या अधिकारांकडे लक्ष देत नसल्याचे मान्य केले. हिंदू आणि मुस्लिम धर्मातील स्त्रियांची परवशता समाजाने आणि धर्माने केली हे त्यांनी स्पष्ट केले. बाळंतपणाची रजा, कामाचे तास, वेतन, कामाच्या ठिकाणी आरोग्याच्या सुख-सुविधांची त्यांनी मागणी केली. कामगार चळवळीत केवळ पुरुषांनीच नव्हे तर स्त्रियांनी भाग घेण्यासाठी मार्गदर्शन केले. कम्युनिस्ट चळवळीने स्त्रीविषयक लेखन आणि तिच्या हक्कांसाठी लढे उभारल्याने साम्यवादी विचार प्रणालीला कृतीची जोड मिळाली. १९५३ आणि १९५४ मध्ये कम्युनिस्टांनी उभारलेले लढे हे स्त्रियांच्या न्याय हक्क मागणीसाठी होते.

भारतीय मार्क्सवादी इतिहासकार वर्गवादी असल्याने ते जातीव्यवस्था व स्त्रीदास्य याची सांगड घालत नाहीत. पर्यायाने, त्यांचे स्त्रियासंबंधीचे विवेचन अपुरे वाटते.

**शरद पाटील**

शरद पाटील यांनी जात-वर्ग-स्त्रीदास्यांतवादी नवीन प्रणाली मार्क्सवाद, फुले, आंबेडकरवाद यांच्या विचारांवर आधारित सिद्ध केली. अभिजात गणसमाजाची सुरुवात ही प्राथमिक साम्यवादी गणसमुहांपासून झालेली नसून स्त्रीसत्ताक गणसमाजापासून झालेली आहे. ही गोष्ट जगभरातील मार्क्सवादी मान्य करत नाहीत पण ही गोष्ट खंडित करूही शकत नाहीत.

**स्त्रीसत्ताक गणसमाजाचे वर्णन**

स्त्री-पुरूष गणसमाजात स्त्रीवर्ग उत्पादक, शासक व पुरोहित होता. त्यामुळे  स्त्री स्वतंत्र होती. तर पुरूषवर्ग अनुत्पादक होता. शासनसंस्था त्याच्या हाती नव्हती तसेच त्याच्याकडे पौरोहित्यही नव्हते. त्यामुळे तो राजकीय दृष्ट्या पारतंत्र्यात होता. पण हा समाज वरकड उत्पन्न मिळवू शकत नव्हता. शेती, शिकार वा युद्ध यातून मिळालेले गणधनाचे कुलांच्या वा ज्ञातींच्या माता व गणराज्ञी या धनाचे स्त्री-पुरुषांत समान वाटप करत. त्यामुळे ह्या गणसमाजात आर्थिक समता होती. समुहनिष्ठ आर्थिक समतेच्या पायावर स्त्रीवर्गाचे स्वातंत्र्य व पुरूषवर्गाचे पारतंत्र्य असे द्वैत उभे राहते. प्राचीन भारतीय आद्य संस्कृतीचे निर्माण स्त्रियांनी केले हे ध्यानात घेऊन स्त्री-पुरूष समतेचा भारतातील इतिहास शरद पाटील मांडतात. भारतीय आद्य संस्कृतीची निर्मिती स्त्रियांनी केली, हे स्पष्ट होते. दासप्रथाक वर्णसमाजाची जागा सामंतप्रथाक जातीसमाजाने घेतली. निमस्वतंत्र शुद्रातिशुद्र जाती-जमाती व स्त्रिया यांच्या वाढत्या शोषणपीडनातून जातीसमाजाचा विकास होऊ लागला. चक्रधर व बसव यांच्यानंतर स्त्री-पुरूष समतेचा अपूर्व व अनन्य असा सक्रीय पुरस्कार फुलेंनी केला. खराखुरा जातीव्यवस्था विरोध, निधर्मीपणा व स्त्रीमुक्ती अविभाज्य कसे आहेत याचे आद्य दर्शन देशाला त्यांच्या साहित्याने घडवले. प्राचीन गणसमाजात ते चक्रधर, बसवेश्वर, फुलेंपर्यंत स्त्री-पुरूष समानतेचा दिलेला लढा शरद पाटील रेखाटतात. जातीव्यवस्थेच्या दृढीकरणानंतर दलित आदिवासी स्त्रिया यांच्या शोषणास या समाजाची निरक्षरता कारणीभूत आहे. ''भारतात स्त्रीदास्याची समस्या वासाहतिक समाजापासून वर्गव्यवस्थेशी निगडित होण्यापूर्वी वर्ण-जातीव्यवस्थेमध्ये तिचा जन्म व विकास झालेला होता. हिंदू स्त्री मजूर म्हणून भांडवलदार-जमीनदारवर्गाची गुलाम, स्त्री म्हणून पुरुषांची गुलाम, हरिजन-आदिवासी म्हणून उच्च-मध्यमजातीयांची गुलाम, बिगरहिंदू स्त्रिया दुहेरी गुलाम, हिंदू स्त्रिया तिहेरी गुलाम. हरिजन-आदिवासी यांच्यामधील अत्याचारात पुरुषांवरील सर्व अत्याचार स्त्रियांवर होतातच पण या अत्याचारा व्यतिरिक्त स्त्रियांना बलात्कार व सक्तीच्या शरीर विक्रयाचेही बळी या स्त्रियांना व्हावे लागते. यातून ते सिद्ध करतात की, हरिजन आदिवासी स्त्रियांमधून वेश्या व्यवसायात तुलनात्मक दृष्ट्या सर्वांत जास्त भरती होण्याचे कारण केवळ त्यांचे आर्थिक दुबळेपण नाही तर जातीव्यवस्था हे आहे. स्त्री शोषणाचे जातीय पदर शरद पाटलांनी उलगडून दाखवले. शरद पाटील वगळता जात-वर्ग-स्त्रीदास्याचे संयुक्तिक विश्लेषण कम्युनिस्ट विचार प्रणालीने केले नाही.

स्त्री शोषणाचे विश्लेषण देताना शरद पाटलांनी समकालीन साधनांची चिकित्सा तर केलीच पण समकालीन विचारप्रणालीचीही चिकित्सा केली. शरद पाटलांची वेगळेपण म्हणजे ते मार्क्सवादी असले तरी त्यांची अन्वेषण पद्धती पारंपारिक न राहता मार्क्स, फुले, आंबेडकरवादी राहिल्याने त्यांनी स्त्रीसत्ताक गणराज्यापासून समकालीन काळापर्यंत स्त्रीसत्तेचे, स्त्री शोषणाचे पैलू बहुजन शुद्रातिशुद्र स्त्रियांपर्यंत नेऊन भिडवले. सद्यकाळातील स्त्रियांचे दुय्यमत्व आर्थिक तर आहेत पण ते जातीय जास्त आहे, हे त्यांनी स्पष्ट केले. डी. डी. कोसंबी वगळता भारतीय मार्क्सवाद्यांनी स्त्री शोषणाचे जातीय पैलू दुर्लक्षित केल्याचे शरद पाटील तर दाखवतातच शिवाय जातीय-वर्गीय विश्लेषण देताना चक्रधर ते फुले यांचे कार्य देखील लक्षात घेतात.

## ब) सबाल्टर्न

ॲन्टिनीओ ग्रामची (१८८१-१९३०) याने सबाल्टर्न ही संकल्पना पुढे आणली. सबाल्टर्न या शब्दाचा अर्थ ऑक्सफर्ड डिक्शनरीमध्ये 'of inferior rank' असा अर्थ दिला आहे. सबाल्टर्नचा अर्थ कनिष्ठ दर्जाचे, कमी दर्जाचे असा आहे. आपल्या नैसर्गिक अधिकारांपासून वंचित असलेले लोक यांचा यात समावेश होतो. इटालियन सैन्यात वापरण्यात येणारी ही संज्ञा ग्रामचीने समूहाची वंचितता आणि त्या प्रकारची जाणीव व्यक्त करण्यासाठी वापरली. या नव्या संकल्पनेच्या द्वारे ग्रामचीने शोषित अंकितांचा इतिहास लिहिण्याचा नवा दृष्टिकोन विकसित केला. त्याने स्त्रियांवर होणाऱ्या विविध प्रकारच्या शोषणाचा विचार केला. त्याने स्त्री विषयक आणि स्त्रीवादाविषयी मांडणी केली. नैतिकता आणि नागरिकतेचा संबंध लिंग-भावात्मकतेशी जोडून भांडवली व्यवस्था स्त्रियांचे शोषण कशी करते हे ग्रामचीने स्पष्ट केले. नैतिकता आणि नागरी व्यवस्थेचा महत्त्वपूर्ण प्रश्न आधुनिक स्त्रियांच्या लैंगिकतेशी जोडला गेला आहे. जोपर्यंत स्त्रिया पुरुषांच्या संबंधाने आपले खरे स्वातंत्र्य हस्तगत करत नाहीत आणि लैंगिक संबंधात आपली आधुनिक भूमिका स्पष्ट करत नाहीत तोपर्यंत लैंगिक असमानतेतून आलेले प्रश्न अनुत्तरित राहतील. यासाठी कायदा महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतो. आजच्या उद्योग जगतात स्त्रियांचे लैंगिक प्रश्न गुंतागुंतीचे झाले आहेत. ग्रामची लिहितो, 'उद्योगपती आपल्या कर्मचाऱ्यांच्या लैंगिकतेबाबत आणि त्यांच्या परिवाराच्या संबंधित काय भूमिका घेतो हे पाहणे आवश्यक आहे. व्यसनाधीनते प्रमाणे शुद्धतेच्या स्वरुपासंबंधी भ्रमित होण्याची आवश्यकता नाही. जो पर्यंत लैंगिकता विवेकसंगत असत नाही तोपर्यंत तिच्या प्रवृत्तीला योग्य स्वरुपात अंकित केले जाऊ शकत नाही. आणि जोपर्यंत उत्पादन आणि कामाचे विवेकीकरण, नव्या पद्धतीच्या मनुष्यत्वाची मागणी करत नाही तोपर्यंत त्याचा विकास होणार नाही.

ग्रामची समाजातील स्त्री विषयक भावना काय आहे, हे स्पष्ट करण्यासाठी म्हणी व वाक्प्रचार आदर्शात्मक प्रतिक्रियेची नोंद घेतो. स्त्रीच्या सौंदर्यपणाचा आदर्श दोन संकल्पनेत फिरतो. 'मूल उत्पादन करणारी घोडी' आणि 'साजश्रृंगारित बाहुली.' शहरातच नव्हे तर खेड्यातही लैंगिकतेचा एक खेळ बनला आहे हे दाखवण्यासाठी त्यांनी काही लोकप्रिय म्हणींचा वापर केला. 'पुरूष  शिकार करतात स्त्रिया उत्तेजित करतात'. 'ज्यांना काही काम नसते ते आपल्या बायको जवळ झोपतात'. या लोकप्रिय म्हणींच्या माध्यमातून समाजात स्त्रियांविषयीच्या लैंगिकतेविषयीची भावना ही शहरापेक्षा ग्रामीण भागांत जास्त दमनकारी होते, हे

ग्रामची दाखवतो. ग्रामचीच्या सबाल्टर्न विचारप्रणालीद्वारे भारतातील वंचितांचा इतिहास ऑस्ट्रेलिया विद्यापीठात प्राध्यापक असणाऱ्या रणजीत गुहा या लेखकाने १९८२ मध्ये सबाल्टर्न स्टडीजच्या लेखन संपादनाचा प्रकल्प हाती घेतला. त्याचे आतापर्यंत १२ खंड प्रकाशित झाले आहेत. या लेखनातील स्त्री विषयक लेखन रणजीत गुहा, पार्थ चॅटर्जी, कमला विश्वेश्वर, गायत्री चक्रवर्ती, स्पिवॅक, दिपेश चक्रवर्ती, डेव्हिड अर्नॉल्ड यांच्या लेखनातील स्त्रीप्रश्नविषयक चर्चा केल्याचे दिसते.

**कमला विश्वेश्वर**

कमला विश्वेश्वर यांनी राष्ट्रवादी विचार प्रणालीच्या इतिहास लेखनशास्त्रातील सबाल्टर्न लिंग-भाव शोधण्याचा प्रयत्न केला. राष्ट्रवादी चळवळीतील स्त्रियांच्या सहभागाचे विश्लेषण त्यांनी केले. त्यांनी नव्या साधनांचा शोध घेत त्यातील लिंग-भाव शोधण्याचा प्रयत्न केला आहे. राष्ट्रीय काँग्रेसच्या स्वतंत्र्यलढ्यात सहभागी झालेल्या स्त्रियांची मोठ्या प्रमाणावरील आकडेवारी देऊन ब्रिटिश सरकारने स्त्री सत्याग्रहींची केलेली छळवणूक पुढे आणली आहे. जेव्हा स्त्री सत्याग्रहींनी १९३०चे जेलभरो आंदोलन केले त्यावेळी या राजकीय स्त्रियांशी कशा पद्धतीने वागावे याचे धोरण ठरलेले नव्हते. या काळात ब्रिटिशांचे भारतीय स्त्रियांच्या संदर्भात कशा प्रकारच्या दृष्टिकोन होता या संदर्भातील माहिती पुढे येते. विश्वेश्वराने मद्रास इलाक्यातील स्वातंत्र्य चळवळीतील स्त्री आंदोलनकर्त्या स्त्रियांचा अभ्यास पुढे आणला. स्त्रियांचे तुरुंगातील शोषण पुढे करताना राष्ट्रवादी आणि ब्रिटिश वसाहतवादी यांच्यातील द्वंद्वावरही विश्वेश्वर यांनी भर दिला. ज्या-ज्या ठिकाणी वसाहतवादी व्यावहारविश्व हे राष्ट्रवादी समूहाचे लिंग-भावीकरण करतात किंवा तसे करणे नाकारतात, यावर विश्वेश्वराने भर दिला. तुरुंगातील स्त्रिया पांढरी साडी घालत. कुंकू लावत नसत. बांगड्या फोडून टाकत. या घटनेचे विश्लेषण करताना भारतीय राष्ट्रवादाच्या पुरूषसत्ताक रचना संबंधांचा निर्देश करतात. पुढे स्पष्ट करतात की, तुरुंगामध्ये वैधव्य दर्शवणाऱ्या प्रतिकांचा विनियोग हा भारतीय स्त्रीत्वावरील हल्ला म्हणूनही बघता येईल. म्हणजेच स्त्रीचे व्यक्ती म्हणून कार्य गौरव न होता स्त्रीत्वाच्या प्रतिकात तिला बघितले जाते किंवा तिच्या कार्याचे मूल्यमापन स्त्रीत्वाच्या पुढे जाऊन पुरुषांच्या बरोबरीने तिच्या कार्याचा उल्लेख होत नाही.

विश्वेश्वरांच्या संशोधनाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे मध्यमवर्गीय आणि दलित स्त्रियांच्या राष्ट्रीय चळवळीमधील तुलनात्मक अभ्यास व नवे संशोधन त्यांनी पुढे आणले. मद्रास अहवालाचा हवाला देऊन त्यांनी लिहिले, 'या सभेत प्रामुख्याने मध्यमवर्गीय व सुखवस्तू अशा स्त्रिया असल्या तरी गरीब वर्गातून आलेल्या स्त्रियांचीही संख्या लक्षणीय होती. अशा २०० स्त्रियांची माहिती देताना त्या प्रामुख्याने कामगार वर्गीय होत्या व तेथे फक्त काय होत आहे हे पाहण्यासाठी त्या आल्या होत्या, अशा प्रकारची माहिती दिली जाते. या ठिकाणी सुद्धा गरीब स्त्रियांची ओळख ही स्त्रिया व कामगार अशा दोन कोटीक्रमातून सांगितली गेली.' तिच्या राजकीय जाणिवांचा शोध घेतला गेला.

**गायत्री चक्रवर्ती स्पिवॅक**

गायत्री चक्रवर्ती स्पिवॅकने महाश्वेतादेवीच्या 'स्तनदायिनी' कादंबरीचे परीक्षण सबाल्टर्न दृष्टिकोनातून केले. भारतातील सर्व प्रकारच्या मानमर्तबापासून, सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठेपासून दूर ठेवल्या गेलेल्या स्त्रियांच्या

एकूणच सामाजिक स्थानाविषयी, वंचितते विषयी आणि बौद्धिक पद्धतीशास्त्र व वंचित इतिहासाचे साधने यांच्या संदर्भात स्पिवॅकने प्रश्न उपस्थित केला. पुढे त्या स्पष्ट करतात की, 'साधारणतः वंचित वर्गाचे काय करायचे? हा प्रश्न कोणत्याही ऐतिहासिक अथवा साहित्यिक विश्लेषणाने सुटू शकत नाही, असे विश्लेषण फार-फार तर वंचितांच्या प्रश्नांचा आवाका व त्यामधील राजकारण थोड्याफार सौम्यपणे समजण्यास मदत होईल, असे वंचितांच्या प्रश्नांचे विश्लेषण केल्यानंतर स्पिवॅकचे साहित्य मूल्य, मार्क्सवाद, सबाल्टर्न, लिंग-भाव, स्त्रीवाद, इत्यादी दृष्टिकोन लक्षात घेऊन 'स्तनदायिनी'ला न्याय देण्याचा प्रयत्न केला.

'चंद्राज डेथ' या निबंधातून रणजीत गुहांनी जात, वर्ग, पुरूषसत्ता, वसाहतकाळ यांचा परस्पर संबंध शोधण्याचा प्रयत्न केला. दीपेश चक्रवर्तींनी पुरूषसत्तेतील क्रूरता मान्य करूनही कूल आणि गृहलक्ष्मी यांचे गौरवीकरण केले. पार्थ चॅटर्जींनी स्त्रियांच्या राष्ट्रवादी चळवळीतील सहभागाविषयी लेखन केले. पण त्यांची सैद्धांतिक पातळीवर विश्लेषण करण्यास ते कमी पडले. राष्ट्रवादाच्या काळातील स्त्रीत्वाच्या नव्या संकल्पनांवर आणि पुरूषसत्तेमध्ये स्त्रियांनी आपले सत्व टिकवण्यासाठी केलेल्या संघर्षावर चटर्जींनी प्रकाश टाकला नसल्याचे प्रवीण चव्हाण यांनी नोंदवले.

**स्वयं अध्ययन प्रश्न २**

**अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.**

१) 'खाजगी मालमत्ता, शासनसंस्था यांचा उगम' हा ग्रंथ .......... यांनी लिहिला.

अ) कार्ल मार्क्स ब) एंगल्स क) लेनिन ड) वरील पैकी नाही

२) भारतीय स्त्रियांचे दुय्यमत्व पोशाखावरून शोधण्याचा ........ यांनी प्रयत्न केला.

अ) डी. डी. कोसंबी ब) आर. एस शर्मा

क) कार्लमार्क्स ड) ए एस आळतेकर

३) .......... यांनी प्राचीन भारतातील राजकीय व सामाजिक संस्थांतील स्त्रियांच्या स्थानाचा शोध घेतला.

अ) आर. एस. शर्मा ब) ए. एस. आळतेकर

क) डी. डी. कोसंबी ड) वरील पैकी नाही

४) अथर्ववेदात विदथमध्ये स्त्रियांची उपस्थिती होती, असे कमीत कमी....... वेळा उल्लेख आले आहेत.

अ) ८ ब) ७ क) ५ ड) १०

५) .......... ही विदुषी विदथमध्ये गेली आहे, हे आर्य शर्मा यांनी ऋग्वेदातील माहितीवरून दाखवले.

अ) घोषा ब) अपाला क) योणा ड) गार्गी

६) .......... ही वयात आलेल्या स्त्री-पुरुषाची समान अधिकार असलेली ही पंचायत म्हणजे लोकसभेच्या स्वरुपाची संस्था होती.

अ) विदथ ब) गण क) सभा ड) वरील पैकी नाही

७) स्कंद अथवा कार्तिकेय या दैत्यांशी युद्ध करण्यास ......... मातृगण गेल्याचे शर्माने दाखवले आहे.

अ) ७ ब) ९ क) ८ ड) ५

८) .......... यांनी मातृसंस्थेचे उच्चाटन व पितृसंस्थेची स्थापना हा स्त्रियांचा ऐतिहासिक पराभव होता असे म्हटले आहे.

अ) आर. एस. शर्मा ब) श्रीपाद अमृत डांगे

क) रोमिला थापर ड) वरील पैकी नाही

९) शरद पाटील यांनी जात वर्ग.......... प्रणाली मार्क्स, फुले, आंबेडकर यांच्या विचारांवर सिद्ध केली.

अ) स्त्रीदास्यांतवादी ब) स्त्रीवादी क) आदर्शवादी ड) वरील पैकी सर्व

१०) स्त्रीसत्ताक गणसमाजाचे वर्णन ............ यांनी केले.

अ) शरद पाटील ब) आर. एस. शर्मा क) ए. एस. आळतेकर ड) वरील पैकी नाही

११) ............... वगळता जात वर्ग स्त्रीदास्याचे संयुक्त विश्लेषण कम्युनिस्ट विचार प्रणालीने केले नाही.

अ) शरद पाटील ब) आर. एस. शर्मा क) श्रीपदा अमृत डांगेड) वरील पैकी नाही

१२) ......... यांनी सबाल्टर्न ही संकल्पना पुढे आणली.

अ) ग्रामची ब) डी. डी. कोसंबी क) शरद पाटील ड) वरील पैकी नाही

१३) राष्ट्रवादी विचार प्रणालीच्या इतिहास लेखनशास्त्रातील लिंग-भाव शोधण्याचा प्रयत्न ......... यांनी केला.

अ) कमला विश्वेश्वर ब) डी. डी. कोसंबी

क) रोमिला थापर ड) वरील पैकी नाही

१४) .......... यांनी महाश्वेता देवीच्या 'स्तनदायिनी' कादंबरीचे परीक्षण सबाल्टर्न दृष्टिकोनातून केले.

अ) गायत्री चक्रवर्ती ब) कमला विश्वेश्वर क) रोमिला थापर ड) वरील पैकी नाही

१५) ............. या निबंधातून रणजीत गुहा यांनी जात, वर्ग, पुरूषसत्ता वसाहतकाळ यांचा परस्पर संबंध शोधण्याचा प्रयत्न केला.

अ) चंद्राज डेज  ब) स्तनदायिनी  क) शुद्रातिशुद्र  ड) वरील पैकी नाही

**ब) खालीलपैकी कोणते विधान योग्य/अयोग्य आहे.**

विधान १- भारतीय मार्क्सवादी इतिहासकार वर्गवादी असल्याने ते जातीव्यवस्था व स्त्री-दास्य यांची सांगड घालत नाहीत.

विधान २- स्त्री शोषणाचे जातीय पदर शरद पाटलांनी उलगडून दाखवले.

अ) दोन्ही विधाने चुकीची आहेत  ब) दोन्ही विधाने बरोबर आहेत

क) पहिले विधान चूक दुसरे बरोबर  ड) पहिले विधान बरोबर दुसरे चूक

**क) योग्य जोड्या जुळवा.**

| | गट १ | | गट २ |
|---|---|---|---|
| १ | भारतीय मार्क्सवादी | अ | प्राचीन भारतीय राजकीय व सामाजिक संस्थांतील स्त्रियांच्या स्थानाचा शोध घेतला |
| २ | डी. डी. कोसंबी | ब | वर्णव्यवस्थेचा उगम व खाजगी मालमत्ता, कुटुंब व्यवस्था याचा उगम काळ हा स्त्री सत्तेचा ऱ्हास काळ होय! |
| ३ | आर. एस. शर्मा | क | स्त्रियांच्या संदर्भातील लेखन वर्गवादी पद्धतीने करतात. |
| ४ | श्रीपाद अमृत डांगे | ड | पाश्चात्य तत्त्वज्ञान व भारतीय तत्त्वज्ञानातील मूलभूत फरक दाखवून दिला |

अ) १-ड, २-क, ३-अ, ४-ब  ब) १-ब, २-अ, ३-ड, ४-क

क) १-अ, २-ड, ३-क, ४-ब  ड) १-क, २-ड, ३-अ, ४-ब

### २.२.३ स्त्रीवादी इतिहास लेखन मिमांसा

**अ) स्त्रीवादी इतिहास लेखन मीमांसा**

१९६२ नंतर अमेरिका, जपान आणि युरोपातील अनेक देशांमध्ये आधुनिक काळातील स्त्रीप्रश्न संबंधित चळवळी सुरू झाल्या. १९७५ हे वर्ष जागतिक स्तरावर स्त्री वर्ष मानले गेले. भारतातही या वर्षानंतर स्त्रीविषयक प्रश्नांची चर्चा सुरू झाली. स्त्रीविषयक नवीन अभ्यास शासकीय पातळीवर सुरू झाले. या नवीन अभ्यासातून स्त्रियांवरील अत्याचाराचे भीषण वास्तव पुढे आले. विवाह अंतर्गत असणारी विषमता, कुटुंब संस्थांमध्ये घडणारी विविध पातळ्यांवरील हिंसा, तसेच शासनसंस्था आणि पुरूषप्रधान व्यवस्था याचे

हितसंबंध पुढे आले. त्यामुळे स्त्रीवादी चळवळीने स्त्रियांच्या विविध प्रश्नांवर चळवळी उभ्या केल्या. समाजाच्या पटलावर स्त्रियांचे प्रश्न येऊ लागले.

स्त्रीवादा विषयी बोलले जाऊ लागले. स्त्रीवादामध्ये स्त्रियांच्या दुय्यमत्वाविषयी लिंग-भावा विषयी विचार मांडले जाऊ लागले. हा विचार स्त्री चळवळीशी जोडला गेला. या विचाराने समाजात स्त्री प्रश्नांविषयी संवेदना निर्माण केली. या संबंधाने प्रीती करमरकर म्हणतात, ''स्त्रीवाद ही राजकीय चळवळीची विशिष्ट संबंध असणारी विचार प्रणाली असून पुरुषांपेक्षा स्त्रियांना दुय्यमत्व का आणि कसे लेखण्यात आले आहे याचे विश्लेषण आणि स्पष्टीकरण व त्याचबरोबर हे असंतुलन कसे नष्ट करता येईल यासाठी कोणती आव्हाने स्वीकारावी लागतील यावर स्त्रीवाद प्रकाश टाकतो.'' स्त्रीवादामध्ये अनेक सिद्धांत अंतर्भूत असतात. म्हणून स्त्रीवाद नावाचा एक आणि एकच सलग सिद्धांत नसतो. स्त्रियांच्या दुय्यमत्त्वाचे विश्लेषण करणारी एक सुसंगत राजकीय विचारसरणी असे स्त्रीवादाचे स्वरूप नसून स्त्रियांना त्यांचे खरे श्रेय मिळावे म्हणून झगडणारी ही एक प्रकारे राजकीय बांधिलकी असते.

स्त्रीवादी इतिहास लेखन प्रवाहाने पुरूषसत्ताक गृहितके आणि स्त्रियांचे अदृश्यीकरण यावर लक्ष केंद्रित केले. डॉ. राजा दीक्षित यांच्या मते, ''ऐतिहासिक वास्तवाच्या लिंग-भावमयतेचा संशोधकीय पायावरील अन्वयार्थ हा स्त्रीवादी इतिहास लेखनाचा खरा गाभा म्हणता येईल. मानवी वास्तवाच्या आकलनासाठी प्रदेश, वंश, धर्म, जात, वर्ग इत्यादी विविध प्रवर्ग लक्षात घेतले जातात. त्यात दुर्लक्षित राहिलेल्या लिंग-भाव या प्रवर्गावर भर देऊन इतिहास लेखन करणारा प्रवाह म्हणजे स्त्रीवादी प्रवाह होय!'' प्रस्थापित पुरुषी इतिहास लेखनाने स्त्रियांच्या दुय्यमत्त्वाचा आणि कर्तेपणाचा इतिहास वस्तुनिष्ठपणे मांडला नसल्यामुळे स्त्रीवाद्यांना स्त्रीवादी इतिहास मांडावा लागला, असे स्त्रीवादी इतिहासकार मानतात. स्त्रीवादी इतिहास लेखनाने वसाहतवादी, राष्ट्रवादी, मार्क्सवादी, सबाल्टर्न इतिहास लेखनाने दुर्लक्षिलेल्या स्त्रियांच्या स्थानाचा शोध घेतला. त्याची चिकित्सा केली. पुरूषप्रधानता, लिंग, लिंग-भाव या संकल्पनांची नव्याने मांडणी केली आणि स्त्रीवादाचे सम्यक स्वरूप पुढे आले. जे कृष्णमूर्ती, कुंकुम संगारी, उमा चक्रवर्ती, सुदेश वैद, राधा कुमार, विद्युत भागवत, शर्मिला रेगे, अनघा तांबे यांनी स्त्रीवादी परिपेक्षात या संकल्पनांचा विस्तार केला.

इतिहास लेखनाने स्त्री विषयक लिखाण करताना दुर्लक्षित, अदृश्य, स्त्रियांना प्रमुख प्रवाहाच्या बरोबरीने मानले नाही, हे स्त्रीवादी इतिहास लेखनाने पुढे आणले. स्त्रीवादी इतिहास लेखनशास्त्राने केवळ पारंपारिक इतिहास लेखनाची चिकित्सा केली नाही तर त्यांनी स्त्रियांचे अदृश्य स्वरुपातील इतिहास आणि पर्यायी साधने पुढे आणली. स्त्रिया का अदृश्य ठेवल्या गेल्या याची चिकित्सा केली.

**विद्युत भागवत**

विद्युत भागवत यांनी स्त्रियांच्या स्थानाची चिकित्सा केली. त्यांच्या मते, 'इतिहासामध्ये प्राचीन गणसमाजात स्त्री-पुरूष समानता होती. पण पुढे उत्पादन साधनांची वाढ होत जाऊन ती पुरूषकेंद्री बनली आणि स्त्रियांच्या दुय्यमत्त्वाचा इतिहास सुरू झाला. भारतीय संदर्भात, ''पुरूषप्रधान समाज व्यवस्थेत जाती आणि वर्ग यांचे परस्पर संबंध जुळले. आणि स्त्रियांच्या दमनातून जातीची उतरंड निर्माण झाली. एकेकाळी

स्त्रियांच्या जनन क्षमतेचा उदो-उदो करणारी भारतीय संस्कृती स्त्रियांच्या रजस्वाला 'विटाळ' मानू लागली. स्त्रियांची लैंगिकता कठोरपणे नियंत्रित करून वारसा हक्काचा प्रश्न बीज शुद्धीच्या मार्गाने सोडवू लागली. मातृत्व आणि स्त्रीची लैंगिकता यामध्ये काटेकोर भेद करून अधिकृत मातृत्वासाठी स्त्रीच्या लैंगिकतेचा बांध घातला गेला. तिला शुद्धतेच्या आणि पावित्र्याच्या चौकटीत जखडले गेले.'' असे विद्युत भागवत यांनी स्त्रियांच्या दुय्यमत्त्वाचा शोध घेताना स्पष्ट केले.

विद्युत भागवत यांनी 'स्त्री प्रश्नांची वाटचाल' या हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथातून त्यांनी अभिजन, सत्यशोधक, आणि ब्राह्मणेत्तर चळवळींनी घेतलेली स्त्री विषयक भूमिका स्पष्ट केली आहे. तसेच समकालीन साहित्याची चर्चा स्त्रीवादी जाणिवेतून केली आहे. बाबा पदमजी यांनी १८५७ मध्ये 'यमुना पर्यटन अथवा हिंदू विधवांच्या स्थितीचे निरूपण' ही कादंबरी लिहिली. ही कादंबरी १९ व्या शतकातील मराठी माणसाच्या सामाजिक, धार्मिक, राजकीय इतिहासावर प्रकाश टाकते. या कादंबरीत हिंदू विधवांच्या दारुण स्थितीचे, त्यांच्या अध:पतनाचे आणि आत्मघाताचे चित्रण केले आहे. बाबा पदमजी यांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला होता. तेव्हा त्यांनी हिंदू धर्म व ख्रिश्चन धर्म यांची तुलना करत स्त्रियांच्या प्रश्नांचा विचार केला. यासंबंधी विद्युत भागवत यांनी चिकित्सा केली त्या लिहितात, ''वारसा हक्क, घरावरचा पतीच्या संपत्तीचा हक्क, किंवा घरावरचा हक्क असे विषय या कादंबरीत चुकूनही येत नाही. सुचित होते ते असे की, विधवा नावच एक घातक गट आहे. त्यांना नियंत्रित ठेवले पाहिजे. त्यांची लैंगिकता नियंत्रित करून त्यांना योग्य वळणावर आणले की समाज सुधारेल. स्त्रिया म्हणजे जनावरांसारखी लैंगिकता असणारे अप्रगल्भ प्राणी असेही चित्र यातून प्रतीत होते. नव्या इंग्रजी राजवटीच्या संक्रमण काळात जुन्या सासवाही अडथळाच होत्या की काय असेही शंका येते.'' स्त्रीवादी साहित्यासंबंधी त्यांनी विचार मांडले. बाईच्या असण्याचा, होण्याचा समग्रतेचा वेध घेणारे, तिच्या आत्मशोधाचा प्रवास साहित्यिक आविष्कार म्हणून मांडणारे लेखनही भागवत स्त्रीवादी मानतात. संत साहित्यातील जनाबाई, मुक्ताबाई, चक्रधर, बहिणाबाई, वेणाबाई यांनी पारंपारिक समाज आणि चौकट मोडून काढण्याचे भागवत दाखवतात.

महात्मा फुले यांच्या विचारसरणीतील उणिवाही त्यांनी दाखवून दिल्या. यासाठी त्यांनी बहिरामजी मलाबारीच्या 'सक्तीचे वैधव्य व बालविवाह' या टिपणाला फुलेंनी दिलेली प्रतिक्रियाचा स्त्रीवादी दृष्टिकोनातून शोध घेण्याचा प्रयत्न केला. ही प्रतिक्रिया अशी आहे (फुलेंनी १९ वर्षांखालील मुलांस आणि ११ वर्षांखालील मुलीस कायद्याने लग्न करण्याची परवानगी नाकारावी असे म्हटले होते) या टिपणावर विद्युत भागवत प्रतिक्रिया देतात की, ''जोतिराव फुलेंसारख्या क्रांतिकारकालाही मुलीचे लग्न वयात येण्यापूर्वी केले जावे या सर्वसामान्य समजुतीबाबत काही वेगळा विचार करावा, असे वाटले नाही. स्त्री-पुरूष समानतेचा व्यापक विचार मांडणारे सार्वजनिक सत्य धर्म लिहिणारे फुले या टिपणात अजाण, आश्राप, निरागस मुलींच्या कोंडी विषयी जीव देण्यापलीकडे त्यांना दुसरा मार्ग उरत नाही. या परिस्थितीत संबंधित कळवळून लिहितात. पण सर्व बायकांच्या वाट्याला येणारे हे दु:ख विशिष्ट प्रकारचे आहे. त्याची सोडवणूक केवळ शिक्षण देऊन केवळ उशिरा लग्न लावून देऊन करता येणार नाही, अशी ठाम भूमिका मात्र त्यांनी मांडली नाही. मानवतावादी दृष्टिकोना पलीकडे जाऊन स्त्रीदास्याचा प्रश्न केवळ दया करूणेचा न बनवता धसास लावला

गेला पाहिजे, याचे भानही इथे दिसत नाही. स्त्रीदास्याचा प्रश्न केवळ ब्राह्मणी वर्चस्व व्यवस्थेला मोडून काढण्या पुरता फुल्यांनी मांडला.

**कुमकुम संगारी, सुदेश वैद**

'स्त्रियांची पुनर्घडण' 'रिकास्टिंग वुमन' ("Recasting Women: Essays in Colonial History") हे पुस्तक कुमकुम संगारी, सुदेश वैद यांनी लिहिले. या पुस्तकात स्त्रीवादी इतिहास लेखनाचे विविध पैलू त्यांनी उलघडून दाखवले. त्यांनी लिंग-भावनात्मकतेच्या मुद्द्याला हात घातला. स्त्रियांचा वा स्त्रियांविषयीचा इतिहास नसतानासुद्धा इतिहास लेखनशास्त्र स्त्रीवादी असू शकते, हा मुद्दा स्पष्ट केला.

स्त्रीवादी इतिहास लेखन हे जाणते की, प्रत्येक वास्तव लिंग-भावावर आधारित असते. त्यामुळे हे इतिहास लेखन अशा सर्व गोष्टींच्या ज्ञान शाखांच्या चिकित्सेकडे घेऊन जाते. ज्या आपल्याला वाटल्या आणि आपल्याला माहित आहेत हे इतिहास लेखन तथाकथित लिंग-भाव निरपेक्ष अभ्यास पैलूंना छेद देते. तसेच, विशिष्ट संदर्भीय चौकटीत बसणारी संकल्पना म्हणून स्त्री संकल्पना नाकारते. लिंग-भावात्मक फरक हा अधिक व्यापक अशा सामाजिक संबंधाने सुरक्षित केलेला दिसतो. तसेच, तो त्या सामाजिक संबंधांना संचारित करत असतो. वरील अर्थाने स्त्रीवादी इतिहास लेखनशास्त्र सर्व इतिहासकारांसाठी खुला पर्याय ठरतो.

स्त्रीवादी इतिहास लेखनशास्त्रासंबंधी संगारी व वैद यांनी 'रीकास्टिंग वीमेन: एसेज इन कोलोनियल हिस्ट्री' या आपल्या ग्रंथात विचार स्पष्ट केले आहे. स्त्रियांचा इतिहासामध्ये स्त्रीवादी, स्त्रीकेंद्रीत, स्त्रीविषयक अशा विचार चौकटीत आपण स्त्रियांचा इतिहास लिहितो. समजून घेतो किंवा या विचाराच्या चौकटीत स्त्रीवादी इतिहास लेखन फिरताना दिसते. कुमकुम संगारी व वैद स्त्रीवादी इतिहासाला या चौकटीच्या बाहेर काढतात. स्त्रीवादी इतिहास लेखनाचे विविध पैलू उघडून दाखवतात.

स्त्रियांचा वा स्त्री विषयाच्या इतिहास नसताना सुद्धा इतिहास लेखन स्त्रीवादी असू शकते हे स्पष्ट करतात. हे स्पष्ट करताना ते लिंग-भावनात्मकतेच्या मुद्द्याला हात घालतात. समाजाची जडणघडण, सामाजिक संबंध हे लिंग-भावात्मक दृष्टिकोनातून संरचित केले जातात. समाजाची जडण घडण व सामाजिक संबंध स्पष्ट करताना हे संबंध समाजाच्या सर्व रचनांमध्ये कार्य करत असतात. त्यामुळे स्त्रीवादी इतिहास लेखन सर्व गोष्टींच्या ज्ञान शाखांच्या चिकित्सेकडे घेऊन जाते. लिंग-भाव सामाजिक संबंध संरचित करीत असतो. आपण असेही म्हणू शकतो की, समाजातील प्रत्येक संरचना, संरचनेचेही जडणघडण लिंग-भावानुसारच झालेली असते. वरील अर्थाने स्त्रीवादी इतिहास लेखनशास्त्र सर्व इतिहासकारांसाठी खुला असलेला पर्याय ठरतो. इतिहासाच्या अनेक दृष्टिकोनांपैकी एक असे त्याचे स्वरूप राहत नाही. चळवळीतील स्त्रियांचा संस्थात्मक व गुणात्मक सहभाग किंवा भारतातील स्त्री अभ्यासाच्या साच्यातील ही एक वेगळी प्रणाली नव्हे. तर सर्व प्रकारच्या सामाजिक संरचनेमध्ये लिंग-भाव समजून घेऊन इतिहासाची मांडणी (त्यात स्त्रिया किंवा त्यांचा विषय असेल असे नाही) स्त्रीवादी दृष्टिकोनातून करू शकतो.

### उमा चक्रवर्ती आणि कुमकुम रॉय

उमा चक्रवर्ती आणि कुमकुम रॉय यांनी प्राचीन भारताविषयी लेखन करणाऱ्या ए. एस. आळतेकर, सी. बादेर, बी. एस. उपाध्याय, जे. जे. मेअर, आय. बी. हॉर्नरचे स्त्रीवादी परिपेक्षातून मूल्यमापन करण्याचा प्रयत्न केला. आळतेकरी विचार प्रणालीने स्त्रीविषयक अभ्यास हा नातेसंबंधाची वीण आणि चार भिंतीतील तिचे अवकाश या पुरता मर्यादित ठेवला. त्यांनी स्त्रीविषयीचे वरवरचे आकलन देण्याचा प्रयत्न केला. स्त्रियांना दुय्यमत्त्व इतिहासाच्या कोणत्या टप्प्यावर आले हे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला नाही. हे स्त्रीवादी इतिहास लेखकांनी पुढे आणले.

पंडिता रमाबाईच्या काळातील स्त्रियांचे पितृसत्तेने केलेले शोषण उमा चक्रवर्ती यांनी पुढे आणले. यासाठी त्यांनी जात, वर्ग आणि लिंग-भाव यांच्या आधारे स्त्रियांच्या शोषणाची रीत स्पष्ट केली. त्यांनी स्पष्ट केली की, पेशवाईतील स्त्रीजीवन ब्राह्मणी पितृसत्तेने अंकित केले होते. चक्रवर्ती लिहितात, ''पेशवाईतील स्त्रियांची लैंगिकता ही विविध जाती नियमानुसार ब्राह्मणाच्या देखरेखी खाली होती. म्हणजेच वैध असे पत्नीत्व, पुनर्विवाह, संन्यासीनी, लग्नाचे स्वरूप व त्याचा काळ ठरवणे या सर्व बाबी ब्राह्मण नेतृत्वाखालील समुदाय आणि राज्यव्यवस्था ठरवत असे. विविध स्त्रियांचे लैंगिकते संबंधातील गुन्हे गुलामीच्या शिक्षेसही पात्र होते. एकंदरीत स्त्रिया कायमच जात, समुदायाच्या आणि राज्यसंस्था यांच्या नियंत्रणात राहिलेल्या दिसतात. अशा प्रकारे राष्ट्रवादी विचारांचे, वासाहतिक कायद्याचे, कुटुंब संस्थेचे, विधवा प्रथेचे विश्लेषण देण्याचा प्रयत्न उमा चक्रवर्तीने केला.

### राधा कुमार

राधा कुमार यांनी १८०० ते १९९० पर्यंत स्त्रियांच्या दडपलेल्या स्थानाचा शोध घेताना सती प्रथेच्या इतिहासापासून जागतिकीकरणापर्यंतचे विश्लेषण देण्याचा प्रयत्न केला. आनंद यांग यांच्या संशोधनाच्या आधारे राधा कुमार यांनी सती प्रथेच्या स्वरूप पुढे आणताना वसाहतवाद्यांनी पतीच्या मृत्यूनंतर कित्येक वर्षांनी असाहाय्यतेपोटी विधवांनी आत्महत्या केलेली प्रकरणे सती म्हणून गृहीत धरली. त्यामुळे सतीची आकडेवारी फुगवून सांगितली हे राधा कुमार यांनी स्पष्ट केले. सती आणि आत्महत्या यामधील फरक वसाहतवाद्यांनी स्पष्ट केला नाही. सती प्रश्नांची व्यापकता सिद्ध करण्यासाठी प्रशासकांनी आत्महत्या ही सतीमध्ये परावर्तित केली. विधवेच्या आत्महत्येला कारण त्यांना जगावे लागणारे जीवन असहाय्य होते, हे स्पष्ट केले.

सती प्रथेच्या निर्मुलनानंतर वसाहतवादी आणि सुधारकांनी स्त्री शिक्षणाच्या प्रश्नांकडे लक्ष देण्यास सुरुवात केली. मध्यमवर्गीयांनी स्त्रीशिक्षणास सकारात्मक पाठिंबा देताना कुटुंबा अंतर्गत घरगुती सुधारणा, मुलांचे शिक्षण आणि पतीच्या कामात मदतनीस, संस्कृती रक्षण, अभिजन अभ्युदय, इत्यादी बाबी समोर ठेवल्या. त्यांचे विवेचन राधा कुमार यांनी केले.

राधा कुमार यांनी पुरूष समाजसुधारक व स्त्री समाजसुधारक असा भेद करून पुरूष समाजसुधारकांप्रमाणे पंडिता रमाबाई सारख्या स्त्रियांना सुधारक मानले गेले नाही, याची चिकित्सा केली.

भारतात वेश्याव्यवसाय ब्रिटिश सरकारने कायदेशीर करण्याचा प्रयत्न केला. युरोपियन सैन्य तळाजवळ रेड लाईट विभाग सुरू केला. सैन्य अधिकाऱ्यांच्या लैंगिक गरजा पूर्ण करण्यासाठी अशी व्यवस्था करण्यात आली. तसेच, रखेली ठेवण्याची पद्धतही बेकायदेशीर ठरवण्यात आली. या स्त्रियाही वेश्या व्यवसायात आल्या. वेश्याव्यवसाय करण्यासाठी शासनाची परवानगी लागत होती. याविरूद्ध अभिजनांनी आवाज उठवला. पण काँग्रेसने ब्रिटिश सरकारला साथ दिली. हे राधा कुमार यांनी दाखवताना काँग्रेस राष्ट्रवादीचा लिंग-भावमयतेचा दृष्टिकोन काय होता, हे स्पष्ट केले. राधा कुमार यांनी राष्ट्रवादी चळवळीत स्त्रियांचा इतिहास रेखाटताना फुले, आंबेडकर चळवळ आणि श्रमिक कष्टकरी स्त्रियांच्या चळवळींकडे लक्ष पुरवले.

**ब) अब्राह्मणी इतिहास लेखन**

भारतीय समाजातील ब्राह्मणी धारणांना विरोध करणारी शोषित वंचितजनवादी हे अब्राह्मणी गट म्हणून ओळखले जातात. या इतिहास लेखन प्रवाहात जातवर्गस्त्रीदास्य अंताची भूमिका घेतली. या अब्राह्मणी प्रवाहाने सर्व ज्ञान शाखांच्या संज्ञा संकल्पनांच्या कक्षा इतिहासक्रमात कशा-कशाला लागू होतात याचा शोध घेतला. व्यक्तीला स्वत:च्या सामाजिक अस्तित्वाची व अस्मिताची ओळख जाती-वर्गातून घडत असते. त्यांच्या या अस्मितेचा शोध घेण्यासाठी इतिहासाची मदत होते आणि इतिहासाच्या मीमांसेची गरज वाटते. इतिहासातून आणि त्यांच्या विश्लेषणांमधून सामाजिक गतीनियम स्पष्ट होत असतात. अब्राह्मणी इतिहास लेखनाने स्त्री विषयक प्रश्नांकडे कोणत्या दृष्टिकोनातून बघितले, हे आपण समजून घेणार आहोत. अब्राह्मणी इतिहास लेखनामध्ये महात्मा फुले, ताराबाई शिंदे, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा समावेश करावा लागेल. या तिघांनीही जातीव्यवस्था केंद्रीभूत मानून स्त्रियांच्या स्थानाची चिकित्सा केली. तसेच स्त्रिया या जातीमध्ये विभागल्या असून त्यानुसार त्यांच्या शोषणाचे पदर भिन्न आहेत, हे ही स्पष्ट केले आहे.

या संबंधाने महात्मा फुलेंचे आद्य चरित्रकार पंढरीनाथ पाटील एका सामान्य स्त्रीविषयी घडलेला प्रसंग उद्धृत करतात. ''नेहमीप्रमाणे एके दिवशी मी पोशाख घेऊन शनिवारवाड्यात पेशवे दरबारात गेलो असता तेथे एका बाईस बसविण्यात आले होते. मी तिच्या गुन्ह्याचा तपास केला तेव्हा मला असे कळले की, बाईने ब्राह्मणांच्या पाणवठ्यावर पाणी भरले त्या गुन्ह्याबद्दल तिला दोन-तीन दिवस बसविण्यात आले. एवढेच नव्हे तर त्या बाईची अब्रू घेण्यात आली व तिच्या नाजूक शरीरावर डाग देण्यात आले.'' स्मृतींनी नियमन केलेले शूद्र क्षणोक्षणी अपमानित होत. द्विजांशी बसता बोलताना, त्यांच्याबरोबर वाट चालताना, द्विजांचे हीत जपताना, बरोबरीच्या नात्याने वागण्याच्या आरोपासाठी त्याला देहदंड होऊ शकतो. शूद्र वर्णातील पुरुषांचा असा अपमान होत असताना त्याची स्त्री ही अशीच केविलवाणी असणे स्वाभाविकच होते. या संबंधाने मुक्ता साळवे यांनी १८५५मध्ये 'मांग-महारांच्या दुःखाविषयी' हा निबंध लिहिला. या निबंधात मुक्ता साळवे लिहितात, ''आमच्यातल्या स्त्रिया बाळंत होतात त्यावेळेस त्यांच्या घरावर छप्पर सुद्धा नसते. म्हणून थंडी, पाऊस व वारा यांच्या उपद्रवामुळे त्यांना खूप त्रास होत असे... जर एखाद्या वेळेस त्यांस बाळांत रोग झाला तर त्याचे औषधास व वैद्यास पैसा नसे. कोणी मोफत औषध देत नसे. थोडक्यात, अब्राह्मणी इतिहास प्रवाहाने स्त्रियांच्या प्रश्नांची चर्चा करताना जातीव्यवस्था, जाती व्यवस्थेतून आलेली स्त्रियांच्या शोषणाची व्यवस्था, कशी काम करते, याचे चिकित्सक विश्लेषण केले आहे.

**महात्मा फुले**

महात्मा फुले यांनी स्त्री शुद्रातिशुद्रांना ब्राह्मणी गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी चळवळ उभारली. त्यांनी भारतीय इतिहासाची नवी पर्यायी मांडणी केली. त्यांनी इतिहासाचे पुनर्लेखन करताना समतेवर आधारित बळीराज्याची संकल्पना मांडली व जात-वर्ण-स्त्रीदास्य यांवर आधारित रामराज्याच्या मर्यादा स्पष्ट केल्या. त्यांच्या या इतिहास विषयक दृष्टिकोनाला अब्राह्मणी इतिहास लेखनाची  पहाट असे म्हणता येईल.

महात्मा फुले यांनी 'सार्वजनिक सत्यधर्म' हा ग्रंथ लिहिला या ग्रंथातील स्त्री-पुरूष संवाद पाहण्यासारखा आहे. मनुष्य जातीला जन्म देणारी, संगोपन संवर्धन करणारी स्त्री पुरुषांपेक्षा निःसंशय श्रेष्ठ आहे, असा निर्वाळा फुले देतात. स्त्रियांच्या दुय्यमत्वाची कारणे त्यांच्या नैसर्गिक शरीर धर्मात नसून पुरुषांच्या कावेबाजपणात आहेत, याची मांडणी महात्मा फुले यांनी केली आहे. ''स्त्रियांची जात फार अबला असल्यामुळे त्या लोभी व धाडशी पुरुषांनी मोठी कावेबाजी करून कोणत्याही कामांमध्ये स्त्री जातीची संमती घेतल्याशिवाय एकंदरीत पुरुषाने आपले घोडे पुढे दामटले, त्यांस मानवी हक्क समजू देऊ नये ह्या इराद्याने त्यांस विद्या शिकवण्यास प्रतिबंध केला. त्यामुळे एकंदर सर्व स्त्रियांवर अशा प्रकारचा जुल्मी प्रसंग येऊन गुदरला.'' अशी शहानिशा महात्मा फुले करतात.

महात्मा फुले यांनी ब्राह्मणी धर्मातील पुरूष स्त्रियांपेक्षा अधिक पक्षपाती, दगेबाज, ठक, साहसी, क्रूर व नित्य नवीन जास्ती भयंकर, धाडसी दुष्ट कर्मे आचरणारी असल्याचे फुले प्रतिपादन करतात. याच पक्षपाती पुरुषांनी स्वतःसाठी एक व स्त्रियांसाठी दुसरे असे पक्षपाती नियम तयार केले. पत्नीच्या मृत्यूनंतर पतीस दुसऱ्या लग्नाची परवानगी तर स्त्रीस पतीच्या मृत्यूनंतर स्वतः जाळून घेणे, असे नियम तयार केले. फुले सतीच्या संदर्भाने बहुभार्या पद्धतीचे वर्णन करतात. प्रथम पत्नी असताना दुसरी पत्नी करणारा, दुसरीने भागत नाही म्हणून तिसरी, चौथी पत्नी वरणारा, पत्नीच्या चारित्र्याविषयी मात्र संशय घेणारा, वेश्यागमन करणारा, स्त्रियांचा विक्री करणारा पुरूष होय! पुरूषाचे असे वर्णन फुले यांनी केले. फुले पुढे विधवांच्या अवस्थेचे आणि तिच्या सतीत्वाच्या मार्गक्रमणा विषयी लिहितात, ''दुर्गुणांनी अलंकृत भर्ता स्वर्गवासी होताच, स्त्रीने आपल्या पतीप्रेमाने पायाचा अंगठा हातात धरून परजातीच्या अशौच शूद्र नापिकाच्या हातून आपले डोके भादरून घ्यावे, अंगावरील सर्व लहान मोठे दागिने मरू घातलेल्या मामांजीच्या पदरी ओवाळण्याकरिता त्यांचे स्वाधीन करून आपण आपल्या मनगटात तुळशीच्या मनगट्या घालण्याजोगती भिकारीण होऊन बसावे. एकंदरीत सर्व उंची वस्त्रे म्हातारपणाचे चावनखरे करणे करीता सासू-आत्याबाईचे स्वाधीन करून आपण केवळ झाडूवाल्या मांगिणीसाठी गुजरीवर गुजारा करून राहण्यापूरती तयारी करावी. निरंतर बहुतेक मादक मिष्ठांन्न पदार्थ खाण्याचे अजिबात वर्ज्य करून एकामागे एक उपोषणांचा पाठलाग करून फराळा करीता भुईमुगाचे दाणे वगैरे नच मिळाल्यास खुपऱ्या दशम्या भक्षून बाकी उरलेले आयुष्य रात्रंदिवस बटकुलीसारखे घरातील सर्व कामाचा चेंदा उपसून आपल्यास कट्टी धार्मिक म्हणून घेणाऱ्या तिची छाती होत नसल्यास, तिने अगाध पुण्य होण्याच्या लालचीने आर्य पुस्तकात लिहिण्याप्रमाणे आपल्या सर्व दुर्गूणमंडित पतीच्या प्रेताचे उशाखाली मांडी घेऊन बसल्याबरोबर या अति कोमल हृदयी पुरुषांनी जीवंत जागृत अज्ञानी स्त्रीस जाळून तिची राखरांगोळी करावी.'' हे पुरुषी षडयंत्र फुले उघडे करतात. वरील विस्तृत उताऱ्यात फुले

ब्राह्मणी पुरुषांचे आर्य पुस्तकातील हेतु उघडे करून दाखवितात. अज्ञानी स्त्रियांच्या कोमल हृदयीपणाचा वापर धूर्तपणे करणाऱ्या पुरुषांचा व्यवहार भौतिक साधनसामग्रीच्या बाबतीत कावेबाजपणा ही फुले स्पष्ट करतात. विधवा स्त्रीच्या अंगावरील दागिने सासऱ्याने काढून घेणे आणि तिला भिकारीण बनवणे हा या पुरुषी व्यवस्थेचा भाग होता. तिने न्हाव्याकडून वपन करून जगण्याच्या भौतिक सुविधा ही भटांनी काढून घेतल्याने कोमल हृदयी विधवा शेवटी पुरुषांनी जाळल्याचे ते नमूद करतात. जसे प्रेमापोटी पतीच्या निधनानंतर विधवा सती जाते. तसे प्रेमापोटी ''पुरुषाला तिच्याविषयी दुःख होऊन तो कधी 'सता' गेलेला ऐकविला आहे काय? असा प्रश्न उपस्थित करून तो सता जात नाही. कारण धर्माने तो लागेल तितकी लग्न करू शकतो असे कारण फुले दर्शवितात. पण स्त्री सती जाते, तिला घालविले जाते कारण विधवांच्या पुनर्विवाह धर्माने ताज्य ठरविला असेही फुले स्पष्ट करतात. एकंदरीत स्त्रीचे जगणे किंवा मरणे पुरुषी धर्मशास्त्राच्या अधीन होते, हे फुले स्पष्ट करतात.

''काही निर्दयी जातीचे लोक आपल्यातील प्रेतासह प्रेताच्या जीवंत असलेल्या भार्येस जाळून टाकीतात आणि त्याविषयी त्यांच्या शास्त्रात लेख दाखवितात. परंतु, त्याचप्रमाणे त्यांच्यातील महाप्रतिव्रतेच्या प्रेतासह प्रेताच्या जीवंत असलेल्या भ्रतारास जाळून टाकावे म्हणून त्यांच्या शास्त्रात अजिबात मुळीच लेख नाही. यांवरून त्यांच्यातील शास्त्रकर्ते पहिल्या प्रतीचेच अधम होते, हे सिद्ध होते.'' जीवंत स्त्रियांना पतीच्या निधनानंतर त्यांच्याबरोबर जळावे यास शास्त्राधार असल्याचे शास्त्रवेत्ते दाखवतात पण मृत पत्नीच्या जीवंत नवऱ्याला तिच्या प्रेताबरोबर दहन करण्यास शास्त्र आधार नाही, असे दाखवतात. हे शास्त्रकर्त्यांचे व ते दाखविणाऱ्याचे अधम कृत्य फुले उघडे करून दाखवतात. पुरूष बहुभार्या असताना एक मरता दुसरी करतो आणि स्वतः मरताच आपल्या बायकांना सती जावयास लावतो. असे कायदे करणाऱ्या मनु सारख्यांना फुले वेठीस धरतात. धर्मशास्त्रातील स्त्रियांविषयीच्या दुटप्पी नीतिचे पितळ उघडे करतात. पुरूषांसाठी एक कायदा व स्त्रियांसाठी एक हे उघड करून दाखवतात. पुरूषसत्ताक व्यवस्थेला धर्माचे अधिष्ठान दिले हे सर्व कावेबाज पुरूषांनी केले आहे हे स्पष्ट करतात.

पुरूषसत्ता, धर्मसत्ता आणि जाती संस्थेने पिडलेल्या स्त्रियांचा प्रश्न सोडविण्यासाठी अब्राह्मणी विचारधारेने काम केले. ख्रिश्चन मिशनरी आणि अभिजन सुधारणावाद्यांपेक्षा सत्यशोधकांचे कार्य जास्त क्रांतिकारी दिसते. ख्रिश्चन मिशनऱ्यांचे कार्य धर्मांतरीत ख्रिश्चन स्त्रियांपुरते मर्यादित असलेले दिसते. तर अभिजनांचे प्रयत्न प्राधान्याने ब्राह्मणी पांढरपेशा स्त्रियांच्या उन्नतीसाठीच होते. त्यांनी बहुजन शुद्रातिशूद्र स्त्रियांसाठी प्रयत्न केलेले दिसत नाही. महात्मा फुलेंचे प्रयत्न हे सर्व स्त्रियांच्या समान हक्कांसाठी होते. बालविवाह, स्त्रीभ्रूणहत्या, विधवा पुनर्विवाह, सती, स्त्रीशिक्षण, स्त्री-पुरूषसमानता या बाबतीत सर्व स्त्रियांच्या उन्नतीचे प्रयत्न फुले यांच्या विचारांत दिसतात. स्त्रियांच्या शाळा, त्यांना विविध प्रकारचे शिक्षण, विधवा, अपंग, अनाथ, पतीत, सुतिकागृहे, इत्यादी संस्थांमार्फत महात्मा फुलेंनी कार्य केले. महात्मा फुलेंनी आपल्या एकूणच आंदोलनात स्त्रियांच्या समतेच्या लढ्याला शुद्रातिशुद्रांच्या लढ्याच्या बरोबरीचे स्थान दिले. त्यांच्या वैयक्तिकरित्या केलेल्या प्रयत्नांतून स्त्रीमुक्तीच्या कार्याला अग्रक्रम दिला होता.

समग्र स्त्री शोषणाचा विचार करताना फुलेंनी त्यातील अभिजन आणि बहुजन स्त्री असाही विचार केला. ब्राह्मण स्त्री धर्मसत्ता आणि पुरूषसत्ता यांच्या कायद्याने अंकित होती. तर बहुजन स्त्री धर्मसत्ता, पुरूषसत्ता आणि जातीसंस्थेने अंकित होती. प्रतिमा परदेशी या संबंधाने असे नोंदवतात की. ''ब्राह्मण स्त्रीला केवळ गृहश्रम तर शेतकरी स्त्रियांना गृहश्रमा बरोबरच घराबाहेरही श्रम करावे लागतात. हे फुलेंनी स्पष्ट केले. तसेच सर्व स्त्रिया सारख्या प्रमाणात शोषित असतात असे न मानता जातीव्यवस्था पुरूषसत्तेतून होणारे स्त्रियांचे शोषण जातीप्रमाणे कमी जास्त असते, हे स्पष्टपणे त्यांनी दाखवले.''

**ताराबाई शिंदे १८५० ते १९१०**

ताराबाई शिंदे यांनी १८८२ साली 'स्त्री-पुरूष तुलना' हा ग्रंथ लिहिला. त्यांचा हा ग्रंथ स्त्रीवादी जाणिवांचा, स्त्रीमुक्तीचा पहिला आविष्कार होता, असे म्हणावे लागते. या ग्रंथात त्यांनी पुरूषी कावेबाजपणा परखड शब्दात मांडला. अतिशय परखड शब्दात पुरूषसत्तेला प्रश्न विचारले. ताराबाई राम, कृष्ण, सतीसावित्री, पुराण, इ. पुरूषसत्ताक मूल्यपरंपरा उभ्या करणाऱ्या व्यक्तिरेखांवर प्रहार करतात. त्या काळी समाजाने या पुस्तकाची म्हणावी तशी दखल घेतली नाही. जवळ-जवळ १०३ वर्षांनी १९९५ साली आंतरराष्ट्रीय बीजिंग परिषदेत हे पुस्तक आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचले.

ताराबाई शिंदे यांचा जन्म बुलढाण्यात आर्थिक परिस्थिती चांगले असलेल्या कुटुंबात झाला. चार भावंडांमध्ये त्या वाढल्या. वडिलांच्या त्या लाडक्या होत्या. ताराबाईचे वडील बापूजी हरी शिंदे महात्मा फुले यांचे अनुयायी होते. ताराबाईला मराठी, संस्कृत, उर्दू व इंग्रजी या भाषा येत होत्या. सत्यशोधक चळवळीचे संस्कार त्यांच्यावर झाले होते. ताराबाई शिंदे यांनी हिंदू धर्मातील व्यवहारावर व पुरुषांच्या दुटप्पीपणावर घाणाघाती प्रहार केला. आणि एका अर्थाने स्त्रीला न्याय मिळावा, मोकळेपणा मिळावा, विकासाची संधी मिळावी, म्हणून आग्रह धरला. स्वतःचे जीवन अतिशय स्वतंत्र बाण्याने जगण्याचा प्रयत्न केला. त्यांनी 'स्त्री-पुरूष तुलना' हे पुस्तक १८८२ लिहिले. स्त्रियांना निरंतर बंदीवासासारखे गृह तुरुंगात कैद करून ठेवले व जिथे तिथे आपली चढती कमान करून राव बसलेत. त्यांना ना विद्या, ना कुठे जाणे येणे. हे पुस्तक लिहिण्यासाठी तत्कालीन एक घटना कारणीभूत झाली होती. सुरत येथे उलपाड गावात एका गुजराती ब्राह्मण कुटुंबातील विजयालक्ष्मी नावाच्या ब्राह्मण विधवेने १८८१ मध्ये भृणहत्या केली. सुरतच्या कोर्टामध्ये तिच्यावर खटला चालवला गेला. तिला कोर्टाने देहांताची शिक्षा ठोठावली. हे प्रकरण बरेच गाजले. या प्रकरणाची चिड येऊन स्त्रियांच्या दुःखाविषयी त्यांनी या पुस्तकात समाचार घेतला.

ताराबाई शिंदे यांनी विधवांच्या प्रश्नांवर आपली मते व्यक्त केली. ''पुनर्विवाह न करण्याची चाल महारोग्याप्रमाणे अनेक ठिकाणी व जातीत पसरलेली आहे. त्यामुळे किती लाखो व कोट्यावधी स्त्रिया वैधव्याचे असाह्य दुःख कसे-कसे भोगत असतील व भोगतात व त्यातून कसे अनर्थ होत आहेत व होत असतील याची कल्पना सुद्धा करता येत नाही. कारण मनोनिग्रह करून मनुष्यवस्तीत राहून स्त्री धर्मरक्षण होणेच नाही.'' निसर्गातः असलेल्या वासना दमनाने क्षमणाऱ्या नसतात. हा मनुष्यधर्म आहे, असे ताराबाईंना सांगावयाचे आहे. उच्च जातीच्या यांच्या अनुकरणातून ब्राह्मणेतरांनी त्यांच्या चाली स्वीकारल्या. स्त्रियांच्या

बाबतीत ब्राह्मणांपेक्षाही कडक निर्बंध ब्राह्मणेतरांनी आपल्या स्त्रियांवर लादले. याची चिकित्सा ताराबाई करतात. 'त्यांच्या कुळात तर ब्राह्मणांपेक्षाही पुनर्विवाह न होण्याची सक्ती दिसून येते. या लोकांचे घराण्यात तर प्राणांती असे होणार नाही. अशा उठून गेल्यावर जाऊ देताना पण पुन्हा दुसरा नवरा कधीही करू देणार नाही. विधवा त्यांच्या नैसर्गिक भावनाशमनार्थ दुसऱ्या पुरुषांशी संग करतील तर ब्राह्मणेत्तर त्यांना तसे करू देतील, पण त्यांच्या पुनर्विवाहाला मान्यता देणार नाही हे ताराबाई ठासून सांगतात. द्रौपदी, सीता, अहिल्या, सत्यवती, कुंतीचे उदाहरण देऊन त्यांच्या गंधर्व विवाहाचे उदाहरणाने ताराबाई पुनर्विवाह झाल्याचे दर्शवितात व हिंदू धर्मशास्त्राची याबदल चिकित्सा करतात. पूर्वीच्या काळी वंशवृद्धीसाठी नियोग पद्धती रूढ केली पण पुनर्विवाह पद्धती रूढ केली गेली नाही. त्यामुळे राजाचे व राणीचे दुःख ताराबाई पोटतिडकीने मांडतात. विधवेच्या तारुण्य सुलभ भावनांचा उद्रेक 'विजयालक्ष्मी खटल्याच्या' संदर्भात ताराबाईंना वाटते विधवेला जर पुनर्विवाह करण्याची मोकळीक असती तर असे गुन्हे घडले नसते. ताराबाई शिंदे यांनी ब्राह्मणीकरणातून बहुजन पुरुषांनी स्त्रियांचे केलेले शोषण स्पष्ट केले. या प्रयत्नाने भारतीय स्त्रियांच्या मुक्तीच्या दोन वाटा निश्चित झाल्या. पहिल्या उच्च जातीय पुरुषी परिघातील तर दुसरी अब्राह्मणी मुक्तीदायी स्वरुपात. ताराबाई शिंदे यांनी रामायण, महाभारत, पुराणे, इतिहास, कथा, कादंबऱ्या, नायक, वृत्तपत्रीय लेखन आणि समकालीन घटना पडताळून पाहिल्या. त्यांचा एक नव्या अन्वयार्थ 'म्हणजे त्यांचा स्त्री-पुरूष तुलना' हा ग्रंथ होय!

त्यांनी पुरुषांच्या विविध पातळ्यांवरचा कावेबाजपणा उघड करून दाखविला. ९० वर्षाच्या म्हाताऱ्याने अकरा वर्षाच्या मुलीशी लग्न केल्याची उदाहरणे ताराबाई दाखवतात. तर नवऱ्याच्या मृत्यूनंतर त्याच्या विधवेला सती जाण्यास पुरुषी व्यवस्था भाग पाडते, हे त्या दाखवितात. पतीप्रेमापोटी विधवा सती जातात असे मानणाऱ्या पुरूषसत्तेला ताराबाई प्रश्न विचारतात, ''तुमच्या बायका मेल्या म्हणजे तुम्ही त्यांच्याबरोबर का सता जाऊ नये बरे? तुमच्यापेक्षा ती सती गेल्याने फार नुकसान होईल तिच्या मागे लहान मुलांचा सांभाळ कोण करेल? असा प्रश्न ताराबाई विचारतात.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

महात्मा फुले यांना गुरुस्थानी मानून डॉ. आंबेडकरांनी स्त्रीमुक्ती चळवळ गतिमान करण्याचा प्रयत्न केला. आंबेडकरांनी स्त्रीदास्याची मिमांसा करताना धर्मचिकित्सा प्रमाण मानली. स्त्रियांवर दुय्यमत्व लादताना धर्मशास्त्राने त्याला आधार दिला. स्त्रीदास्याचा संबंध जातीव्यवस्थेशी आहे. जातीअंता शिवाय भारतीय स्त्री मुक्त होऊ शकत नाही. जातीव्यवस्थेत सर्वात जास्त शोषित बहिष्कृत दलित स्त्रिया आहेत. जातीसंस्थेच्या चळवळीचे नेतृत्व दलित समूह म्हणून स्त्रिया करतील, असे प्रतिपादन करून डॉ. आंबेडकरांनी जात, धर्म, संस्कृती, तत्त्वज्ञान या क्षेत्रातील स्त्रीदास्याचे विश्लेषण केले.

डॉ. आंबेडकरांनी वैदिक काळातील व बौद्ध धर्मातील स्त्रियांच्या उच्च स्थानाचा उल्लेख केला. अथर्ववेद, श्रौतसुत्रे, पाणिनी, पतंजलीचे भाष्य इत्यादी साधनांच्या आधारे डॉ. आंबेडकर स्त्रियांच्या उच्च स्थानाविषयी लिहितात, ''प्राचीन काळी हिंदूस्थानातील स्त्रियांचा सामाजिक दर्जा फार उच्च होता. मुलींची

ब्रह्मचर्य अवस्था संपलेली आहे आणि आता विवाहाला योग्य झाली आहे, असा अथर्ववेदात उल्लेख आलेला आहे. यांवरून असे स्पष्ट दिसते की, पूर्वीच्या प्राचीन काळात स्त्रियांचा उपनयन विधी करण्याचा प्रघात होता. श्रौतसुत्रातील उल्लेखावरून असे दिसते की, स्त्रिया वेदातील मंत्र म्हणत असत. त्या वेद अभ्यासही करत असत. गुरुकुलातील (विद्यापीठातील) स्त्रिया वेदांत निष्णात झालेल्या होत्या, असे पाणिनी अष्टाध्यायी ग्रंथातील उल्लेखावरून स्पष्ट होते. गुरुकुलातील स्त्रिया अध्यापक म्हणूनही काम करत होत्या. त्या विद्यार्थीनींना वेद शिकवत होत्या. हे सर्व पतंजलीच्या महाभाष्यावरून दिसून येते. धर्म तत्त्वज्ञान, विश्वाची उत्पत्ती, ज्ञानविकास, इत्यादी गहन आणि जटिल विषयांवर पुरुषांच्या बरोबर वादविवाद करणाऱ्या स्त्रिया होत्या. त्यांची बरीचशी उदाहरणे इतिहासात नमूद केलेली दिसून येतात. जनक आणि सुलभा, याज्ञवल्क्य आणि गार्गी, याज्ञवल्क्य आणि मैत्रेयी, तसेच शंकराचार्य आणि विद्याधरी यांचे वादविवाद सार्वजनिक झालेले होते, असे इतिहास सांगतो. यांवरून हे सिद्ध होते की मनुच्या (मनुस्मृतीच्या) पूर्वीच्या काळात हिंदूस्थानातील स्त्री विद्याअभ्यासाच्या जोरावर समाजात उच्चपदी जाऊन शकत होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राष्ट्रवादी इतिहासकाराप्रमाणे प्राचीन काळी स्त्रियांचा दर्जा उच्च होता हे स्पष्ट केले.

शिक्षण घेण्याचे, ज्ञानी होण्याचे, ज्ञान देण्याची, वादविवाद करण्याचे स्वातंत्र्य स्त्रियांना होते. म्हणजे वर्तमान वास्तव पूर्व आयुष्यातील ज्ञान घेण्याच्या पायावर उभे असते. ज्ञान हे भौतिक परिस्थिती घडविण्याचे, बदलाचे प्रभावी साधन असते. पण मनुस्मृतीने त्यावर घाला घातल्याने स्त्रियांच्या पारतंत्र्याला सुरुवात झाली, असे बाबासाहेब आंबेडकर स्पष्ट करतात. स्त्रियांची अवनती मनुच्या पक्षपाती कायद्यामुळे झाली. मनुस्मृतीने स्त्रियांच्या एकंदर जीवनासंबंधी जे अधिकार, कायदे लिहून ठेवले त्याची चिकित्सा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केली.

**डॉ. आंबेडकर कृत मनुस्मृतीची चिकित्सा**

स्त्रियांच्या वर्तमानकालीन समस्ये बाबत ब्राह्मणीधर्मपुरस्कृत मनुस्मृती जबाबदार होती हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृतीची चिकित्सा करून सिद्ध केले. त्यांनी 'हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती' हे पुस्तक लिहिले. यातून त्यांनी हिंदू स्त्रियांच्या अवनतीस मनु जबाबदार असल्याचे सिद्ध केले.

**धर्म आणि स्त्रिया**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्माची चिकित्सा जातीव्यवस्था व स्त्रीदास्य यांच्यामधील परस्पर संबंध समोर ठेवून केली. चातुर्वर्ण्यात स्त्रियांचे स्थान शुद्रांप्रमाणे दुय्यम होते. स्त्रियांनी फक्त पुरूषांची सेवा करावी एवढेच तिच्या हाती ठेवले होते. डॉ. आंबेडकर लिहितात, ''चातुर्वण्याच्या पुरस्कर्त्यांनी चातुर्वर्ण्यात स्त्रियांचे स्थान काय राहील याचा विचार केलेला दिसत नाही. यांचेही ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र असे चार वर्ण पाडणार काय? अथवा त्यांना आपल्या पतीप्रमाणेच स्थान व प्रतिष्ठा प्राप्त होणार? जर त्यांना विवाहा नंतर त्यांच्या पतीच्या कर्मानुसार त्यांचे (स्त्रियांचे) स्थान ठरवण्यात येत असेल तर व्यक्तीच्या कर्मानुसार तिचे स्थान ठरवण्यात येते. या चातुर्वर्ण्यांतर्गत असलेल्या तत्त्वांचा काय अर्थ उरला? जर स्त्रियांना त्यांच्या स्वतःच्या कर्मानुसार स्थान प्राप्त होणार असेल तर ते स्थान निव्वळ नामधारी राहणार की, खरोखरीचे

राहणार? जर ते नामधारी राहणार असेल तर ते निरुपयोगी आहे. चातुर्वर्ण्य निदान स्त्रियांना तरी लागू पडत नाही. असे चातुर्वर्ण्याच्या पुरस्कर्त्यांना मान्य करायला पाहिजे.'' शूद्र आणि स्त्रिया यांनी चातुर्वर्ण्य धर्माने स्वतंत्रपणे जगण्याचा अधिकार, त्यांच्यावर धर्माचे, रूढी परंपरेच्या माध्यमातून विविध प्रकारचे संस्कार लादून संकुचित केला. स्वातंत्र्यापासून त्यांना दूर ठेवले.

स्त्रियांच्या अवनतीचे, शोषणाचे, वेदनेचे मूळ वेद, उपनिषदे, अरण्यके, ब्राह्मणे, श्रृती-स्मृति, पुराणे, रामायण, महाभारत या धर्मशास्त्रात आढळते. या ग्रंथांमधून स्त्रियांचे स्थान पुरुषांच्या स्थानापेक्षा दुय्यम दिसते. पितृसत्ताक चातुर्वर्ण्य व्यवस्थेच्या संवर्धनासाठी धर्म आधारभूत रचना निर्माण केली गेली. त्यात स्त्रियांचे गणना शुद्रांप्रमाणे केली गेली आहे.

**स्त्रिया ह्या जातीसंस्थेच्या प्रवेशद्वार आहेत**

स्त्रिया ह्या जाती संस्थेच्या प्रवेशद्वार आहेत, हा सिद्धांत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडला. या सिद्धांत त्यांनी जातीव्यवस्था आणि स्त्री शोषणाचा संबंध स्पष्ट केला. जाती निर्माण करण्यामध्ये व त्या टिकवणे या प्रक्रियेमध्ये स्त्रिया या माध्यम बनल्या. वंश व जात शुद्धीसाठी त्यांच्या लैंगिकतेला विविध रूढी परंपरेने नियंत्रित केले. या नियंत्रणातूनच सती प्रथा, विधवा पूनर्विवाहास बंदी, सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर अनेक बंधने लादण्यात आली.

वंश व जात शुद्ध ठेवण्यासाठी ही बंधने कसे काम करतात ती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दाखवून दिले. जाती व्यवस्थेची निर्मिती गटांतर्गत विवाह करण्याच्या रुढीने स्वगटाबाहेर लग्न करण्याच्या रुढीवर मिळवलेल्या विजयाने झाली, असे आंबेडकर प्रतिपादन केले आहे. या जात्यांतर्गत विवाहाचा नियम जोपासण्यासाठी स्त्रीची दोन प्रकारे विल्हेवाट लावण्यात आली. एक तिला तिच्या मृत पतीच्या चितेवर जाळून तिच्या अतिरिक्त होण्यामुळे निर्माण झालेले प्रश्न सोडवून. दोन तिच्या उर्वरित जीवनात तिच्यावर जबदस्तीचे वैधव्य लादणे अशा प्रकारे ज्यादा स्त्रीची (वरकड) भारतीय धर्मसंस्थेने वासालात लावली, असे डॉ. आंबेडकरांचे सती आणि वैधव्याबद्दलचे म्हणणे आहे.

डॉ. आंबेडकरांनी जाती व्यवस्थेच्या निर्मितीमध्ये ब्राह्मणी धर्माने स्त्रियांना गोवल्याचे दाखवले. प्रतिमा परदेशी यांच्या विश्लेषणानुसार... जाती निर्मितीसाठी स्त्री-पुरुषांच्या संख्येची तफावत नाहीशी केली जाते. आणि त्यासाठी सती प्रथा, वैधव्य लादणे, विधुरावर ब्रह्मचर्य लादणे, लग्नयोग्य नसलेल्या अल्पवयीन मुलीशी विधुराचे लग्न लावणे हे मार्ग अवलंबले जातात. हे उपाय स्त्रियांवर अन्याय करणारे आहेत. स्त्रियांच्या लैंगिक शोषणातून अशा प्रकारे जाती टिकून ठेवल्या गेल्या, हे डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट केले. या अर्थाने स्त्रिया या जाती संस्थेच्या प्रवेशद्वार आहेत अशी मांडणी त्यांनी केली. म्हणजे स्त्रियांच्या लैंगिकतेवरील नियंत्रणात जाती व्यवस्थेचा उदय आहे  हे स्पष्ट केले.

डॉ. आंबेडकर सती प्रथेच्या विषयाचे विश्लेषण करतात. त्यांनी जातीव्यवस्था आणि स्त्री शोषणाचा अनन्य संबंध स्पष्ट केला. म्हणजे जातीव्यवस्था विश्लेषणात स्त्री शोषणाचा विचार आधारभूत आहे असे

त्यांनी मांडले. डॉ. आंबेडकरांनी जातीव्यवस्थेचे मुख्य लक्षण विटाळ किंवा अस्पृश्यता नसून जात्यांतर्गत विवाह हेच जातीचे प्रमुख लक्षण मानले. जातीबाहेर लग्न होऊ नये याची पूर्ण खबरदारी घेण्यात आली.

कोणत्याही सामान्य लोकसमूहामध्ये स्त्री पुरुषांची संख्या समान असते. परंतु, हे प्रमाण व्यस्त झाल्यास कठीण समस्या निर्माण होतात. पतीच्या मृत्यूनंतर ती स्त्री वाढीव ठरते तसेच पत्नीच्या मृत्यूनंतर पुरूष वाढीव होतो. स्त्री-पुरुषांची त्या जातीतील संख्या व्यस्त होते. हे प्रमाण समसमान राहावे, आपल्या जातीतील वा गटातील वाढीव स्त्रीने गटाबाहेर विवाह करू नये, म्हणून तिला सती जाणे भाग पाडले किंवा विधवा होऊन विद्रुप जीवन जगायला भाग पाडले.

जाती अंतर्गत विवाह होत राहावेत म्हणजे जाती टिकून राहतील. जातीबाह्य विवाह होऊ नये यासाठी भारतात सती प्रथा, वैधव्य लादणे, सक्तीचे ब्रह्मचर्य, बाल-जरठविवाह या चार प्रमुख रुढींचा पुरस्कार केल्याचे डॉ. आंबेडकर सांगतात. पतीच्या मृत्यूनंतर वाढीव स्त्रीला पतीच्या चितेवर जाळण्याचा व्यवहार्य मार्ग अवलंबला जातो. जर विधवा स्त्री जीवंत राहिली तर तिला दुसऱ्या जातीतील पुरुषाशी विवाह करण्याची मुभा द्यावी लागेल. असे झाल्यास जाती अंतर्गत विवाहाचा नियम मोडला जाईल व जात बंदिस्त करता येणार नाही. म्हणून वाढीव स्त्रीला पतीसोबत जाळण्याचा मार्ग अवलंबला. हे सती प्रथेच्या उदयाचे कारण स्पष्ट करतात. डॉ. आंबेडकरांच्या मते, जाती व्यवस्थेला बळकटी आणणाऱ्या सती प्रथेचे धर्माने गौरवीकरण केले. वैधव्य लादणे जाळून टाकण्यापेक्षा ही तुलनात्मक दृष्ट्या चांगली बाब होती. स्त्रीला जीवंत राहण्याचा अधिकार दिला होता. पण सर्व प्रकारचे अधिकार तिला नाकारण्यात आले होते. जाडीभरडी वस्त्र तिने नेसावी, सामाजिक वावर टाळावा, डोक्यावरचे केस कापून पूर्ण मुंडन करावे, अशी बंधने तिच्यावर लादण्यात आली होती. कारण ती स्त्री सामाजिक व्यवहारात कार्यरत राहिली, नीटनेटकी राहिली तर तिच्याकडून काही अनैतिक व्यवहार होण्याची भीती व्यक्त केली गेली. डॉ. आंबेडकरांनी वैधव्य स्त्रियांवर सक्तीने लादले जाते या मुद्याकडे लक्ष केंद्रित केले. स्त्रियांवर असा अत्याचार जाती-बंदीसाठी केला जातो, अशी मांडणी त्यांनी केली. ब्राह्मणी संस्कृतीने स्त्रियांकडे मादी म्हणून पाहिले. वाढीव पुरूष जर समाजात असेल तर त्याला जाळले जात नाही कारण तो केवळ पुरूष असल्याने असे घडू शकत नाही, असे आंबेडकर स्पष्ट करतात. पुरूष जाती टिकवण्यासाठी उपकारक मानला जातो. म्हणून त्याला जाळले जात नाही. विधुराने स्वेच्छेने संन्यास किंवा ब्रह्मचर्य स्वीकारावे. पण असा वाढीव पुरूष आपल्या जातीची प्रजा उत्पन्न करण्यासाठी गृहस्थ अवस्थेत ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. डॉ. आंबेडकर स्पष्ट करतात की, अशा परिस्थितीत वाढीव पुरुषाला जातीत जखडून टाकायचे असेल तर त्याला केवळ लग्नयोग्य न झालेल्या वयोगटातील मुलगीच वधू म्हणून पुरवली जाऊ शकते. यातूनच जात्याअंतर्गत विवाहाचा नियम, जातीची नीतिमत्ता याचे रक्षण केले जाते. जातीय मानसिकता घडवली जाते. अशा प्रकारे जाती कायम ठेवण्यासाठी स्त्री-पुरुषांच्या संख्येतील तफावत नाहीशी केली जाते. आणि त्यासाठी सती प्रथा, सक्तीचे वैधव्य, विधुरावर ब्रह्मचर्य लादणे, लग्नास योग्य न झालेल्या (लहान) मुलीचे विधुराशी लग्न लावणे हे मार्ग अवलंबले जात. आणि हे सर्व मार्ग स्त्रियांवर अन्याय करणारे आहेत. स्त्रियांचे लैंगिक शोषण करणारे आहेत. अशा स्त्रियांच्या शोषणातून जाती टिकून ठेवल्या व जात बंदिस्त झाली. जात्यांतर्गत विवाह बंदी हे जातीसंस्थेचे

व्यवच्छेदक लक्षण आहे. मनुस्मृतीमध्ये देखील जाती अंतर्गत विवाहच वैध मानले जातात. म्हणजे जातीव्यवस्था मिश्र विवाहास, अंतरजातीय विवाहास विरोध करते. जाती व्यवस्थेची निर्मिती स्त्रियांवर बंधने लादून करण्यात आली. या बंधनांना धर्म रूढी परंपराचा आधार देण्यात आला. डॉ. आंबेडकरांनी जातीव्यवस्था आणि स्त्रीमुक्ती दोन स्वतंत्र तट मानले नव्हते जाती व्यवस्थेच्या निर्मिती प्रक्रियेत स्त्रियांवर बंधने लादली गेली, हे एकच स्त्रीमुक्तीच्या मार्गातील अडथळा असल्याचे प्रतीत होते.

जातीव्यवस्था व स्त्रीदास्य याचा संबंध आहे हे दाखवणारा मुद्दा डॉ. आंबेडकरांच्या महाड सत्याग्रहात पुढील भाषणातून स्पष्ट होतो. परिषदेत सहभागी झालेल्या अस्पृश्य स्त्रियांना डॉ. आंबेडकरांनी एक महत्त्वाचा प्रश्न विचारला आहे. ते म्हणतात, ''खरे म्हटले असता अस्पृश्यता निवारणाचा प्रश्न पुरुषांचा नसून स्त्रियांचा आहे. तुम्ही आम्हाला जन्म दिला आहे. आम्हाला इतर लोक कसे जनावरापेक्षा कमी लेखतात आणि काही ठिकाणी आमची सावली सुद्धा घेत नाही. इतर लोकांना कोर्ट-कचेऱ्यांमध्ये माना-सन्मानाच्या जागा मिळतात. परंतु, तुमच्या पोटी जन्मलेल्या आम्हा मुलांना पोलीस खात्यात शिपुर्ड्याचीही नोकरी मिळत नाही. इतका आमचा हीन दर्जा आहे. या सभेत बसलेल्या कायस्थ व इतर स्पृश्य बायकांच्या पोटी जन्मलेल्या मुलांमध्ये व आम्हा मुलांमध्ये काय अंतर आहे?.. असे असताना ब्राह्मण स्त्रीच्या पोटी जन्मलेले बालक का सर्वमान्य व्हावे व तुमच्या पोटी जन्मलेले बालक का अवमानले जावे? त्याला साध्या माणुसकीचाही हक्क का मिळू नये? तुमच्या पोटी जन्म घेणे पाप का ठरले जावे?'' असा हृदयद्रावक प्रश्न ते विचारतात. ज्यांचे शोषण केले गेले त्यांच्यासाठी बाबासाहेब जाती व्यवस्थेच्या विरोधात स्त्रियांना संघर्षशील व्हावयास आवाहन करतात. आणि जातीव्यवस्था जन्मजात असल्याचे सांगतात. यातून जातीव्यवस्था स्त्रियांचे कशा प्रकारे शोषण करते, स्त्रिया जाती व्यवस्थेच्या प्रवेशद्वार आहेत, हे त्यांनी सप्रमाण पटवून दिले आणि जाती अंताच्या लढ्यात स्त्रियाच पुढे असतील हे त्यांनी दाखवून दिले.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय राज्यघटनेने स्त्रियांना स्वातंत्र्याचा विचार करून पुरुषांप्रमाणे स्त्रियांना अधिकार दिला. या अधिकाराचा संकोच होऊ नये म्हणून स्त्रियांसाठी हिंदू कोड बिल तयार करण्यात आले. यात अंतरजातीय विवाहास मान्यता, एक पत्नीत्वाचे बंधन, पुरुषांप्रमाणे स्त्रियांना सुद्धा घटस्फोट मागण्याचा अधिकार, दायभाग पद्धतीचा वारसा हक्क, मुलाइतकाच मुलींना सुद्धा पित्याच्या मालमत्तेत अधिकार, आणि दत्तक विधान सुधारणा, इत्यादिंचा समावेश होतो. या बिलाला सनातनी विचारांच्या मंडळींनी त्याला विरोध केला. डॉ. आंबेडकरांनी तयार केलेले हिंदू कोड बिल ९ भागात १३९ कलमांत आणि ७ परिशिष्टात विभागले आहे. आंबेडकरांनी हिंदू स्त्रीला पुरुषांप्रमाणे समान दर्जाची तरतूद असणारे कायदे तयार करण्याची योजना या बिलान्वये केली. ते स्त्री-पुरूष समानतेच्या सिद्धांताचे व व्यवहाराचे कट्टर समर्थक होते. या बिलामुळे हिंदू स्त्रियांच्या परिस्थितीत अमुलाग्र बदल घडून येणार होता. समाजातील पुरूषप्रधान स्वरूप व स्त्रीदास्य संपणार होते म्हणून डॉ. आंबेडकर म्हणतात, ''मला भारतीय राज्यघटना निर्माण केली त्यापेक्षा हिंदू कोड बिल माझ्या हातून झाले याचा मला आनंद होतो.'' हे हिंदू कोड बिल म्हणजे पुरूषप्रधानता व स्त्रीदास्यावर आधारलेल्या धर्म, संस्कृती व समाजाचे सनातनी व परंपरावादी स्वरूप बदलणारी होते.

स्त्री प्रश्नांची सर्व बाजूंनी कायद्यांच्या माध्यमातून सोडवणूक करण्यासाठी तयार केलेले हिंदू कोड बिल पास होऊ शकले नाही. सनातनी विचारांच्या रेट्या पुढे नेहरू मंत्रिमंडळ झुकल्याने डॉ. आंबेडकरांनी कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला. स्त्री प्रश्नांसाठी मंत्रिपदाचा राजीनामा देणारे आंबेडकर हे एकमेव समाजक्रांतीकारक होते. स्त्री-पुरूष समतेचे सिद्धांताचे समर्थक होते.

**स्वयं अध्ययन प्रश्न ३**

**अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.**

१) .............. इतिहास लेखन प्रवाहात पुरूषप्रधानता, लिंग व लिंग-भाव या संकल्पनेची नव्याने मांडणी केली आहे.

अ) राष्ट्रवादी ब) सबाल्टर्न क) मार्क्सवादी ड) स्त्रीवादी

२) 'स्त्री प्रश्नांची वाटचाल' ग्रंथ ........... यांनी लिहिला.

अ) विद्युत भागवत ब) शर्मिला रेगे क) कुमकुम संगारी ड) यापैकी नाही

३) 'रिकास्टिंग वुमन' हा ग्रंथ .............. यांनी लिहिला.

अ) कुमकुम संगारी ब) विद्युत भागवत क) शर्मिला रेंगे ड) यापैकी नाही

४) स्त्रियांचा किंवा स्त्री विषयाचा इतिहास नसताना सुद्धा इतिहास लेखन स्त्रीवादी असू शकते हे ........... यांनी स्पष्ट केले.

अ) कुमकुम संगारी वैद ब) विद्युत भागवत

क) शर्मिला रेगे ड) यापैकी नाही

५) 'मांग-महारांच्या दुःखाविषयी' हा निबंध ........... यांनी लिहिला.

अ) ताराबाई शिंदे ब) मुक्ता साळवे क) सावित्रीबाई फुले ड) जनक्का शिंदे

६) 'सार्वजनिक सत्यधर्म' हा ग्रंथ .............. यांनी लिहिला.

अ) ताराबाई शिंदे ब) महात्मा फुले क) राजा राम मोहन रॉय ड) यापैकी नाही

७) 'स्त्री-पुरूष तुलना' हा ग्रंथ ........... यांनी लिहिला.

अ) पंडिता रमाबाई ब) मुक्ता साळवे क) ताराबाई शिंदे ड) ताराबाई मोडक

८) 'हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती' हे पुस्तक ........... यांनी लिहिले.

अ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर ब) महात्मा फुले

क) ताराबाई शिंदे ड) जनक्का शिंदे

९) 'स्त्रिया जातीप्रथेचे प्रवेशद्वार आहेत' हा सिद्धांत ............... यांनी मांडला.

अ) महात्मा फुले ब) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

क) ताराबाई शिंदे ड) पंडीता रमाबाई

१०) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातीव्यवस्थेचे मुख्य लक्षण विटाळ किंवा अस्पृश्यता नसून.......... हे जातीचे प्रमुख लक्षण मानले.

अ) जात्याअंतर्गत विवाह ब) सती प्रथा

क) उच्चनिचता ड) वरील पैकी नाही.

**ब) खालील पैकी कोणते विधान योग्य/अयोग्य आहे.**

विधान १ - व्यक्तीला स्वत:च्या सामाजिक अस्तित्वाची ओळख जाती वर्गातून घडत असते.

विधान २ - त्यांच्या या अस्मितेच्या शोधासाठी इतिहासाची मदत होत नाही.

अ) दोन्ही विधाने चुकीची आहेत ब) दोन्ही विधाने बरोबर आहेत

क) पहिले विधान चूक दुसरे बरोबर ड) पहिले विधान बरोबर दुसरे चूक

**क) योग्य जोड्या जुळवा.**

| | गट १ | | गट २ |
|---|---|---|---|
| १ | राधा कुमार | अ | जातवर्गस्त्रीदास्य अंताची भूमिका |
| २ | अब्राह्मणी इतिहास लेखन | ब | स्त्रियां जातीप्रथेच्या प्रवेशद्वार आहेत |
| ३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर | क | पंडिता रमाबाई सारख्या स्त्रियांना सुधारक मानले गेले नाही याची चिकित्सा केली |
| ४ | कुमकुम संगारी वैद | ड | स्त्रियांचा किंवा स्त्री विषयाचा इतिहास नसताना सुध्दा इतिहास लेखन स्त्रीवादी असू शकते. |

अ) १-ड, २-क, ३-अ, ४-ब ब) १-ब, २-अ, ३-ड, ४-क

क) १-अ, २-ड, ३-क, ४-ब ड) १-क, २-अ, ३-ब, ४-ड

## २.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१) गणसमाज - प्राचीन समाज की ज्या मध्ये सर्व बाबतीत समानता होती आणि तो सामुहिक जीवन जगणारा समाज होता.

२) सामंत प्रथा- असा समुदाय ज्याच्या कडे राजकीय शक्ती व जमिनीची मालकी असते राजाला कर जमा

करून देतात.

३) स्त्रीदास्यांतवादी - स्त्रीदास्याचा अंत करणारी

४) उदो-उदो करणारी- गोडवे गाणे, प्रशंसा करणे

५) वासलात लावणे - व्यवस्था लावणे

६) विटाळ - अस्पृश्यतेसंबंधी एक कल्पना जी अस्पृश्यांना अशौच मानते. त्यांना स्पर्श करत नाही.

## २.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयं अध्ययन प्रश्न १**

अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.

१) राष्ट्रवादी

२) राष्ट्रवादी

३) हिस्ट्री ऑफ ब्रिटिश इंडिया

४) हिस्ट्री ऑफ ब्रिटिश इंडिया

५) मनुस्मृती

६) विलियम हंटर

७) विलियम बेन्टिक

८) अकबर

९) राष्ट्रवादी

१०) आर. सी. दत्त

११) आर. सी. दत्त

१२) आर. सी. दत्त

१३) ए. एस. आळतेकर

ब) खालील पैकी कोणते विधान योग्य / अयोग्य आहे.

१) दोन्ही विधाने बरोबर

२) दोन्ही विधाने चुक

क) जोड्या जुळावा

अ) १-ड, २-क, ३-अ, ४- ब

**स्वयं अध्ययन प्रश्न २**

अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.

१) एंगल्स

२) डी. डी. कोसंबी

३) आर. एस. शर्मा

४) ७

५) योणा

६) विदथ

७) ७

८) श्रीपदा अमृत डांगे

९) स्त्रीदास्यांतवादी

१०) शरद पाटील

११) शरद पाटील

१२) ग्रामची

१३) कमला विश्वेश्वर

१४) गायत्री चक्रवर्ती

१५) चंद्राज डेज

ब) खालील पैकी कोणते विधान योग्य / अयोग्य आहे.

दोन्ही विधान बरोबर आहेत

क) जोड्या जुळावा

ड) १-क, २-ड, ३-अ, ४-ब

**स्वयं अध्ययन प्रश्न ३**

अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.

१) स्त्रीवाद

२) विद्युत भागवत

३) कुमकुम संगारी

४) कुमकुम संगारी वैद

५) मुक्ता साळवे

६) महात्मा फुले

७) ताराबाई शिंदे

८) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

९) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

१०) जात्यांतर्गत विवाह

ब) खालील पैकी कोणते विधान योग्य/अयोग्य आहे.

पहिले विधान बरोबर दुसरे चूक.

क) जोड्या जुळावा

ड) १-क, २-अ, ३-ब, ४-ड

## २.५ सारांश

स्त्रियांचा इतिहास लिहिताना किंवा स्त्रीवादी इतिहास लेखन करताना प्रचलित इतिहास लेखन प्रवाहातील स्त्रियांसंबंधित लिखाणातील विविध दृष्टिकोन लक्षात घेणे गरजेचे आहे. या विविध प्रवाहांनी स्त्रियांच्या प्रश्नांकडे कोणत्या भूमिकेतून बघितले. त्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी कोणत्या सैद्धांतिक मांडण्या केल्या. या सिद्धांताच्या जमेच्या बाजू त्यांच्या मर्यादा समजून घेता येतील.

भारतात इंग्रजांची राजवट स्थिर झाल्यानंतर वसाहतवादी राज्यप्रणालीने भारतीय सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करणारे इतिहासकार निर्माण झाले. त्यांनी भारतातील धर्म, अध्यात्म, साहित्य, कला, विज्ञान, कायदे यांचा अभ्यास केला. या माध्यमातून त्यांनी त्यांच्या राज्याला नैतिक अधिष्ठान देण्याचा प्रयत्न केला. या वसाहतवादी इतिहास लेखनात भारतातील स्त्रियांचे दयनीय सामाजिक स्थान अधोरेखित केले. त्यांनी भारतीय इतिहासाचा अभ्यास केला आणि भारतीय स्त्रियांच्या स्थितीची तुलना तत्कालीन ब्रिटिश स्त्रियांच्या उच्च सामाजिक दर्जाशी करण्यात आली. जेम्स मीलने भारतीय स्त्रियांसंबंधित रानटी अमानुष प्रथा परंपरा दाखवून भारतीय संस्कृती हीन दर्जाची ठरवली. या मांडणीला प्रत्युत्तर देताना आळतेकरांसारखे हिंदू राष्ट्रवादी इतिहासकार पुढे आले. आर्य स्त्रीची प्रतिमा पुढे करून प्राचीन हिंदू संस्कृती त स्त्रियांना असलेल्या उच्च स्थानाचा गौरव केला. हिंदू ब्राह्मणी मध्यमवर्गीय संस्कृती म्हणजे भारतीय संस्कृती असे समीकरण मांडण्यात आले. या मांडणीत भारतातील इतर वर्णातील स्त्रियांच्या स्थितीबद्दल काहीही बोलले गेले नाही, पण या मांडणीतील इतिहास लेखनाच्या प्रकाराला फक्त तमिळनाडू व महाराष्ट्रातील अब्राह्मणी चळवळीने शह दिलेला दिसतो.

वसाहतवादी आणि राष्ट्रवादी विचार प्रणालीने स्त्री शोषणाच्या भौतिक बाबींकडे दुर्लक्ष केल्याने त्यांच्यातील त्रुटींकडे मार्क्सवादी इतिहासकारांनी लक्ष वेधले. कार्ल मार्क्स, एंगल्स व लेनिन यांच्या विचारांतून शासनसंस्था, कुटुंब संस्था, समाज यातील स्त्रीचे स्थान इतिहासाच्या टप्प्यांवर कसे बदलत गेले हे स्पष्ट केले. कार्ल मार्क्स व एंगल्सने साम्यवादी क्रांतीचे ध्येय समोर ठेवताना स्त्रियांच्या अनुषंगानेही विचार केला. मानव मुक्तीमध्ये स्त्रीमुक्ती आहे अशी त्यांनी भूमिका घेतली. कार्ल मार्क्स आणि एंगल्सने स्त्री शोषणाच्या भौतिक बाबी पुढे आणल्या. भारतीय मार्क्सवादी इतिहासकार रामशरण शर्मा यांनी प्राचीन भारतातील राजकीय व सामाजिक संस्थांतील स्त्रियांच्या स्थानाचा शोध घेतला. सभा, समिती, गण, परिषद, यज्ञ, जनपद, पौर, ग्राम इत्यादी या सभागृहातील स्त्रियांच्या स्थानाची चर्चा केली. शरद पाटील यांनी जात-वर्ग-स्त्रीदास्यांतवादी नवीन प्रणाली मार्क्सवाद फुले आंबेडकरवाद यांच्या विचारांवर आधारित सिद्ध केली. अभिजात गणसमाजाची सुरुवात ही प्राथमिक साम्यवादी गणसमुहापासून झालेली नसून स्त्रीसत्ताक गणसमाजापासून झालेली आहे, हे सिद्ध केले. ही गोष्ट जगभरातील मार्सवादी मान्य करत नाहीत पण ही गोष्ट खंडित करूही शकत नाही.

सबाल्टर्न या नव्या संकल्पनेच्या द्वारे ग्रामचीने शोषित वंचितांचा इतिहास लिहिण्याचा नवा दृष्टिकोन विकसित केला. त्याने स्त्रियांवर होणाऱ्या विविध प्रकारच्या शोषणांचा विचार केला. त्याने स्त्री विषयक आणि स्त्रीवादाविषयी मांडणी केली. नैतिकता आणि नागरिकतेचा संबंध लिंग-भावात्मतेशी जोडून भांडवली व्यवस्था स्त्रियांचे शोषण कशी करते, हे ग्रामचीने स्पष्ट केले.

स्त्रीवादी इतिहास लेखनशास्त्राने केवळ पारंपारिक इतिहास लेखनाची चिकित्सा केली नाही तर त्यांनी स्त्रियांचा अदृश्य स्वरुपातील इतिहास आणि पर्यायी साधने पुढे आणली. स्त्रिया का अदृश्य ठेवल्या गेल्या याची चिकित्सा केली. विद्युत भागवत यांनी 'स्त्री प्रश्नांची वाटचाल' या हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथातून त्यांनी अभिजन, सत्यशोधक, आणि ब्राह्मणेत्तर चळवळींनी घेतलेली स्त्री विषयक भूमिका स्पष्ट केली आहे. तसेच,

त्यांनी महात्मा फुले यांच्या विचारसरणीतील उणिवाही त्यांनी दाखवून दिल्या. यासाठी त्यांनी बहिरामजी मलाबारीच्या 'सक्तीचे वैधव्य व बालविवाह' या टिपणाला फुलेंनी दिलेली प्रतिक्रियांचा स्त्रीवादी दृष्टिकोनातून शोध घेण्याचा प्रयत्न केला.

कुमकुम संगारी, सुदेश वैद 'स्त्रियांची पुनर्घडण' (Recasting Women: Essays in Colonial History) हे पुस्तक लिहिले. या पुस्तकात स्त्रीवादी इतिहास लेखनाचे विविध पैलू त्यांनी उलघडून दाखविले. त्यांनी लिंग-भावात्मकतेच्या मुद्द्याला हात घातला. स्त्रियांचा वा स्त्रियांविषयीचा इतिहास नसतानासुद्धा इतिहास लेखनशास्त्र स्त्रीवादी असू शकते, हा मुद्दा स्पष्ट केला. पंडिता रमाबाईच्या काळातील स्त्रियांचे पितृसत्तेने केलेले शोषण उमा चक्रवर्ती यांनी  पुढे आणले.

अब्राह्मणी प्रवाहाने सर्व ज्ञान शाखांच्या संज्ञा, संकल्पना, कक्षा इतिहासक्रमात कशा लागू होतात, याचा शोध घेतला. अब्राह्मणी इतिहास लेखनामध्ये महात्मा फुले, ताराबाई शिंदे, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा समावेश करावा लागेल. महात्मा फुले यांनी इतिहासाचे पुनर्लेखन करताना समतेवर आधारित बळीराज्याची संकल्पना मांडली व जात, वर्ण, स्त्रीदास्य यावर आधारित रामराज्याच्या मर्यादा स्पष्ट केल्या. ताराबाई शिंदे यांनी १८८२ साली 'स्त्री-पुरूष तुलना' हा ग्रंथ लिहिला. त्यांचा हा ग्रंथ स्त्रीवादी जाणिवांचा, स्त्रीमुक्तीचा पहिला आविष्कार होता असे म्हणावे लागते. या ग्रंथात त्यांनी पुरूषी कावेबाजपणा परखड शब्दात मांडला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्माची चिकित्सा जातीव्यवस्था व स्त्रीदास्य यांच्यामधील परस्पर संबंध समोर ठेवून केली. चातुर्वर्ण्यात स्त्रियांचे स्थान शुद्रांप्रमाणे दुय्यम होते. त्यांच्या मते, स्त्रीदास्याचा संबंध जाती व्यवस्थेची आहे, जातीअंता शिवाय भारतीय स्त्री मुक्त होऊ शकत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृतीची चिकित्सा केली. स्त्रियांच्या दारूण परिस्थितीला मनुच जबाबदार आहे, हे स्पष्ट केले. स्त्रिया जातीप्रथेचे प्रवेशद्वार आहेत हे सिद्ध केले. राज्यघटना व हिंदू कोड बीलातून स्त्रीमुक्तीचा मार्ग मोकळा केला.

विविध इतिहास लेखन प्रवाहाने स्त्रियांच्या प्रश्नांकडे वेगवेगळ्या दृष्टिकोनातून बघितले व त्यानुसार स्त्रियांचा समावेश त्यांच्या इतिहासात केला. आधुनिक काळात स्त्रीवादी सिद्धांत व लिंग-भावाची जडणघडण लक्षात घेऊन इतिहासाची पुनर्मांडणी करावी  लागणार आहे.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

१) वसाहतवादी दृष्टिकोनामध्ये भारतीय स्त्रियांसंबंधीच्या दृष्टिकोन स्पष्ट करा.

२) राष्ट्रवादी इतिहास लेखनामध्ये भारतीय स्त्रियांसंबंधीचा दृष्टिकोन स्पष्ट करा.

३) मार्क्सवादी इतिहासकारांचा स्त्रियांसंबंधीच्या दृष्टिकोन स्पष्ट करा.

४) स्त्रीवादी इतिहास लेखनाने स्त्री प्रश्नांची केलेली चिकित्सा  स्पष्ट करा.

५) अब्राह्मणी इतिहास लेखन स्त्री प्रश्नांची केलेली चिकित्सा स्पष्ट करा.

टिपा लिहा

१) जेम्स मिलने भारतीय स्त्री प्रश्नांची केलेली चिकित्सा

२) ए. एस. आळतेकरांचे आर्य असणाऱ्या स्त्रीचे प्रारूप

३) ग्रामचीचा स्त्रीविषयक दृष्टिकोन

४) आर. एस. शर्मा

५) विद्युत भागवत

६) स्त्रिया जातीप्रथेचे प्रवेशद्वार आहेत.

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१) डॉ. नारायण भोसले, महाराष्ट्रातील स्त्रीविषयक सुधारणावादाचे सत्ताकारण (१९४८-१९५६), द. ताईची प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती, २००८

२) शरद पाटील, प्रिमिटिव्ह कम्युनिझम, मातृसत्ता-स्त्रीसत्ता आणि भारतीय समाजवाद, माळवाई प्रकाशन धुळे. प्रथम आवृत्ती, २०१२

३) डॉ. रामचरण शर्मा, प्राचीन भारतीय राजकीय विचार आणि संस्था, डायमंड पब्लिकेशन पुणे, प्रथम आवृत्ती, २००६.

४) प्रतिमा परदेशी व सरोज कांबळे, जातीव्यवस्था आणि स्त्रीमुक्ती, क्रांतिसिंह नाना पाटील अकॅडमी, २०१९.

५) संपा. प्रतिमा परदेशी, विद्युत भागवत, स्त्रीवादी इतिहास लेखनाच्या दिशेने, सुगावा प्रकाशन पुणे, द्वितीय आवृत्ती, २०१५.

६) डॉ. नारायण भोसले, डॉ आंबेडकर आणि अब्राह्मणी इतिहास मीमांसा, दिग्नाक प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती, २००४.

७) विद्युत भागवत, स्त्री प्रश्नांची वाटचाल, प्रतिमा प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती, २००४.


❑❑❑

# घटक ३
# भारतीय स्त्रियांचा रुढीगत व वैधानिक दर्जा

**अनुक्रमणिका**


३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१ प्राचीन काळातील स्त्रियांचा रुढीगत व वैधानिक दर्जा

३.२.२ मध्ययुगीन काळातील स्त्रियांचा रुढीगत व वैधानिक दर्जा

३.२.३ वसाहत कालीन स्त्रियांचा रुढीगत व वैधानिक दर्जा

३.२.४ आदिवासी स्त्रियांचा रुढीगत व वैधानिक दर्जा

३.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

३.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ सारांश

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ आधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## ३.० उद्दिष्ट्ये

१) प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक स्त्रियांचा रुढीगत व वैधानिक दर्जा लक्षात येईल.

२) प्रत्येक कालखंडामध्ये स्त्रियांच्या दर्जात झालेले बदल समजून घेता येईल.

३) वसाहत काळामध्ये स्त्रियांच्या स्थानात झालेल्या बदलाची कारणमिमांसा करता येईल.

४) आदिवासी स्त्रियांच्या स्थिती व इतर स्त्रियांपेक्षा त्यांचे वेगळेपण लक्षात येईल.

५) स्त्रिया असलेल्या रूढी परंपराचा स्त्रियांच्या जीवनावर काय परिणाम झाला हे लक्षात येईल.

६) स्त्रियांच्या दयनीय परिस्थिती होण्यामागच्या कारणांचा शोध घेता येईल.

७) स्त्रियांचा दर्जा लक्षात आल्यामुळे तिच्या सक्षमीकरणा संदर्भात दिशा मिळेल.

## ३.१ प्रास्ताविक

मानवी इतिहासाच्या सर्व टप्प्यांवर स्त्रियांना दुय्यमत्व का व कसे प्राप्त झाले याचा विचार या प्रकराणात करावयाचा आहे. प्राचीन वैदिक काळात भारतात स्त्रियांची स्थिती पुरुषांबरोबरीने होती. त्यासाठी आपण गार्गी, मैत्रेयी, लोपामुद्रा, सुलभा, अपाला, घोषा इत्यादी स्त्रियांचे दाखले देतो. पुढे उत्तर वैदिक काळापासून स्त्रियांचा दर्जा घसरण्यास सुरुवात झाली. बुद्ध व जैन परंपरेने स्त्रियांना स्वातंत्र्य बहाल केले. पण मध्ययुगापर्यंत या स्वातंत्र्यातही घसरण होऊन अनेक अनिष्ट रूढी परंपरांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त झाली. स्त्रीभृणहत्या, बालविवाह, सतीप्रथा, बहुपत्नीत्व, जरठ-बालविवाह, विधवांचे केशवपन, स्त्रियांच्या शिक्षणाचा अधिकार नाकारण्यात आला. विवाह संस्कार हाच त्यांच्यासाठी उपनयन संस्कार होता. चूल आणि मूल एवढेच मर्यादित क्षेत्र व स्त्रीधर्माचे पालन करणे, हे त्यांच्या जीवनाचे उद्दिष्ट होते. हे झाले हिंदू स्त्रियांचे जीवन! पुढे मध्ययुगात त्यात काही बदल झाले नाही. उलट या रूढी अधिकच घट्ट झाल्या. मध्ययुगात भारतात मोठा राजकीय बदल झाला. सन १२०६ ला सुलतानशाही व सन १५२६ मुघल बादशाहीची स्थापना येथे झाली. सामान्यतः दिल्लीत मुस्लिम सत्ता स्थापन झाली तेव्हापासून पेशवाईच्या अखेर पर्यंतचा काळ म्हणजेच १२०६ ते १८१८ हा मध्ययुगीन कालखंड समजला जातो. या कालखंडात स्त्रियांचा दर्जा आणखीनच खालावला गेला. हिंदू समाजात पडदा पद्धतीसारख्या प्रथांना महत्त्व आले. मुस्लिम स्त्रीयांचा दर्जाही खुप चांगला नव्हता. पुरूषप्रधानता हे तत्त्व दोन्ही हिंदू व मुस्लिम संस्कृतीमध्ये महत्त्वाचे होते. मुस्लिम स्त्रीला घटस्फोटाचा अधिकार होता. पण या समाजात बहुपत्नीकत्त्वाची पद्धती रूढ होती, पडदा पद्धती होती. मात्र ब्रिटिशांच्या आगमनाने आपल्याकडे आधुनिक युगाची सुरुवात होते. स्त्री सुधारणेचे पर्व सुरू झाले. तिला व्यक्ती म्हणून प्रतिष्ठा प्राप्त होऊ लागली. समाजसुधारकांनी ब्रिटिश सरकारच्या मदतीने महिला विषयक सुधारणा कायदे मंजूर करून व प्रबोधनाच्या मार्गाने स्त्रियांचा दर्जा सुधारणेचा प्रयत्न केला. स्त्रियांच्या जीवनात अनेक स्थित्यंतरे झाली. या स्थित्यंतराचा त्याच्या दर्जावर झालेला परिणाम आपण अभ्यासणार आहोत.

## ३.२ विषय विवेचन

स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्याय ही आधुनिक युगाची मूल्ये आहेत. जीवनाच्या सर्व क्षेत्रात या मूल्यांचा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर पुरस्कार केला जात आहे. या बदलाचा प्रभाव स्त्रियांच्या पारंपारिक रुढीगत व वैधानिक दर्जावर झाला आहे. सर्व जगभरातून सर्व धर्ममतांमध्ये स्त्रियांचा दर्जा हा दुय्यम होता. धर्माकडून तिचे जीवन नियंत्रित केले जात होते. या परिस्थितीत आधुनिक काळात मोठे बदल झाले. स्त्रियांकडे माणूस म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन विकसित होऊ लागला. या प्रक्रियेमध्ये स्त्रियांच्या चळवळी सर्व जगभरातून निर्माण झाल्या. परिणामी स्त्रियांच्या दर्जासंबंधीच्या अभ्यास पुढे येऊ लागला. सर्व ज्ञानशाखा स्त्रियांचा अभ्यास करू लागल्या. या अभ्यासाचा उद्देश स्त्रियांना मानवी अधिकार कसे उपभोगता येतील याचा विचार व कृती होऊ लागली. स्त्रीला मानव अधिकार द्यायचे तर लिंगभावात्मक जडण-घडणीवर संशोधने केले जाऊ लागले, लिहिले जाऊ लागले. आपणही भारतीय स्त्रियांच्या सामाजिक,

धार्मिक, आर्थिक जीवनाच्या एकंदरीत सर्व क्षेत्रात, सर्व काळात तिचा दर्जा कसा होता, याचा शोध घेणार आहोत. भारतीय स्त्रीचा सामाजिक दर्जा ठरवण्यासाठी ज्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक घटकांचा प्रभाव स्त्रीजीवनावर पडलेला होता त्या घटकांचा अभ्यास करणे अपरिहार्य आहे. कुटुंब, नातेसंबंध, विवाह पद्धती, वारसा हक्क, धार्मिक संस्था, राजकीय संस्था, इ. सामाजिक संस्थांमध्ये स्त्रियांना दिले गेलेले स्थानच त्यांचा दर्जा लक्षात आणून देणारे आहे. समाज विकासाच्या प्रक्रियेत भारतात निर्माण झालेले विविध धार्मिक प्रवाह, पंथ, राजकीय बदल यामुळे स्त्रियांच्या स्थानात बदल झालेले दिसतात.

### ३.२.१ प्राचीन काळातील स्त्रियांचा रुढीगत व वैधानिक दर्जा

भारतीय स्त्रियांचा रुढीगत आणि वैधानिक दर्जा पाहण्यापूर्वी आपण दर्जा या शब्दाचा अर्थ समजून घेऊ या. प्रसिद्ध मानवशास्त्रज्ञ डॉ. राल्फ लिटन यांनी दर्जा या शब्दाची व्याख्या केली आहे. ते म्हणतात, 'कोणत्याही व्यक्तीला समाजव्यवस्थेत विवक्षित काली जे स्थान असते त्या स्थानाला दर्जा असे म्हणतात.' तेव्हा कोणत्याही समाजात स्त्रियांना कोणते हक्क आणि अधिकार आहेत, त्यांची कोणती कर्तव्य आहेत, त्यांच्यावर कोणती बंधने आहेत आणि हे हक्क व कर्तव्य यांच्याकडून कशा रीतीने कार्यान्वित होतात, या बाबीवर त्या समाजातील स्त्रियांचा दर्जा अवलंबून असतो.

प्राचीन काळात भारतीय स्त्रियांच्या सामाजिक दर्जामध्ये काळानुरूप बरेच बदल झालेली दिसून येतात. वैदिक काळात स्त्रिया पुरूषांप्रमाणे अधिकार उपभोगत होत्या पण उत्तर वैदिक काळानंतर त्यांच्यावर अनेक बंधने येऊन त्यांचा दर्जा खालावत गेला. समाजाच्या विविध प्रथा-परंपरांमध्ये बदल होत गेलेला आपल्याला जाणवतो. या काळात सामाजिक संबंधाचे नियमन करणारे आचारधर्म हे स्मृतीकार व नंतर टीकाकार यांनी तयार केले होते. वैदिक काळातील समाज अधिक उदार होता. उत्तर वैदिक काळात मात्र यात बदल झाला. स्त्रियांच्या जीवनात अनेक स्थित्यंतरे झाली. याचा अभ्यास प्राचीन काळातील स्त्रियांचा रुढीगत व वैधानिक दर्जाची खालील मुद्द्याच्या आधारे स्पष्ट करता येतील.

#### विवाह

स्त्री व पुरूष यांना पती-पत्नी या नात्याने एकत्र आणण्यास विवाह हा मानवी जीवनातील एक अत्यंत महत्त्वाचा संस्कार आहे. वैदिक काळात स्त्रियांच्या विवाहाचे वय १६ ते १७ वर्ष असल्याने पतीच्या निवडीत तिला अधिकार होता. क्षत्रिय स्त्रियांना स्वयंवराचा अधिकार होता. मात्र स्ववर्णातच विवाह व्हावा, अशी बंधने होती. तरीही भिन्न वर्णात विवाह झाल्याची उदाहरणे आहेत. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडळातील दहाव्या सुक्तावरून असे समजते की, दस्यू वर्णातील लोकांबरोबर विवाह करण्यास आर्य समाजाने बंदी घातली होती. तथापि भीम व अर्जुन यांनी हिडिंबा व उलूपी या अनार्य स्त्रियांशी विवाह केल्याचा उल्लेख आहे. पण नंतरच्या काळात मुलींचे लग्नाचे वय हे मनुस्मृतीनुसार ८ ते १२ वर्षाच्या खाली आले. महाकाव्य काळात ७ ते १० असे विवाहाचे वय होते. विवाहाचे वय कमी झाल्याने शिक्षणाचा अधिकार संपुष्टात आला. स्त्री ही आपल्या पतीच्या सुखदुःखात केवळ जन्मभराची साथीदार होती असे नाही तर त्याच्या घराची मालकीण होती. पतीच्या घरात तिचे आगमन एक उज्वल भविष्य सूचक घटना मानली जात असे.

वैदिक शब्द दम्पतीचा अर्थ संयुक्तरीत्या पती-पत्नी किंवा उत्पत्तीशास्त्रानुसार घराचे संयुक्त मालक असा आहे. विवाहाचे उद्देश पत्नी बरोबर गृहस्थ धर्माचे पालन करणे, धार्मिक अनुष्ठान, यज्ञयाग आणि श्रेष्ठ संतानप्राप्ती हा होता. मुलाच्या जन्माचे स्वागत केले जाई. पण मुलीच्या जन्माचे स्वागत होत होते, असा उल्लेख मात्र सापडत नाही. 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भवः' या आशीर्वाद मुलाच्या जन्माचे महत्त्व दर्शवतो.

मुलीला वेद अध्ययनाचा अधिकार होता. प्रसंगी तिला अविवाहित राहण्याचे स्वातंत्र्य होते. ब्रम्हवादिनी स्त्रिया आपल्या पित्याच्या घरी राहत व आयुष्यभर धर्मशास्त्र व तत्त्वज्ञानाचा अभ्यास करीत. वेदातील काही ऋचा स्त्रियांनी रचलेल्या आहेत.

धर्मग्रंथ, स्मृतीग्रंथ, सूत्रग्रंथ इ. मधून म्हणून प्राचीन काळात ८ विवाह प्रकार अस्तित्वात होते, असा उल्लेख मिळतो. ते प्रकार पुढीलप्रमाणे-

**ब्रह्म विवाह**

या विवाह प्रकारात मुलीचे वडील वेद अभ्यासात पारंगत असलेल्या मुलास आपल्या मुलीबरोबर विवाह करण्यास आमंत्रित करीत असत.

**दैव विवाह**

या पद्धतीनुसार यज्ञाच्या ऋत्विजाला कन्यादान केले जात असे. हा विवाहाचा प्रकार सर्वसामान्यासाठी नसल्याने त्याची विवाह संस्था ही मर्यादित राहिली. त्यामुळे हा विवाह प्रकार कालबाह्य ठरला.

**आर्ष विवाह**

या प्रकारात वरपक्षाकडून वधुपक्षाला एक गाय व बैल दिला जात असे. आणि हेच या विवाह प्रकाराचे वैशिष्ट्ये होते.

**प्रजापत्य विवाह**

या विवाह प्रकारात स्त्रियांचा आदर ठेवला जात असे. या विवाहानुसार पती-पत्नीचे सहधर्माचरण अभिप्रेत होते. पतीने पत्नी जिवंत असताना दुसरा विवाह करू नये तसेच गृहस्थाश्रमाचा त्याग करून वानप्रस्थ किंवा संन्यास आश्रमाचा स्वीकार करू नये. पत्नीच्या मृत्यू नंतर मात्र या गोष्टीचे स्वातंत्र्य होते.

**असुर विवाह**

या विवाह प्रकार वर पक्षाकडून मुलींच्या वडीलांना संपत्ती देऊन मुली विकत घेतल्या जात असत. अशा मुलीशी केलेला विवाह म्हणजे असून विवाह होय! धर्मशास्त्रानुसार अशा विवाहाला मान्यता दिली जात नव्हती परंतु समाजात हा विवाह प्रकार रूढ होता.

**गांधर्व विवाह**

हा विवाह प्रकार म्हणजे प्रेमविवाह होय! परस्परांच्या प्रेमात पडलेल्या स्त्री-पुरुषांनी परस्परांच्या संमतीने विवाह करणे म्हणजे गांधर्व विवाह पद्धती होय! काही ग्रंथांमधून या विवाह पद्धतीचे समर्थन केले आहे.

**राक्षस विवाह**

या विवाह प्रकारात मुलीला जबरदस्तीने पळून आणत असत अशा मुलींशी केलेला विवाह म्हणजे राक्षस विवाह होय! या विवाह प्रकारात क्षत्रिया मध्ये रूढ होता. युद्धात स्त्रियांना जिंकून आणून त्यांच्याशी विवाह केले जातात.

**पिशाश्च विवाह**

या विवाह प्रकारात संबंधित मुलीला दारू पाजून बेशुद्ध स्थितीत आणून किंवा बेसावध असताना तिची फसवणूक करून विवाह करत असत.

वरील आठही विवाह प्रकारात कमी जास्त प्रमाणात प्राचीन काळी भारतीय समाजात रूढ होते. ब्रह्म विवाह, गांधर्व विवाह, व प्रजापत्य विवाह हे स्त्रीला समानतेचा दर्जा देत होते. इतर विवाहात तिचा दर्जा खालावलेला होता.

**नियोग पद्धती**

पतीचा मृत्यू, असाध्य रोग, निर्बिजत्व, इ. कारणामुळे स्त्री निपुत्रिक असेल तर तिने केवळ पुत्र प्रातीसाठी अन्य पुरुषाशी विधीपूर्वक समागमन करण्याच्या पद्धतीला नियोग असे म्हटले जाते. वंश सातत्य हा या प्रथेचा मुख्य उद्देश होता. ही पद्धत इ. स. पूर्व ३०० वर्षापर्यंत अस्तित्वात होती. या प्रथेमुळे स्त्रियांचे समाजातील दर्जा स्थान घसरले. काही धर्मशास्त्रकारांणी या प्रथेला विरोध दर्शवला. स्त्रियांच्या पावित्र्यापेक्षाही वंश चालू राहणे महत्त्वाचे मानले जात असे. स्त्रीने नियोगाच्या मार्गाचा अवलंब करावा यासाठी पुरुषाकडून व कुटुंबाकडून स्त्रियांवर दबाव आणला जात असे या पद्धतीने स्त्रियांचे जीवन दुय्यम केले.

**विधवा पुनर्विवाह**

विधवा स्त्रीच्या बाबतीत वैदिक समाज बराच उदार होता. पतीचे निधन झाल्यानंतर मृत्यूशयेवर त्याच्या शेजारी निजलेल्या त्याच्या पत्नीस तिचा दीर हात धरून उठवी व तिला घरी नेई. एवढेच नव्हे तर तिला आपली वधू म्हणूनही तिचा स्वीकार करी. असे ऋग्वेद व अथर्ववेदातही उल्लेख आले आहेत. नारदस्मृती, पाराशर स्मृती आणि अग्निपुराणात 'पती हरवला असेल, मरण पावला असेल, संन्याशी झाला असेल, नपुंसक असेल आणि पतीत झाला असेल तर या पाच संकटाच्या वेळी स्त्रियांनी दुसरा पती करणे शास्त्रविहित आहे.' असे सांगून पुनर्विवाहाचे समर्थन केले आहे.

प्राचीन काळात समाजाच्या रक्षणासाठी जास्तीत जास्त वीर पुरुषांची आवश्यकता होती. युद्धाचे वेळी अनेक वीर पुरुषांना मरण येई त्यामुळे स्त्रियांच्या पुनर्विवाहाची परवानगी होती. मात्र काही काळानंतर स्त्रियांच्या पुनर्विवाहाला विरोध होऊन लागला. सुरुवातीला ब्राह्मण जातीतून या पुनर्विवाहाला विरोध होऊ लागला. मात्र इतर वर्णातून ही पद्धत काही काळ चालू राहिली. बालविवाह पद्धती रूढ झाल्यानंतर विधवांच्या समस्या मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्या. जैन व बौद्ध धर्मातील स्त्रिया साध्वी होणे पसंत करत

असत. इ. सन. १००० पासून बालविधवांचा सुद्धा पुनर्विवाह होणे बंद झाले. विधवेशी विवाह करणाऱ्याला धर्मबहिष्कृत करण्यात येऊ लागले. साधारणपणे इसवी सन ११०० नंतर पुनर्विवाहाची प्रथा बंद झाली. विधवा पुनर्विवाह बरोबरच सगोत्र, सपिंड विवाहाला सुद्धा बंदी आली. चुकून सगोत्र व सपिंड विवाह झाला तर पुरुषाने त्या स्त्रीचा पत्नी म्हणून त्याग करावा व मातेप्रमाणे तिचा सांभाळ करावा, अशी प्रथा होती. त्या पुरुषाला पुन्हा विवाह करायचा अधिकार होता मात्र स्त्रीचा पुनर्विवाह होऊ शकत नव्हता.

**बालविवाह**

उपनिषद व सूत्र कालखंडामध्ये कन्येचा विवाह कमीत कमी वयामध्ये करण्यात येऊ लागला. उत्तर वैदिक कालखंडानंतर बालविवाहाच्या प्रथेने रौद्र रूप धारण केले. मनुस्मृतीच्या मते, जो पिता आपल्या कन्येचा विवाह आठव्या वर्षी करीत नाही तो पिता नरकात जातो, असे म्हटले आहे.

**केशवपन**

विधवेच्या केशवपनाची चाल इ.स. ५०० पर्यंत नसावी, असे दिसते. काही धर्मशास्त्रीय वचनातून विधवांनी केशभूषा करू नये एवढेच म्हटले आहे. नवव्या शतकानंतर केशवपनाच्या चालीचा प्रसार झाला. विधवा सती न जाता जिवंत राहणार असेल तर तिने आपल्या केसाचा त्याग करून आपले शरीर तपश्चर्येने शुष्क करून टाकावे. स्कंदपुराणात असे वचन आहे की, 'विधवेची बांधलेली वेणी मृत नवऱ्याला जखडणारी जाचक होते म्हणून विधवेने केशवपन केले पाहिजे.' केशवपनाची रूढी ब्राह्मण जातीत मोठ्या प्रमाणात होती. कनिष्ठ वर्गातून केशवपन पद्धती फारशी अस्तित्वात नव्हती वरिष्ठ वर्णातून व जातीतून ही प्रथा मोठ्या प्रमाणात रूढ होती.

**सती प्रथा**

सती प्रथा भारताबरोबरच आशिया व युरोप खंडात सुद्धा प्रचलित होती पण तिचे अस्तित्व आपल्यासारखे दीर्घकाळ नव्हते. प्राचीन काळात पतीच्या मृत देहाबरोबर त्याच्या पत्नीला जिवंत जाळण्याची प्रथा होती. ही सती प्रथा वैदिक काळात प्रचलनात नव्हती. इ.स. ४ थ्या शतकापासून सती प्रथा अस्तित्वात असल्याचे दिसते. विविध धर्म ग्रंथ, वाङ्.मयीन साहित्य यामधून सती प्रथेची माहिती मिळते. स्त्री सती गेल्यानंतर स्त्रीला मोक्ष प्राप्त होऊन तिला स्वर्ग प्राप्ती होते, अशी अंधश्रद्धा होती. स्मृतीकारांनी सती प्रथेला विरोध केला होता. मात्र त्याच वेळी धर्मशास्त्रकारांनी सती प्रथेचे जोरदार समर्थन केले. उत्तर हिंदुस्तानात व विशेषत: काश्मीरमध्ये ही प्रथा अस्तित्वात होती. क्षत्रिय वर्णांमध्ये सतीप्रथा मोठ्या प्रमाणात अस्तित्वात होती. हरीताने असे प्रतिपादले आहे की, गारूडी जसा सापाला बिळातून बाहेर ओढून काढतो तशी सती जाणारी स्त्री आपल्या पतीला नरकातून बाहेर ओढून काढते. सती जाणारी स्त्री आजोळ, माहेर व सासर अशा तिन्ही कुळाचा उद्धार करते.' या मताचा प्रभाव समाजावर पडलेला दिसतो. इ.स. ७८० ते १००० या अवधीत उत्तर हिंदुस्थानातील व विशेषतः काश्मीरमध्ये ही प्रथा अस्तित्वात होती. ब्राह्मण स्त्रीने सती जाऊ नये अशी शास्त्र वचने आढळतात. अंगीरसाने म्हटले आहे की ब्राह्मण जातीमधील जी स्त्री पतीच्या मृत्यूनंतर अनुगमन करेल ती आत्महत्या करीत असल्यामुळे स्वत:ला व पतीला स्वर्गात नेत नाही.' परंतू

आळतेकरांनी असे म्हटले आहे की, बंगाल व उत्तर प्रदेशातील बहुतेक सती ब्राह्मण होत्या. ही प्रथा ब्रिटिश कालखंडापर्यंत अस्तित्वात होती. लॉर्ड बेंटिंगने ही प्रथा नष्ट केली.

**पडदा पद्धती**

इसवी सन पहिल्या शतकापर्यंत पडदा पद्धती नव्हती. वैदिक काळात मुला-मुलींचे सहशिक्षण होत असे. स्त्रिया सार्वजनिक जीवनात सभा संमेलनात हजर राहत असत. मात्र पहिल्या शतकापासून राजघराण्यातील स्त्रियांमध्ये पडदा पद्धती अस्तित्वात होती. राजघराण्यातील स्त्रियांचे अनुकरण श्रीमंत सरदार, जमीनदार यांच्या घराण्यातील स्त्रिया करू लागल्या. 'मृच्छकटिक' या नाटकातून राजघराण्यातील स्त्रियांचे अनुकरण काही श्रीमंत घराण्यातील स्त्रिया ही करत असल्याचे उल्लेख दिसतो. तेव्हा राजघराण्याखेरीज अन्यत्र कोणीही पडदा घेतल्याचे पुरावे इ.स. दहाव्या शतकापर्यंत सापडत नाहीत.

**घटस्फोट**

भारतीय समाजात स्त्रीला घटस्फोट घेण्याचा अधिकार नव्हता. पतीपरमेश्वर हाच तिचा धर्म होता. तरीही नारद याने पती नपुंसक असेल किंवा संन्यासी बनला असेल तरच पत्नीला घटस्फोट घेण्याचा अधिकार आहे, असे सांगितले. या सामाजिक दास्यत्वामुळे स्त्रियांना स्वतंत्र व्यक्तिमत्त्व नाही, हेच सिद्ध झाले. पती हाच धर्म मानणारी मानसिकता स्त्रियांमध्ये मोठ्या प्रमाणात निर्माण झाली व ती आजही दिसून येते.

**बहुपत्नीत्व पद्धती**

बहुपत्नीत्वाची पद्धती प्राचीन भारतीय समाज-जीवनाचा अविभाज्य घटक होती. ही प्रथा उत्तर वैदिक कालखंडापासून सुरू होऊन ती नंतरच्या कालखंडामध्ये फोफावत गेली. हळूहळू पुरूषसत्ताक समाज व्यवस्थेत समाजातील वरिष्ठ व धनवान वर्गाने बहुपत्नीत्व प्रथेला कायदेशीर रूप दिले. ही प्रथा सबंध भारतभर दिसून येते. स्त्रियांना आपल्या इच्छेविरूद्ध या प्रथेला बळी पडावे लागले. या अमानुष प्रथेने स्त्रियांचे जीवन अधिकच दयनीय केले. सवती मत्सराचे दुखः तिच्या वाट्याला आले होते.

**वारसा हक्क**

प्राचीन काळात वैदिक कालखंडात पती-पत्नी यांना उद्देशून दम्पती हा शब्द वापरला जात होता. घराची संयुक्त मालकी असा त्याचा अर्थ होता. याचाच अर्थ पती व पत्नी घराचे व घरातील चीज वस्तूंचे संयुक्त स्वामी समजले जात होते. परंतु पुरूषप्रधान समाज व्यवस्थेत स्त्रीला मालमत्तेत समान वाटा व दर्जा मिळाला नाही. जरी काही वेळामध्ये हक्क मिळाला तरी तो हक्क गौण प्रकारचा होता. पत्नीला पतीच्या मालमत्तेत एक तृतियांश हक्क मिळत होता. पती प्रवासाला किंवा कामानिमित्त बाहेरगावी गेल्यास पत्नी आपल्या नेहमीचा दैनंदिन खर्च करीत असे. जमीन, घर, पशुधन ही स्थावर मालमत्ता मोठ्या संयुक्त कुटुंबाची समजली जात असे. परंतु घरातील दाग-दागिने, अलंकार, वस्त्रे यासारख्या जंगम मालमत्तेवर स्त्रियांचा हक्क मान्य करण्यात आलेला होता. स्त्रियांच्या अधिकारातील जंगम मालमत्तेला स्त्रीधन असे नाव होते. स्त्रीच्या

मृत्यूनंतर स्त्रीधन तिच्या मुलीकडे हस्तांतरित होत असे. तर स्त्रीला मूल नसेल तर तिचे सर्व स्त्रीधन पुन्हा माहेरी वडीलांना मिळत असे. मनुस्मृतीमध्ये स्त्रीधनाचे सहा प्रकार सांगितलेले आहेत. १) वडिलांनी दिलेल्या भेटवस्तू २)आईने दिलेल्या भेटवस्तू ३)भावाने दिलेल्या भेटवस्तू ४) विवाहानंतर पतीने दिलेले दागिने ५) विवाहाच्या वेळी नातेवाईक व इतरांकडून मिळालेल्या देणग्या. ६) विवाहानंतर नव्या घरी आल्यावर दिलेल्या देणग्या मनुस्मृतीने सांगितलेली सहा प्रकारांनी स्त्रीला स्त्रीधन प्राप्त होत असे. विष्णू स्मृतीने स्त्रीधनात तीन गोष्टीचा समावेश केला आहे. १) मुलाने दिलेले अलंकार, दागिने, भेटवस्तू, देणग्या २) नातेवाईकांनी दिलेल्या देणग्या ३) पतीने दुसरा विवाह केल्यानंतर भरपाई म्हणून दिलेली संपत्ती, नातेवाईकांशिवाय इतरांकडून मिळालेल्या देणग्या व स्वत: काम करून मिळवलेली संपत्ती याचा समावेश स्त्रीधनात होतो. वरील दोन्हीत ग्रंथकारांनी स्त्रीधन संकल्पना मांडली आहे यातून एक गोष्ट स्पष्ट होती की, स्त्रीचा स्थावर मालमत्तेवर निश्चित असा हक्क दिसत नाही. मात्र जंगम मालमत्तेवर तिचा हक्क होता, असे म्हणावे लागते. स्त्रियांच्या विवाहाच्या वेळी तिला ज्या देणग्या मिळत त्यात प्रामुख्याने भांडीकुंडी, अलंकार व वस्त्रे यांचा समावेश असे. त्या देणग्यांना 'परिणाह्य' असे म्हणत. अशा वस्तूवर स्त्रीची संपूर्ण मालकी होते. स्त्रीधनावरील स्त्रियांचा हक्क बहुतेक ग्रंथकारांनी मान्य केलेला आहे. काही ठिकाणी धर्म ग्रंथातून कुटुंबाच्या मालकीची संपत्ती कुटुंबप्रमुखाकडे होती व पत्नी, मुले व दास यांचा संपत्तीत कोणताही हक्क नव्हता. बौद्ध साहित्यात भरणपोषणा खेरीज इतर आर्थिक अधिकाराची नोंद दिसत नाही. तसेच, जैन धर्मात पित्याच्या संपत्तीत मुलीला अधिकार नव्हते मात्र विवाह प्रसंगी 'दाय' या सदराखाली अनेक भेटवस्तू मिळत होत्या तो तिचा अधिकार नसून खुशीने दिले जात असे.

वैदिक काळात विवाहित मुलींना वडीलांच्या संपत्तीत वारसा हक्क मिळत नव्हता. तिला भाऊ असल्यास वडिलाच्या संपत्तीत हक्क मागता येत नसे. परंतु, मुलगी अविवाहित असेल तर हक्क दिला जात होता. थोडक्यात, पुरुषप्रधान समाज व्यवस्थेत स्त्रियांना चरितार्थापुरता वारसा हक्क मान्य केला. मात्र संपत्तीचे खरे मालक पुरुष वर्ग राहिला, असे दिसते.

**वेश्या व्यवसाय**

प्राचीन साहित्यामध्ये वात्सायनचे कामसूत्र, धर्मसूत्र, स्मृती, कौटिल्याचे अर्थशास्त्र या शिवाय जैन व बौद्ध धर्म ग्रंथांमध्ये वेश्या व्यवसायाचे उल्लेख आढळतात. नगरवधू, गणिका व देवदासीच्या माध्यमातून स्त्रियांना बंदिस्त करण्याचा प्रयत्न झालेला आहे. त्याच बरोबर वैदिक वाङ्मयामध्ये कन्या विक्रयाचा याचा उल्लेखही आढळतो. वधू पित्याला पैसे देऊन कन्या मिळवून स्त्रियांना बंधनात अडकविण्यासाठी सर्व उपाय शास्त्रकारांनी अवलंबले.

**स्त्रियांचा सामाजिक, व धार्मिक जीवनातील दर्जा**

प्राचीन काळात विशेषतः वैदिक काळात स्त्री जीवनाच्या प्रगतीच्या दृष्टीने सुवर्णाक्षरांनी लिहिण्या योग्य आहे. वैदिक काळात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान होते. समाजामध्ये व कुटुंबामध्ये मानाचे स्थान होते. मुलांप्रमाणे मुलींची ही मुंज होत असे. मुलांबरोबर शिक्षण घेण्याचा हक्क होता. विवाहात वर

निवडण्याचे स्वातंत्र्य होते. विवाहानंतर यज्ञ प्रसंगी आणि प्रत्येक धार्मिक कार्यात सहभागी होता येत असे. धार्मिक कार्याप्रमाणे सार्वजनिक सभा व मिरवणुकीच्या कार्यक्रमातही भाग घेत असत. स्त्रियांना स्वतंत्रपणे असे सीता व रुद्रयज्ञ करता येत असत. मुलींना मुला बरोबर शिक्षणाचा अधिकार असल्यानेच सद्योवधू व ब्राह्मवादीनी होऊ शकल्या. एकूणच वैदिक काळात स्त्रियांचा दर्जा प्रतिष्ठेचा व महत्त्वाचा होता.

वैदिक कालखंडानंतर धर्मसूत्राच्या काळात स्त्रियांचा दर्जा व प्रतिष्ठा यात हळूहळू अनिष्ट बदल होत गेले. या काळात बालविवाहाला सुरूवात झाली. त्यांच्यासाठी लग्न हेच उपनयन संस्कार मानला गेला. त्यामुळे शिक्षणापासून त्या दूर गेल्या. त्यामुळे त्या शूद्र मानल्या जाऊ लागल्या. या काळातील विविध धर्मग्रंथांतून त्यांचे दुय्यम स्थान स्पष्ट दिसून येते. बालविवाहाची पद्धती सर्वत्र रूढ झाली. त्यांना वडिलांच्या संपत्तीत असलेला हक्क नाहीसा झाला. त्यामुळे सती  जाण्यास उत्तेजन मिळू लागले. तसेच विधवांचे जीवन अतिशय खडतर असल्याने स्त्रिया सती जाणे मान्य करू लागल्या. शिवाय धर्मशास्त्रातून या प्रथेला पाठिंबा मिळू लागला स्त्रियांचा दर्जा या कालावधीत निश्चित खालावला.

बौद्ध व जैन धर्मात सुद्धा स्त्रियांना पुरूषांबरोबरचे स्थान सहज मिळाले नव्हते. गौतम बुद्धांनी भिक्षू संघात स्त्रियांना अनेक वर्ष स्थान दिले नव्हते. भिक्खू आनंदाच्या शिफारशीनंतर स्त्रियांना संघात स्थान मिळाले. पण संघामध्ये संघातील भिक्षुणीला आठ नियमांचे पालन करावेत लागत होते. त्यानुसार पुरुषांपेक्षा स्त्रियांचे स्थान हे दुय्यमच राहिले. जैन धर्मात सुद्धा साधूच्या तुलनेत साध्वीचे स्थान दुय्यम होते. तरीसुद्धा हिंदू धर्मात स्त्रियांना जो दर्जा व प्रतिष्ठा होती त्यापेक्षा निश्चितच चांगला दर्जा व प्रतिष्ठा बौद्ध व जैन धर्मातील स्त्रियांना मिळत होती.

स्त्रियांवर अनेक बंधने असली तरी वंश वाढवणारी म्हणून आईच्या भूमिकेत तिला खूप महत्त्व होते. त्यातही मुलीच्या आईपेक्षा मुलाच्या आईचा मान कुटुंबात व समाजात मोठा होता.

थोडक्यात, वेदकाळ व उपनिषद काळ स्त्रियांसाठी चांगला होता. स्मृती काळात पुरुषांचे वर्चस्व प्रस्थापित होणारा व स्त्रियांचा दर्जा घालवणारा आहे. गुप्त काळानंतर स्त्रियांचा दर्जा एकदम घसरला. पुराण काळात त्यांच्यावर अनेक बंधने आली. बालविवाह, केशवपन, सती प्रथा, विधवा पुनर्विवाहाचा अधिकार नाकारणे, शिक्षणाचा अधिकार नाकारणे, इ. मुळे स्त्री म्हणजे उपभोगाचे व प्रजोत्पन्नाचे साधन बनले.

**स्वंय अध्ययन प्रश्न १**

अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.

१) वैदिक शब्द दम्पतीचा अर्थ ........ आहे.

अ) संयुक्तरीत्या पती पत्नी ब) संयुक्तरीत्या नातेसंबंध

क) संयुक्तरीत्या सामाजिक संबंध क) वरीलपैकी नाही

२) प्राचीन काळी विवाहाचे ...... प्रकार अस्तित्वात होते.

अ) ९ ब) ७ क) ८ ड) ९

३) ............ विवाह पद्धतीनुसार यज्ञाच्या ऋत्विजाला कन्यादान केले जात होते.

अ) दैव विवाह ब) आर्ष विवाह क) गांधर्व विवाह ड) वरील सर्व

४) ............ विवाह प्रकारात स्त्रियांचा आदर ठेवला जात असे.

अ) असुर विवाह ब) दैव विवाह क) आर्ष विवाह ड) प्रजापत्य विवाह

५) ............... स्मृतीमध्ये पुनर्विवाहाचे समर्थन केले आहे.

अ) नारद स्मृती ब) पारशार स्मृती क) अग्निपुराण ड) वरील सर्व

६) विधवेची बांधलेली वेणी मृत नवऱ्याला जखडणारी जाचक होते म्हणून विधवेचे केशवपन केले पाहिजे असे ........ पुराणात म्हटले आहे.

अ) अग्निपुराण ब) वायुपुराण क) स्कंद्पुराण ड) वरील सर्व

७) गारुडी जसा सापाला बिळातून बाहेर काढतो तसेच सती जाणारी स्त्री पतीला नरकातून ओढून काढते असे ....... यांनी म्हटले आहे.

अ) कौटिल्य ब) हरित क) मनु ड) वरीलपैकी नाही

८) मनुस्मृतीत स्त्री धनाचे ....... प्रकार सांगितले आहे.

अ) ६ ब) ७ क) ८ ड) ५

९) वधूला विवाहात मिळालेल्या देणग्यांना .......... म्हणतात.

अ) परिणाह्य ब) जंगम क) दाय ड) वरीलपैकी नाही

१०) जैन धर्मात विवाह प्रसंगी मिळालेल्या भेटवस्तूंना ......... म्हणतात.

अ) परिणाह्य ब) जंगम क) दाय ड) वरील सर्व

ब) विधान चूक की बरोबर ओळखा.

विधान १ ऋग्वेदातील दहाव्या मंडळातील दहाव्या सूत्रावरून समजते की दस्यू वर्णातील लोकांबरोबर विवाह करण्यास आर्यांनी बंदी घातली.

विधान २ विधवा पुनर्विवाह बरोबरच सगोत्र व सपिंड विवाहाला सुद्धा बंदी घालण्यात आली होती.

अ) पहिले विधान बरोबर दुसरे चूक ब) पहिले विधान चूक दुसरे बरोबर

क) दोन्ही विधाने चूक ड) दोन्ही विधाने बरोबर

क) योग्य जोड्या जुळवा.

| | अ | | ब |
|---|---|---|---|
| | अ | | ब |
| १ | गंधर्व विवाह | अ | मुलीच्या वडीलांना संपत्ती देऊन मुलींना विकत घेणे |
| २ | असुर विवाह | ब | यज्ञाच्या ऋत्विजाला कन्यादान केले जाते |
| ३ | राक्षस विवाह | क | प्रेम विवाह |
| ४ | दैव विवाह | ड | मुलीला पळवून आणून तिच्याशी विवाह करणे |

अ) १-ड, २-अ, ३- ब, ४-क  ब) १- ब, २-ड, ३- क, ४-अ

क) १- क, २- अ, ३- ड, ४- ब  ड) १- ड, २- ब, ३- अ, ४- क

## ३.२.२ मध्ययुगीन काळातील स्त्रियांचा रूढीगत व वैधानिक दर्जा

सामान्यत: दिल्लीत मुस्लिम सत्ता स्थापन झाली तेव्हापासून पेशवाईच्या अखेर पर्यंतचा काळ म्हणजेच १२०६ ते १८१८ हा मध्ययुगीन कालखंड समजला जातो. या कालखंडात भारतात राजकीय, सामाजिक, व सांस्कृतिक बदल मोठ्या प्रमाणात घडून आले. भारतात मुस्लिमांची सत्ता स्थापन झाल्यावर समाजात अनेक वर्ग तयार झाले. हिंदू व मुस्लिम संस्कृतीचा व परंपराचा एकमेकांवर परिणाम झाला.

इ.स. ११९२ च्या तराईंच्या युद्धात मोहम्मद घोरीने पृथ्वीराज चव्हाणचा पराभव केल्यानंतर इ.स. १२०६ मध्ये कुतुबुद्दीन ऐबक याने दिल्लीवर आपली सत्ता प्रस्थापित केली. सुलतानशाही, मुघलशाही आणि इतर छोट्या मोठ्या मुस्लिम सत्ताधीशांनी आपली संस्कृती व धर्माची पेरणी भारतामध्ये केली.

गुलाम घराणे, खिलजी घराणे, तुगलक घराणे, सय्यद घराणे, लोधी घराणे व मुगल घराणे यांच्या राजकीय कारकिर्दीत भारतीय राजवटींचा संघर्ष होऊन काही सांस्कृतिक घटकाचा प्रभाव भारतीय समाज व्यवस्थेवर झाला. आणि स्त्रियांच्या रूढीगत दर्जा व स्थानावर मध्ययुगीन कालखंडामध्ये काही नवीन घटनांनी शिरकाव करून स्त्री जीवन एका वेगळ्या वळणावर आणून ठेवले. परकीयांची विशेषतः मुस्लिम आक्रमणे त्यातून उद्भवलेले धार्मिक व सांस्कृतिक संघर्ष हा स्त्रियांच्या रूढीगत व वैज्ञानिक दर्जामध्ये बदल करणारा ठरला.

### सुलतानशाहीचा काळ (१२०६ ते १५२६)

इ.स. १२०६ साली मुहम्मद घोरी च्या मृत्यूनंतर भारतात त्याचा सरदार कुतुबुद्दीन ऐबक यांनी आपली स्वतंत्र सत्ता स्थापन केली. तो पूर्वायुष्यात गुलाम होता म्हणून त्यांनी त्याचे घराणे गुलाम घराणे म्हणून ओळखले जाते. त्याच्यानंतर खिलजी, तुघलक, सय्यद, लोदी घराण्यांनी भारतावर आपली सत्ता स्थापन केली. या सर्व राजसत्ताचा कालखंडात सुलतानशाही या नावाने ओळखली जातो. पुढील काही मुद्द्याच्या आधारे स्त्रियांची परिस्थिती सुलतानशाही काळात कशी होती याचा आढावा आपल्याला घेता येईल.

या काळात सर्वसाधारणपणे मुस्लिम व हिंदू समाजात स्त्रियांना दुय्यम दर्जाचे स्थान होते. अमीर खुस्त्रोच्या मते, ''स्त्री कितीही गुणी असली तरी पुरुषांपेक्षा कनिष्ठ दर्जाची समजली जात असे. तिच्या पावित्र्याकडे विशेष लक्ष दिले जात असे. एखाद्या मुलीच्या चारित्र्यावर जरी खोटे आरोप लावून तिला कलंकित करण्याचा प्रयत्न केला तरी तिला मरणासारखे होते. कारण तिच्याशी कोणीही विवाह करण्यास तयार होत नसे.'' या खुस्त्रोच्या मतावरून आपल्या हिंदू व मुस्लिम स्त्रियांची स्थितीचा अंदाज घेता येतो.

**विवाह**

मुस्लिम धर्मानुसार विवाह हा संस्कार नसून जोडीदारामधील एक करार आहे. मुस्लिम विवाह पद्धती इस्लाम धर्माच्या तत्त्वांवर आणि शरीयतच्या नियमांवर आधारित असते याला 'निकाह' असे म्हणतात. मुस्लिम विवाह निकाह  जो दोन व्यक्तींमधील एक कायदेशीर आणि सामाजिक करार असतो. या करारात पती आणि पत्नीच्या अधिकारांचे आणि कर्तव्याचे स्पष्टपणे वर्णन केले जाते. मेहर हा विवाहाचा एक महत्त्वपूर्ण भाग असतो. हा पतीकडून पत्नीला दिला जाणारा उपहार किंवा संपत्ती असते. हे पत्नीच्या आर्थिक सुरक्षेचे प्रतीक मानले जाते. मुस्लिम स्त्रीला वर निवडण्याचे स्वातंत्र्य नसले तरी विवाहामध्ये स्त्रिच्या इच्छेशिवाय तिच्याशी विवाह करता येत नाही. मुस्लिम समाजात विवाह एक करार असल्याने स्त्रीला घटस्फोट घेण्याचा अधिकार मिळाला होता. त्यामुळे तिला हिंदू स्त्रियांच्या तुलनेत चांगला दर्जा प्राप्त झाला होता. कारण घटस्फोटीत मुस्लिम स्त्रीला पुनर्विवाह करण्याची परवानगी होती.

बहुपत्निकत्वाची पद्धती प्रचलित होती. मुस्लिम पुरुषांस कुराणा नुसार चार स्त्रियांशी विवाह करता येत होता. 'मुताहा' म्हणजे (अस्थायी विवाहाची) परवानगी होती. इब्न बतुताच्या रेहला ग्रंथात अशा प्रकारच्या विविहाचे वर्णन आले आहे. अस्थायी विवाह विशेषतः इस्लामच्या शिया पंथामध्ये विषेशत: त्याचे प्रचलन होते. ह्या प्रकारात, विवाह एका निश्चित कालावधीसाठी, उदाहरणार्थ काही महिन्यांसाठी किंवा वर्षभर, केला जातो आणि कालावधीच्या समाप्तीनंतर तो आपोआप समाप्त होतो. मुस्लिम समाजात मुलीचा विवाह चुलत भाऊ, मावस भाऊ, मामाच्या मुलाशी केला जाण्याची प्रथा आहे.

**तलाक (घटस्फोट) पद्धती**

मुसलमानांमध्ये घटस्फोट हा हिंदूपेक्षा सहज व सोपा होता. त्यामुळे हिंदू स्त्रियांपेक्षा मुस्लिम स्त्रियांची स्थिती चांगली होती, असे म्हणावे लागेल. मुस्लिम समाजात पुरुष मुस्लिम कायद्यानुसार तीन वेळा तलाक हा शब्द उच्चारून पत्नीस केव्हाही सोडू शकतो. त्यासाठी काही कारणे असण्याचे बंधन नव्हते, तलाक तोंडी व लेखी ही घेऊ शकतो. तो पत्नीच्या अनुपस्थितीत तसेच उपस्थितीतही तलाक घेऊ शकतो. इला, झिहार, लियन खुला, आणि मुबारत असे घटस्फोटाचे मुस्लिम कायद्यात चार प्रकार होते. मुबारत दोघांच्या संमतीने घेण्यात येत असे. पत्नीकडून घटस्फोटासाठी पुढाकार घेतला तर त्याला खुला असे म्हणतात. मुबारत नुसार पती-पत्नी दोघेही परस्परांतील मतभेदामुळे घटस्फोट घेत असत. मुस्लिम कायद्याचे वैशिष्ट्य म्हणजे घटस्फोटासाठी न्यायालयाच्या आदेशाची आवश्यकता नसते, या कायद्यानुसार मुस्लिम पतीस साक्षीदारासमोर तलाक शब्द उच्चारला तर घटस्फोट मिळत होता. परंतु मुसलमान स्त्री मात्र तसे करू शकत नव्हती. मुस्लिम

स्त्रीला घटस्फोटाचा अधिकार जवळजवळ नाकारण्यात आलेला होता. एवढेच नव्हे तर तलाक विरुद्ध दाद मागणीची मुभा, तरतूद मुस्लिम कायद्यात नव्हती.

इस्लामने घटस्फोटीत स्त्रीला पुनर्विवाहाचा हक्क दिला होता. तथापि कुराणात निर्णायक तलाक घेण्यापूर्वी पती-पत्नीला तीन महिन्याचा अवधी दिला जात असे. या काळात दोघांनी नीट सल्ला मसलत करून ठरवले पाहिजे या पद्धतीला 'इद्दत' असे म्हणतात. एवढे करूनही त्यांचे परस्पर पटले नाही तर शेवटी तलाक होत असे.

**पडदा पद्धती**

पडदा पद्धती इराण व ग्रीस देशांमध्ये प्रचलित होती. अरब आणि तुर्कांनी सुद्धा या पद्धतीचा स्वीकार केला. ती आपल्याबरोबर भारतात आणली. तुर्कांच्या प्रभावामुळे किंवा राज्यकर्त्यांच्या व अभिजनांच्या प्रथांचे अनुकरण करण्यासाठी ही प्रथा भारतात विशेषता उत्तर भारतात मोठ्या प्रमाणात स्वीकारली गेली. हिंदू स्त्रियांना आक्रमकांनी पळून नेण्याच्या भीतीमुळे ही पद्धत रूढ झाली असे मानले जाते. सतत संघर्षाच्या काळात स्त्रिया युद्धातील लुटीचा एक भाग मानल्या जात होत्या. वांशिक शुद्धतेचे स्थान कायम राहावे. स्त्रियांच्या मानसन्मानाची स्थिती टिकून राहावी, इत्यादी कारणांनी हिंदूंनी पडदा पद्धती स्वीकारली. कदाचित पडदा पद्धती प्रथेचे सर्वात महत्त्वाचे कारण सामाजिकही असू शकेल. ही पद्धती प्रतिष्ठेचे धोतक बनली. आणि इतरांनी आपल्याला उच्चवर्णीय समजावे अशी त्यांची इच्छा होती त्यांनी ही पद्धत स्वीकारली. त्याचप्रमाणे या पद्धतीचे धार्मिक औचित्यही सांगण्यात आले.

सुलतानशाहीच्या काळात उच्च कुटुंबात व राजघराण्यात पडदा पद्धती विशेषतः प्रचलनात होती. शाही 'हरेम' किंवा जनानखान्यात ही पद्धत खास होती. फिरोजशहा तुघलकने पडदा पद्धती कडक केली. त्याने मुस्लिम स्त्रियांना दर्गापर्यंत जाण्यासही प्रतिबंध लावले. त्याने आपली आत्मकथा 'फतूहाते फिरोजशाही' मध्ये लिहिले आहे की, ''मुस्लिम शहरात इस्लामी नियमांच्या विरुद्ध परंपरा सुरू झाली आहे. पवित्र प्रसंगाच्या वेळी स्त्रिया पालखी, घोडे, तट्टूवर बसून अथवा मोठे गट करून पायीच दरग्याला जातात. त्यामुळे असभ्य व्यक्तींना आवश्यक व अयोग्य व्यवहार करण्याची संधी मिळत असे.''

तत्पूर्वी रझिया सुलतानाने पडदा पद्धती बंद करण्याचा प्रयत्न केला. मात्र तिला हे शक्य झाले नाही. उलट तिला अनेक शत्रू निर्माण झाले. मुस्लिम पुरुषांना आपल्या पत्नीने चेहरा उघडा ठेवल्याचे अथवा तिचा चेहरा तिच्या भावाने व वडीलांनी पाहणे पसंत नव्हते. त्यामुळे मुस्लिम समाजात पडदा पद्धतीला महत्त्व प्राप्त झाले. कारण काही असो या प्रथेचे स्त्रियांवर प्रतिकूल परिणाम झाल्याने त्या पुरुषांवर अधिकच अवलंबून राहू लागल्या.

ग्रामीण भागात बहुतेक स्त्रिया आपल्या साडीच्या पदरानेच डोके किंवा तोंड झाकून घेत. परंतु कनिष्ठ जातीतील म्हणजे शेतकरी, मजूर, कारागीर या वर्गातील स्त्रिया त्यांच्या कामाच्या स्वरूपामुळे त्यांना पडदा पद्धतीचा अवलंब करणे शक्य नव्हते.

**राजकीय व सामाजिक क्षेत्रातील स्त्रिया**

मुस्लिम समाजात स्त्री-पुरुष सामाजिक जीवनात मुक्तपणे वावरत नसत. उच्च व मध्यम वर्गाच्या मुस्लिम स्त्रियांना नृत्य व संगीतात सामील होण्यास प्रतिबंध घातला होता. मात्र राजघराण्यातील व सरदार घराण्यातील काही स्त्रिया शिकलेल्या होत्या. त्यांचा राजकारणावर व प्रशासन या क्षेत्रावर मोठा प्रभाव होता. राजकारणाबरोबर सामाजिक जीवनावरही त्यांचा प्रभाव होता. अल्तमशनंतर रुकनुद्दीन फिरोजला सत्ता प्राप्त करून देण्यात त्याची आई शहातुर्केनचा हात होता. रझिया सुलतान ही भारताच्या इतिहासातील दिल्लीच्या तक्तावर बसलेली पहिली स्त्री राज्यकर्ती होती. तिने जनतेच्या संमतीने रूकनुद्दीन फिरोजची सत्ता समाप्त करून दिल्लीचे तक्त मिळवले.

सुलतानशाही काळात राजकारणाबरोबर समाज व धार्मिक क्षेत्रात पुढील स्त्रियांनी आपला ठसा उठावला. अशा स्त्रियांमध्ये शेख हमीद नागोरीची पत्नी बीबी फातिमा, निजामुद्दीन अवलियाची आई बीबी फातिमा, बीबी हाफिज जमाल या स्त्रियांनी मुस्लिम समाजातील कुलीन स्त्रियांचे नेतृत्व केले.

**जनान खाना**

सल्तनतकालीन मुस्लिम राज्यकर्ते आपल्या जनानखान्यामध्ये अतिशय सुंदर व प्रभावी स्त्रियांचा समावेश करत असत. जनानखान्यात स्त्रियांची संख्या भरपूर असून त्यांना एकप्रमाणे गुलामगिरीचे जीवन जगावे लागत असे. आपल्या जनानखान्यामध्ये अनेक हिंदू स्त्रियांचाही सामावेश मुस्लिम राज्यकर्त्यांनी केलेला होता. त्यामुळे स्त्री जीवनाला अवनती आली.

सुलतानशाही काळात मुस्लीम स्त्रियांचे जीवन मुस्लीम धर्मातील कायद्यानुसार व रूढी-प्रथा परंपरेनुसार नियंत्रीत केले होते.

**मुघलकालीन स्त्रियांचा दर्जा (१५२६ ते १७०७)**

सुलतानशाही नंतरचा १५२६ ते १७०७ हा मुघलबादशाहीचा कालखंड मानला जातो. या कालखंडातही मुस्लीम स्त्रियांच्या दर्जामध्ये फारसा फरक झाला नाही. त्यांचे जीवन धर्म व परंपरांनी नियंत्रित केले होते.

**बहुविवाह पद्धती**

कुराण पुरुषांना चार विवाह करण्याची परवानगी दिली होती. या विवाहित स्त्रियांशी चांगल्या प्रकारची वागणूक देण्याची जबाबदारी पैगंबराने त्या व्यक्तीवर घातली होती. अकबराने एक पत्नीत्वाचा पुरस्कार केला होता. तथापि त्याने आपल्या मताचे उल्लंघन करून जवळजवळ ३०० स्त्रियांशी विवाह केला होता. अकबराचा मानलेला भाऊ मिर्झा अझिझ कोका यांनी गमतीने बहुपत्नीत्वाच्या पद्धतीचा जो उल्लेख केलेला आहे. तो म्हणतो, ''एका पुरुषांनी चार स्त्रियांशी विवाह केला पाहिजे. बोलण्यासाठी व संगीतासाठी पर्शियन, गृहकार्यासाठी खुरासनी, मुलांच्या पालनपोषणासाठी हिंदुस्थानी व या तिघींना चेतावणी देऊन शांत करण्यासाठी तुर्कस्तानी स्त्री.'' त्याच्या या विधानावरून पुरुषांच्या मनातील स्त्रियांविषयीची भावना कळून

येते. बहुपत्नीत्वाच्या प्रथेमध्ये कुटुंबातील शांततेचा भंग झाला. प्रत्येक स्त्रीने पतीवर आपला प्रभाव व नियंत्रण स्थापन करण्याचा प्रयत्न केला. परिणामी त्यांच्यात द्वेष व मत्सर निर्माण झाला. बहुपत्नीकत्व असलेल्या कुटुंबात पहिल्या पत्नीला इतर पत्नीपेक्षा प्रतिष्ठा व सन्मान मिळत असे. इतर पत्नी तिच्या देखरेखीखाली राहत असत.

**विधवा पुनर्विवाह**

मुस्लिम स्त्रियांना पुनर्विवाहाचा अधिकार होता. पण बहुपत्नीकत्व असलेल्या कुटुंबात पुनर्विवाहित विधवेची स्थिती दुय्यम दर्जाची व अपमानास्पद झाली. त्यामुळे कुटुंबात मुलांबाबत प्रश्न निर्माण झाले. याबाबत इतिहासकार बदायुनीने प्रकाश टाकला आहे की, 'कुटुंबात विधवेच्या पहिल्या पतीपासून झालेली मुले, विधवेशी विवाह केल्यानंतर त्या व्यक्तीपासून झालेली मुले आणि त्या व्यक्तीने कुमारीकेशी केलेल्या विवाहानंतर झालेली मुले यामुळे कुटुंबात ताणतणाव निर्माण होत असे. या काळात वयाने मोठ्या असलेल्या स्त्रीने तरुणाशी विवाह, एखाद्या तरुणीने वृद्धाशी केलेला विवाह, आणि बालविवाहाची उदाहरणे दिसतात. या सर्व बाबतीत स्त्रियांची स्थिती समाधानकारक नव्हती असे म्हणावे लागते. अकबराने याबाबत त्यांची स्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला पण त्याला यश आले नाही.

**पडदा पद्धती**

सुलतान काळाप्रमाणे मुघल काळातही पडदा पद्धत होती. मुस्लिम स्त्रियांनी घराबाहेर पडताना बुरखा वापरणे आवश्यक होते. अकबर हा सुधारणावादी समजला जातो परंतु त्यांनी सुद्धा पडदा पद्धती बळकट करण्याचा प्रयत्न केला होता. परपुरुषांशी संभाषण करणे, भाऊ अथवा वडील यांना पडद्या शिवाय दिसणे हे स्त्रियांच्या पतींना मान्य नव्हते. एवढेच नव्हे तर आजारी स्त्री वैद्यांना भेटू शकत नव्हती. विशेष प्रसंगी घराबाहेर पडणे स्त्रियांसाठी तुच्छ मानले जाई. मुस्लिम राज्यकन्या रस्त्याने जात असता कोणीही पुरुष रस्त्यावर येऊ शकत नव्हते. सम्राट जहांगीरची पत्नी नूरजाँहा या पद्धतीला अपवाद होती. ती पडद्याशिवाय सार्वजनिक व राजकीय जीवनात सहभागी होत असे.

**स्त्रियांचे शिक्षण**

राजघराणी व सरदार घराण्यात मर्यादित प्रमाणात स्त्री शिक्षणाकडे लक्ष देत असत. सामान्य स्त्रियांमध्ये शिक्षणाचा पूर्ण अभाव होता, त्यामुळे स्त्रियांमध्ये अज्ञान अंधश्रद्धा दांभिकपणा इत्यादी बाबींचा फैलाव झाला. मुस्लिम मुलींना फक्त कुराणाचे पठण करावे लागत असे. श्रीमंत लोक मात्र त्यांच्या मुलींना शिकवण्यासाठी घरीच व्यवस्था करीत. मुघलांच्या जनानखान्यातील स्त्रियांना शिकविण्यासाठी मानधनावर शिक्षिका नेमत असत. अशावेळी त्या पर्शियन, अरबी, अध्यात्मिक, इतिहास यासारखे विषय शिकवत. सामान्य मुस्लिम वर्गांच्या मुलींसाठी मदरशातून शिक्षण दिले जात नव्हते. मात्र लहान मुलींना शिकवण्यासाठी मशिदीतील मुल्लाकडे पाठवत असत. मुलींना नृत्य, संगीत, शिवणकाम, विणकाम इत्यादी हस्त व्यवसायांचे शिक्षण देत असत. अकबराने फत्तेपूर शिक्री येथील त्याच्या महलात स्त्रियांसाठी मदरसा सुरू केला होता. औरंगजेबाने मुस्लिम स्त्रियांनी कुराणाचा अभ्यास करून त्यानुसार आचरण करण्यासाठी मदरसा मार्फत त्यांना

शिक्षण देण्याची व्यवस्था केली होती. उच्च वर्गातील उच्च विद्या विभूषित स्त्रियांमध्ये गुलबदन बेगम, झेबुन्निसा बेगम यांचा समावेश होतो. मात्र सामान्य स्त्रियांना शिक्षण घेणे जवळपास अशक्य होते.

**खेळ व मनोरंजनात स्त्रियांचा सहभाग**

भारतीय समाजात स्त्रीवर्ग वेगवेगळ्या खेळात सहभागी होत असे. मुघल काळात राजघराण्यातील व उच्च वर्गातील पुरुषांबरोबर कनिष्ठ वर्गातील स्त्रिया मनोरंजनाचे खेळ खेळत असत. अकबर दरबारातील गुलाम वर्गाच्या स्त्रियांबरोबर बुद्धिबळाचा खेळ खेळत असे. औरंगजेबाच्या मुली त्यांच्या सेवेसाठी नेमण्यात आलेल्या स्त्रियांबरोबर व मैत्रिणींबरोबर वेगवेगळे खेळ खेळत. 'चौपट' हा खेळ राजपूत स्त्रियांमध्ये विशेष प्रसिद्ध असून मुघल दरबारातील स्त्रिया सुद्धा खेळत असत. राजघराण्यातील गुलबदन बेगम सारख्या स्त्रिया पत्त्याचा खेळ खेळत होत्या.

**संगीत व गायनकला**

मुघलांच्या दरबारात अनेक संगीतकार व गीतकार यांना आश्रय दिलेला होता. मुगल काळातील सर्वश्रेष्ठ गायक तानसेन याचे नाव इतिहासात आजरामर आहे. राजघराण्यातील अनेक स्त्रिया संगीतात कुशल होत्या. शिवाय काही स्त्रिया चांगल्या संगीतकारही होत्या. पुरणमल याची पत्नी रत्नावली हिंदी गीतांची उत्कृष्ट गायिका होती. संत मीराबाई, नूरजहाँन बेगम, झेबुन्निसा बेगम यासारख्या मुस्लिम स्त्रिया गीतरचनाकार होत्या. मानसिंगाची राणी मृगनयनी ही उत्कृष्ट संगीतकार म्हणून लोकप्रिय होती.

**जनानखाना पद्धत**

बादशहाप्रमाणे त्यांच्या सरदारांची सुद्धा जनानखानी असत. त्यांच्या लग्नाच्या अनेक स्त्रिया असत. अकबराला ३०० लग्नाच्या स्त्रिया होत्या तरीही त्याने जनानखाना बाळगला होता. अनेक स्त्रियांचा शारीरिक उपभोग घेता यावा यासाठी जनानखाना ठेवत. त्यात राजाच्या दासी, सरदार घराण्यातील असंख्य रूपवान स्त्रियांचा त्यात समावेश असे. अबुल फजलच्या माहितीनुसार अकबराच्या जनानखान्यात पाच हजारापेक्षा जास्त स्त्रिया होत्या. जनानखान्यातील स्त्रियांचे जीवन कैदखाण्यासारखे बंदिस्त होते. अकबर स्त्रियांचा मीना बाजार भरून सुंदर स्त्रियांचा शोध घेत असे. जनानखाना पद्धतीमुळे स्त्रियांच्या सामाजिक नैतिक दर्जा घसरल्याचे स्पष्ट होते.

**पोषाख व अलंकार**

मुस्लिम स्त्रिया सलवार कमीज परिधान करत असत. सलवार- कमीज रंगीबेरंगी रंगाचे, कशिदा काम केलेली असत. सुती किंवा रेशमी वस्त्रे परिधान करत. श्रीमंत मुस्लिम वर्गातील स्त्रिया सुवासिक तेल अत्तर यांचा वापर करत. स्त्रिया सौंदर्यप्रसाधनाचा मोठ्या प्रमाणात वापर करीत. स्त्रिया अनेक प्रकारचे लेप लावत त्यात चंदनाच्या लेपाला प्राधान्य होते. मुस्लिम स्त्रिया डोळ्यात सुरमा घालत असत पान खाण्यामुळे ओठ लाल असतात.

**साहित्य क्षेत्रात प्राविण्य मिळवलेल्या स्त्रिया**

मुघल काळात भारतातील स्त्रियांनी वेगवेगळ्या भाषेतील साहित्यात प्राविण्य मिळवले होते. गुलबदन बेगम, गुलरुख बेगम, सलिमा सुलतान बेगम इत्यादी पर्शियन भाषेतील उत्कृष्ट कवियत्री होऊन गेल्या. अरबी भाषेतील कवयित्रींच्या वर्गात जान बेगम, नूरजहाँन यांचा उल्लेख करता येईल. मीराबाई, रूपमती, झिनतुन्निसा, इत्यादी स्त्रियांनी साहित्यात नावलौकिक मिळवला. गुलबदन बेगम एक विद्वान स्त्री होती. तिने 'हुमायुननामा या ग्रंथाचे लेखन तिने केले.

**मुघल काळातील राजकारणातील कर्तृत्ववान स्त्रिया**

मुघल काळात स्त्रियांनी शासन व्यवस्था व राजकीय क्षेत्रात आपले योगदान दिले. त्यांच्या ठिकाणी मुत्सद्दीपणा, धैर्य, न्यायप्रियता, इत्यादी गुण होते.

बाबरच्या काळात प्रशासनात सहभागी असलेल्या स्त्रिया एहसान दौलत बेगम, बाबरची आई कुतलग निगार खानम, त्याची पत्नी माहिम बेगम या होत्या.

हुमायुनच्या कारकिर्दीत खान जादा बेगम, गुलबदन बेगम, हिरम बेगम इत्यादी स्त्रियांनी प्रशासनात सहभागी होऊन युद्धप्रसंगी सैन्याचे नेतृत्व केले. राणासंगाची पत्नी राणी कर्णावतीने चित्तोडचा किल्ला स्वत: लढविला. आपल्या संरक्षणार्थ तिने हुमायूनकडे राखी पाठविली होती. राणी दुर्गावतीने आपला पती दलपतशहाच्या मृत्यूनंतर न डगमगता गढामंडलचे राज्य सांभाळले.

अकबरची मुख्यदायी माहाम अनगाने व जीजी अनगा यांनी अकबराचे पालन पोषण केले. सुरुवातीच्या राज्य कारभारावर या दोन स्त्रियांचे वर्चस्व होते. राजपूत राजा भरमलची कन्या जोधाबाई व अकबर यांच्या विवाहानंतर तिने राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावली.

अहमदनगरच्या राज्यातील चांदबिबी यांच्या कर्तृत्वासाठी प्रसिद्ध आहे. तिने अहमदनगरच्या रक्षणासाठी मुघलांशी शौर्याने लढा दिला. तिच्या मृत्यूनंतर अकबराला अहमदनगरचा किल्ल्यावर वर्चस्व प्राप्त करतात आले.

जहांगीरच्या काळात **नूरजहान** हिने स्वत: प्रशासनात नेतृत्व केले. राज्याची वास्तविक संचालक म्हणून तिने ११ वर्ष सत्ता हातात ठेवून प्रतिस्पर्धांच्या कट-कारस्थानाला हाणून पाडले. तिने सुमारे ५०० मुलींचा विवाह स्वखर्चाने केला. तिने कला व साहित्याला आश्रय दिला होता. आपल्या काळातील फॅशन ती ठरवत असे. वस्त्रे अलंकार व डिझाईन यात तिने क्रांती घडवून आणली होती. नूरजहान की एक प्रभावी व्यक्तिमत्त्वाची स्त्री होती.

सम्राट शहाजहानवर मुमताज महलचा मोठा प्रभाव होता. तिच्याशिवाय जहानआरा बेगम, रोशनअरा बेगम, शहबेगम, इत्यादी स्त्रिया राजकारणावर प्रभाव टाकणाऱ्या होत्या.

औरंगजेबच्या मुलीने राजकारणात भाग घेऊन मोठा मुत्सद्दीपणा दाखवला होता. झेबुन्निसा व झिनतुन्निसा यांनी आपला वडील औरंगजेबाच्या धर्मवेड्या स्वभावावर संयमाने लगाम लावला होता. झिनतुन्निसा कैदेत असलेला शाहू व त्याची आई येसूबाई यांच्या जीविताचे रक्षणही केले.

विजापूरच्या दरबारात बडीसाहेबा हिच्या हातात आदिलशहाचा कारभार अनेक वर्ष होता. बंगालमध्ये अलिवर्दीखानाची पत्नी, ओरिसात मुर्शिदकुलीखानाची पत्नी दुर्गेनाह बेगम विजापूरमध्ये युसूफ अदिलशहाची बहीण दिलशाद आगा व आई पुनजी खातून इत्यादी स्त्रिया मुघलकालात राजकारणात प्रभावी ठरल्या होत्या.

**सम्राट अकबराने केलेल्या स्त्री विषयक सुधारणा**

अकबराने स्त्रीविषयक केलेल्या सुधारणांची माहिती अबुल फजलने लिहिलेल्या 'आईन-ए- अकबरी' या ग्रंथात मिळते.

**बालविवाहास आळा घातला.**

मुलाचे १६ व मुलीचे १४ वर्ष विवाहाचे वय निश्चित केले. नूतन विवाह इच्छुक स्त्री-पुरुषाचे वय नियमाप्रमाणे आहे की नाही हे पाहण्याचे काम कोतवालाकडे सोपवले. तसेच, निकटच्या नात्यातील विवाह बंधनास मनाई केली.

**विषम विवाहास आळा घातला**

एखाद्या पुरुषाचा त्याच्याहून बारा वर्षापेक्षा अधिक वयाने मोठ्या स्त्रीशी होणाऱ्या विवाहाला बंदी घातली. परंतु वयस्क पुरुषाचा अल्पवयीन स्त्री बरोबर होणाऱ्या विवाहविरुद्ध अकबराने कडक निर्बंधने लावली, असे दिसत नाही.

**एकपत्नीत्त्व**

एकपत्नीत्त्व विवाह मुसलमानांमध्ये लोकप्रिय करण्यासाठी अकबराने उल्लेमांचा धर्मगुरूचा विचार घेण्यासाठी त्यांना आपल्या इबादतखान्यात बोलवून घेतले होते. परंतु त्यांनी असा एकपत्नी विवाह निर्बंधाचा कायदा करणे हे मुस्लिम धर्माविरूद्ध होईल असे सांगितले. परंतु त्यांच्या या विरोधास न जुमानता अकबराने फरमावले की, सामान्य स्थितीतील मुसलमानानेदेखील एकपत्नीत्वाचे आचरण केले पाहिजे. मात्र पत्नीस संतती न झाल्यास ती गोष्ट निराळी. अकबराने म्हटले आहे की अनेक पत्नी विवाह हे मनुष्याच्या प्रकृतीस अपायकारक व गृह सौख्य विघातक ठरतात. याशिवाय अकबराने हुंड्याच्या चालीस आळा घातला.

**वेश्याव्यवसायाचे नियंत्रण केले**

वेश्या व्यवसायाचे नियंत्रण करण्यासाठी त्याने वेश्यांनी शहराच्या एका वेगळ्या भागात वस्ती करावी असे फार्मावले. अशा स्त्रियांनी आपल्या व्यवसायाचा परवाना काढला पाहिजे असे सांगून त्यांच्या ठिकाण्यावर एका दरोग्याची नेमणूक केली व कोणासही वेश्यागमन करायचे असेल तर त्याने आपले नाव

दरोग्याच्या कचेरीत नोंदविले पाहिजे व फी दिली पाहिजे असे ठरवले. या प्रकरणी अकबराने अशा अनेक गुन्हेगारांना शिक्षा दिल्याचे नमूद आहे.

**बुरखा न वापरता वावरण्यास उत्तेजन दिले.**

अकबराने वयस्कर स्त्रियांनी निरनिराळे संमेलन, प्रदर्शने इत्यादी समारंभात बुरखा न वापरता भाग घ्यावा अशा प्रथेस उत्तेजन दिले. या संबंधीचे बरेच तपशीलवार वर्णन व्हिसेंन्ट स्मिथ याने लिहिलेल्या अकबर चरित्रात आले आहे.

**सतीच्या चालीस प्रतिबंध केला**

सतीच्या चालीस प्रतिबंध केला. पुनर्विवाहस मान्यता दिली .त्याने असा नियम केला होता की, जर एखाद्या हिंदू मुलीला जबरदस्तीने मुसलमाना बरोबर विवाह झाला तर त्या मुलीला परत सुरक्षितपणे तिच्या पित्याच्या स्वाधीन करण्यात यावे.

मध्ययुगीन मुघल कालखंडात राजघराण्यातील स्त्रियांनी शासन व्यवस्था व राजकीय क्षेत्रात आपले योगदान दिले. त्यांच्या ठिकाणी मुत्सद्दीपणा, धैर्य, न्यायप्रियता इत्यादी गुण होते. पण एकंदरीत धर्माचा प्रभावातून स्त्रीची जडणघडण होत असल्याने व धर्माचा प्रभाव समाजमनावर असल्याने स्त्रियांचे जीवन धर्म नियमांनी बांधलेले होते. नैतिकतेच्या नावाखाली पडदा पद्धती, बहुपत्नित्व, तलाक यामुळे स्त्रियांचे जीवन पुरूषांच्या तुलनेत दुय्यम होते, असे म्हणावे लागते.

**मध्ययुगीन हिंदू स्त्रियांचा दर्जा**

भारतीयांच्या जीवन विषयक आदर्शात धर्म प्रमुख केंद्रस्थानी राहिला आहे. हिंदू स्त्रीचे जीवनही धर्माने नियंत्रित केलेले होते. भारतामध्ये तुर्कांचे आगमन झाले त्यांनी त्यांच्या धार्मिक व सामाजिक वारसा सोबत आणला. स्त्रियांसंबंधी त्यांची जी धोरणे होती ती भारतीय हिंदू संस्कृतीने स्वीकारली व मध्ययुगीन हिंदू स्त्री जीवनामध्ये कमालीचे परिवर्तन झाले.

**बालविवाह**

विवाह हे एक धार्मिक व सामाजिक कर्तव्य होते. त्यात पती-पत्नीच्या प्रेमापेक्षा त्यांच्या कर्तव्यावर भर दिला जात असे. विवाहानंतर मुलगी सासू-सासऱ्याच्या नियंत्रणाखाली राहत असे. जातींअंतर्गत विवाह होत. जातीबाह्य विवाहाला धर्म मान्यता नव्हती. विवाह मुलगी वयात येण्यापूर्वी करावेत अशी रूढी होती. मुलीचे विवाह वयाच्या ८ ते ९ वर्षापर्यंत केले जात. बालविवाहाची प्रथा भारतात सर्वत्र रूढ होती. श्री जी. ए. शर्मा यांनी आपल्या 'सोशल लाईफ इन मिडिएव्हल राजस्थान' या ग्रंथात बालविवाहाचे वर्णन केले आहे. मारवाडी जमातीतील मुलगी दिडवर्षाची व मुलगा तीन वर्षाचा अशा विवाहाचे उल्लेख येतात. मुलींचे विवाह साधारण ८ ते १८ वर्षापर्यंत होत असत.

**हुंडा पद्धती**

कन्याच्या जन्माचे स्वागत प्राचीन काळापासून आपल्याकडे होत नाही. मुलगी परक्याचे धन आहे, असा समज आपल्या समाजामध्ये आहे. मुलगीच्या माता पित्याला तिच्या लग्नासाठी हुंडा द्यावा लागतो. नवरी मुलीच्या वडिलांना काही रक्कम व मौल्यवान वस्तू विवाह निमित्त नवऱ्या मुलाला द्याव्या लागतात, त्याला हुंडा असे म्हणतात. ही प्रथा सर्व भारतभर प्रचलित आहे. या प्रथेमुळे मुलगी कुटुंबासाठी ओझं बनते. राजस्थानमध्ये या प्रथेला 'नेग' असे म्हणतात, तर दक्षिण भारतात 'अरनामू' असे म्हणतात. हुंडा पद्धती उच्च व गरीब वर्गामध्ये सर्व जातीमध्ये प्रचलित आहे.

**बहुपत्नीत्वाची पद्धती**

बहुपत्नीत्वाची पद्धती भारतीय समाजामध्ये सर्वत्र प्रचलित आहे. मुस्लिम व हिंदू धर्मामध्ये ही प्रथा दिसून येते. बहुपत्नीकत्वाची काही कारणे होती. पहिल्या पत्नीला पुत्र झाला नाही, पती-पत्नी यांच्यातील संघर्ष, सामाजिक प्रतिष्ठा, राजकीय संबंध व त्यातून लाभाची अपेक्षा, नियोगाची पद्धत इत्यादी कारणांनी बहुपत्नीत्वाची प्रथा रूढ झाली होती. या प्रथेमुळे स्त्रियांचे जीवन आणखीनच दुर्बोध झाले.

बहुपत्नीत्वामुळे पुरुषांच्या पत्नींमध्ये पतीची मर्जी सांभाळण्यासाठी संघर्ष होत. त्यातून शेवटी सवती मत्सर, द्वेष, कटकारस्थाने होत. त्यातून कौटुंबिक कलह होत. सावत्र भावंडे व त्यांचे संघर्ष समाजासाठी डोकेदुखी होत असे. राजपुत राजांच्या अंतःपुरात भिन्न जातीच्या अनेक स्त्रिया असत. मात्र सर्वांनाच राण्यांचा दर्जा मिळत नसे. महाराष्ट्रात राजघराणे, सरदार व श्रीमंतामध्ये ही पद्धत प्रचलित होती. शिवाजी राजांच्या आठ पत्नी होत्या. राजाराम व शाहू यांच्या प्रत्येकी चार पत्नी होत्या. नाना फडणविसांना नऊ पत्नी होत्या. महादजी शिंदे यांना सुद्धा नऊ पत्नी होत्या. दक्षिण भारतात सुद्धा म्हैसूरच्या राजाचा हारेम मोठा असल्याचा उल्लेख मिळतो.

**विधवांची स्थिती**

मध्ययुगामध्ये विधवांची स्थिती अतिशय दयनीय स्वरुपाची होती. संपूर्ण भारतात तिला सामाजिक व धार्मिक कार्यक्रमात भाग घेणे निषिद्ध मानले जात होते. वैधव्य हे मध्ययुगीन स्त्री जीवनाचा अभिशाप होता. स्त्रीचा सामाजिक दर्जा तिच्या पतीशी जोडला गेला होता. पती जिवंत असताना तिला सुवासिनीचा मान असे. समाजात नवऱ्याआधी आपला मृत्यू व्हावा व सवास्न मरण यावे असे स्त्रिया देवाकडे साकडे घालत. अशा धारणा असलेल्या सामाजिक परिस्थितीत ती जगत होती. ती विधवा झाली तर तिला अपशकुनी म्हटले जाई. तिचे. सुख, सन्मान, अशा आकांक्षा सर्व संपून जात. तिला असाहाय्य व काबाडकष्टाचे जीवन जगावे लागे. तिला केशवपन करावे लागे. स्कंद पुराणात असे वचन आहे की, विधवेची बांधलेली वेणी मृत भार्याला जखडणारी, जाचक होते म्हणून विधवेने केशवपन केले पाहिजे. तपश्चर्येने तिने आपले शरीर शुष्क करून टाकावे. साधे वस्त्र वापरणे, जाड्या भरड्या अंथरूणात झोपणे अतिशय नकारात्मक जीवन तिला जगावे लागत होते. विधवा स्त्रीला पतीच्या मालमत्तेत हिस्सा मिळत नसे. तथापि नवऱ्याच्या मालमत्तेतून तिला काही प्रमाणात पोटगी मिळत असे.

**शैक्षणिक पीछेहाट**

मध्ययुगीन कालखंडात स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. चूल आणि मूल एवढ्या पुरते त्यांचे जीवन मर्यादित होते. शिक्षण घेण्याचे मुलांसारखे स्वातंत्र्य मुलींना नव्हते. त्यांच्यासाठी लग्न हाच संस्कार महत्त्वाचा होता. पडदा पद्धतीने शिक्षण घेणे अशक्य झाले. बालविवाहाची पद्धत रूढ झाल्याने मुली शिक्षणापासून वंचित राहू लागल्या.

परंतु मुस्लिम सत्ताधीशांच्या काळात अनेक सरदार घराणी उदयास आली. त्या घराण्यातील मुलींना जुजबी शिक्षण मिळत असे. रजपूत राजांच्या घराण्यातील स्त्रियांना, नायर व जमीनदाराच्या कुटुंबातील मुलींना शिक्षण मिळत असते. जैन धर्माच्या साध्वींना लिहिण्या वाचण्या इतपत शिक्षण मिळत होते. परंतु सर्वसामान्य स्त्री शिक्षणाचा समाजात अभाव होता. त्यामुळे सामान्य वर्गातील स्त्रियांमध्ये अंधश्रद्धा, कर्मकांड, अज्ञान, दांभिकपणा इत्यादी गोष्टी आढळत होत्या. स्त्री शिक्षण विषयक समाजात अनेक गैरसमज होते. सरदार घराण्यातून प्रशासनाचे व लष्करी शिक्षण स्त्रियांना देत होते. सामान्य वर्गातील क्षत्रिय स्त्रीसुद्धा लष्करी शिक्षण घेत असत. त्यांना दरबारात जनानखान्यात संरक्षक म्हणून नेमले जात असे.

**सती प्रथा**

पतीच्या मृत्यू नंतर पत्नी सती जात असे. स्त्री आपल्या पती बरोबर दोन प्रकारे सती जात असे. एक, सहगमन म्हणजे मृत पती बरोबर स्वत:ला जाळून घेणे व दुसरे अनुगमन म्हणजे पतीच्या एखाद्या वस्तूबरोबर स्वत:ला जाळून घेणे. पती निधनाच्या वेळी स्त्री गरोदर असेल तर पुत्र किंवा कन्या जन्मानंतर ती पतीच्या एखाद्या वस्तूबरोबर अग्नित प्रवेश करीत असे. एखाद्या राजाच्या अनेक पत्नी असल्यास पट्टराणी पती बरोबर सती जात असे. तर इतर राण्या पृथक अग्निप्रवेश करत. प्रसिद्ध यात्रेकरू इब्नबतूता यांनी आपला ग्रंथ रेहला यात तत्कालीन सती प्रथेचे वर्णन केलेले आहे. हे प्रसंग त्यांनी स्वत: बघितलेले आहेत. तसेच १७ व्या शतकातील प्रवासी ट्रॅव्हर्नियर याने शूद्र स्त्री सती जाताना पाहिल्याचे वर्णन केलेले आहे. सती पद्धतीमुळे स्त्रीला स्वतंत्र असे स्वतःचे अस्तित्व व दर्जा नव्हता. ती फक्त एका पुरुषाची पत्नी होती व तिचे प्रमुख कर्तव्य म्हणजे पतीला या लोकात व परलोकात प्रसन्न ठेवणे असा होता.

**कुटुंबाची मालतत्ता व स्त्री हक्क**

मध्ययुगीन कालखंडात हिंदू स्त्रियांना आपल्या आई-वडिलांच्या अथवा पतीच्या संपत्तीवर हक्क सांगता येत नव्हता. तिला मिळणाऱ्या अलंकार दागदागिने हिरे जड जवाहर यासारख्या स्त्रीधनात समाविष्ट होणाऱ्या वस्तूवर तिचा हक्क असे. वडिलांची संपत्ती मुलाला मिळत असे. विधवेला एकत्र कुटुंबातून मालमत्ता मिळत नसे. श्राद्ध कर्म आणि वंश संवर्धनासाठी दत्तक मुलगा घेण्याची प्रथा मध्ययुगात होती. ब्रम्हचारी पुरुषाला दत्तक घेता येत असे पण ब्रह्मचारी स्त्रीला दत्तक घेण्याचा हक्क नव्हता. पत्नीच्या संमतीशिवाय पुरुष दत्तक घेऊ शकत असे. दत्तक केवळ संपत्तीच्या अपेक्षेने येत असल्याने पतीच्या मृत्यूनंतर दत्तक मुलाकडून छळ होत असे.

**जोहर**

जोहार ही प्रथा राजपूत स्त्रियांमध्ये प्रचलित होती. ज्यावेळी राजपूत स्त्रियांना आपला पती रणभूमीतून विजयी होऊन परत येणार नाही असे वाटत तेव्हा त्या आपल्या रक्षणासाठी अग्नी प्रवेश करीत असत. राजपूत स्त्रिया आपल्या पतीच्या कपाळावर तिलक लावत त्याच्या पदाला अभिवादन करीत त्यानंतर भगवी वस्त्रे परिधान करून अग्नीत प्रवेश करीत असत. इब्नबतूताने आपल्या रेहला या ग्रंथात या प्रथेचे सजीव वर्णन केले आहे. मोहम्मद तुगलकने कम्पिलाच्या शासकावर आक्रमण केले तेव्हा त्याच्या स्त्रियांनी जोहार केला. अल्लाउद्दीन खिलजीने १३०१ मध्ये रणथंबोरच्या किल्ल्याला वेढा दिला त्यावेळी राणी पद्मावतीसह इतर स्त्रियांनी जोहार केला. १५३५ मध्ये बहादूर शहाने चितौडला वेढा दिल्यावर राणी कर्णावती व इतर स्त्रियांनी जोहार केला. इतिहासात जोहारची अशी काही उदाहरणे सापडतात. परकीय आक्रमकापासून आपले जीवित आणि अब्रूचे रक्षण करण्यासाठी त्या आपला प्राण त्याग करत.

**कुटुंबातील स्त्रियांचे स्थान**

मुळातच स्त्रियांना कुटुंबात परावलंबित्व बहाल करण्यात आले होते. वडील, पती व मुलगा यांच्या नियंत्रणाखाली ती अजन्म वावरत असे, स्वतंत्रपणे जगणे तिला अशक्य होते. विवाह, घटस्फोट व वारसा यात तिला कसलीही किंमत नव्हती. तरीही मध्ययुगीन भारतीय समाजात मातेला मोठ्या आदराने वागवले जाई. कुटुंबातील सर्वच व्यक्तींकडून मातेला मोठा आदर मिळत असे. पतीच्या तुलनेत पत्नीचे स्थान दुय्यम असले तरी वडिलाच्या तुलनेत मातेचे स्थान आदराचे असे. अनेक प्रसंगी मातेचा सल्ला महत्त्वाचा मानला जात असे. हिंदू समाजातील कोणत्याही सामाजिक कार्यक्रमात उत्सवात हिंदू पुरुष त्याच्या पत्नी शिवाय सहभागी होऊ शकत नसे. त्यामुळे स्त्रीला समाजात पुरुषाची अर्धांगिनी म्हणून स्थान प्राप्त झाले होते. यावरून पत्नीला जरी कुटुंबात दुय्यम स्थान असले तरी सामाजिक जीवनात महत्त्वाचे स्थान दिले जात असे, यात शंका नाही.

**राजकीय व सामाजिक क्षेत्रातील स्त्रिया**

मध्ययुगीन भारताच्या इतिहासात स्त्रियांवर अनेक बंधने होती तरी सुद्धा राजकारण व समाजकारणात नावलौकिक मिळवलेल्या अनेक स्त्रिया होत्या. त्यापैकी बहुतेक स्त्रिया राजघराणे व सरदार घराण्यातील होत्या. त्यांच्या स्वकर्तृत्वाने, धैर्यशील वृत्ती व समय सूचकतेनुसार संकट प्रसंगी राज्यकारभार व राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावली.

चितोडची राणी कर्णावती ही चांगली योद्धा होती. गोंडवनची राणी दुर्गावती आपल्या धैर्य व लष्करी कामासाठी प्रसिद्ध आहे. गोंडवनच्या स्वातंत्र्यासाठी ती मुघलाबरोबर शौर्याने लढली. युद्धात जखमी झाली व शत्रूच्या हाती सापडून आपली दुर्दशा होऊ नये म्हणून तिने पोटात खंजीर खुपसून आत्महत्या केली.

दक्षिण भारतात कृष्णदेवराव यांच्या दोन राण्या चिन्नादेवी अम्मा व तिरूमलादेवी अम्मा लष्करी कामगिरीत सहभागी होत असत. राणी चन्नम्मा १६७७ पासून केळदी येथे स्वतंत्र राज्यकारभार करत होती. राजारामाला तिने जिंजीपर्यंत जाण्यास मदत केली होती.

उत्तर बंगालमधील नाटोर संस्थानाची प्रमुख राणी भवानी आपल्या राज्यकारभारासाठी प्रसिद्ध आहे. तिच्या कर्तव्यदक्ष कारभारामुळे तिचे संस्थान आर्थिक दृष्ट्या समृद्ध बनले. वाराणसी येथील मंदिर व घाट तिच्या कामाची साक्ष देतात.

छत्रपती शिवाजी महाराजांची आई जिजाबाई तिच्या कर्तृत्वाबद्दल प्रसिद्ध आहे. शिवाजीला अनेक महत्त्वाच्या प्रसंगी सल्ले दिले. संभाजीची पत्नी येसूबाई औरंगजेबाच्या कैदेत दीर्घकाळ राहिली. इ. सन १७०७ मध्ये आपला मुलगा शाहू याची सुटका केली. परंतु स्वतः कारावासात एकटी राहिली. राजारामाची पत्नी ताराबाई वयाच्या २५ व्या वर्षी विधवा झाली. मात्र आपल्या वडिलांचे गुण तिच्यात होते त्यामुळे ती मराठ्यांच्या स्वराज्याचे रक्षण करणारी रणरागिणी ठरली. सरदारांच्या नेमणुका, त्यांच्या बदल्या, राज्याचा कारभार, बादशाही मुलखावरील हल्ले तिच्या तंत्राने चालू होते. पुढच्या अर्ध्या शतकात मराठ्यांची सत्ता भारतभर पसरली. त्याची बीजे ताराबाईच्या आक्रमक लष्करी हालचालीत होती.

अहिल्याबाई होळकर भारतीय राज्यकर्त्यांत प्रशासकाची भूमिका बजावणारी महत्त्वाची स्त्री मानली जाते. मल्हारराव होळकराचा मुलगा खंडेरावाची ती पत्नी होती. खंडेरावाच्या मृत्यूनंतर सती जाण्यापासून सासऱ्याने परावृत्त केले. मल्हाररावाच्या मृत्यूनंतर तिने होळकराची दौलत चांगल्या प्रकारे सांभाळली. तिने तीस वर्ष राज्य कारभार पाहिला. पुढे तुकोजी होळकरांना प्रमुख नेमले. अहिल्याबाई स्वभावाने निश्चयी, धर्मसहिष्णुवादी, दयाळू, परोपकारी होती. संकट प्रसंगी लष्करी मोहिमांची नेतृत्व ही तिने केले. धार्मिक व सामाजिक हिताच्या कामामुळे अहिल्याबाई इतिहासात अजरामर झाली. वृंदावन, वाराणसी, गया, रामेश्वरम, सोमनाथ, नाशिक इत्यादी ठिकाणी बांधलेली विश्रामगृहे, मंदिरे, विहिरी, घाट, कलकत्ता ते वाराणसी मार्ग इत्यादी समाज उपयोगी व जनहिताची कामे तिच्या मानवतावादी व कल्याणकारी विचाराची व कर्तृत्वाची साक्ष देत आहेत.

राघोबा दादाची पत्नी व दुसऱ्या बाजीरावाची आई आनंदीबाई तिच्या महत्वाकांक्षी स्वभावामुळे नारायणरावांच्या खुणाच्या कटात सहभागी झाली. काशीबाई ही पहिल्या बाजीरावाची पत्नी राजस्थानातील लष्करी मोहिमेत सामील झाली होती. मात्र मस्तानीमुळे बाजीरावाचे तिच्याकडे दुर्लक्ष झाले. बाजीरावाच्या मृत्यूनंतर भारतातील प्रमुख तिर्थस्थळाला तिने भेटी दिल्या. या स्त्रियांनी आपले कार्य सिद्धीस नेण्यासाठी त्यांच्या अंगी आत्मविश्वास, महत्वाकांक्षा, धैर्य, मुत्सद्दीपणा, बुद्धिमत्ता आणि प्रशासनासाठी आवश्यक ते गुण होते.

मध्ययुगीन कालखंडात वरील विविध चालिरीती रूढी परंपरा अस्तित्वात होत्या. त्यानुसार स्त्रियांना कुटुंबात व समाजात दुय्यम स्थान होते हे स्पष्ट होते. बालविवाह, हुंडा पद्धती, विधवा पद्धती, सती पद्धती, जोहार, वेश्या व्यवसाय, बहुपत्नीत्त्व, कन्या विक्री यातून स्त्रियांच्या खालावलेला दर्जा स्पष्ट होतो. परंतु

त्याचबरोबर काही सामाजिक व धार्मिक कार्यात त्यांचा सहभाग लक्षणीय होता. विशेषता त्यांना माता म्हणून गौरवाचे व मानाचे स्थान होते. एकंदरीत मध्ययुगीन काळात स्त्रियांचे जीवन व दर्जा खालवलेला होता.

**स्वयं अध्ययन प्रश्न २**

**अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.**

१) मुस्लिम समाजात विवाह म्हणजे दोन ............ मधील करार मानला जातो.

अ) व्यक्ती ब) कुटुंब क) परिवार ड) यापैकी नाही

२) मुस्लिम समाजात एका पुरुषाला जास्तीत जास्त ............. स्त्रियांशी विवाह करण्याची परवानगी आहे.

अ) १ ब) ४ क) ८ ड) ७

३) मुस्लिम कायद्यात घटस्फोटाचे ...................... प्रकार आहेत.

अ) ४ ब) ३ क) ५ ड) ६

४) ................. सुलतानाने पडदा पद्धती कडक केली.

अ) फिरोजशहा तुघलक ब) मोहम्मद घोरी

क) रजिया सुलतान ड) वरीलपैकी नाही

५) मुस्लिम समाजात विवाह प्रसंगी पतीने पत्नीला दिलेल्या रकमेला ................ म्हणतात.

अ) नेग ब) मेहर क) मेसर ड) वरीलपैकी नाही

६) मुस्लिम समाजात अस्थाई विवाह प्रकारास ............. म्हणतात.

अ) निकाह ब) मुताहा क) मेहेर ड) वरीलपैकी नाही

७) इला, खुला, झिहार, मुबारत हे मुस्लिम समाजातील ............. चे प्रकार आहेत.

अ) निकाह ब) घटस्फोट क) हुंड्याचे ड) वरीलपैकी नाही

८) निर्णायक तलाक होण्यापूर्वी पती-पत्नी यांनी सल्लामसलत करून तलाक संबंधी निर्णय घ्यावा या पद्धतीला ........... म्हणतात.

अ) खुला ब) इला क) इद्दत ड) मुराबत

९) ............... ने पडदा पद्धती बंद करण्याचा प्रयत्न केला.

अ) नूरजहान ब) मुमताजमहल क) रजिया सुलतान ड) शहा तुर्के

१०) ................ ही इतिहास भारताच्या दिल्लीच्या तक्तावर बसलेली पहिली स्त्री होती.

अ) नूरजहान ब) मुमताजमहल क) रजिया सुलतान ड) शहा तुर्के

११) .................. या मुघल सम्राटाने फतेपुर सिक्री येथे मुलींसाठी मदरसा सुरू केला.

अ) बाबर ब) अकबर क) शहाजहान ड) औरंगजेब

१२) ........... खेळ प्रकार राजपूत स्त्रियांमध्ये विशेष प्रसिद्ध होता.

अ) पत्त्याचा खेळ ब) चौपट क) फुगडी ड वरीलपैकी नाही

१३) .............. हिने हुमायूननामा हा ग्रंथ लिहिला.

अ) नूरजहान ब) गुलबदन बेगम क) झिनतुन्नीसा ड) वरीलपैकी नाही

१४) हुंड्याच्या प्रथेला राजस्थानमध्ये .................... म्हणतात.

अ) नेग ब) अरनामु क) हूंडा ड) वरीलपैकी सर्व

१५) दक्षिण भारतात हुंडा प्रथेला .................... म्हणतात.

अ) नेग ब) अरनामु क) हूंडा ड) वरीलपैकी सर्व

१६) विधवेची वेणी मृतभार्याला जखडणारी, जाचक होते म्हणून विधवेचे केशवपन केले पाहिजे हे ............. पुराणात सांगितले आहे.

अ) स्कंदपुराण ब) विष्णुपुराण क) गरुड पुराण ड) पद्मपुराण

१७) मृतपतीच्या बरोबर स्वतःला जाळून घेणे या सती प्रकारास .................... म्हणतात.

अ) अनुगमन ब) सर्वगमन क) सहगमन ड) वरीलपैकी नाही

१८) मृतपतीच्या एखाद्या वस्तूबरोबर स्वतःला जाळून घेणे या सतीच्या प्रकारास ............. म्हणतात.

अ) सहगमन ब) अनुगमन क) सर्वगमन ड) वरीलपैकी नाही

१९) जोहार ही प्रथा .................... स्त्रियांमध्ये प्रचलित होती.

अ) राजपूत ब) राजस्थानी क) बंगाली ड) वरील सर्व

**ब) विधान चूक की बरोबर ओळखा.**

विधान -१ सम्राट जहांगीरची पत्नी नूरजहान पडद्या शिवाय सार्वजनिक व राजकीय जीवनात सहभागी होत असे.

विधान- २ ग्रामीण भागात शेतकरी, मजूर, कारागीर या वर्गातील स्त्रिया त्यांच्या कामाच्या स्वरूपामुळे त्यांना पडदा पद्धतीचा अवलंब करणे शक्य नव्हते.

अ) पहिले विधान बरोबर दुसरे चूक            ब) पहिले विधान चूक दुसरे बरोबर

क) दोन्ही विधाने चूक            ड) दोन्ही विधाने बरोबर

विधान -१- प्रसिद्ध यात्रेकरू इब्नबतूताच्या रेहला या ग्रंथामधून सती प्रथेचे वर्णन केले आहे.

विधान -२- टॅव्हर्नियर याने शूद्र स्त्री सती जाताना पाहिल्याचे वर्णन केले आहे.

अ) पहिले विधान बरोबर दुसरे चूक            ब) पहिले विधान चूक दुसरे बरोबर

क) दोन्ही विधाने चूक            ड) दोन्ही विधाने बरोबर

क) योग्य जोड्या जुळवा.

१)

| | अ | | ब |
|---|---|---|---|
| १ | अकबराच्या दरबारातील श्रेष्ठ गायक | अ | हिंदी गीताची उत्कृष्ट गायिका |
| २ | पुरणमल याची पत्नी रत्नावली | ब | गीत रचनाकार |
| ३ | संत मीराबाई, नूरजहान बेगम, झेबुन्नीसा | क | उत्कृष्ट संगीतकार |
| ४ | मानसिंगाची पत्नी मृगनयनी | ड | तानसेन |

अ) १-ड, २-अ, ३-ब, ४-क            ब) १-ब, २-ड, ३-क, ४-अ

क) १-क, २-अ, ३-ड, ४-ब            ड) १-ड, २-ब, ३-अ, ४-क

२)

| | अ | | ब |
|---|---|---|---|
| १ | मुबारत | अ | अस्थाई विवाह |
| २ | खुला | ब | तीन महिने तलाक पूर्वी पती पत्नी एकत्र राहतात. |
| ३ | इद्दत | क | दोघांच्या संमत्तीने तलाक घेण्यात येत असे |
| ४ | मुताहा | ड | पत्नीकडून घटस्फोटासाठी मागणी होते |

अ) १-ड, २-अ, ३-ब, ४-क            ब) १-ब, २-ड, ३-क, ४-अ

क) १-क, २-ड, ३-ब, ४-अ            ड) १-ड, २-ब, ३-अ, ४-क

३)

| अब | | | |
|---|---|---|---|
| १ | रझिया सुलतान | अ | उच्च विद्याविभूषीत स्त्रिया |
| २ | नूरजहा | ब | उत्कृष्ट संगितकार |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | गुलबदन बेगम, झेबुन्नीसा बेगम | क | दिल्लीच्या तक्तावर बसलेली पहिली स्त्री |
| ४ | मृगनयनी | ड | पडद्याशिवाय राजकीय व सामाजिक जीवनात सहभागी |

अ) १-ड, २-अ, ३-ब, ४-क ब) १-ब, २-ड, ३-क, ४-अ

क) १-क, २-ड, ३-अ, ४-ब ड) १-ड, २-ब, ३-अ, ४-क

४)

| | अ | | ब |
|---|---|---|---|
| १ | झेबुन्नीसा व झिनतुन्नीसा | अ | अहमदनगरच्या दरबारातील कर्तृत्ववान स्त्री |
| २ | नूरजहाँ | ब | विजापूर दरबाराचा कारभार बरीच वर्षे हिच्या हाती होता |
| ३ | चांदबिबी | क | शाहू व यसुबाई यांच्या जीविताचे रक्षण केले |
| ४ | बडी साहिबा | ड | जहांगीरच्या काळात प्रशासनात नेतृत्व केले |

अ) १-ड , २-अ, ३-ब, ४-क ब) १- ब, २-ड, ३-क, ४-अ

क) १-क, २-ड, ३-अ, ४-ब ड) १-ड, २-ब, ३-अ, ४-क

### ३.२.३ वासाहत काळातील स्त्रियांचा रूढीगत व वैधानिक दर्जा

भारतात ब्रिटिशांच्या राजकीय सत्तास्थापने नंतरचा काळ हा भारताचा आधुनिक काळ म्हणून ओळखला जातो. अठराव्या शतकात भारतीय समाज परंपरावादी होता. तो बुद्धीप्रामान्या पासून दूर होता. समाजात शास्त्रीय दृष्टिकोन मागे पडून हानिकारक रुढीप्रियता बळवली होती. तंत्र-मंत्र, दानधर्म, जादूटोणा, शुभ-अशुभ यांना धार्मिक जीवनात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते. रूढी, कर्मकांड हाच खरा धर्म, अशी भ्रामक समजूत समाजामध्ये दृढ होती. समाजात जातीभेद, अस्पृश्यता, स्त्रियांचे दास्य, यासंबंधात अनेक अनिष्ट सामाजिक रूढी-परंपरा निर्माण झाल्या होत्या. समाज गतीहीन झाला होता. अशा समाजाला ब्रिटिशांच्या अगमनाने स्वातंत्र्य, समता, बंधुत्त्व, व्यक्तीस्वातंत्र्य, बुद्धिवाद, लोकशाही, राष्ट्रवाद इत्यादी महत्त्वपूर्ण संकल्पनांची इंग्रजी शिक्षणातून ओळख झाली. ब्रिटिशांनी भारतात जी धोरणे राबवली, सुधारणा केल्या त्याचे सामाजिक जीवनावर विशेषतः स्त्रियांवर अनेक परिणाम दिसून आले. इंग्रजी शिक्षण घेऊन शिक्षित झालेली पिढी आपला धर्म, चालिरीती, रूढी-परंपरा यांचा नावाने समाजात जो अन्याय अत्याचार चालू आहे त्याचे आकलन झाले. त्यांनी स्त्रियांची परिस्थिती बदलण्याचा निश्चय केला. वैचारिक जागृती, शिक्षणाची संधी, पाश्चात्य संस्कृतीचे ज्ञान, जुन्या रुढींचा त्याग, व्यापक दृष्टी, वृत्तपत्रे, शिक्षणाचा प्रसार इत्यादी घटकांमुळे स्त्री सुधारणांना चालना मिळाली. ब्रिटिश राजवटीच्या सुरुवातीला सत्ताधीशांनी धार्मिक व सामाजिक परंपराच्या बाबतीत हस्तक्षेप न करण्याचे धोरण स्वीकारले परंतु राज्यकर्त्यांनी न्यायिक निर्णय व कायद्याद्वारे भारतीय सामाजिक संबंधात व कुटुंबात हस्तक्षेप केला. त्यामुळे आधुनिक काळात समाज सुधारक व राज्यकर्त्यांच्या प्रयत्नाने स्त्री विषयक सुधारणा पर्वाला सुरुवात झाली. समाजसुधारकाच्या प्रयत्नातून स्त्रियांसंबंधित प्रबोधन व राज्यकर्त्याच्या माध्यमातून कायदेशीर सुधारणा सुरू झाल्या.

**सतीबंदी कायदा:**

**सती प्रथा**

सती प्रथा प्रामुख्याने बंगाल, बिहार, ओरिसा, राजपुताना व दक्षिण भारतात विजयनगर भागात प्रचलित होती. राजा राममोहन रॉय यांनी सती प्रथेविरुद्ध लोकमत जागृत करण्याचा प्रयत्न केला. लेख लिहून, पत्रके छापून या प्रथेला धर्मशास्त्राचा आधार नाही, हे त्यांनी पटवून दिले. अनेक वेळा सतीच्या स्थळी जाऊन स्त्रियांना सती जाण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्नही केला. सनातनी मंडळींनी त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली पण ते विचलित झाले नाहीत. त्यांच्या प्रयत्नांतून गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेटिंग यांनी केले ४ डिसेंबर १८२९ रोजी सतीबंदीचा कायदा करून ही प्रथा कायद्याने बंद केली. या कायद्यानुसार सती जाण्यास भाग पाडणे जिवंत जाळणे अथवा पुरणे बेकायदेशीर ठरवून मनुष्यवधाचा गुन्हा म्हणून समजून फौजदारी कोर्टातर्फे शिक्षेची तरतूद केली. या कायद्याला सनातनी लोकांनी खूप विरोध केला.

**बालहत्या/ स्त्री भृणहत्या**

मुलीचा जन्म पालकांना ओझे वाटे. तिच्या जन्माचे स्वागत केले जात नसे. ती जन्माला येताच तिला मारून टाकले जाई. ही प्रथा कच्छ, गुजरात, राजस्थान व बंगालमध्ये प्रामुख्याने होती. मुलगी जन्माला येताच तिला उपाशी ठेवून किंवा अफू देऊ मारून टाकण्यात येत असे. याबाबतचे वर्णन राजस्थानतील इतिहासकार कर्नल टॉड यांनी त्यांच्या ग्रंथात केले आहे. गुजरातमध्ये दुधाच्या उकळत्या कढईमध्ये मुलीला मारून टाकण्यात येई. त्यास 'दूध पिती पद्धती' या नावाने ओळखण्यात येत असे. या क्रूर पद्धती विरोधी भारतीय सुधारकांनी ब्रिटिशांच्या मदतीने सण १८०४ मध्ये बालहत्या बेकायदेशीर ठरवण्यात आली. असे करणाऱ्यावर सदोष मनुष्यधाचा गुन्हा दाखल करण्यात येऊ लागला. महाराष्ट्रात या प्रथेविरोधी मानवतावादी कृतिशील समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांनी १८६३ मध्ये बालहत्या प्रतिबंध गृह काढले. इसवी सन १८७० मध्ये कायदा करून जन्मलेल्या बालकाचे नोंद करणे कायदेशीर ठरवण्यात आले. त्यामुळे स्त्री अर्भकांची संख्या वाढवण्याबरोबरच मुलींच्या प्रति समाजामध्ये सकारात्मक आदरभाव वाढीस लागला.

**विधवा पूनर्विवाहास परवानगी**

समाजामध्ये बालविवाहाची प्रथा रूढ होती. मुलीचे लग्न वयाच्या नवव्या वर्षाच्या आत केले जाई. बालविवाहा सोबतच जरठविवाहाची प्रथाही होती. या प्रथेमध्ये लहान मुलीचे लग्न वयाने खुपच मोठ्या असलेल्या पुरुषासोबत लावले जायचे. या दोन्ही प्रथेमध्ये नवऱ्याचा मृत्यू झाल्यानंतर विधवा झालेल्या मुलींना पुनर्विवाहाचा अधिकार नव्हता. तिला समाजात अपशकुनी मानले जायचे. तिचे केशवपन केले जायचे. अशा विधवांसाठी वसाहत कालखंडामध्ये ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी वैदिक साहित्याचा आधार घेऊन विधवा विवाहास मान्यता होती, हे सिद्ध केले. एक हजार सह्यांचा विनंती अर्ज भारत सरकारकडे सादर केला. १८५६ साली लॉर्ड डलहौसीने विधवांच्या पुनर्विवाहाला मान्यता दिली. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी विधवांच्या केशवपना विरूद्ध न्हावी समाजामध्ये जागृती घडवून आणून विधवांचे केशवपन करणार नाही यासाठी न्हाव्यांचा संप घडवून आणला. धो. के. कर्वे, वीरलिंगम पंतलु यांनी आप-

आपल्या राज्यामध्ये पुनर्विवाहाच्या बाबतीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यामुळे उत्तरोत्तर भारतभर विधवा विवाहासंबंधित सकारात्मक वातावरण निर्माण होण्यास मदत झाली.

**बाल विवाहावर बंदी:**

१८७२ साली केशव चंद्रसेन यांच्या प्रयत्नामुळे नागरी कायदा पास झाला. त्यानुसार मुलीचे वय १४ व मुलाचे १८ वर्षे ठरवण्यात आले. १८८१ साली बेहरामजी मलबारी यांच्या प्रयत्नामुळे संमती वयाचा कायदा पास करण्यात आला. त्यानुसार १२ वर्षांखालील मुलीचा विवाह बेकायदेशीर ठरवण्यात आला. त्यांच्या विधेयकाला कलकत्त्यातील स्त्री डॉक्टरांनी पाठिंबा दिला होता. १८९० साली १६०० महिलांनी कायदेशीर सुधारणा करण्याची मागणी करणारे विनंती पत्र राणी व्हिक्टोरियाला पाठवविले. महाराष्ट्रात प्रामुख्याने मुंबईत बालविवाह विरोधी मोहिमेला सुरुवात झाली होती. गुजरातमध्ये १९२९ च्या बालविवाह प्रतिबंधक कायद्यानुसार याबाबत होणारे सर्व गुन्हे दंडपात्र बनवावेत यासाठी प्रयत्न झाले. १९२९ साली शारदा कायदा पास करण्यात आला. त्यानुसार मुलीचे विवाहाची वयोमर्यादा १४ वर्षापर्यंत वाढविण्यात आली. १९२३ मध्ये स्पेशल मॅरेज ॲक्टनुसार आंतरजातीय विवाह करण्यास परवानगी देण्यात आली.

**वारसा हक्क**

१९ व्या शतकापर्यंत स्त्रीला वारसा हक्काने पित्याच्या व पतीच्या संपत्तीत कोणताही वाटा नव्हता. तिचा आणि संपत्तीचा काडीमात्र संबंध नव्हता. किंबहुना स्त्रीधनावर सुद्धा तिची मालकी नाममात्र होती. किंवा एकत्रित कुटुंब पद्धतीमध्ये त्या धनाचा संचय विनियोग अन्यत्र केला जात असे. आधुनिक काळात ब्रिटिशांनी  स्त्रियांच्या वारसा हक्काबद्दल कायदे पास केले.

पहिला कायदा १९२९ साली 'हिंदू लॉ ऑफ इन्हेरिटन्स ॲक्ट' या नावाने मंजूर करण्यात आला. त्यानुसार कन्या वारसाने मिळालेली मिळकत हे स्त्रीचे संपूर्ण मालकीचे धन असते, हा महाराष्ट्रात प्रचलित असलेला नियम ज्या ज्या ठिकाणी मिताक्षरेचा अंमल चालू आहे तेथे लागू करण्यात आला. भारत सरकारने तत्पूर्वी १८६९ साली एक कायदा करून पतीने आपली पत्नी व मुले यांची गरज भागवण्यासाठी पोटगीचा अधिकार दिला. १९३७ साली 'हिंदू विमेन्स राईट टू प्रॉपर्टी ॲक्ट' कायदा पास केला. त्यानुसार स्त्रियांच्या मिळकतीच्या हक्कात वाढ करण्यात आली. विधवेला पतीच्या मृत्यूनंतर मालमत्तेत मुलाच्या बरोबरीने हिस्सा मिळेल हे स्पष्ट करण्यात आले. १९५६ चा हिंदू वारसा हक्क कायदा लागू होण्यापूर्वी हिंदू कायद्यात स्त्रीधनाला मान्यता होती. मात्र स्त्रीधन कोणते व कसे या बाबत संधिग्धता होती. स्वसंपादित मालमत्तेवर विधवा व अविवाहित स्त्रीचा हक्क होता. मात्र १९३७ च्या कायद्यात विवाहित स्त्रीला हा हक्क नव्हता. १९५६ च्या या कायद्याने भाऊ-बहीण मुलगा मुलगी यांना समान वारसा हक्क मिळाला.

**घटस्फोट :**

विवाह एक धार्मिक संस्कार मानला जात होता. उच्चवर्णीय हिंदू जातीत विवाह हे जन्मोजन्मीचे बंधन मानले जात होते. हिंदू विवाह हे भग्न होऊ शकत नाहीत, अशी सर्वसामान्य समजूत होती. मात्र हिंदू

समाजातील आठरापगड जातीत मात्र काडीमोड (घटस्फोट) घेतला जात असे. घटस्फोट परस्पर संमतीने घेता येत होता. पतीकडून घटस्फोट मिळवणे व न्यायालयातून घटस्फोट मिळवणे असे घटस्फोटाचे प्रकार त्या काळात रूढ होते. धार्मिक सामाजिक रूढीपरंपरेनुसार घटस्फोटानंतर पुनर्विवाह करण्यासाठी विशिष्ट काळ थांबण्याची गरज नव्हती.

१९३५ नंतर मुस्लिम समाजाच्या दृष्टीने दोन महत्त्वाची कायदे पास करण्यात आले. १९३७ च्या शरियतच्या अंमलबजावणीचा कायदा व १९३९ चा मुस्लिम घटस्फोट कायदा हे दोन कायदे पास झाले. या कायद्यामुळे परंपरागत कायद्यापेक्षा शररियत लागू केल्याने स्त्रियांचा दर्जा उंचावला. सर्वात महत्त्वाचे म्हणजे १९३९ च्या कायद्याने स्त्रियांना पतीला घटस्फोट देण्याचा अधिकार मिळाला. तत्पूर्वी मुस्लिम स्त्री घटस्फोट देऊ शकत नव्हती, तिला पतीकडून घटस्फोट मिळत असे. १८६९ चा घटस्फोट कायदा ख्रिश्चन धर्माशीसुद्धा संबंधित आहे. पत्नीने व्यभिचार  केला तर तिला घटस्फोट मिळतो. मात्र पतीने व्यभिचार केला तर त्याला घटस्फोट मिळत नाही. त्याशिवाय त्याने इतरही गुन्हे करणे आवश्यक आहे. या कायद्याने स्त्री व पुरुष यांच्यात पक्षपाती भेदभाव केला आहे. १९३६ च्या पारशी विवाह व घटस्फोट कायद्याने इतर कायद्यापेक्षा एका वेगळ्या परिस्थितीत पत्नीला घटस्फोटाचा हक्क प्राप्त करून दिला. ती परिस्थिती म्हणजे पतीने पत्नीला वेश्या व्यवसाय करण्याची जबरदस्ती केली असेल तर घटस्फोट मिळतो. यहुदी लोकांना सनदी कायदा लागू होत नाही पण व्यभिचार व निर्दयी वागणूक या दोन कारणामुळे न्यायालयातून घटस्फोट मिळवता येतो.

**स्त्री शिक्षणाचा उदय – स्त्री शिक्षणासाठीचे प्रयत्न :**

**भारतीय समाजात स्त्रियांना शिक्षण**

भारतीय समाजात स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. त्यांना शिक्षण देणे म्हणजे देव, धर्म व समाज यांच्याविरुद्ध वर्तन करणे होय! स्त्रीला शिक्षण दिले तर स्त्री कुमार्गाला लागेल आणि घरच्या सुखात अडसर निर्माण होईल. मुलींनी शिक्षण घेतले तर तिला अकाली वैधव्य येईल, अशा समजुती समाजामध्ये रूढ होत्या. स्त्रियांचे शिक्षण म्हणजे घरात आई किंवा सासू अशा वडीलधाऱ्या स्त्रियांच्या हाताखाली काम करताना घरकाम, कौटुंबिक रीतिरिवाज व वृत्तवैकले यांची माहिती त्यांना होई. वरच्या वर्गातील स्त्रियांना मोठ्या झाल्यावर पुराणे, किर्तने व प्रवचने करून आपल्या धर्माचे व धर्मग्रंथाचे श्रवणभक्तीने साध्य होईल ते ज्ञान व त्यातून जे अक्षर ओळख होईल तेवढे शिक्षण स्त्रियांच्या वाट्याला आले होते. आज आपण शालेय शिक्षण म्हणतो, सहशिक्षण, मुलामुलींसाठी एक अभ्यासक्रमाचे शिक्षण म्हणतो त्याचा त्यावेळी गंधही नव्हता.

ज्याला शिक्षण म्हणतात त्या शिक्षणाला मिशनरी संस्थाकडून स्त्री शिक्षणाचा प्रारंभ झाला. ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या प्रयत्नांनी मुलींसाठी सार्वजनिक शाळा सुरू झाल्या. १९२७ मध्ये मुलींसाठी १२ शाळा चालवल्या जात होत्या. ब्राह्मो समाजाने बंगालमध्ये स्त्री शिक्षणासाठी मोठी कामगिरी पार पाडली. महात्मा फुले यांनी मुलींसाठी पुणे येथे १८४८ साली स्वतंत्र शाळा सुरू केली. या शाळेत शिकवण्यासाठी त्यांनी सावित्रीबाई या स्वत:च्या पत्नीस शिकवून तयार केले. लोकमताची पर्वा न करता छळ सोसून त्यांनी मुलींना

शिकवले. त्याचबरोबर वुडचा खलिता (Sir Charles Wood – Wood's Dispatch of 1854) व त्यानंतर सरकारी पातळीवरून स्त्री शिक्षणाचा मोठा पाठपुरावा सुरू झाला. पंडिता रमाबाई, धो.के. कर्वे, पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यासारख्या समाजसुधारकांनी स्त्री शिक्षणाशिवाय स्त्रियांची समस्या सुटणार नाही हे ओळखून अनेक संस्थांची स्थापना केली. त्यामुळे स्त्री शिक्षणाचा विकास घडून आला.

एकंदरीत वसाहातिक काळात आधुनिक युगाच्या प्रबोधनाच्या मुळाशी स्त्री प्रश्नांची चर्चा केली गेली. त्या प्रश्नांवर चळवळी उभ्या केल्या केल्या. त्या चळवळीतून स्त्रियांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी ब्रिटिश सरकारवर कायदे करण्याचा दबाव चळवळीने आणला. त्यानुसार सती बंदीचा कायदा १८२९, विधवा पुनर्विवाहाला आनुमती देणारा कायदा १८५६, स्पेशल मॅरेज अॅक्ट १८७२ (मी हिंदू नाही असे घोषित करून अंतरजातीय विवाह करू शकत असत.) या कायद्यात पुढे बदल होऊन अंतरजातीय विवाहास मान्यता देणारा कायदा १९२३, बालविवाह प्रतिबंधक कायदा १९२१ (मुलीचे विवाहयोग्य वय १४ करण्यात आले) हिंदू विमेन्स राईट टु प्रॉपर्टी अॅक्ट १९३७ नुसार नवऱ्याच्या इस्टेटित विधवेचा अंशत: हक्क मान्य करण्यात आला. असे विविध कायदे करून स्त्रियांची सामाजिक परिस्थिती उंचावण्याचा प्रयत्न या काळात झाला. तसेच, स्त्री शिक्षणाची सुरूवात या काळात ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या प्रयत्नांतून सुरू झाली. मिशनऱ्यांप्रमाणे अनेक भारतीय समाजसुधारकाच्या प्रयत्नाने स्त्री शिक्षणास चालना मिळाली. स्त्री प्रश्नांवर त्यांनी प्रबोधन केले. सनातनी लोकांच्या बहिष्काराचा सामना केला. त्यांचा शिव्या-शाप झेलला पण स्त्रियांच्या प्रश्नांवर त्यांनी लढा दिला. राजाराम मोहन रॉय, पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर, स्वामी विवेकानंद, देवेंद्रनाथ टागोर, केशवचंद्र सेन, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई हे व यासारख्या अनेक विचारवंत व कार्यकर्त्यांच्या अथक प्रयत्नांतून वसाहत कालात स्त्रियांच्या प्रश्नांवर चर्चा झाली. ते प्रश्न सोडविण्यासाठी शिक्षण, कायदा व प्रबोधनाचा मार्ग अवलंबिला गेला. या प्रयत्नांतून स्त्रियांच्या दर्जा सुधारण्यास मदत झाली.

**स्वयं अध्ययन प्रश्न ३**

**अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.**

१) ........... गव्हर्नर जनरलने सती बंदीचा कायदा केला.

अ) लॉर्ड विल्यम बेंटिंग — ब) लॉर्ड डलहौसी

क) लॉर्ड कॉर्नवॉलीस — ड) वरील पैकी नाही

२) सती बंदीचा कायदा ........... साली झाला.

अ) ३ डिसेंबर १८२० — ब) ४ डिसेंबर १८२९

क) १५ डिसेंबर १८२९ — ड) १० डिसेंबर १८२९

३) दुधाच्या उकळत्या कढईत मुलीला टाकून मारण्याच्या पद्धतीला............ म्हटले जाई

अ) दूधन हाती — ब) दूध खेलती — क) दूध पिती — ड) यापैकी नाही

४) संमती वयाचा कायदा ......... यांच्या प्रयत्नाने पास करण्यात आला.

अ) बेहरामजी मलबारी ब) कर्वे

क) महात्मा फुले ड) आगरकर

५) १९२९ चा हिंदू लॉ ऑफ इनहेरिटन्स ॲक्ट ................ शी संबंधित आहे.

अ) विवाह ब) घटस्फोट क) बालविवाह ड) वारसा हक्क

६) .............. कायद्या नूसार अंतरजातीय विवाहाला परवानगी मिळाली.

अ) हिंदू लॉ ऑफ इन्हेरिटन्स ॲक्ट ब) स्पेशल मॅरेज ॲक्ट

क) एज ऑफ कन्सेंट बील ड) वरील पैकी नाही.

७) १९३७ चा शरीयतच्या अंमलबजावणीचा कायदा मुस्लिम समाजाच्या दृष्टीने .......... शी संबंधित आहे.

अ) विवाह ब) घटस्फोट क) बहुपत्नीत्त्व ड) वारसा हक्क

८) महाराष्ट्रात १८६३ मध्ये ........... यांनी बालहत्या प्रतिबंधक गृह काढले.

अ) महात्मा फुले ब) लोकमान्य टिळक क) रानडे ड) वरीलपैकी नाही

९) ........... यांनी विधवांच्या पुनर्विवाहाला मान्यता दिली.

अ) लॉर्ड बेंटिंग ब) लॉर्ड डलहौसी क) लॉर्ड मेकॉलो ड) वरीलपैकी नाही

१०) विधवांच्या केशवपनाविरुद्ध न्हाव्यांचा संप ........... यांनी घडवून आणला.

अ) पंडिता रमाबाई ब) रमाबाई रानडे

क) महात्मा फुले व सावित्रीबाई फुले ड) वरीलपैकी नाही

११) पुणे येथे मुलींसाठी पहिली शाळा ........... यांनी सुरू केली.

अ) कर्वे ब) पंडिता रमाबाई क) महात्मा फुले ड) वरीलपैकी नाही

ब) विधान चूक की बरोबर ओळखा.

१)

विधान १ अठराव्या शतकात भारतीय समाज परंपरावादी होता.

विधान २ भारतीय समाजाला ब्रिटिशांच्या अगमनाने स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, व्यक्ती स्वातंत्र्य, बुद्धिवाद, लोकशाही, राष्ट्रवाद, इत्यादी महत्त्वपूर्ण संकल्पनांची इंग्रजी शिक्षणातून ओळख झाली.

अ) पहिले विधान बरोबर दुसरे चूक ब) पहिले विधान चूक दुसरे बरोबर

क) दोन्ही विधाने चूक ड) दोन्ही विधाने बरोबर

२)

विधान १ सती प्रथा प्रामुख्याने बंगाल, बिहार, ओरिसा, राजपुताना व दक्षिण भारतात विजयनगर भागात प्रचलित नव्हती.

विधान २ राजा राममोहन रॉय यांच्या प्रयत्नातून सती प्रथा बंदीचा करण्यात आला.

अ) पहिले विधान बरोबर दुसरे चूक ब) पहिले विधान चूक दुसरे बरोबर

क) दोन्ही विधाने चूक ड) दोन्ही विधाने बरोबर

क) योग्य जोड्या जुळवा.

१)

| | अ | | ब |
|---|---|---|---|
| १ | १८२९ | अ | विधवा विवाह कायदेशीर करण्यात आला. |
| २ | १८५६ | ब | अंतरजातीय विवाहास मान्यता देण्यात आली |
| ३ | १८९१ | क | सती बंदीचा कायदा |
| ४ | १९२३ | ड | संमती वयाचा कायदा पास करण्यात आला |

अ) १-ड, २-अ, ३-ब, ४-क ब) १-ब, २-ड, ३-क, ४-अ

क) १-क, २-अ, ३-ड, ४-ब ड) १-ड, २-ब, ३-अ, ४-क

२)

| अब | | | |
|---|---|---|---|
| १ | राजा राममोहन रॉय | अ | मुलीच्या विवाहाच्या वयाची मर्यादा १४ वर्षाची झाली. |
| २ | पंडीत ईश्वरचंद्र विद्यासागर | ब | बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना |
| ३ | महात्मा फुले | क | विधवाविवाहास मान्यता देण्यात येणारा कायदा |
| ४ | हरविलास शारदा | ड | सती बंदीचा कायदा |

अ) १-ड, २-क, ३-ब, ४-अ ब) १-ब, २-ड, ३-क, ४-अ

क) १-क, २-अ, ३-ड, ४-ब ड) १-ड, २-ब, ३-अ, ४-क

### ३.२.४ आदिवासी स्त्रियांचा रुढीगत  व वैधानिक दर्जा

भारतीय समाजात अनेक प्रकारच्या आदिवासी जमाती आहेत. भारताच्या विविध भागात वेगवेगळ्या आदिवासी जमातीचे वास्तव्य आहे. प्रा. मेमोरिया यांनी म्हटल्याप्रमाणे भारत हा जगातील अन्य देशांपेक्षा आधिक अदिवासींची संख्या असलेला देश आहे. नागालँड, मेघालय, मिझोराम, अरुणाचल प्रदेश या राज्यातील बहुसंख्य लोक आदिवासी आहेत. ओरिसा, मध्य प्रदेश, बिहार, आसाम, उत्तर प्रदेश येथे आदिवासींची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. मध्य प्रदेशात सर्वात जास्त आदिवासी राहतात.

भारतात ४२७ अनुसूचित जमाती असून १९९१ च्या जनगणनेनुसार त्यांची लोकसंख्या ७.८% आहे. या देशातील मूळनिवासी म्हणून डॉ. इक्विन तसेच ठक्कर बाप्पा यांनी त्यांना आदिवासी म्हटले आहे. तर डॉ. धुर्ये त्यांचा उल्लेख मागासलेले हिंदू असा करतात. तसेच ते वनात राहतात म्हणून वन्यजाती असेही म्हटले जाते.

भारतीय संविधानातील कलम ३४१ आणि ३४२ मध्ये केलेल्या तरतुदी प्रमाणे तयार केलेल्या सूचित सामाविष्ट करण्यात आलेल्या या जनसमुहांना अनुसूचित जनजाती म्हटले जाते. हा पृथक आणि अंतर्मुख जनसमूह आहे. उत्पादन आणि उपभोगाच्या दृष्टीने समरूप असतात. आर्थिक बाबतीत मागासलेल्या या समूहातील लोकांचे इतरांकडून शोषण केले जाते. भाषा, वंश, धर्म, जीवनशैलीचा विचार करता त्यांच्यात इतरांपेक्षा वेगळेपण दिसून येते.

आदिवासी समाजाची व्याख्या डॉ. डी. एन. मुजुमदार या मानवशास्त्रज्ञाने केली आहे. ती पुढील प्रमाणे ''आदिवासी समाज म्हणजे समान नाव धारण करणाऱ्या, एका विशिष्ट भू-प्रदेशावर निवास करणाऱ्या, एकाच प्रकारची भाषा बोलणाऱ्या, विवाह व्यवसाय या बाबतीत समान निषेध नियमांचे पालन करणाऱ्या व निश्चित अशा काही मूल्यांची, विचारांची जोपासना करणाऱ्या कुटुंबाचा समूह होय!'' या वरून आदिवासी समाजाची कल्पना करता येते. या विविध आदिवासी जमातीतील स्त्रियांचा अभ्यास करण्यासाठी अमेरिकेतील प्रसिद्ध सामाजिक मानसशास्त्रज्ञ रॉबर्ट लोवी यांनी आदिवासी समाजात स्त्रियांचा दर्जा ठरवताना काही बाबींचा विचार करावा, असे म्हटले आहे. त्या बाबी पुढील प्रमाणे.

१) प्रत्यक्ष वागणूक (Actual treatment)

२) कायदेशीर दर्जा (legal status)

३) सार्वजनिक कामाची संधी (opportunity of public activity)

४) कामाचे स्वरूप व व्याप्ती (character and extendt of work)

तेव्हा स्त्रियांच्या दर्जा ठरवताना प्रत्येक आदिवासी जमातीचा स्वतंत्रपणे विचार केला पाहिजे. परंतु सर्वसाधारणपणे आदिवासी समाजातील स्त्रियांवरील दर्जावर पुढील बाबींचा परिणाम होतो.

**मातृवंशपरंपरा** (System of Matrilineal Decent)

आसामच्या डोंगराळ भागात राहणारी खासी जमात व मन्नर या आदिवासी जमाती मातृवंश परंपरेचा उत्कृष्ट नमुना आहेत. या जमातीत मालमत्तेचा उत्तर अधिकार आईकडून मुलीला दिला जातो. पुरुषाला आपली मिळकत आईकडे व लग्नानंतर बायकोच्या हवाली करावी लागते. खाशी जमातीत लोक स्त्री पूर्वजापासून आपल्या वंशपरंपरेची गणना करतात व त्यांना देवताप्रमाणे मान देतात. असे असले तरी स्त्रियांच्या बाजूची सर्व अशी परिस्थिती असली तरी समाजात व कुटुंबात स्त्रीची निरंकुश व सर्वोच्च सत्ता होती असे नाही. या पद्धतीत स्त्रियांना कुटुंबात मानाचे स्थान मिळत असे. तसेच पुरुषांना आपल्या वैयक्तिक नावापुढे आपल्या मातेचे नाव लावावे लागते. शिवाय राजकीय व सार्वजनिक स्वरूपाच्या कामांमध्ये स्त्रियांना मानाचे स्थान मिळते. कौटुंबिक बाबतीत तर स्त्रियांच्या मताला प्राधान्य दिले जाते.

**मातृस्थानीय निवास पद्धती (Matrilocal Residence)**

लग्नानंतर पती-पत्नींनी कोठे निवास करावा यासंबंधी काही आदिवासी समाजात निश्चित स्वरूपाचे नियम प्रचलित आहेत. या निवास पद्धतीच्या प्रकारामुळे स्त्रियांच्या दर्जावर काही स्वरूपात फरक पडत असतो. या पद्धतीत लग्नानंतर नवऱ्याला बायकोच्या घरी जाऊन कायमचे राहावे लागते. या पद्धतीमुळे स्त्रीला आपल्या रक्त संबंधित अप्तस्वकीयांमध्ये राहावयास मिळते. त्यामुळे तिला वाईट वागणूक मिळत नाही. सारखा जाच केला जाण्याची शक्यता फार कमी असते. तेव्हा या पद्धतीत सहाजिकच स्त्रियांना वरचे स्थान मिळण्यास मदत होते. तसेच पुरुषांच्या बहुपत्नीकत्वाच्या चालीला या पद्धतीत पाय बंद बसतो. त्यामुळे स्त्रीला सवत येण्याची शक्यता कमी असल्याने स्त्रीचा दर्जा उन्नत होण्यास मदत होते. परंतु कुटुंबातील सर्व जबाबदारी स्त्रीचा भाऊ पाहत असतो. प्रत्यक्ष व्यवहारातील जबाबदाऱ्या पुरुषाला सांभाळायला लागतात ही पद्धत ईशान्य भारतात गारो, केरळमध्ये मथुवन व मन्नर, इत्यादी आदिवासी समाजात प्रचलित आहे.

**पितृस्थानीय निवास पद्धत (Patrilocal Residences)**

या पद्धतीत पुरुषाला प्रभावी स्थान असते. या प्रकारात स्त्रीला नवऱ्याच्या घरी जाऊन राहावे लागते. त्यामुळे चांगली वागणूक मिळेल याची खात्री देता येत नाही. पुरुषाच्या हाती सर्व सत्ता एकवटलेली असल्यामुळे स्त्रियांचा दर्जा घसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र मध्य भारतातील गोंड जमातीत स्त्रियांना चांगल्या प्रकारची वागणूक देण्यात येते. तसेच थारू जमातीतील स्त्रिया 'चेटूक' क्रियेचा वापर करून आपले वर्चस्व गाजवतात.

**आर्थिक सहयोग :**

समाजाचे आर्थिक जीवन सुकर होण्यासाठी स्त्रिया कितपत मदत करतात यावर समाजातील स्त्रियांचा दर्जा पुष्कळ अंशी अवलंबून असतो. आदिवासी समाजामध्ये उत्पादनाच्या प्रकारावर स्त्रियांचे नियंत्रण काही प्रमाणात असल्याचे आढळून आले आहे. खारिया, चेंचू, कादर या आदिवासी समाजात अन्नसंचय यावर

गुजरान करणारा समाज आहे. या समाजात स्त्रिया पुरुषाच्या बरोबनेने काम करू शकतात. त्यामुळे अशा समाजातून पुरुष व स्त्रीला समान वागणूक दिली जाते. शिकार हे उपजीविकेच्या साधन असणाऱ्या आदिवासी समाजात ही परिस्थिती आढळत नाही. या समाजात पुरुष शिकार करतात. या आर्थिक अवस्थेमुळे कोळी या आदिवासी जातीतील पुरुषाला मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. पशुपालनाच्या आर्थिक व्यवस्थेत आदिवासी स्त्रियांची परिस्थिती थोडी वेगळी आहे. या कामात आपले घरकाम सांभाळून स्त्रिया हातभार लावू शकतात. 'तोडा'सारख्या आदिवासी समाजात काही प्रमाणात स्त्रियांची स्थिती चांगली आहे. शेती करणाऱ्या आदिवासी समाजात काही प्रमाणात स्त्रियांची स्थिती सुद्धा चांगली आहे. पण शेतीच्या कामाची वाटणी स्त्रिया व पुरुष अशी वेगवेगळी केलेली असते.

**विवाहासंबंधीचा दर्जा :**

आदिवासी समाजामध्ये स्त्री एक मालमत्तेचा प्रकार म्हणून गणली जाते. मुली घरकाम, आर्थिक क्रियांमध्ये सहभाग घेत असल्यामुळे मुलीच्या लग्नानंतर पित्याला तिच्या श्रमशक्तीला मुकावे लागते. त्यामुळे लग्न करण्यापूर्वी वराला वधूपित्याल्या वधूमूल्य देऊन नुकसान भरपाई द्यावी लागे. नागा जातीत मुलगी जन्माला आल्याबरोबर तिची हत्या करण्याचा प्रघात आहे. तर तोडा जातीतील स्त्रीला एकापेक्षा अधिक पुरुषाशी लग्न करता येतात. या परस्पर विरोधी पद्धतीमुळे स्त्रियांच्या आरोग्य व जीवनावर खूप वाईट परिणाम पडतो. बहुपत्नीत्वाची प्रथा महाराष्ट्रातील भिल्ल, ठाकूर, गोंड, केरळमधील पिलियन व उरली यांच्यामध्ये असल्यामुळे या जातीतील स्त्रियांचा दर्जा घसरल्याचे दिसून येते.

**कायदेविषयक दर्जा**

आदिवासी स्त्री इतर स्त्रीच्या मानाने थोडी मुक्त आहे. आदिवासी समाजामध्ये तिला घटस्फोट घेण्याचा हक्क दिला असून गारो व खासी या आदिवासी जातीमध्ये स्त्रीवर कोणी बलात्कार केल्यास पुरुषाला त्या स्त्रीबरोबर विवाह करावा लागतो व नकार दिल्यास दंड भरावा लागतो. गोंड जमातीत वैवाहिक निष्ठेचा अभाव, वंध्यत्व, घरकामात दुर्लक्ष, भांडखोर वृत्ती या कारणावरून पती-पत्नीला घटस्फोट देता येतो. पत्नीने पतीला घटस्फोट दिल्यास तिला पतीने दिलेले वधू मूल्य परत करावे लागते.

ब्रिटिशांच्या आगमनापासून प्रगत समाजाशी आदिवासी समाजाचा संपर्क वाढला. त्यामुळे आदिवासी समाजात विविध परिवर्तन होत आहे. भाषा, पोशाख व कला या क्षेत्रात बदलामुळे त्यांच्या संस्कृतीचे अस्तित्व नष्ट होण्याचा धोका निर्माण झालेला आहे. स्त्रीपुरुष संबंधातील मोकळेपणावर बंधने आली आहेत. बालहत्या बंदी कायद्यामुळे मुलींना मारून टाकण्यास बंदी घातल्याने बहुपती विवाहाचे प्रमाण कमी झाल्याचे तोडा जातीतील उदाहरणावरून दिसते.

मातृसत्ताक पद्धतीमध्ये जीवन व्यतीत करणाऱ्या आदिवासी जमातीतील स्त्रियांचा दर्जा वरचा आहे. त्यांना माता म्हणून स्त्रीला वरचा दर्जा दिला जातो. आदिवासी स्रिया आर्थिक जीवनाला मोठ्या प्रमाणात हातभार लावत असल्याने आर्थिक सहयोगात स्त्रीला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न ४**

अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.

१) १९९१ च्या जनगणनेनुसार आदिवासीची लोकसंख्या ............ आहे.

अ) ७.८% ब) ८.७% क) ६.७ % ड) ७.२ %

२) या देशातील आदिवासी यांना ............ यांनी मूळनिवासी म्हटले आहे.

अ) डॉ. इक्विन व ठक्कर बाप्पा ब) डॉ. घुर्ये

क) इरावती कर्वे ड) वरील सर्व

३) 'मागासलेला हिंदू' असा आदिवासीचा उल्लेख ............ यांनी केला आहे.

अ) डॉ. इक्विन व ठक्कर बाप्पा ब) डॉ. घुर्ये

क) इरावती कर्वे ड) वरील सर्व

४) आसामच्या डोंगराळ भागात राहणारी ........... आदिवासी जमाती मातृवंशीय आहेत.

अ) खासी जमात व मन्नर ब) पनिया

क) गोंड ड) वरील सर्व

५) मातृवंश परंपरेत संपत्तीची मालकी माते नंतर ............... कडे जाते.

अ) मुलाकडे ब) नवऱ्याकडे क) मुलीकडे ड) वरील सर्वाकडे

६) ....... या निवास पद्धतीत लग्नानंतर नवऱ्याला बायकोच्या घरी जाऊन कायमचे राहावे लागते.

अ) पितृस्थानिय निवास पद्धती ब) मातृस्थानिय निवासपद्धती

क) संयुक्त कुटुंब पद्धती क) वरील पैकी नाही.

७) ...........जमातीतील स्त्रिया 'चेटूक' क्रियेचा वापर करून आपले वर्चस्व गाजवतात.

अ) गोंड ब) खासी क) कादर ड) थारू

८) ......... आदिवासी जामातीत मुलगी जन्माला आल्याबरोबर तिची हत्या करण्याचा प्रघात आहे.

अ) गोंड ब) नागा क) कादर ड) थारू

९) ............ या आदिवासी जामातीतील स्त्रीला एकापेक्षा अधिक पुरुषाशी लग्न करता येतात.

अ) गोंड ब) खासी क) तोडा ड) थारू

१०) .......... या आदिवासी जातीमध्ये स्त्रीवर कोणी बलात्कार केल्यास पुरुषाला त्या स्त्रीबरोबर विवाह करावा लागतो.

अ) गारो व खासी ब) गोंड व तोडा क) कादर व नागा ड) वरील पैकी नाही.

ब) विधान चूक की बरोबर ओळखा.

विधान १ - पितृस्थानीय निवास या पद्धतीत पुरुषाला प्रभावी स्थान असते.

विधान २- मातृस्थानीय निवास या पद्धतीत लग्नानंतर नवऱ्याला बायकोच्या घरी जाऊन कायमचे राहावे लागते.

अ) पहिले विधान बरोबर दुसरे चूक

ब) पहिले विधान चूक दुसरे बरोबर

क) दोन्ही विधाने चूक

ड) दोन्ही विधाने बरोबर

क) योग्य जोड्या जुळवा.

१)

| | अ | | ब |
|---|---|---|---|
| १ | मातृवंश परंपरा | अ | चेटुक क्रियेचा वापर करतात |
| २ | थारू जमातीतिल स्त्रिया | ब | खासी व मन्नर |
| ३ | तोडा | क | खरिया, चेंचू, कादर |
| ४ | अन्न संचयनावर गुजराण करणारा आदिवासी समाज | ड | बहुपतित्वाची पद्धती |

अ) १-ड, २-अ, ३-ब, ४-क

ब) १ ब, २-अ, ३- ड, ४-क

क) १-क, २-ड, ३-अ, ४-ब

ड) १-ड, २-ब, ३-अ, ४-क

२)

| | अ | | ब |
|---|---|---|---|
| १ | कोळी जमात | अ | मुलगी जन्माला आल्यावर तिची हत्या करण्याची पद्धती |
| २ | नागा जमात | ब | स्त्रीवर बलात्कार केल्यावर तिच्याशी विवाह करावा लागतो. |
| ३ | गारो, खासी | क | बालहत्या प्रतिबंध कायद्यामुळे बहुपती विवाहाचे प्रमाण कमी झाले. |
| ४ | तोडा | ड | पुरूषाला मानाचे स्थान |

अ) १-ड, २-अ, ३-ब, ४-क

ब) १ ब, २-अ, ३- ड, ४-क

क) १-क, २-ड, ३-अ, ४-ब

ड) १-ड, २-ब, ३-अ, ४-क

## ३.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१. ऋत्विज – यजमानासाठी यज्ञाचे पौरोहित्य करणाऱ्या ब्राह्मणास ऋत्विज म्हणतात.

२. अनुगमन – विधवा स्त्री मृत पतीच्या शवाबरोबर जळून मरणे.

३. जंगम व स्थावर – हे दोन्ही शब्द मालमत्तेशी संबंधित आहेत. जंगम मालमत्ता म्हणजे चल संपत्ती जसे की, दाग-दागिने, रुपये पैसे व स्थावर मालमत्ता म्हणजे अचल संपत्ती जसे की, जमीन, घर.

४. मुंज – उपनयन संस्कार (वेद अध्ययन, शिक्षणाची सुरूवात)

५. सद्योवधु – विवाहापर्यंत शिक्षण घेणारी स्त्री

६. ब्रह्मवादीनी – आयुष्यभर धर्मशास्त्र व तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणारी अविवाहित स्त्री.

७. दर्जा – स्थिती

८. वारसा हक्क – वंशपरंपरागत मिळणारा हक्क

९. हरेम – जनानखाना (जिथे राजाच्या मालकीच्या स्त्रिया राहतात व त्या ठिकाणी राजा शिवाय इतरांना जाण्यास प्रतिबंध असतो.)

## ३.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्वयं अध्ययन प्रश्न १

अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.

| | | | |
|---|---|---|---|
| १) संयुक्तरीत्या पती-पत्नी | २) ८ | ३) दैव विवाह | ४) प्रजापात्य विवाह |
| ५) वरील सर्व | ६) स्कंद पुराण | ७) हरित | ८) ६ |
| ९) परिणाह्य | १०) दाय | | |

ब) विधान चूक की बरोबर ओळखा.

ड) दोन्ही विधाने बरोबर

क) योग्य जोड्या जुळवा.

१) १-क, २-अ, ३-ड, ४-ब

स्वयं अध्ययन प्रश्न २

अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.

| | | | |
|---|---|---|---|
| १) व्यक्ती | २) ४ | ३) ४ | ४) फिरोजशहा तुघलक |
| ५) मेहर | ६) मुताहा | ७) घटस्फोट | ८) इद्दत |
| ९) रझिया सुलतान | १०) रझिया सुलतान | ११) अकबर | १२) चौपट |
| १३) गुलबदन बेगम | १४) नेग | १५) अरनामू | १६) स्कंद पुराण |

१७) सहगमन १८) अनुगमन १९) राजपुत

ब) विधान चूक की बरोबर ओळखा.

१) दोन्ही विधाने बरोबर आहेत

२) दोन्ही विधाने बरोबर आहेत

क) योग्य जोड्या जुळवा.

१) अ) १-ड, २-अ, ३-ब, ४-क

२) क) १-क, २-ड, ३-ब, ४-अ

३) क) १-क, २-ड, ३-अ, ४-ब

४) क) १-क, २-ड, ३-अ, ४-ब

स्वयं अध्ययन प्रश्न- ३

रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.

१) लॉर्ड विल्यम बेंटिंग २) ४ डिसेंबर १८२९ ३) दूध पिती ४) बेहरामजी मलबारी

५) वारसा हक्क ६) स्पेशल मॅरेज ॲक्ट ७) घटस्फोट

८) महात्मा फुले ९) लॉर्ड डलहौसी १०) महात्मा फुले व सावित्रीबाई फुले

११) महात्मा फुले

ब) विधान चूक की बरोबर ओळखा.

१) ड) दोन्ही विधाने बरोबर

२) ब) पहिले विधान चूक दुसरे बरोबर

क) योग्य जोड्या जुळवा.

१) क) १-क, २-अ, ३-ड, ४-ब

२) अ) १-ड, २-क, ३-ब, ४-अ

स्वयं अध्ययन प्रश्न ४

अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.

१) ७.८ % २) डॉ. इक्विन व ठक्कर बप्पा ३) डॉ घुर्ये

४) खासी व मन्नर ५) मुलीकडे ६) मातृस्थानिय निवास पद्धत

७) थारू ८) नागा ९) तोडा १०) गारो व खासी

ब) विधान चूक की बरोबर ओळखा.

ड) दोन्ही विधाने बरोबर

क) योग्य जोड्या जुळवा.

१) १-ब, २-अ, ३-ड, ४-क

२) १-ड, २-अ, ३-ब, ४-क

## ३.५ सारांश

स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्याय ही आधुनिक युगाची मूल्ये आहे. जीवनाच्या सर्व क्षेत्रात या मूल्यांचा आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवर पुरस्कार केला जात आहे. या बदलाचा प्रभाव स्त्रियांच्या पारंपारिक रूढीगत व वैधानिक दर्जावर झाला आहे. सर्व जगभरातून सर्व धर्ममतात स्त्रियांचा दर्जा हा दुय्यम होता. धर्माकडून तिचे जीवन नियंत्रित केले जात होते. काळाच्या ओघात स्त्रियांच्या जीवनात अनेक स्थित्यंतरे झाली. कुटुंब, नातेसंबंध, विवाहपध्दती, वारसा हक्क, धार्मिक संस्था, राजकीय संस्था इ. सामाजिक संस्थांमध्ये स्त्रियांना दिले गेलेले स्थानच त्यांचा दर्जा लक्षात आणून देणारे आहे. स्त्रियांच्या स्थानात समाज विकासाच्या प्रक्रियेत भारतात निर्माण झालेले विविध धार्मिक प्रवाह, पंथ, राजकीय बदल यामुळे त्यांच्या स्थानात बदल झालेले दिसतात.

प्राचीन काळात भारतीय स्त्रियांच्या सामाजिक दर्जामध्ये काळानुरूप बरीच बदल झालेली दिसून येतात. वैदिक काळात स्त्रिया पुरूषांप्रमाणे अधिकार उपभोगत होत्या पण उत्तर वैदिक काळानंतर त्यांच्यावर अनेक बंधने येऊन त्यांचा दर्जा खालावत गेला. समाजाच्या विविध प्रथा परंपरेमध्ये बदल होत गेलेला आपल्याला जाणवतो. या काळात सामाजिक संबंधांचे नियमन करणारे आचारधर्म हे स्मृतीकार व नंतर टीकाकार यांनी तयार केले होते. वैदिक काळातील समाज अधिक उदार होता. उत्तर वैदिक काळात मात्र यात बदल झाला. बहुपत्नीत्त्व, बालविवाह, हुंडा पद्धती, जरठविवाह, सतीप्रथा, विधवांना पुनर्विवाहाचा अधिकार नसणे, त्याचे केशवपन केले जाई. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. संपत्तीत अधिकार नव्हता. एकंदरीत चूल आणि मुल एवढेच तिचे कार्यक्षेत्र होते. यातही पुरूषप्रधान समाजरचनेत तिला अनेक प्रकारच्या कौटुंबिक जाचाला सामोरे जावे लागत होते. तिला जन्म घेण्याचा अधिकार नाकारला होता. काही समाजामध्ये तिचा जन्म झाल्यावर तिला मारून टाकण्याची अमानुष रूढी होती. सासूचा व नवऱ्याचा जाच तिला सोसावा लागे. अशा परिस्थितीत उदयास आलेल्या जैन व बौद्ध धर्मात मात्र स्त्रियांना थोडी मोकळीक मिळाली. तिला मोक्ष प्राप्त करण्याचा अधिकार व भिक्षुणी बनण्याचा अधिकार या धर्माने दिला. मुस्लिमांच्या आगमनाने मध्ययुगाची सुरुवात झाली. सुलतानशाही व मुघलशाही या ठिकाणी आवतरली. या काळातही हिंदू स्त्रियांच्या परिस्थितीत कोणताही बदल झाला नाही, मात्र मुस्लिम धर्माच्या प्रभावातून आपल्याकडे पडदा पद्धतीला प्रतिष्ठा प्राप्त झाली. सम्राट अकबराने स्त्रियांच्या परिस्थितीत सुधारणा करण्याचा प्रयत्न केला पण फार फरक पडला नाही. कारण समाजाच्या धारणा धर्मातून तयार झाल्या होत्या. मुस्लिम समाजातही स्त्रियांना बहुपत्नीत्त्व, पडदा पद्धती, तलाक सारख्या परंपरांना बळी पडत होत्या. हिंदू आणि मुस्लिम स्त्रियांना पित्याच्या व पतीच्या संपत्तीत वाटा नव्हता. हिंदू स्त्रियांबाबतीत स्त्रीधनावर तिचा अधिकार मान्य

केला असला तरी ती स्वत:च्या मर्जीने ती खर्च करू शकत नव्हती. अशा परिस्थितीतही मुस्लिम व हिंदू राजघराण्यामध्ये अनेक महत्त्वपूर्ण स्त्रिया होऊन गेल्या.

या परिस्थितीत आधुनिक काळात मोठे बदल झाले. स्त्रियांकडे माणूस म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन विकसित होऊ लागला. या प्रक्रियेमध्ये स्त्रियांच्या चळवळी सर्व जगातून निर्माण झाल्या. परिणामी स्त्रियांच्या दर्जासंबंधीच्या अभ्यास पुढे येऊ लागला. सर्व ज्ञान शाखा स्त्रियांचा अभ्यास करू लागल्या. या अभ्यासाचा उद्देश स्त्रियांना मानव अधिकार कसे उपभोगता येतील याचा विचार व कृती होऊ लागली.

कुटुंब, नातेसंबंध, विवाहपद्धती, वारसा हक्क, धार्मिक संस्था, राजकीय संस्था, इ. सामाजिक संस्थांमध्ये स्त्रियांना दिले गेलेले स्थानच त्यांचा दर्जा लक्षात आणून देणारे आहे. स्त्रियांच्या स्थानात, समाज विकासाच्या प्रक्रियेत भारतात निर्माण झालेले विविध धार्मिक प्रवाह, पंथ, राजकीय बदल यामुळे त्याच्या स्थानात बदल झालेले दिसतात.

इंग्रजांच्या आगमनानंतर आधुनिक काळाला सुरुवात झाली. आणि इंग्रजी शिक्षणामुळे स्वातंत्र्य, समता, बंधुता, व्यक्तिस्वातंत्र्य ही मूल्ये भारतीय समाजात अवतरले. त्यांनी समाजातील अनिष्ट रूढी परंपरांवर प्रहार केले. सुधारणावादी चळवळीने स्त्रियांच्या सर्वांगीण सुधारणेवर भर दिला. बंगाल, पंजाब, गुजरात, महाराष्ट्र, इत्यादी प्रदेशात राजा राममोहन रॉय, पंडित विश्वचंद्र विद्यासागर, दयानंद सरस्वती, लोकहितवादी, जांभेकर, रानडे, पंडिता रमाबाई, आगरकर, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, कर्वे, राजर्षी शाहु महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, इत्यादी समाजसुधारकांनी अन्याय्य चालिरीती रूढी परंपरा मोडून काढण्याबरोबरच स्त्रियांच्या शिक्षणावर भर दिला. पुरुषांना वाटणाऱ्या दया भावनेवर सुरुवातीला पुरुषांनीच पुढाकार घेऊन स्त्रियांचा दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न केला. स्त्रियांना आर्थिक पायावर उभे राहण्यास व स्वतः संघर्ष करण्यास तयार केले. त्यामुळे विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून स्त्रियांचा राजकारण, समाजकारण, स्वातंत्र्य चळवळी व सुधारणा चळवळीत सहभाग वाढला. त्यामुळे स्त्रियांचा दर्जा निश्चितच सुधारला. याच काळात म्हणजे आधुनिक काळात ब्रिटिश सरकारने स्त्री सुधारण्यासाठी विविध कायदे पास करून स्त्रियांचा दर्जा उंचावण्यास मदत केली. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय राज्यघटनेने स्त्रियांना निश्चितच आदराचे मानाचे व पुरुषांबरोबरचा दर्जा प्राप्त करून दिला.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) थोडक्यात उत्तरे लिहा.

१. प्राचीन काळातील स्त्रियांचा रुढीगत व वैधानिक दर्जा स्पष्ट करा.

२. मध्ययुगीन काळातील हिंदू स्त्रियांचा रुढीगत व वैधानिक दर्जा स्पष्ट करा.

३. मुस्लिम स्त्रियांचा रुढीगत व वैधानिक दर्जा स्पष्ट करा.

४. आदिवासी स्त्रियांचा रुढीगत व वैधानिक दर्जा स्पष्ट करा.

५. वासाहतिक काळात स्त्रियांच्या दर्जामध्ये झालेल्या दर्जाची चर्चा करा.

ब) टिपा लिहा.

१) प्राचीन भारतातील विवाहाचे प्रकार

२) वैदिक कालीन स्त्री जीवन

३) अकबराने केलेल्या स्त्री-सुधारणा

४) मराठा कालीन सामाजिक व राजकीय क्षेत्रातील स्त्रिया

५) मुघलकालीन स्त्री-जीवन

६) आदिवासी स्त्रियांचा दर्जा

७) वसाहतकालीन स्त्री-सुधारणा

८) वसाहतकालीन स्त्री-जीवन

## ३.७ आधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

संदर्भ


१) डॉ लांजेवार ज्योती, भारतीय समाज आणि स्त्री, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००५.

२) डॉ. पाटील पद्मजा, डॉ. सौ. जाधव शोभना, भारतीय इतिहासातील स्त्रिया, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती २००७.

३) साने गीता, भारतीय स्त्रीजीवन, मौज प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती १९९७.

४) डॉ. भोसले नारायण, महाराष्ट्रातील स्त्रीविषयक सुधारणावादाचे सत्ताकारण (१८४८-१९५६) द. ताईची प्रकाशन, पूणे, २००८

५) डॉ. कर्वे स्वाती (संपा) स्त्री विकासाच्या पाऊल खुणा, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००३.

६) निलिमा भावे, शिवकालीन स्त्रियांच्या अधिकारकक्षा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती २०१०

७) डॉ. संगवे विलास, आदिवासीचे सामाजिक जीवन, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

८) डॉ. कठारे अनिल, भारतीय स्त्री चळवळीचा इतिहास, एज्युकेशनल पब्लिशर्स अॅड डिस्ट्रिब्युटर्स, औरंगाबाद २०१३

९) संपादक बनहट्टी श्री. ना, शाहणे मो. शा. भारतीय स्त्री. प्रकाशन हिंगणे स्त्री शिक्षण संस्था पुणे. १९६७


❑❑❑

# घटक ४
# विविध चळवळीतील स्त्रियांची भूमिका

**अनुक्रमणिका**

४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

    ४.२.१ शांताबाई दाणी

    ४.२.२ अनुताई वाघ

    ४.२.३ गोदावरी परुळेकर

    ४.२.४ गेल ऑम्व्हेट

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक अध्ययनासाठी संदर्भ

## ४.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर विद्यार्थ्यांना

१. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक चळवळीतील स्त्रियांच्या योगदानाची माहिती होईल.

२. स्त्रियांनी सामाजिक - आर्थिक - शैक्षणिक न्यायासाठी केलेल्या संघर्षाची माहिती होईल.

३. दलित चळवळीतील नेत्या शांताबाई दाणी यांच्या कार्यकर्तृत्वाची माहिती होईल.

४. आदिवासी शिक्षित करण्यासाठी आपले सर्व आयुष्य व्यतीत करणाऱ्या अनुताई वाघ यांच्या कार्याची माहिती होईल.

५. वारली आदिवासींना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी गोदावरी परुळेकर यांनी केलेल्या अविरत संघर्षाची माहिती होईल.

६. मुळच्या अमेरिकन परंतु नंतर पूर्णपणे भारतीय बनलेल्या आणि येथील सामाजिक चळवळीशी जोडल्या गेलेल्या गेल ऑम्व्हेट यांच्या कार्याची माहिती होईल.

## ४.१ प्रास्ताविक :

प्राचीन काळापासून इतिहासाचा आढावा घेतला तर भारतीय स्त्रियांच्या जीवनात अनेक स्थित्यंतरे आलेली दिसतात. कुटुंबात आणि समाजातील दुय्यम स्थान असलेली स्त्री ते आज अनेक अधिकारपदांची जबाबदारी सहजपणे सांभाळणारी स्त्री एवढी मजल तिने मारली आहे. अर्थात हे सहजासहजी घडलेले नाही. त्यासाठी स्त्रियांना अनेक शतके खूप संघर्ष करावा लागला. एकोणिसावे आणि विसावे शतक या दृष्टीने खूप महत्त्वाचे ठरले. याच कालखंडात भारतात राजकीय बदलांबरोबरच सामाजिक बदल ही होत गेले. पाश्चात्य शिक्षणाचा भारतात झालेला प्रसार हे त्यामागचे एक कारण होते. विविध स्तरातील सामाजिक चळवळींची सुरुवात हे ही या कालखंडाचे वैशिष्ट्य ठरले. विशेषतः स्त्रियांच्या प्रश्नांकडे, मागासवर्गीयांच्या प्रश्नांकडे भारतातील समाज सुधारकांनी समाजाचे लक्ष वेधून घेतले. यात सर्वात महत्त्वाचे कार्य महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले या दांपत्याने केले. त्यांचे कार्य समाज सुधारणा चळवळीतील पायाभूत कार्य ठरले. स्त्री जीवनाकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन हळूहळू बदलत गेला. स्त्रियांचे अधिकार, स्त्री शिक्षण, स्त्रियांशी निगडित अनिष्ट प्रथा दूर करण्याचे प्रयत्न होऊ लागले. स्त्रियांचे शिक्षण घेण्याचे प्रमाण वाढले. त्याचबरोबर सार्वजनिक जीवनात स्त्रियांचे वावरणे ही वाढत गेले. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतीय स्वातंत्र्य चळवळ विकसित होत गेली. स्वातंत्र्यलढ्यात स्त्रिया सहभागी झाल्या त्यांनी प्रसंगी तुरुंगवासही पत्करला. एकूणच शिक्षण आणि सामाजिक जीवनातील त्यांचा वाढलेला सहभाग यामुळे स्त्रियांच्यातील जागृती वाढत गेली. स्त्रियांच्या समस्यांची चर्चा होऊ लागली. सुरुवातीला बराच काळ स्त्रियांचे प्रश्न हे पुरुष समाजसुधारकांकडूनच मांडले जात होते. मात्र हळूहळू स्त्रिया ही समाज सुधारणा कार्यात सहभागी झाल्या आणि या क्षेत्रात त्यांनी चमकदार कामगिरी केली. सदर प्रकरणात विविध सामाजिक, शैक्षणिक चळवळींमध्ये सहभागी झालेल्या स्त्रियांच्या कार्याचा आढावा घेण्यात आला आहे.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ शांताबाई दाणी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांच्या उद्धाराचा लढा सुरू केला. सामाजिक परिवर्तनाच्या या लढ्यात हजारो अस्पृश्यांनी त्यांना पाठिंबा दिला. यामध्ये पुरुषांबरोबर स्त्रियाही होत्या. अस्पृश्य स्त्रियांची सामाजिक आर्थिक परिस्थिती अत्यंत वाईट होती. बहुतेकदा लहानपणीच त्यांचा विवाह करून दिला जाई. घरादारात राबणे, नवरा दारुडा असेल तर त्याची मारहाण सहन करणे, नवऱ्याने सोडलं तर पुढे काय? याच भीतीत सतत जगणे, असे आयुष्य जगत असणाऱ्या या स्त्रिया पूर्णपणे असुरक्षित होत्या. गरीबीमुळे अंगभर कपडे नाहीत की पोटभर खायला नाही, सवर्ण लोक पाणवठ्यावर पाणी भरू देत नसत, त्यामुळे पुरेसे पाणीही नाही, अशा अवस्थेत या अस्पृश्य स्त्रिया जगत होत्या. अस्पृश्य पुरुषांनाच शिक्षण घेण्याचा हक्क नव्हता तर या स्त्रियांचे शिक्षण ही तर खूप दूरची गोष्ट होती. थोडक्यात, या स्त्रिया तर आपले स्त्रीपण आणि अस्पृश्यता अशा दुहेरी जोखडात सापडलेल्या होत्या. त्यांच्यात आत्मभान निर्माण करण्याचे कार्य या चळवळीने केले. घरचा उंबरठा ओलांडण्याचे धाडस त्यांच्यात निर्माण झाले. माणूस म्हणून जगण्याची त्यांची

ही लढाई ठरली. अनेक अस्पृश्य स्त्रिया या चळवळीमुळे कार्यकर्त्या म्हणून तयार झाल्या. यापैकीच एक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अत्यंत समर्पित कार्यकर्त्या म्हणून शांताबाई दाणी यांचे नाव घ्यावे लागते. अस्पृश्य कुटुंबात जन्माला आलेल्या शांताबाईंनी उच्च शिक्षण घेऊन स्वसमाजाच्या विकासासाठी स्वतःला समर्पित केले.

**शांताबाई दाणी यांचे पूर्वायुष्य :**

शांताबाईचा जन्म १९१८ मध्ये नाशिकच्या खडकाळी नावाच्या वसाहतीत एका गरीब दलित कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव धनाजी तर आईचे नाव फुंदाबाई होते. कष्टाची कामे करून हे कुटुंब जगत होते. त्यांच्या वडिलांचा दूध व्यवसाय होता. इंग्रज अधिकाऱ्यांना ते दूध पुरवत असत. विशेष म्हणजे धनाजींचे मिशनरी शाळेत चौथीपर्यंत शिक्षण झालेले होते. यामुळे शिक्षणाचे महत्त्व जाणणाऱ्या धनाजींनी आणि फुंदाबाईंनी शांताबाईंना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. नाशिकमध्ये चौक मंडईच्या ख्रिश्चन शाळेत त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले. नगरपालिकेच्या शाळेतून त्या व्हर्नाक्युलर फायनल परीक्षा उत्तीर्ण झाल्या. शालेय शिक्षण घेत असताना त्यांना दाणी आडनाव असलेले ब्राह्मण शिक्षक भेटले. त्यांनी शांताबाईंना खूप प्रोत्साहन दिले, वाचनासाठी पुस्तके दिली. त्या उत्तम प्रकारे इंग्रजी सातवीची परीक्षा उत्तीर्ण झाल्या. त्याकाळी सातवीनंतर दोन वर्षाचा कोर्स केल्यानंतर शिक्षक होता येत असे. दाणी मास्तरांनी त्यांना पुण्याच्या वुमन्स गव्हर्मेंट कॉलेजमध्ये प्रवेश मिळवून दिला. त्यांनी हे टीचर ट्रेनिंग यशस्वीपणे पूर्ण केले. नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील विंचूर या गावी त्यांची प्राथमिक शिक्षिका म्हणून नियुक्ती झाली. त्यांच्या घरात शिक्षण घेतलेल्या आणि शिक्षिका म्हणून नोकरी करणाऱ्या त्या पहिल्याच होत्या. अर्थात ही वाटचाल सोपी नव्हती. लहानपणापासूनच अस्पृश्यतेचे चटके त्यांना सतत बसत होते. एकदा शांताबाईंना व त्यांच्या वडिलांना त्यांच्या मित्राने जेवायला बोलावले मात्र त्या घरातले लोक जेवायला आत बसले तर या बाप लेकींला गोठ्यामध्ये जेवायला बसवले. जिथे शेणाची घाण आणि त्याचा वास पसरलेला होता. तिने वडिलांना याबाबत प्रश्न केला. वडिलांनी उत्तर दिले आपण मागासलेल्या महार जातीचे आहोत आपण स्पर्श केला तर विटाळ होतो आणि यामुळे आपल्याला बाहेर बसवलेले आहे. एका माणसाचा स्पर्श विटाळ कसा असा मोठा प्रश्न शांताबाईंच्या बालमनाला पडला. प्राथमिक शिक्षिका म्हणून काम करत असताना त्या एकदा शालेय सहलीतून गेल्या. त्यावेळी मुलींबरोबर मंदिरात जाऊन त्यांनी देवीचे दर्शन घेतले. यानंतर शांताबाईंमुळे देवीला विटाळ झाला अशी बातमी सगळीकडे पसरली. विंचूरच्या संस्थानिकांनीही त्यांना या संदर्भात जाब विचारला. हे आपल्याकडून अजाणतेपणाने घडले होते त्यात माझा कोणताच हेतू नव्हता, असे शांताबाईंनी उत्तर दिले आणि हे प्रकरण तेथेच थांबविले. या सर्व प्रसंगांनी शांताबाईंच्यातील कार्यकर्ती घडत गेली. त्यांना पुढे शिकायचे होते यामुळे त्यांनी नोकरी सोडली. याचवेळी त्यांचा संपर्क नाशिक मधील पेशाने डॉक्टर असलेल्या श्रीमती लोंढे यांच्याबरोबर झाला. त्या त्यांच्याबरोबर राहू लागल्या. डॉ. लोंढे यांची बदली गुजरातला झाली. शांताबाई त्यांच्याबरोबर सौराष्ट्र मधील वडवणी येथे गेल्या आणि तिथे त्यांनी मॅट्रिक होण्यासाठी शाळेमध्ये प्रवेश घेतला. विशेष म्हणजे तेथील वासदा या रियासतीकडून त्यांना आर्थिक मदत मिळाली. मॅट्रिक उत्तीर्ण झाल्यानंतर त्या परत नाशिकला आल्या आणि तेथील महाविद्यालयात त्यांनी प्रवेश

घेतला. या महाविद्यालयात त्या शिकू लागल्या. या काळात सायकलवरूनकॉलेजला जाणारी मुलगी म्हणून त्या कुतुहलाच्या विषय बनलेल्या होत्या. यादरम्यानच अनेक कौटुंबिक दुःखद प्रसंगांना त्यांना सामोरे जावे लागले. त्यांच्या आईचा मृत्यू झाला पाठोपाठ भावाचा मृत्यू झाला. वडील व्यसनांच्या आहारी गेले. या सर्वांवर मात करत त्यांनी आपले शिक्षण पुढे चालू ठेवले.

**दादासाहेब गायकवाड यांच्याशी परिचय आणि सामाजिक कार्याची सुरुवात :**

नाशिकमधले शांताबाईंचे वास्तव्य खूप महत्त्वाचे ठरले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीची माहिती त्यांना या काळात झाली. त्या अत्यंत धाडसी होत्या. महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या शांताबाई या दलित समाजातील पहिल्या स्त्री होत्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे निकटवर्तीय कार्यकर्ते दादासाहेब गायकवाड यांची पत्नी ही शांताबाईंची दूरची बहीण होती. या बहिणीमुळे त्या दादासाहेब गायकवाड यांच्या संपर्कात आल्या आणि त्यांचे आयुष्य पूर्णपणे बदलून गेले. गायकवाडांमुळे त्यांना आंबेडकरांच्या कार्याची ओळख झाली आणि त्या समाजासाठी कार्य करणाऱ्या सच्चा कार्यकर्त्या बनल्या. दादासाहेब गायकवाड यांचे कार्य त्यांनी बघितले. आंबेडकरी चळवळींशी त्यांचा जवळून संबंध आला आणि दलितांचा उद्धार हे त्यांचे जीवित कार्य बनले. १९४२ मध्ये त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण ऐकले. त्यामुळे दलित हक्कांसाठी आपण आता इथून पुढे लढायचे हे त्यांनी ठरविले. शांताबाईंचे ध्येय निश्चित झाले. दादासाहेब गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांची वाटचाल सुरू झाली. दादासाहेबांच्या कार्यालयात त्या दररोज जाऊ लागल्या. तेथे अनेक दलित दररोज आपल्या समस्या घेऊन येत त्या सोडविण्याचा प्रयत्न या कार्यालयातून केला जात असे. शांताबाईही हळूहळू अर्ज लिहिण्यासाठी, पत्र लिहिण्यासाठी लोकांना मदत करू लागल्या. लोकांच्या प्रश्नांची, ते प्रश्न कसे सोडवावेत याची जाणीव त्यांना होऊ लागली. शिवाय दादासाहेबांच्या सभांनाही त्या हजर राहत. एका कार्यक्रमाच्या निमित्ताने दादासाहेबांच्या घरी त्यांची भेट डॉ. आंबेडकरांशी झाली. त्यांच्या विचार आणि कार्यामुळे त्या भारावून गेल्या.

**शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना:**

दलितांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी एक स्वतःचे व्यासपीठ मिळावे यासाठी डॉ. आंबेडकरांनी १९४२ साली ऑल इंडिया शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना केली. दादासाहेब गायकवाड यांनी पक्ष कार्यासाठी स्वतःला वाहून घेतले होते. १९४२ साली शांताबाई या पक्षाच्या नाशिक जिल्ह्याच्या अध्यक्ष बनल्या. या पक्षाच्या माध्यमातून त्या देशाच्या राजकारणाशी जोडल्या गेल्या. देशातील काँग्रेस आणि इतर पक्षांच्या तुलनेत शेड्युल्ड कास्ट फेडरेशन खूप लहान आणि नवा होता. सर्वसामान्य लोकांपर्यंत या पक्षाची ध्येयधोरणे पोहोचविण्याचे कार्य या कालखंडात शांताबाईंनी केले. विशेषतः दलित समाजातील स्त्रियांना यासाठी जागृत करण्याचे कार्य त्यांनी केले. फेडरेशनची अधिवेशने दरवर्षी आयोजित केली जाऊ लागली. शांताबाईंच्या प्रयत्नामुळे या अधिवेशनातील स्त्रियांचां सहभागही वाढत गेला.

**शांताबाईंचे शैक्षणिक कार्य:**

हे सर्व सुरू असतानाच त्यांचे शैक्षणिक कार्यही सुरू होते. दादासाहेबांनी स्थापन केलेल्या नाशिक आणि मनमाड येथील वसतिगृहांच्या सरचिटणीस म्हणून त्या कार्यरत होत्या. १९४७ मध्ये मुलींसाठी स्थापन केलेल्या रमाबाई आंबेडकर वसतिगृहाचे उद्घाटन डॉ. आंबेडकर यांच्या हस्ते झाले. या वसतिगृहाच्या विकासात शांताबाईंचे मोठे योगदान राहिले. केवळ वीस मुलींबरोबर सुरू झालेल्या या वसतिगृहात १९७५ मध्ये शंभरच्यावर मुलींनी प्रवेश घेतला होता. अत्यंत हिमतीने हा सर्व कार्यभार त्यांनी सांभाळला. जानेवारी १९५९ साली त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्ञानविकास केंद्र या शैक्षणिक संस्थेची स्थापना केली. याच वर्षी नाशिक रोडला देवळाली गावात पाच एकर जागा मिळवून १४ एप्रिल १९५९ रोजी तक्षशिला माध्यमिक शाळेची स्थापना करून शाळेची इमारत त्यांनी बांधली. त्याच वर्षी नाशिक रोडला गौतम छात्रालय स्थापन केले. जून १९६५ मध्ये त्यांनी रमाबाई आंबेडकर कन्या विद्यालयाची स्थापना केली. शासनाकडून गोल्फ ग्राउंडजवळ दोन एकर जागा मिळवून त्यावर शाळेची नवी इमारत उभा केली. जून १९८३ मध्ये कुणाल प्राथमिक शाळा सुरु केली. शिक्षणाच्या माध्यमातून दलित समाजाचे सबलीकरण हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दादासाहेब गायकवाड यांनी दिलेला वसा आणि वारसा शांताबाईंनी खूप यशस्वीपणे पुढे नेला. शांताबाईंना राजकीय – सामाजिक चळवळीतील सहभागामुळे बी.ए.चे शिक्षण पूर्ण करता आले नाही. मात्र शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी त्या अखेरपर्यंत कार्यरत रहिल्या.

**विविध चळवळीतील शांताबाईंचा सहभाग:**

डॉ. आंबेडकरांनी केलेल्या विविध चळवळींमध्ये त्या हिरीरीने सहभागी झाल्या. १९४६ मध्ये पुण्याच्या असेंब्लीवर दलितांना प्रतिनिधित्व मिळत नाही म्हणून तेथे जाऊन काळे झेंडे दाखवत आंदोलन करायचे ठरले. पोलिसांनी अगोदरच पक्का बंदोबस्त ठेवला होता. शांताबाई काही स्त्रियांना घेऊन मागच्या बाजूने आत शिरल्या. त्यांचा टापटीप, व्यवस्थितपणा पाहून त्यांना कोणी अडवले नाही. या सर्व स्त्रियांनी सभागृहात प्रवेश केला आणि आंबेडकरांच्या नावाचा जयजयकार केला. तेथे बसलेल्या सर्व नेत्यांना काळे झेंडे दाखविले. त्यांचा हेतू सफल झाला. लगेचच सर्वजणींना अटक करून येरवडा तुरुंगात पाठविण्यात आले. तेथील वास्तव्यात त्यांनी महिला कैद्यांमध्ये आंबेडकरांच्या तत्वज्ञानाचा प्रसार केला.

डॉ.आंबेडकर यांनी बौद्ध धर्मात प्रवेश करण्याचे ठरवले. शांताबाई यासाठी गावोगावी जाऊ लागल्या. नाशिक जिल्ह्यातील निफाड स्टेशन कुंदेवाडी येथे आयोजित केलेल्या सभेच्या त्या अध्यक्ष होत्या. जवळच्या नैताळे गावातील अनेक जण जे धर्मांतर करणारे होते ते आपल्या घरातील देव टोपलीत घेऊन आले. त्यांनी शांताबाईंना विचारले की, देवांचे काय करायचे? तेव्हा शांतीबाईंनी या देवांचे जवळच्या काजवा नदीत विसर्जन करण्याबाबत सांगितले. त्याप्रमाणे देवांचे विसर्जन केल्यावर त्या लोकांना बौद्ध धर्माची दीक्षा देण्यात आली. अनेक दलितांनी शांताबाईंच्या मार्गदर्शनाखाली धम्मदीक्षा घेतली. आंबेडकरांच्या विचारांचा प्रसार करणाऱ्या त्या सच्चा कार्यकर्त्या होत्या.

भूमिहीनांच्या सत्याग्रहासाठी त्यांचे मोठे योगदान राहिले. १९६४ मध्ये हा सत्याग्रह अखिल भारतीय पातळीवर झाला. जवळपास तीन लाख चाळीस हजार लोक जेलमध्ये गेले. तुरुंग कमी पडले. सर्व सत्याग्रही हजारोंच्या संख्येने मोठ्या मैदानावर थांबून राहिले, कोणी पळून गेले नाही. सर्वसामान्यांच्या स्वतःच्या हक्कांबद्दल जागृती निर्माण करण्याचे धाडस निर्माण करण्याचे कार्य शांताबाईंनी केले.

शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या विचारांचा प्रचारासाठी पा.ना. राजभोज यांची निवड झाली त्यांनी शांताबाईंना त्यांनी आपल्यासोबत घेतले. मध्यप्रदेश मधील रायपूर येथे दरवर्षी चांभार समाजाची यात्रा भरते असे. हे दोघेही तेथे गेले. तेथे त्यांनी केलेले आंदोलन विशेष गाजले. १९४७ मध्ये जबलपूर पोलिसांनी त्यांना रझाकाराचे हेर समजून पकडले आणि तुरुंगात टाकले. जवळपास तीन आठवड्यानंतर त्यांची सुटका झाली. परत आल्यावर दलित समाजाने त्यांच्या मोठा सत्कार केला.

शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या प्रसाराच्या निमित्ताने त्यांनी खूप प्रवास केला. या काळात स्त्रिया फारशा बाहेर पडत नसत. त्यांच्या गरजांच्या विचार केला जात नसे. पुरुष कार्यकर्त्यांबरोबर प्रवास करणे सोपे नसे. पण ध्येयवादी शांताबाईंनी सर्व अडचणींचा सामना करत आपले कार्य केले. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले पण अखंड भारताची फाळणी झाली. पाकिस्तानातील चांभार समाजातील अनेक स्त्री-पुरुष निर्वासित म्हणून नाशिकमध्ये आले. या लोकांची व्यवस्था करणे, त्यांना आर्थिक मदत करणे हे काम शांताबाईंनी केले. या काळात देशात वातावरण खूप तंग बनले होते. तरी न घाबरता शांतीबाईंचे दौरे सुरू होते. या काळात मुंबई प्रांताच्या शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्यात्या सेक्रेटरी बनल्या होत्या. भारतभर त्यांनी दौरे केले. शेड्युल्ड कास्ट फेडरेशन मजबूत करण्यात त्यांचे योगदान खूप महत्त्वाचे ठरले. शांताबाईंच्या कार्याची जाणीव महाराष्ट्र सरकारला झाली होती.

**रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची स्थापना :**

डॉ.आंबेडकर यांनी शेड्युल्ड कास्ट फेडरेशन बरखास्त करून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची (रिपाई) स्थापना करण्याचे जाहीर केले होते. परंतु हे होण्यापूर्वीच त्यांचे निधन झाले. त्यानंतर त्यांच्या अनुयायांनी त्यांचे हे स्वप्न पूर्ण केले. शांताबाईनी या पक्षाच्या प्रसारासाठी खूप प्रयत्न केले. २ ऑक्टोबर १९५७ ला नागपूर येथे अखिल भारतीय महिला परिषद आयोजित करण्यात आली. याचे अध्यक्षपदी शांताबाईची नियुक्ती करण्यात आली. रिपाइंला जोडून ठेवण्यासाठी त्यांनी बरेच प्रयत्न केले. वयाच्या ७२ व्या वर्षी त्यांनी एक सभा घेऊन दलितांच्या विविध संघटनाच्या नेत्यांना एकत्रित आणले. मात्र त्यांना यश आले नाही.

**विधान परिषदेवर नियुक्ती :**

मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी शांताबाईंच्या कार्याचे महत्त्व ओळखले. १९६८ साली त्यांनी राज्यपाल नियुक्त आमदार म्हणून शांताबाईंची विधान परिषदेवरती नियुक्ती केली. शांताबाईंनी आपल्या या कारकिर्दीत गोरगरिबांच्या अनेक प्रश्नांना विधान परिषदेच्या अधिवेशनातून वाचा फोडली. सर्वसामान्यांच्या अन्याय - अत्याचारांबाबत सरकारच्या उदासीन वृत्तीवर त्यांनी टीका केली. १९७४ पर्यंत त्या विधान परिषदेच्या सदस्य

म्हणून कार्यरत राहिल्या. १९८० मध्ये त्यांनी नाशिक मतदार संघातून लोकसभेसाठी निवडणूक लढवली पण त्यात त्यांना यश मिळाले नाही. १९८९ मध्ये शांताबाई सक्रिय राजकारणातून बाजूला झाल्या. मात्र त्यांचे सामाजिक कार्य, शैक्षणिक कार्य पुढेही चालू राहिले.

**शांताबाईंना मिळालेले सन्मान आणि पुरस्कार :**

शांताबाईंनी लिखाणही केले. 'रात्रंदिन आम्हा'...... हे त्यांचे आत्मचरित्रात्मक पुस्तक प्रसिद्ध झालेले आहे. 'चंदनाची छाया' हे त्यांचे दुसरे पुस्तक होते. समाजकार्यासाठी वाहून घेतलेल्या शांताबाईंना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. १९७५ साली महिला गौरव पुरस्कार, १९८७ साली देशदूततर्फे दिला जाणारा आदर्श समाजसेविका पुरस्कार, १९८९ साली महाराष्ट्र शासनाचा सावित्रीबाई फुले पुरस्कार व इतर काही पुरस्कार त्यांना मिळाले. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने डी.लीट. पदवी देऊन शांताबाईंचा सन्मान केला. याशिवाय १९६८ मध्ये त्या मलेशिया, १९७० मध्ये जपान आणि १९७२ मध्ये श्रीलंका येथे झालेल्या बौद्ध धर्माच्या परिषदांना त्या उपस्थित राहिल्या होत्या.

**समारोप :**

स्त्री म्हणून समाजाकडून मिळणारे दुय्यमत्व आणि अस्पृश्य समाजात जन्माला आल्यामुळे होणारी टोकाची अवहेलना अशा दुहेरी अन्यायाच्या जोखडात अडकलेल्या शांताबाईंनी अत्यंत जिद्दीने शिक्षण घेतले. अस्पृश्य असल्याचा अत्यंत वाईट अनुभव त्यांना पदोपदी आला पण खचून न जाता अत्यंत धैर्याने त्यांनी सामाजिक विषमतेचा सामना केला. आपल्या समाजाची विशेषत: स्त्रियांची प्रगती व्हावी यासाठी त्यांनी त्यांचे सर्व आयुष्य वेचले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने प्रभावित झालेल्या शांताबाईंनी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक इ. सर्व क्षेत्रात कार्य केले. त्या आजन्म अविवाहित राहिल्या. केवळ दलितच नव्हे तर शेतकरी, भूमिहीन शेतमजूर, कामगार, आदिवासी यांच्यावर होणाऱ्या अन्याय विरोधात त्यांनी आवाज उठवला. विधान परिषदेच्या अधिवेशनातून त्यांनी वेळोवेळी सरकारचे या समस्यांकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. दलित चळवळीमध्ये फूट पडू नये यासाठी त्यांनी शक्य तेवढे सगळे प्रयत्न केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अन्यायाविरुद्धच्या संघर्षाचा वारसा त्यांनी पुढे नेला. स्त्री म्हणून त्यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागला. मात्र कुठलीही तडजोड न करता त्या अखेरपर्यंत कार्यरत राहिल्या. ९ ऑगस्ट २००१ मध्ये शांताबाई दाणी यांचा मृत्यू झाला.

**स्वयं अध्ययन प्रश्न १**

अ) योग्य पर्याय निवडा

१. महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या .............. या दलित समाजातील पहिल्या स्त्री होत्या.

अ) पंडिता रमाबाई ब) गेल ऑम्व्हेट क) शांताबाई दाणी ड) गोदावरी गोखले

२. शांताबाई दाणी यांनी नाशिक रोडला देवळाली येथे .................माध्यमिक शाळेची स्थापना केली.

अ) तक्षशिला ब) चंदनाची छाया क ) वासदा ड) कुणाल

३. मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी शांताबाईं दाणी यांची............... नियुक्ती केली.

अ) लोकसभा ब) विधान परिषदेवर

क) रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ड) शेड्युल कास्ट फेडरेशन

४. 'रात्रंदिन आम्हा ..........' हे ........... यांचे आत्मचरित्रात्मक पुस्तक आहे.

अ) अनुताई वाघ ब) गेल ऑम्व्हेट क) गोदावरी परुळेकर ड) शांताबाई दाणी

५. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने डी.लीट. पदवी देऊन ........ यांचा सन्मान केला.

अ) गेल ऑम्व्हेट ब) शांताबाई दाणी क) अनुताई वाघ ड) पंडिता रमाबाई

**४.२.२ अनुताई वाघ**

ज्या काळात स्त्रियांनी शिक्षण घेणे निषिद्ध मानलं जात असे त्यातही विधवा स्त्री असेल तर तिच्यावर सामाजिक, आर्थिक खूप बंधने असत अशा काळात बालविधवा असलेल्या अनुताईंनी शिक्षण घेतले, एवढेच नाही तर अत्यंत मागासलेल्या आणि समाजापासून फटकून राहणाऱ्या आदिवासींपर्यंत हे शिक्षण पोहोचवण्यासाठी, त्यांची प्रगती घडवून आणण्यासाठी स्वतःचे आयुष्य व्यतीत केले. ज्यामुळे आदिवासीही आपल्या समाजाचा भाग आहे हे इतर समाजाला आणि सरकारलाही जाणीव झाली. आदिवासींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांच्या मुलांना शिक्षणातून स्वावलंबी बनवण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. आधुनिक काळात विद्यार्थी-केंद्रित शिक्षण, रचनावादी शिक्षण पद्धत या संकल्पना खूप महत्वाच्या बनल्या आहेत. हे प्रयोग सत्तर-पंचाहत्तर वर्षापूर्वी अनुताईंनी प्रत्यक्ष केले. शिक्षण तज्ज्ञ म्हणून त्या ख्यातनाम झाल्या. शिक्षण क्षेत्रातील दीपस्तंभ असे त्यांचे वर्णन केले जाते.

**पूर्वायुष्य :**

अनुताई वाघ यांचा जन्म पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यातील मोरगांव येथील एक सामान्य कुटुंबात १७ मार्च १९१० रोजी झाला. त्यांचे वडील बाळकृष्ण वाघ हे बांधकाम खात्यात नोकरीस होते. वडिलांची सततची बदली यामुळे त्यांचे शिक्षण व्यवस्थित झाले नाही, परंतु त्यांच्यात शिक्षणाची आवड निर्माण झाली. त्यावेळच्या प्रथेप्रमाणे १९२३ मध्ये वयाच्या तेराव्या वर्षी त्यांचा विवाह शंकर वामन जातेगांवकर यांच्याशी झाला. विवाहानंतर त्या माहेरी होत्या. त्यांनी सासरचे घर बघितले नव्हते. लग्नानंतर त्यांनी पतीला पाहिले नव्हते. केवळ सहा महिन्यात त्यांच्या पतीचे निधन झाले. त्या विधवा झाल्या. एके ठिकाणी त्यांनी लिहून ठेवले आहे की, घरी सगळेजण रडत होते, म्हणून मीही रडत होते. रडण्याइतपत काय भयंकर झाले आहे, हे तेव्हा मला कळत नव्हते. या बालविधवा मुलीचं काय करायचं हा यक्ष प्रश्न त्यांच्या आई-वडिलांसमोर होता. कारण त्या काळात पुनर्विवाह शक्य नव्हता. अनुताईंना शिक्षणाची आवड होती. त्यांच्या आईची मैत्रीण दुर्गाबाई नेने यांनी एकूण परिस्थिती पाहून त्यांना अकोल्याला नेले. त्यांनी अनुताईंना बोलावे कसे-लिहावे कसे हे शिकवले. त्यांच्याकडून भाषणे पाठ करून घेतली. अकोल्याच्या राष्ट्रीय शाळेत त्यांचे शिक्षण झाले. तेथून त्या इगतपुरीला आल्या.१९२५ मध्ये तेथे त्यांनी व्हर्नाक्युलर फायनलची परीक्षा दिली. यावेळी

त्या नाशिक जिल्ह्यात परीक्षेत पहिल्या आल्या. १९२९ मध्ये पुण्याच्या महिला प्रशिक्षण महाविद्यालयातून त्यांनी प्राथमिक शिक्षणाचा प्रमाणपत्र (पी.टी.सी.) अभ्यासक्रम पूर्ण केला. यामुळे त्यांना लगेचच नाशिकमधील चांदवडच्या शाळेत जिल्हा लोकल बोर्डातर्फे मुख्याध्यापिका म्हणून सेवा करण्याची संधी मिळाली. १९३३ नंतर पुण्यातील हुजूरपागा प्राथमिक विद्यालयात त्या नोकरीस लागल्या. या काळात घरची-पाठच्या भावंडाची सर्व जबाबदारी त्यांनी सांभाळली. शिवाय नाईट हायस्कूलमधून त्यांनी १९३७ मध्ये मॅट्रिक उत्तीर्ण केले. अत्यंत जिद्दीने त्यांनी हे सर्व पूर्ण केले. उपक्रमशील अनुताई शाळेतील सर्व उपक्रमात सहभागी होत असत. पुण्याच्या वास्तव्यात अनेक उत्तम व्याख्याने त्यांनी ऐकली. ज्यामुळे त्या समाजसेवेकडे वळल्या. पुढे १९६१ साली कोसबाडला असताना त्यांनी एक्कावन्नव्या वर्षी डोळ्यात मोतीबिंदू झाला असतानाही मुंबई येथील श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाची (एस.एन.डी.टी. विद्यापीठ) बी. ए. परीक्षा जिद्दीने प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केली.

**शैक्षणिक कार्याची सुरुवात :**

१९४५ साली बोरिवलीमध्ये आखिल भारतीय स्त्रियांचे बालशिक्षण विषयक शिबिर आयोजित करण्यात आले होते. हे शिबीर अनुताईंच्या आयुष्याला कलाटणी देणारे ठरले. या शिबिरात महात्मा गांधीं आणि पूर्व प्राथमिक शिक्षणाची चळवळ भारतात रुजविण्याचे प्रयत्न करणाऱ्या जेष्ठ शिक्षणतज्ञ व पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या प्रणेत्या ताराबाई मोडक या मार्गदर्शन करण्यासाठी आले होते. ताराबाई मोडक या ठाणे जिल्ह्यातील अत्यंत दुर्गम अशा या बोर्डी गावात ग्रामीण बालशिक्षण केंद्र स्थापन करण्याच्या तयारीत होत्या. त्यांनी तेथे उपस्थित असणाऱ्या सर्वांना आदिवासींच्या शिक्षणासाठी बोर्डीला येण्याचे आव्हान केले. या आव्हानाला अनुताईंनी प्रतिसाद दिला. त्यांनी बोर्डीला जाण्याचे निश्चित केले. तुलनेने पुण्यातील आरामाचे आयुष्य, नामांकित शाळेतील नोकरी, चांगला पगार, कुटुंबातील सुरक्षित आयुष्य या सगळ्यांचा त्याग करत एक अत्यंत खडतर आयुष्याची त्यांनी निवड केली. १९४५ मध्ये त्या बोर्डीला आल्या. ताराबाई मोडक यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांची नवी वाटचाल सुरू झाली. येथील कार्यात त्यांनी स्वतःला अक्षरशः झोकून दिले. पुढे त्यांच्या निधनापर्यंत म्हणजे १९९२ पर्यंत त्या हे कार्य अविरतपणे करत राहिल्या.

**बोर्डीतील कार्य :**

ताराबाई आणि अनुताईंनी बोर्डी येथे बालवाडी सुरू केली, जी अर्थाने शिक्षणाची विकासवाडी होती. याचे उद्घाटन २४ डिसेंबर १९४५ रोजी तत्कालीन मुंबई राज्याचे मुख्यमंत्री बाळ गंगाधर खेर यांच्या हस्ते झाले. शिक्षणापासून दूर असलेल्या इथल्या समाजाला पूर्व प्राथमिक शिक्षण ही संकल्पना पटवून देणे, हा खूप कठीण गोष्ट होती. बालवाडी शेजारी हरिजनवस्ती होती. यामुळे सवर्णांची मुले तेथे येत नसत. गावात जायचे झांजा वाजवून मुलांना, पालकांना आकर्षित करायचे, त्यांच्याशी गप्पा मारायच्या, बालवाडीबद्दल माहिती सांगायची असे प्रयोग अनेक दिवस केल्यानंतर बालवाडीत येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत गेली.

हे सर्व करत असताना या दोघींच्या लक्षात आले की, आदिवासी मुले मात्र या बालवाडीकडे फिरकलेली नाहीत. इतर समाजापासूनही ही मुले आणि त्यांचे आई-वडील दूरच राहत होते. त्यामुळे

औपचारिक शिक्षणापासून ही मुले वंचित राहिली होती. ही मुले सांगूनही शाळेत येणार नाहीत, याची जाणीव त्यांना झाली. या मुलांना शिक्षण प्रवाहात आणणे आवश्यक आहे, हे त्यांच्या लक्षात आले. बऱ्याच विचाराअंती अनुताईंनी आणि ताराबाई मोडक यांनी शाळाच त्यांच्या वस्तीकडे न्यावयाची असे ठरले.१० जून १९५६ साली बोर्डीहून कोसबाड या आदिवासीबहुल गावात स्थलांतर केले. अनुताईंच्या नव्या आयुष्याला जणू सुरुवात झाली. १९४९ ते १९५६ या सात वर्षात अनुताईंनी पंधरा अंगणवाड्या चालविल्या. स्वयंभू रात्रशाळा चालविल्या.

**अनुताईंचे कोसबाड येथील कार्य :**

कोसबाड हा अत्यंत मागासलेला भाग होता. वारली आदिवासींची संख्या येथे जास्त होती. अशिक्षित आणि मागासलेल्या वारलीच्या मुलांना शिकविणे हे मोठे आव्हान होते. ताराबाई आणि अनुताईंनी सुरुवातीला छोट्या झोपडीवजा घरात वास्तव्य केले. या घराच्या अंगणातच शाळा सुरू केली आणि येथे अंगणवाडीचा जन्म झाला. अत्यंत दारिद्र्य , मागासलेपणा, रोगराई, अस्वच्छता, कुपोषणामुळे हातापायाच्या अक्षरशः काड्या झालेली, खरुज उठलेली मुलेही या भागाची जणू वैशिष्ट्ये होती. अनेक कुटुंबांना दोन वेळचं पोटभर जेवणही मिळत नसे. आई-वडील कामासाठी बाहेर गेल्यानंतर थोरली मुलं लहान भावंडांचा सांभाळ करत. घरात जनावर पाळलेले असेल तर त्याला चरायला घेऊन जात. अशा मुलांना शिक्षणाकडे वळवणे हे मोठे आव्हान समोर होते. अनुताईंनी मुलांना शिक्षणाकडे आकर्षित करण्यासाठी नव्या-नव्या कल्पना शोधून काढल्या. एखादा दिवस टाळ्या वाजवत दिंडी काढली जाई तर कधी बैलगाडीतून मिरवणूक काढून त्या मुलांना शाळेपर्यंत आणले जाई. तरीही विद्यार्थी येत नाहीत हे बघितल्यावर आदिवासी वस्त्यांवर जाऊन त्यांनी झाडाखाली शाळा भरवण्यास सुरुवात केली. शाळेत आलेल्या मुलामुलींना आंघोळ घालून स्वच्छ करणे, त्यांच्या शरीरावर असलेल्या खरुजवर औषध लावणे, अगदी डोक्यातील उवा काढणे इथपर्यंत सर्व काही अनुताईंनी केले. आदिवासी मुलांच्या जीवनशैलीस योग्य अशा गोष्टींचा वापर करून त्यांना शिक्षणाकडे आकर्षित करण्यासाठी प्रयत्न केले. मुलांच्या आसपासच्या गोष्टी निसर्गातल्या गोष्टींचा वापर करून मुलांना विविध विषयांचे ज्ञान दिले. पाने, फळे-फुले गोळा करणे, बिया, गुंजा जमवणे, ओढ्यात उडी मारून त्याची लांबी मोजणे, गाणी गप्पा यातून मुलांचे शिक्षण होऊ लागले. मुले हळूहळू या सर्व गोष्टींमुळे शिक्षणाकडे आकर्षित होऊ लागली. स्वानुभावातून अनुताईंनी हे सर्व प्रयोग केले.

**पाळणाघराची सुरुवात :**

अनेक मुले, ही आपल्या धाकट्या भावांना सांभाळावे लागते म्हणून अंगणवाडीत येत नसत. यासाठी लहान मुलांना सांभाळण्यासाठी अनुताईंनी पाळणाघर सुरू केले. एवढेच नाही तर मोठ्या मुलांच्या जेवणाची सोयही केली. मुलांच्या आईंनाही अधेमधे बोलावून बाल संगोपनाची माहिती त्यांना दिली जाई. कोसबाड परिसरात वेगवेगळ्या अकरा ठिकाणी बालवाड्या आणि दहा पाळणाघरे सुरू केली.आसपासच्या परिसरातील जास्तीत जास्त मुले शिक्षणाच्या प्रवाहात यावी यासाठी अनुताईंनी खूप प्रयत्न केले. रानोमाळ भटकणाऱ्या

पोरांना पकडून आणायचे त्यांना स्वच्छ करायचे, त्यांच्याबरोबर खेळ खेळायचे, मुले शाळेत येत नाहीत तर शाळेलाच मुलांपर्यंत न्यावयाचे असे अनेक प्रयोग अनुताईंनी केले. याचा चांगला परिणाम दिसूनआला.

**महिला उद्योग :**

ताराबाईंच्या मृत्यूनंतर सर्व जबाबदारी अनुताईंवर आली. मुलांच्या शिक्षणाबरोबर इतर काही उपक्रमही त्यांनी हाती घेतले. आदिवासींकरिता उभारलेले विकासवाडी शबरी उद्योगालय यापैकीच एक होते. आदिवासी स्त्रियांकडून मसाले, पापड, लोणची इत्यादी खाद्यपदार्थ तयार करून घेऊन त्याची विक्री सुरू केली. संस्थेने स्वतःचा छापखाना सुरू केला. त्यामध्ये  बालवाडीसाठीची पुस्तके, त्याचप्रमाणे बाल साहित्याची छपाई होत असे. बाहेरचे छपाईचे कामही घेतले जाऊ लागले. यामुळे संस्थेचे उत्पन्न वाढले.

**दाभोण प्रकल्प :**

कोसबाड- बोर्डी परिसरात शिक्षण प्रसाराचे कार्य चांगले झाले. शेजारील डहाणू तालुक्यात आदिवासी भागातील परिस्थिती मात्र खूपच खराब होती. तिथे शिक्षक जात नसत. हे बघून अनुताई स्वतः या तालुक्यातील दाभोण गावात जाऊन राहिल्या. दाभोणच्या जंगलात आदिवासींच्या शिक्षणाचे प्राथमिक स्वरूपाचे काम सुरु झाले. दाभोणचा भाग हा कातकरी आदिवासी जमातीचा भाग होता. कोसबाड सारखीच विकासवाडी दाभोणला सुरु करायची हे अनुताईनी ठरविले. १९८२ साली त्यांनी तेथे 'ग्राममंगल' नावाची संस्था स्थापन केली. या संस्थेच्या माध्यमातून बालवाडी व शाळा सुरू करण्यात आली. अनुताईंचे नातेवाईक असणाऱ्या मुंबईच्या प्राध्यापक रमेश पानसे यांनी या प्रकल्पाची जबाबदारी घेतली आणि त्यांनी आणखीन काही तिथे नवे प्रयोग सुरू केले. दाभोण बरोबरच आसपासच्या आदिवासी पाड्यांवरतीही शाळा सुरू करण्यात आल्या. या शाळातून शिकण्यासाठी वेळ-काळाचे बंधन नव्हते. मुले त्यांच्या सोयीप्रमाणे कधीही शाळेत येत जात असत. अनेक विविध नाविन्यपूर्ण प्रयोगामुळे या परिसरातील शेकडो आदिवासी मुलं शिक्षण प्रवाहात आली. पुढे दाभोण गावातील प्रकल्प शेजारील ऐने या गावात स्थलांतरित करण्यात आला.

अत्यंत मागासलेल्या अशा भागातून शिक्षण प्रसाराचे काम करत असताना अनुताईंना अनेक कठीण प्रसंगांना सामोरे जावे लागले. १९७१ मध्ये तर अत्यंत विषारी अशा मण्यार जातीच्या सर्पाने त्यांना दंश केला. या घटनेचा न घाबरता त्यांनी सामना केला.  सुदैवाने यातून त्या वाचल्या.

**अनुताईंचे इतर कार्य:**

१९६४ मध्ये अनुताईंनी कोसबाड येथे ग्रामसेविका विद्यालय सुरू केले. येथे मुलींना अंगणवाडी चालविण्याचे प्रशिक्षण दिले. त्याचबरोबर युनिसेफच्या मदतीने अनुताईंनी सकस आहार प्रशिक्षणवर्गही चालवला. आसपासच्या गावांमध्ये या वर्गातल्या महिला जात आणि सकस आहार, बाल संगोपन, बाल आरोग्याची माहिती देण्याचे काम करत. इंडियन कौन्सिल फॉर चाइल्ड वेल्फेअर या संस्थेने अंगणवाडी कार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग येथे चालवला. याचा परिणाम असा झाला की यातून अनेक कार्यकर्त्या तयार

झाल्या. अनुताईंनी संस्थेचा स्वतःचा छापखाना सुरु केला होता. अनुताई या शिक्षणतज्ज्ञ डॉ. चित्रा नाईक यांच्या संपर्कात होत्या. चित्रा नाईक यांनी सरकारतर्फे त्यांना कागद मिळवून दिला. यानंतर अनुताईंनी शिक्षक मित्रमाला तर्फे लहान मुलांसाठी बालवाडीतील कृतिगीते, बालवाडीतील बडबडगीते, बालवाडीतील गोष्टी - भाग एक, भाग दोन, सकस आहार, छोटीशी नाटुकली, गंमत जंमत इत्यादी बालवाडी, प्राथमिक शाळेतील मुलांसाठी तसेच शिक्षकांसाठी पंचवीस छोटी पुस्तके प्रकाशित केली. बाहेरचे छपाईचे काम घेतल्यामुळे संस्थेचे उत्पन्न वाढले. समाजात शिक्षणाबाबत प्रबोधन व्हावे यासाठी शिक्षणपत्रिका आणि स्त्रियांसाठी सावित्री नावाचे मासिक सुरु केले.

विविध शिक्षण परिषदांच्या निमित्ताने तसेच राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद (NCERT), भारतीय बाल कल्याण परिषद, (ICCW) यांच्या बैठकांच्या निमित्ताने अनुताई दिल्ली बरोबरच भारतात इतर ठिकाणी जात असत. विविध परिसंवादातून त्यांनी भाग घेतला. त्यांनी लहान मुलांसाठी जी साधने तयार केली होती त्याची प्रदर्शने भारतभर मांडली गेली. बेंगलोर येथे आयोजित अखिल भारतीय शेतकी प्रदर्शनात कोसबाडला पहिले बक्षीस मिळाले. खुद्द कोसबाडलाच एक अधिवेशन भरवले गेले आणि भारतभरातून चारशेपेक्षा जास्त प्रतिनिधी तेथे उपस्थित राहिले. अत्यंत मागासलेल्या भागात हे पहिल्यांदाच घडले होते. त्यामुळे कोसबाडची ख्याती सर्व दूर पसरली.

अनुताईंचे शिक्षणातले विविध प्रयोग अव्याहतपणे चालू होते. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून केंद्रीय समाज कल्याण मंत्रालयाने बालकल्याण कार्यासाठी १८ मार्च १९८० रोजी अनुताईंना वीस हजार रुपयाचे रोख पारितोषिक देऊन त्यांचा गौरव केला. यावेळी अनुताई म्हणाल्या, ताराबाई मोडक यांचे हे आशीर्वाद आहेत, त्यांच्यामुळेच मी घडलेले आहे. त्यांचे कार्य मी पुढे चालू ठेवलेले आहे. कोसबाडचे नंदनवन करण्याचे काम अनुताईंनी केले. २३ जून १९८० रोजी डहाणू मासोली भागात मुकबधिर विद्यालय सुरु केले. समाजाचा सर्वांगिक विकास घडवून आणण्यासाठी आदिवासी पाड्यावर प्रौढ शिक्षण वर्ग सुरु केले.

**अनुताईंनी केलेले लेखन आणि त्यांना मिळालेले पुरस्कार :**

अनुताई उत्तम लेखिकाही होत्या. टिल्लूची करामत, बालसंवाद, शब्दांची मजा, सकस आहारगीते, प्रौढ शिक्षणमाला, अजब सातभाई, गंमत जंमत, कुरण शाळा, विकासाच्या मार्गावर, आटपाट नगरात, बालवाडीतील बडबड गीते, बालवाडीतील गोष्टी भाग १, भाग २, कोसबाडच्या टेकडीवरून हे आत्मनिवेदनपर पुस्तक अशी अनेक पुस्तके त्यांनी लिहिली. याचा उपयोग नव्यानेच या क्षेत्रात येणाऱ्या शिक्षकांना, अंगणवाडी सेवकांना मोठ्या प्रमाणावर झाला. बालवाडी कशी चालवावी? या पुस्तकाचा अनुवाद इंग्रजी, हिंदी, गुजराती भाषांमधून झाला आहे. गुरुमाऊलीचा संदेश हे नाटक लिहिले. १९८१ मध्ये केंद्र सरकारकडून सहज शिक्षण या पुस्तकास त्यांना पुरस्कार मिळाला. अनुताईंनी शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली. मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी पाळणाघरे काढली. दारूबंदी, विधवाविवाह अशा सामजिक प्रश्नांवर त्यांनी पाड्यांवर जाऊन लोकांचे प्रबोधन केले. आदिवासी जोडप्यांची सामुदायिक लग्ने लावून दिली. १९८० साली डहाणूतील मासोली भागात सुरु केलेल्या मूक -बधीर विद्यालयात गरीब

मुलांच्या राहण्याची जेवणाची सोय केली. स्वावलंबी होण्यासाठी त्यांना उद्योगाचे शिक्षण दिले. आदीवासियांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी केलेल्या कामाची दखल घेऊन विविध पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले. यामध्ये १९७२ साली आदर्श शिक्षिका पुरस्कार, १९७५ साली दलित मित्र पुरस्कार, १९७८ साली इचलकरंजीचा फाय फौंडेशन पुरस्कार, १९८० साली आदर्श माता सावित्रीबाई फुले पुरस्कार, बालकल्याण राष्ट्रीय पुरस्कार, १९८५ साली जमनालाल बजाज पुरस्कार त्यांना मिळाले. त्यांच्या कार्याची दखल भारत सरकारनेही घेतली, २६ जानेवारी १९८५ मध्ये भारत सरकारकडून पद्मश्री पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. २० नोव्हेंबर १९८९ मध्ये एस.एन.डी.टी. विद्यापीठ पुणेकडून डी.लिट. पदवी देऊन गौरविण्यात आले. अशा थोर शिक्षणतज्ज्ञ आणि आदिवासी उद्धारकअनुताईंचे निधन २७ सप्टेंबर १९९२ रोजी कोसबाड येथे झाले.

**समारोप :**

एखाद्या समस्येचा अभ्यास करणे ती समस्या सोडविण्यासाठी तेथील परिस्थिती बघून मार्ग शोधणे आणि अत्यंत चिकाटीने ती समस्या सोडविणे हे अनुताईंचे वैशिष्ट्य होते. आदिवासी मुलांना शिक्षित करण्यासाठी त्यांनी सर्व ते प्रयत्न केले. मुले शाळेत यावीत यासाठी नवनवे उपक्रम राबविले. खरे तर पुण्यासारख्या अत्यंत प्रागतिक शहरात एका प्रसिद्ध शाळेत शिक्षिका असणाऱ्या, चांगला पगार मिळणाऱ्या अनुताईंनी सुखसोयी, आराम याचा त्याग केला आणि ग्रामीण आदिवासी भागात जाऊन स्वतःहून अत्यंत कष्टप्रद जीवन जगणे स्वीकारले. आदिवासी मुलांना शिकवण्यासाठी नव्या शिक्षण पद्धती त्यांनी विकसित केल्या. त्यासाठी तेथील मुलांच्या परिस्थितीचा अगदी बारकाईने त्यांनी अभ्यास केला. ताराबाईं मोडक यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांची वाटचाल सुरू झाली. ताराबाईंच्या या सर्व योजना प्रत्यक्षा अंमलात आणण्याचे काम अनुताईंनी केले. ताराबाईंच्या मृत्यूनंतर संस्थेच्या सर्व कामाची जबाबदारी अनुताईंनी सांभाळली. एवढेच नाही तर हे कार्य वाढवत नेले. सृजनशील अनुताईंनी आदिवासींच्या विकासासाठी, आदिवासी महिलांच्या विकासासाठी अनेक उपक्रम राबविले. लहान वयात आलेले वैधव्य यामुळे अनुताईंना घरचं, संसाराचं किंवा स्वतःच्या मुलाबाळांचं सुख कधीच मिळालं नाही, पण असंख्य आदिवासी मुलांच्या आयुष्याला त्यांनी आकार दिला. खऱ्या अर्थाने त्यांच्या त्या आई बनल्या.

**स्वयं अध्ययन प्रश्न : २**

ब) योग्य पर्याय निवडा

१. अनुताई वाघ यांच्या आईची मैत्रीण दुर्गाबाई नेने यांनी त्यांना शिकण्यासाठी .............येथे नेले.

अ) पुणे ब) अकोला क) बोर्डी ड) कोसबाड

२. १९४५ साली बोरिवलीमध्ये पार पडलेल्या शिबिरात मार्गदर्शन करण्यासाठी ............ आले होते.

अ) अनुताई वाघ ब) म. गांधी, अनुताई वाघ

क) ताराबाई मोडक, अनुताई वाघ ड) म. गांधी, ताराबाई मोडक

३. ताराबाई आणि अनुताईंनी बोर्डी येथे सुरू केलेल्या बालवाडीचे उद्घाटन मुंबई राज्याचे मुख्यमंत्री .............. यांच्या हस्ते झाले.

अ) बाळ गंगाधर खेर          ब) वसंतदादा पाटील

क) सुधाकरराव नाईक          ड) मनोहर जोशी

४. कोसबाड येथे .............. आदिवासींची संख्या जास्त होती.

अ) कातकरी     ब) वारली     क) भिल्ल     ड) कोळी

५. दाभोणचा भाग .......................आदिवासी जमातीचा भाग होता.

अ) कातकरी     ब) भिल्ल     क) गोंड     ड) वारली

### ४.२.३ गोदावरी परुळेकर

भारताचे मूलनिवासी म्हणून ओळखला जाणारा, स्वतःची संस्कृती चालीरीती जपणारा, प्रगत नागरी समाजापासून स्वतःला अलिप्त ठेवणारा, स्वतःची स्वतंत्र बोलीभाषा असणारा, निसर्ग पूजक, जंगलांमध्ये किंवा डोंगराळ प्रदेशात वास्तव्यास असणारा आणि अर्थार्जनासाठी जंगल संपत्तीवरती अवलंबून असणारा समाज म्हणून आदिवासींचा उल्लेख करावा लागतो. भारतात आदिवासींचे वास्तव्य हे प्राचीन कालखंडापासून आहे. आदिवासींमध्ये अनेक जमाती आहेत. भारतातल्या विविध भागांमध्ये त्यांचे वास्तव्य आहे. महाराष्ट्रातील आदिवासींच्या आंध, भिल्ल, धानका, गोंड, गावित, हलबा, कातकरी, कोकणा, कोलाम, कोळी, कोरकू, परधान, पारधी, ठाकूर, वारली इ. जमाती आढळतात. भारतीय राज्यघटनेने आदिवासींना नंतर अनुसूचित जमातीचा दर्जा दिला आहे. कधीकाळी आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेला हा वर्ग ब्रिटिश कालखंडात मात्र सावकारांकडून आणि जमीनदारांकडून लुबाडला गेला. त्यांची एकूणच परिस्थिती अत्यंत वाईट बनली. ब्रिटिशांचे हस्तक असलेल्या सावकार-जमीनदारांनी या वर्गाचे प्रचंड शोषण केले. स्वातंत्र्यपूर्व काळात सुरू झालेले हे शोषण स्वातंत्र्योत्तर काळातही सुरू राहीले.

१९४५ च्या सुमारास गोदावरी परुळेकर यांनी ठाणे जिल्ह्यातील आदिवासी वस्तीच्या डहाणू, तलासरी येथील आदिवासींचे गुलामगिरीचे भीषण जीवन पाहून तेथेच काम करायचे ठरवले. त्यांनी सावकार, जमीनदारांविरुद्ध संघर्ष उभारला. निश्चित भूमिकेतून आणि ध्येयाने लढण्यासाठी आदिवासियांच्या मुलभूत स्वातंत्र्यासाठी चळवळी केल्या. वेठबिगारी हेच आपलं आयुष्य मानणाऱ्या, प्रचंड दारिद्र्यात जगणाऱ्या आदिवासींना जागृत करून त्यांच्या मुक्ततेसाठी, त्यांच्या हक्कांसाठी आपले सर्व आयुष्य व्यतीत केले. वारली या जमातीच्या महिलांच्या जीवनात सुधारणा घडवून त्यांना अंधश्रद्धेच्या जोखंडामधून सुटका करण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळेच आदिवासींच्या त्या गोदाराणी बनल्या होत्या. उच्च शिक्षित गोदावरी परुळेकर यांनी आपल्या आयुष्यातील पन्नासहून अधिक वर्षे शेतकरी, आदिवासी, कामगार यांच्या होणाऱ्या शोषण आणि अत्याचाराविरुद्ध लढण्यासाठी घालवली. नेतृत्व गुण, वैचारिक जाणीव, राजकीय जाणीव, लढा उभारण्याची क्षमता ही त्यांची गुण वैशिष्ट्ये होती.

**पूर्वायुष्य :**

गोदावरी परुळेकरांचा जन्म राजकीय आणि समाजसुधारकाची पार्श्वभूमी असलेल्या एका सुशिक्षित, सुस्थापित कुटुंबात १४ ऑगस्ट १९०७ रोजी पुण्यात झाला. त्यांचे वडील लक्ष्मणराव गोखले हे पुण्यातील प्रसिद्ध वकील होते. राजकीय व सामाजिक नेते नामदार गोपाल कृष्ण गोखले यांचे ते चुलत भाऊ होते. गोदावरी गोखले यांचे शिक्षण पुण्यातील हुजूरपागा मुलींच्या शाळेत झाले. फर्ग्युसन कॉलेजमधून इतिहास आणि अर्थशास्त्र हे विषय घेऊन त्या पदवीधर झाल्या. वडिलांप्रमाणेच त्यांनी नंतर एल. एल.बी. चा अभ्यास पूर्ण केला. त्या महाराष्ट्रातील पहिल्या महिला कायदा पदवीधर बनल्या. हा सगळा कालखंड स्वातंत्र्य आंदोलनाचा होता. पुणे अनेक राजकीय घडामोडींचे केंद्र बनले होते. आधुनिक विचारांच्या गोदावरीही या चळवळीकडे ओढल्या गेल्या. विशेषतः विद्यार्थी चळवळीमध्ये त्या सहभागी झाल्या. चळवळींमध्ये सहभागी होणे हे त्यांच्या वडिलांना आवडत नव्हते. त्यांनी वकिली करावी असे वडिलांचे मत होते. पुढे वैयक्तिक सत्याग्रहामध्ये त्यांनी सहभाग घेतला. १९३२ मध्ये त्यांना ब्रिटिशांनी पकडून तुरुंगात टाकले. या गोष्टींमुळे त्यांचे वडील खूपच रागावले. गोदावरी तुरुंगातून बाहेर आल्यावर त्यांना घरात प्रवेश नाकारण्यात आला. त्यांनी पुणे सोडले आणि त्या मुंबईला गेल्या. एका तरुण मुलीने राजकीय कारणांसाठी तेही स्वातंत्र्य आंदोलनासाठी घराचा त्याग करायचा ही गोष्ट या काळात खूप धाडसाची होती.

**भारत सेवक समाजात प्रवेश आणि कामगारांसाठी कार्य :**

आधुनिक भारताच्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण योगदान असलेल्या नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांनी भारत सेवक समाजाची स्थापना १२ जून १९०५ मध्ये पुणे येथे केली होती. राजकीय आणि सामाजिक क्षेत्रामध्ये कार्य करणारी ही सामाजिक संस्था होती. गोदावरी या संस्थेच्या आजीवन सदस्य बनल्या. अशा प्रकारचा सदस्यत्व स्वीकारलेल्या त्या पहिल्या भारतीय महिला होत्या. सुप्रसिद्ध कामगार नेते ना. म. जोशी तेव्हा तेथे प्रमुख होते. १९३६ ते १९३९ ही तीन वर्ष त्यांनी संस्थेत काम केले.

या काळात त्यांनी मुंबईतील कामगार वर्गासाठी १९३७ साली प्रौढ साक्षरता मोहीम राबवली, जी खूप यशस्वी झाली. गिरगाव ते परळ या भागात ठिकठिकाणी कामगारांसाठी वर्तमानपत्रे वाचन केंद्रे सुरु केली. चिंचपोकळी येथे वाचनालय सुरु केले. यामुळे कामगारवर्गात शिक्षणाची आवड निर्माण झाली. त्यांच्या या कार्याने प्रभावित होऊन तत्कालीन मुंबई राज्याचे मुख्यमंत्री बी.जी. खेर यांनी त्यांना राज्यसरकारतर्फे सुरू केलेल्या प्रौढ साक्षरतेच्या नवीन विभागाचा अध्यक्ष होण्याविषयी विचारले. पण गोदावरींनी या गोष्टीच नकार दिला. कामगारांचे कल्याण हे त्यांचे नंतर जीवित कार्य बनले. कामगारांच्या संपर्कात आल्यामुळे त्यांना या वर्गाच्या विविध प्रश्नांची माहिती होऊ लागली होती. भारत सेवक समाजातर्फे महिलांसाठीही शिवण वर्ग सुरू करण्यात आले. गोदावरींनी अनेक गरजू महिलांना हे प्रशिक्षण घेण्यासाठी प्रेरित केले. १९३८ मध्ये त्यांनी घर कामगारांना संघटित केले तर १९३९ मध्ये ठाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना संघटित केले. केवळ संघटित केले नाही तर त्यांना संप करण्यासाठी, मोर्चा काढण्यासाठी प्रेरित केले. यामुळे गोदावरींना तुरुंगवास झाला. हे काम करत असतानाच त्यांची ओळख भारत सेवक समाजाचे सदस्य असलेल्या कॉम्रेड शामराव परुळेकर

यांच्याशी झाली. तेही कामगारांसाठीच कार्यरत होते. दोघांचेही विचार जुळले. २४ मे १९३९ रोजी गोदावरी गोखले यांचा शामराव परुळेकर यांच्याशी विवाह झाला.

**कम्युनिस्ट पक्षात प्रवेश :**

गोदावरी आणि शामराव परुळेकर यांचे विचार भारत सेवक समाजाच्या विचारधारेशी जुळत नव्हते. विशेषत: १९३९ साली सुरू झालेल्या दुसऱ्या जागतिक महायुद्धातील भारताच्या सहभागावरून समाजातील इतर सदस्यांशी त्यांचे असलेले मतभेद वाढत गेले. कॉम्रेड शामराव आणि गोदावरी हे दोघेही ब्रिटिशांना पाठिंबा देण्याच्या विरोधात होते. त्यांनी युद्धविरोधी पत्रके काढायला, भाषणे द्यायला सुरुवात केली. हे भारत समाजाच्या प्रमुख लोकांना रुचले नाही. मतभेद वाढत गेले. अखेरीस दोघांनीही भारत सेवक समाजाचा त्याग केला आणि १९३९ मध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षामध्ये रीतसर प्रवेश केला. दोघांचेही सहजीवन आणि विविध चळवळींमध्ये एकत्रितपणे सहभागी होणे सुरू झाले. गोदावरींना विश्वास होता की, ब्रिटिश सत्ता उलथवून लावण्यासाठी कामगार आणि शेतकऱ्यांना संघटित केले पाहिजे.

**१९४० मध्ये झालेला कामगारांचा संप :**

३ मार्च १९४० रोजी मुंबईत वाढीव महागाई भत्त्यासाठी कापड कामगारांचा संप सुरू झाला. कम्युनिस्ट पक्षाच्या कॉम्रेड रणदिवे, कॉम्रेड डांगे, कॉम्रेड मिरजकर त्यापाठोपाठ परुळेकर आणि इतर महत्त्वाच्या नेत्यांनाही ब्रिटिश सरकारने तुरुंगात टाकले. संपाचे नेतृत्व कोण करणार असा प्रश्न निर्माण झाला, यावेळी गोदावरी पुढे आल्या आणि त्यांनी संपाचे नेतृत्व केले. हा संप चाळीस दिवस चालला. या संपाचे नेतृत्व गोदावरी आणि इतर कॉम्रेड्सवर सोपवण्यात आले, हे काम गोदावरींनी धैर्याने आणि दृढनिश्चयाने पूर्ण केले. १९४० मध्ये गोदावरींना पकडून तुरुंगात पाठवण्यात आले. पुढे दोन वर्षांनी म्हणजे १९४२ साली त्यांची तुरुंगातून सुटका झाली. एका नवविवाहित दांपत्य, कामगारांसाठी केलेल्या न्याय हक्कांच्या मागण्यामुळे तुरुंगात गेले होते. तुरुंगातून बाहेर आल्यावर या जोडीने आपले कार्य पुढे चालू ठेवले. आपले पूर्ण आयुष्य शेतकरी, कामगार, आदिवासींना संघटित करण्यात आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष करण्यात घालविले.

**किसान सभेच्या महाराष्ट्रातील शाखेची स्थापना:**

११ एप्रिल १९३६ मध्ये लखनऊ येथे अखिल भारतीय किसान सभेची स्थापना झाली होती. महाराष्ट्रात या सभेचा फारसा प्रसार झाला नव्हता. हे कार्य शामराव परुळेकर यांनी सुरू केले. भारतीय किसान सभेच्या माध्यमातून त्यांनी शेतकऱ्यांना संघटित करायला सुरुवात केली. महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या गोदावरी या पहिल्या सहसचिव झाल्या. पुढे १९४५ मध्ये त्यांनी किसानसभेचे अध्यक्षपदी सांभाळले. गोदावरी आणि शामराव परुळेकर यांनी जिल्ह्या- जिल्ह्यात फिरून शेतकऱ्यांच्या भेटी घेऊन किसान सभेचा प्रसार केला. १२ जानेवारी १९४५ रोजी ठाणे जिल्ह्यातील टिटवाळा येथे किसान सभेची पहिली शेतकरी परिषद झाली. यावेळी उंबरगाव तालुक्यातील पंधरा वारली आदिवासी उपस्थित होते. यापैकी माह्या लाडक्या धांगडा या आदिवासीने वेठबिगारीवर भाषण करून वारलींच्या विदारक आयुष्याचे चित्र सर्वांसमोर मांडले. परुळेकर

दांपत्यांनी या आदिवासींना पाठिंबा दिला. किसानसभा तुमच्या पाठीशी राहील आणि किसान सभेचे चिन्ह झेंडा म्हणजेच लालबावटा असेल, हे या वेळेला जाहीर केले. येथून पुढे गोदावरी या आदिवासींशी पूर्णपणे जोडल्या गेल्या.

परुळेकर दांपत्य आदिवासी बहुल असलेल्या तलासरी, डहाणू भागात भेटीसाठी गेले. यावेळी तेथील आदिवासींची अत्यंत वाईट परिस्थिती त्यांनी बघितली. येथील आदिवासी गुलामगिरीचे जीवन जगत होता. यामुळे त्यांनी या भागातच काम करायला सुरुवात केली. येथून पुढच्या काळात गोदावरींनी आदिवासींना जागृत करणे, त्यांचे लढे उभारणे आणि त्यांना त्यांचा हक्क मिळवून देणे यातच आपले आयुष्य व्यतीत केले. आदिवासींना आपण माणूस आहोत याची जाणीव त्यांनी करून दिली. याचबरोबर त्यांच्यातील अंधश्रद्धा दूर करण्याचा प्रयत्न केला.

**वारली आदिवासींचे शोषण :**

गोदावरींनी जेव्हा या भागात काम करायला सुरुवात केली, तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, मुंबईसारख्या एका प्रगत शहरापासून हा भाग केवळ साठ मैलावर असून सुद्धा या भागातील अर्धनग्न, अर्धपोटी आदिवासींची परिस्थिती खूप वाईट आहे. अज्ञान, दारिद्र्य, रोगराईमध्ये खितपत असलेल्या या लोकांकडे सरकारचेही पूर्ण दुर्लक्ष झाले होते. याचाच फायदा जमीनदार-सावकारांनी घेऊन आदिवासींचे प्रचंड शोषण केले होते. बैलाऐवजी आदिवासींना नांगराला जुंपले जायचे. काम केले नाहीतर त्यांना मारहाण केली जायची. वेठबिगारीच्या वेगवेगळ्या पद्धती जमीनदारांनी विकसित केल्या होत्या. उदा. लग्न गड्याची प्रथा, लग्नासाठी घेतलेले कर्ज न फेडता आल्यामुळे पती-पत्नीला दोघांनाही सावकाराच्या घरी राबण्यासाठी जावे लागे. बहुतेकदा आयुष्यभर राबवून सुद्धा हे कर्ज फिटत नसे. काही वेळा पतीला दूर गावात तर त्याच्या पत्नीला सावकाराच्या वाड्यावर कामासाठी ठेवले जात होते आणि तिचे लैंगिक शोषण केले जात असे.

गोदावरी या भागातील अनेक पाड्यातून आपल्या सहकाऱ्यांसह पायी हिंडल्या. अनेक आदिवासी कुटुंबांची भेट घेऊन, त्यांच्या व्यथा त्यांनी जाणून घेतल्या. यातून अन्यायाच्या अनेक कहाण्या त्यांच्यासमोर आल्या. एका घरमालकाने आदिवासी स्त्रीवरती अत्याचाराचा प्रयत्न केला. तिच्या पतीने याला विरोध केला तेव्हा त्याला पकडून जिवंत दफन करण्यात आले. या गोष्टीची तक्रार झाली तेव्हा दफन केलेल्या ठिकाणाहून पोलिसांनी हाडे जप्त केली. ती हाडे प्राण्याची आहे असा रिपोर्ट देण्यात आला. पोलीसही जमीनदारांना साथ देत. थोडक्यात, या आदिवासींना कोणीही वाली नव्हता.

अत्यंत अल्पमजुरीवर या वारली आदिवासींकडून शेतीची आणि इतर सर्व कामे करून घेतले जात. कधीकाळी जमिनीचे मालक असणारे हे वारली लोक जमीनदार-सावकारांच्या जाळ्यात अडकले आणि अक्षरशा कंगाल बनले, वेठबिगार बनले. ही वेठबिगारी एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे चालवली जायची. कर्ज कधीही फिटायचे नाही. एखाद्याने विरोध केला तर जमीनदाराचे नोकर त्याला बदडून काढत. त्यामुळे इतर जण घाबरून विरोध करत नसत. आदिवासींचे जेवण म्हणजे भात किंवा भाताची पेज नाहीतर नाचणीच्या पिठाची आंबील, तीसुद्धा पोटभर मिळत मिळेल असे नाही. जंगलात जो झाडपाला, कंदफळे

मिळत असत त्याचाही नाईलाजाने खाण्यासाठी वापर केला जात होता. उपाशीपोटी, अर्धपोटी झोपणे ही तर नित्याचीच गोष्ट होती. मानसिकदृष्ट्या आणि शारीरिकदृष्ट्या  या वारली आदिवासींचे खच्चीकरण झाले होते.

**वारली आदिवासींना संघटित करण्यासाठीचे प्रयत्न :**

वारलींच्या मनात आत्मविश्वास निर्माण करणे, त्यांना संघटित करणे आवश्यक आहे याची जाणीव गोदावरींना झाली. त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी अनेक आदिवासी गावांना पाड्यांना भेटी दिल्या. अत्यंत दारिद्र्याने  ग्रस्त, या भागातला प्रवास, लोकांना भेटणे त्यांना समजावणे सोपे नव्हते. जे मिळेल त्या वाहनाने नाहीतर पायी प्रवास, आदिवासींच्या झोपडीतच मुक्काम, त्यांच्या घरात जे उपलब्ध असेल ते खाणे, अंघोळीसाठी पाणी मिळेलच याची शाश्वती नाही. अशा अत्यंत विपरीत परिस्थितीत गोदावरींनी या भागाचे दौरे केले. जमीनदार आणि सावकारांच्या भैय्यांच्या हल्ल्याची भीती सतत असायची. तरीही न घाबरता गोदावरींनी वारलींना एकत्र करायला सुरुवात केली.

**झरी येथील आदिवासींची परिषद :**

टिटवाळा येथील सभेस हजर राहिलेले वारली आदिवासी आपापल्या गावी जाताना लपवून लालबावटे घेऊन गेले होते. त्यांनी आसपासच्या परिसरात लालबावट्याचा गुप्तपणे प्रचार केला. यामुळे वेठबिगारी विरोधातले वातावरण तापू लागले होते. वेठबिगारीच्या नावाखाली जमीनदारांनी वारली स्त्री-पुरुषांना जनावरांसारखे राबवून घेतले होते. या जमीनदार-सावकारांची सर्व कामे वारलीकडून फुकटात करून घेतली जात असत. वारलींच्या अंगणात पिकणारा थोडाफार भाजीपालाही या सावकारांच्या घशात जात असे. वेठबिगारीचे काम करणाऱ्याला वेठ्या असे म्हणत. एखाद्या वेठ्याने काम करण्यास नकार दिला तर चाबूकाने त्याला फोडले जात होते. या सर्व आयुष्याला कंटाळलेले आदिवासी गोदावरींना सकारात्मक प्रतिसाद देऊ लागले. गोदावरींनी या लालबावट्याच्या माध्यमातून फक्त आदिवासींची उंबरगाव तालुक्यातील झरी येथे दिनांक २३ मे १९४५ रोजी परिषद घेतली. या परिषदेला पाच हजार आदिवासी उपस्थित राहिले. यापैकी पाचशे स्त्रिया होत्या, ही क्रांतिकारक घटना होती. या परिषदेच्या वेळेला कॉम्रेड परुळेकरांनी भाषण केले. त्यामध्ये वेठबिगारी संपली पाहिजे हे ठासून सांगितले. त्याचे दुरगामी परिणाम आदिवासींवर झाले. परिषद संपल्यावर वेठबिगारी काढून टाका, अशा घोषणा देतच हे वारली लोक आपापल्या पाड्यांवर परतले. यानंतरच्या काळात आदिवासींच्या लढ्याला खऱ्या अर्थाने वेग आला. लालबावटा हा त्यांचा आधार बनला तर गोदावरी या त्यांच्या मार्गदर्शक बनल्या.

**प्रत्यक्ष आंदोलनाला सुरुवात  :**

आदिवासींनी वेठबिगारी करायची नाही हे ठरवले. त्यांनी कामावर जायचे बंद केले. जमीनदारांनी दडपशाहीचे शस्त्र उपसले. जे वेठबिगारी करत नाही त्यांना खावटी दिली जाणार नाही अशीही धमकी त्यांनी दिली. गरीब आदिवासी घरातला तुटपुंजा धान्यसाठा संपल्यावर जमीनदारांकडून उसनवार धान्य घेत असत. ते त्यांना दाम दुपटीने परत करावे लागे याला खावटी म्हणत असत. वारलींनी हे आव्हाने स्वीकारले. उपाशी राहू, पण वेठबिगारी  करणार नाही हा त्यांनी दृढ निश्चय केला.

हे आंदोलन इतर तालुक्यातही पसरले. अनेक आदिवासी स्वयंस्फूर्तीने एकत्रित येऊ लागले. आदिवासींचे असे एकत्र येणे किसान सभेसाठीही आश्चर्याचा धक्का होता. आदिवासींची झालेली प्रचंड पिळवणूक हे या मागचे महत्त्वाचे कारण होते. नरपड येथील समुद्रकिनाऱ्यावर पंधरा-वीस हजार आदिवासी स्वयंस्फूर्तीने जमा झाले. आता आम्ही फुकटातील वेठबिगारी करणार नाही. आम्हाला मजुरीचे दर ठरवून द्या, अशी मागणी त्यांनी केली. हातात काठ्या घेतलेले हजारो आदिवासी हे दृश्य जमीनदारांच्या मनात हे धडकी भरवणारे होते. यावेळी कॉम्रेड दळवी तेथे गेले. त्यांनी या सर्व आदिवासींना समजावून कोसबाड येथील टेकडीवर नेले. जेथे आदिवासींच्या निवडक प्रतिनिधींना बोलावून मजुरी ठरविण्यात आली. यानंतर कुठलाही दंगा किंवा हिंसा न करता सर्व आदिवासी आपापल्या घरी परतले. जमीनदारांना दिलेली ही मोठी चपराक होती. त्यांच्या अनिर्बंध, अन्यायी वर्चस्वाला तडा जायला सुरुवात झाली.

आदिवासींनी एकत्र येऊन लग्नगड्याची प्रथा ही मोडून काढायला सुरुवात केली. लग्नगड्याच्या प्रथेमुळे हजारो जोडपी जमीनदारांच्या जणू नजर कैदेत अडकलेली होती. अत्यंत वाईट हलाखीचे जीवन जगत होती. आयुष्यभर त्यांनी घेतलेले कर्ज फिटत नसे. आदिवासींनी आपले गट तयार केले. गटागटानेच ते जमीनदाराच्या घरासमोर जाऊन तेथे काम करणाऱ्या लग्न गड्याला सुडका-मडका घे, सुटून पड! अशी हाक देत. यावेळी शेकडोलग्न गड्यांनी धाडस करून आपले काम सोडले आणि ते चळवळीत सहभागी झाले. लालबावट्याच्या पाठिंबामुळे आणि आदिवासींच्या एकजुटीमुळे हे शक्य झाले.

**गवत कापणी मजुरी वाढीसाठी आदिवासींचा संप (ऑक्टोबर १९४५) :**

गवत कापणी आणि त्याची विक्री हा एक मोठा व्यवसाय दरवर्षी ऑक्टोबर महिन्यापासून सुरू होत असे. गावाबाहेर जंगलात, खडकाळ भागात, डोंगर उतारावर जे गवत नैसर्गिकरित्या उगवत असेल किंवा खास बियाणे टाकूनही त्याची लागवड केली जात असे. या गवताची कापणी करून, त्याच्या विशिष्ट वजनाच्या पेंड्या करून, त्याची विक्री देशाच्या विविध विभागामध्ये केली जात असे. जमीनदारांना भरपूर नफा मिळवून देणारा हा व्यवसाय होता. विशेषत: दुसऱ्या महायुद्धाच्या काळात या विक्रेत्यांना कोट्यावधी रुपये नफा मिळाला होता. किचकट जागी जायचे, उंच वाढलेले गवत दिवसभर उन्हात, पावसात, थंडीत कापायचे. त्याच्या पेंड्या बांधायच्या. त्याच्या वजनदार भार गाडीपर्यंत येऊन गाडीत भरायचा ही सर्व खूप कष्टाची कामे आदिवासी पुरुष, स्त्रिया, मुले करत असत. या बदल्यात त्यांना अत्यंत तुटपुंजी म्हणजे केवळ एक आणा, दोन आणे नाहीतर गाडगे भरून ताडी मजुरी म्हणून दिली जात असे. अनेक जमीन मालक तर आपल्या वेठयांकडूनच फुकटात हे काम करून घेत असत. आदिवासींना शेतीतले काम सोडून, रोजगारी सोडून हे काम करावे लागे. दलाल-मुकादम या काळात अनेक आदिवासींना जबरदस्तीने पकडून या कामावर जुंपत असत.

किसान सभेसमोर हा प्रश्नही उपस्थित करण्यात आला. मजुरीचे दर वाढवून मागण्याचे ठरले. गवत कापणाऱ्या आदिवासींशी सल्लामसलत करून पाचशे पौंड गवत कापले की अडीच रुपये मजुरी मागावी असे ठरले. अर्थात या अगोदर मालकाला यासाठी किती खर्च येतो किती नफा मिळतो याचाही अगोदरच आढावा

घेण्यात आला होता. वाढीव मजुरीसाठी वारली आदिवासींनी संपाची घोषणा केली. एकही वारली गवत कापणीच्या कामावर गेला नाही. जमीन मालकांनी संप मोडून काढण्यासाठी प्रयत्न सुरू केले. वाढीव मजुरी देण्याची त्यांची तयारी नव्हती. १० ऑक्टोबर १९४५ या दिवशी जमीन मालकांनी अफवा पसरून दिली की, गोदावरी परुळेकरांनी तलवाडा भागात मध्यरात्री सभा बोलावली आहे आणि त्यांचा जीव धोक्यात आहे. त्यांच्या रक्षणासाठी आदिवासींनी जमावे. ही बातमी ऐकून हजारो आदिवासी जे मिळेल ते शस्त्र घेऊन, मिळेल त्या वाहनाने, चालत तलवाडा गावात जमा झाले. गोदावरी किंवा इतर कार्यकर्त्यांना याबाबत काहीच माहित नव्हते. दुसरीकडे जमीनदारांनी आदिवासी हल्ला करण्याच्या तयारीत आले आहेत असा पोलिसांना निरोप पाठवला. आदिवासी शांततेने सभेसाठी एकत्र बसले होते. पोलिसांनी या आदिवासींवर गोळीबार सुरू केला. अनेक आदिवासींना त्यांच्या लहान मुलांना गोळ्या लागल्या. सभेच्या तेथे आदिवासींनी लालबावटा फडकवला होता. काही आदिवासींनी त्या लालबावट्या भोवती संरक्षणासाठी कडे करून ठेवले होते. संघटनेचे कोणीच आलेले नाही हे बघून एक जण खत्तलवाडा येथील ऑफिसमध्ये गेला. कॉम्रेड रणदिवे तेथे होते. ते लगेचच तलवाड्याला पोहोचले. अनेक आदिवासी एवढ्या गोळीबारातही तेथेच थांबून होते. रणदिवेंनी या आदिवासींना समजावल्यावर ते परत गेले.

या घटनेत पाच आदिवासी मारले गेले, शेकडो जखमी झाले. पोलिसांनी या भागात जमावबंदी केली. कॉम्रेड दळवीसहित काही कार्यकर्त्यांना अनेक आदिवासींना अटक करण्यात आली. कॉम्रेड परुळेकर आणि गोदावरी या कालखंडात मुंबईला होते. त्यांना मुंबईला जाऊन ही बातमी सांगितली गेली. इकडे गवत कापणी संपाचा मुंबईतील दूध पुरवठ्यावर विपरीत परिणाम होऊ लागला होता. मुंबईचे तत्कालीन मिल्क कमिशनर एम.डी. भट यांनी परुळेकर दांपत्याला यासाठी बोलावून घेतले. आदिवासी फक्त लालबावट्याचे ऐकणार याची जाणीव त्यांना होती. त्यांनी परुळेकरांना समझोता घडवून आणण्याबाबत सांगितले. या दोघांची तिथे पोहोचण्याची विशेष व्यवस्थाही त्यांनी केली. परुळेकर दांपत्य रेल्वेने संजानला पोहोचले.

ठाणे जिल्ह्याच्या कलेक्टरने जमीन मालकांचे प्रतिनिधी आणि आदिवासींचे प्रतिनिधी म्हणून परुळेकर दांपत्य यांच्यात बोलणी घडवून आणण्याचा प्रयत्न केला, मात्र जमीन मालकांच्या प्रतिनिधींनी त्यांच्याशी बोलण्यास नकार दिला. कलेक्टर श्री. बेडेकर यांच्याशी परुळेकररांनी चर्चा केली. गवत कापणीचा सर्व हिशेब सांगून अडीच ते तीन रुपये मजुरीची मागणी केली. मात्र जमीन मालकांनी ही मागणी ताबडतोब फेटाळली. ते दीड रुपयाच्या वरती जायला तयार नव्हते. वाटाघाटी फिस्कटल्या. जमीन मालकांनी पोलिसांच्या मदतीने दडपशाहीला सुरुवात केली. परुळेकर दांपत्य व इतर काही कार्यकर्त्यांना हद्दपार करण्यात आले. आदिवासींची यावेळी भेट घेणे शक्य नव्हते पण त्यांना निरोप पाठवला की एकजूट ठेवा आणि अडीच-तीन रुपये मजुरी मिळेपर्यंत गवत कापू नका. आदिवासींनी याचे तंतोतंतपणे पालन केले. पोलिसांच्या मदतीने आदिवासींवर खूप अत्याचार करण्यात आले. खोटे आरोप करून तुरुंगात टाकणे, बेदम मारहाण करणे, अगदी आदिवासी कार्यकर्त्यांच्या घरातील स्त्रियांनाही खूप छळले. अनेक आदिवासी जंगलात जाऊन उपाशी-तापाशी लपून बसले. पण त्यांनी माघार घेतली नाही. त्यांच्या बायकांनीही पोलिसांना पुरुष कुठे गेलेत हे सांगितले नाही. गवत कापणीला कोणीही गेलेले नाही, या सर्व बातम्या आदिवासींनी

लपतछपत जाऊन मुंबईला सांगितल्या. मुंबईच्या वृत्तपत्रातून त्या छापल्या जाऊ लागल्या. सर्वत्र संतापाची लाट उसळली. सरकारवरचे दडपण वाढले. इकडे गवत वेळेत कापले गेले नाही तर हजारो रुपयांचे नुकसान होणार याची जमीन मालकांना भीती वाटू लागली. अनेक आदिवासींना या वेळेला तुरुंगात टाकलेले होते त्यांच्या सुटकेची मागणी केली गेली. त्याशिवाय बोलणी करणार नाही हेही आदिवासींनी निक्षून सांगितले. शेवटी एकूण परिस्थिती बघून जमीन मालकांनी माघार घेतली. कार्यकर्त्यांची हद्दपारी मागे घेऊन अटकेतल्या आदिवासींना मुक्त करण्यात आले. आदिवासींच्या मागण्या मान्य करण्यात आल्या. काही जमीन मालकांनी तर चार-साडेचार रुपये मजुरी देऊ केली. गोदावरी आणि त्यांच्या सहकार्याने घेतलेल्या मेहनतीला आणि आदिवासींच्या एकजुटीला फळ आले.

**महालक्ष्मी गावातील आदिवासी परिषद (२१ जानेवारी १९४६) :**

किसान सभेमार्फत महालक्ष्मी गावात डहाणू, उंबरगाव तालुक्यातील आदिवासींची परिषद बोलावली गेली. या परिषदेला पालघर, जव्हार तालुक्यातील आदिवासीही आले होते. जमलेल्या आदिवासींच्या आनंदाचे वातावरण होते कारण अनेक वर्षांपासून त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायास लालबावट्याच्या प्रेरणेमुळे प्रत्युत्तर दिले गेले होते. यावेळी कम्युनिस्ट पक्षासाठी आदिवासींनी स्वयंस्फूर्तीने वर्गणी गोळा करून दिली. या परिषदेच्या वेळी दोन मुख्य ठराव करण्यात आले. पहिला ठराव होता, जमीनदार-सावकारांकडून वाढविलेला गेलेला खंड देऊ नका. विशेषतः मागील तीन वर्षात वाढविलेला खंड देऊ नये तसेच वर्षानुवर्षाची थकबाकी देऊ नये. दुसऱ्या ठरावामध्ये खंडापोटी फक्त भातच द्यावे. कारण खंडापोटी जे मिळेल ते सावकार लोक घेऊन जात असत. आदिवासींनी अंगणात पिकवलेला भाजीपालाही ओरबाडून देत. कोंबड्या, अंडीही उचलून नेत. जमीन मालक अत्यंत अन्यायकारक वसुली करत होते. आदिवासींनी लगेचच याची अंमलबजावणी केली. कोणी याबाबत जबरदस्ती करू लागले तर आदिवासी एकत्रितपणे त्याला विरोध करू लागले. आदिवासी आता स्वतःहूनच या गोष्टी करू लागले होते. किसानसभा त्यांना आधार देत होती. गोदावरी परुळेकर आणि कॉम्रेड परुळेकर यांनी ठिकठिकाणी जाऊन आदिवासींना सोप्या शब्दात अनेक गोष्टी समजावून सांगितल्या. सभेमध्ये गोदावरी परुळेकर सुरुवात करत आणि त्यानंतर कॉम्रेड परुळेकर पुढची माहिती देत. आदिवासींच्या कायदेशीर तक्रारी सोडवण्याचा प्रयत्न किसान सभेमार्फत केला जाऊ लागला. आदिवासींना याबाबत योग्य ते मार्गदर्शन केले जाऊ लागले, कायदेशीर सल्ले दिले जाऊ लागले.

**जंगलतोड मजूर वाढीसाठी मागणी आणि संघर्षाची सुरुवात :**

१९४६ हे वर्ष राजकीय बदलांचे ठरले. कॉंग्रेसचे मंत्रिमंडळ सत्तेत आले होते. श्री. बा.ग. खेर हे मुंबईचे मुख्यमंत्री झाले होते. ठाणे जिल्ह्याचे कलेक्टर श्री. बेडेकर यांची बदली होऊन त्या जागी श्री. अलमोला आले होते. ते पूर्णपणे साम्राज्यवादी विचारांचे होते. जंगलतोड या भागातील एक प्रमुख व्यवसाय होता. याचे ठेके सरकारमार्फत दिले जात. ठेकेदार आदिवासींकडून कमी पैशात हे कष्टाचे काम करून घेत आणि स्वतः मात्र भरपूर नफा मिळवत. मोठ-मोठी झाडे तोडणे, ती साफ-सूफ करून, त्याचे तुकडे करून

गाडीत भरणे हे सर्व कष्टाचे कामे आदिवासी लोक करत. याची मजुरी तीन-चार आण्यापेक्षा जास्त दिली जात नसे. कामावर देखरेख करणारे मुकादम या पैशातही काटछाट करत. किसान सभेने हा प्रश्न हाती घेतला. जंगलतोडीसाठी रोज सव्वा रुपयाची मागणी केली आणि गवत कापणीचा १९४५ साली ठरलेला दर द्यावा अशी मागणी केली. यानंतर संघर्षाची ठिणगी पडली. कलेक्टर अलमोला यांनी या प्रश्नाबाबत विपरीत भूमिका घेत स्वतःचे दर जाहीर केले. पाचशे पौंडाच्या गंजीसाठी दीड ते दोन रुपये तर जंगलतोडीची रोज एक रुपये मजुरी जाहीर केली. हा आदिवासींवरती खूप मोठा अन्याय होता. पुन्हा एकदा संघर्षाला सुरुवात झाली.

सरकारने जाहीर केलेल्या मजुरीमुळे जे जमीनमालक जास्त मजुरी देत होते त्यांनी अधिकचा दर देण्याचे बंद केले. आदिवासींनी पुन्हा एकदा संपाला सुरुवात केली. जंगलतोड बंद केली. अत्यंत वेगात ही बातमी आसपासच्या गावात गेली आणि तेथेही संपाला सुरुवात झाली. गवत कापणी ही पूर्णपणे बंद पडली. सरकारमार्फत संप मिटावा यासाठी प्रयत्न सुरू झाले. लोकांमध्ये प्रचार सभा घेण्याचा प्रयत्न सरकारी नोकरांनी केला पण आदिवासी या सभांना गेले नाहीत. अखेरीस पोलिसांनी दडपशाही सुरू केली. आदिवासींना खोट्या आरोपाखाली अटक करून लॉकअपमध्ये टाकले. आदिवासी पाड्यांवर जमीनदारांकडून हल्ले करणे अशा गोष्टी होऊ लागल्या. काही आदिवासींना पकडून मरेपर्यंत मारले तरीही आदिवासी मागे हटले नाहीत. गवत कापणी थांबल्यामुळे जमीनदारांचे नुकसान होऊ लागले. अखेरीस काही जमीनदारांनी किसानसभेने मागितलेला दर मान्य केला. त्यांची गवत कापणी केली गेली. सरकारने किसानसभेस या प्रकरणी दोषी ठरवून हे लोक प्रतिसरकार (Parallel governent) स्थापन करत आहेत असे जाहीर केले.

जंगलतोड पूर्णपणे बंद होती. प्रांत ऑफिसर ए. एच. खान यांनी परुळेकर दांपत्याबरोबर बोलणी केली. रोज सव्वा रुपया मजुरी दर ठरवला गेला. जखमी आदिवासींना नुकसान भरपाई द्यावी असेही ठरवले गेले. टिंबर मर्चंट असोसिएशननेही यास मान्यता दिली. मात्र या सर्व गोष्टी मुंबई सरकारने अमान्य करत १४ नोव्हेंबर १९४६ रोजी ठाणे जिल्ह्यात आणीबाणी जाहीर केली. सरकारी दडपशाहीला सुरुवात झाली. परुळेकर दांपत्याला २१ नोव्हेंबर १९४६ रोजी ठाणे जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले. किसानसभेच्या इतर नेत्यांवरती ही अशाच प्रकारची जिल्हाबंदी करण्यात आली. आदिवासींना मार्गदर्शन करण्यासाठी कोणीच उरले नव्हते. तरीही आदिवासींनी स्वबळावर हा संप चालू ठेवला. सरकार व जमीनदारांनी आदिवासींना खूप छळले. त्यांच्यावर हल्ले केले. अनेक पाडेही उध्वस्त केले. कलेक्टर अलमोला यांनी आदिवासींना दडपण्यासाठी अनेक वटहुकूम काढले. या आदिवासींचे खटले कोर्टात चालवता येऊ नयेत अशा प्रकारचे निर्णय या वेळेला घेण्यात आले. पण आदिवासी मागे हटले नाहीत त्यांचा संप चालूच राहिला.

तुरुंगात टाकलेल्या आदिवासींना कायदेशीर मदत मिळावी त्यांच्यावरचे खटले चालवावेत यासाठी किसान सभेने अनेक वकिलांना विनंती केली. वकील श्री. निमचवाला, श्री. गोदीवाला या दोघांनीही सकारात्मक प्रतिसाद देत आदिवासींची वकिली करायचे मान्य केले. वकील श्री. निमचवाला खुद्द डहाणूत राहायला गेले, आदिवासींना मदत करू लागले. हे बघून जिल्हा मॅजिस्ट्रेट यांनी वकील श्री. गोदीवाला यांना सभांमधून भाषणे करतो हे खोटे कारण दाखवून त्यांना हद्दपार केले, एवढेच नाही तर त्यांना घाबरवण्यासाठी

त्यांच्यावर हल्ले केले. वकील श्री. निमचवाला यांनाही ११ नोव्हेंबर १९४६ रोजी हद्दपार केले. हे प्रकरण मुंबईच्या वृत्तपत्रातून खूप गाजले. गृहमंत्री मोरारजी देसाईंना याबाबत पत्रे लिहिली गेली. हे प्रकरण शेवटी मागे घेण्यात आले. या दोघांचीही हद्दपारी मागे घेण्यात आली. या दोघांनीही पुन्हा डहाणूत राहून आदिवासींना मदत करायला सुरुवात केली.

एकीकडे आदिवासींवर अत्याचार सुरू होते तर दुसरीकडे ६ फेब्रुवारी १९४७ रोजी गोदावरी परुळेकरांना अटक करण्यात आली. त्यांच्यावर हिंसेला प्रोत्साहन देणारी भाषणे दिल्याचा आरोप ठेवण्यात आला. बॅरिस्टर रजनी पटेल यांनी लगेचच त्यांना बाहेर काढले. सरकारने खटला चालविला परंतु प्रबळ पुरावे न दिल्यामुळे अखेरीस खटला मागे घेतला. या दरम्यानच्या कालखंडात शेकडो आदिवासींना तुरुंगात टाकले होते. शेकडो आदिवासी भूमिगत झाले होते. लपून छपून जमीनदार आणि सरकारला असलेला विरोध त्यांनी चालू ठेवला होता. या लपून बसलेल्या पुरुषांचे पत्ते सांगावेत म्हणून त्यांच्या बायका मुलांना खूप त्रास दिला गेला. पण एवढे होऊनही आदिवासी बदलले नाहीत. आदिवासी जणू गनिमी काव्याने सरकार आणि जमीनदारांचा प्रतिकार करत होते. आदिवासी पाड्यातून जे जे घडत होते ते गोदावरींना मुंबईला जाऊन सांगण्याचे काम काही आदिवासी करत. किसान सभेचे काही कार्यकर्ते पोलिसांना न कळू देता या काळात आदिवासींच्या मदतीने जंगलात जाऊन आदिवासींना भेटून आले.

यानंतर आदिवासींनी आपल्या मागण्यांची पत्रके तयार करून सर्वत्र लावली. यामध्ये लाकूडतोड्याला सव्वा रुपये रोज मजुरी, गवत व लाकडे वाहून येणाऱ्या बैलगाडीस भाडे, पकडलेल्या आदिवासींची मुक्तता आणि आदिवासी नेत्यांवरची हद्दपारी मागे घ्यावी अशा मागण्या केल्या. पोलिसांनी आदिवासींवर गोळीबार करू नये अशी मागणी करणारे पत्रकही लावले. ही सर्व परिस्थिती पोलिसांच्या नियंत्रणाबाहेर गेली. आदिवासींची भक्कम एकजुट यासाठी कारणीभूत होती. गोदावरी आणि त्यांच्या सहकार्यांनी आदिवासींच्यात आत्मविश्वास आणि अन्यायाविरुद्ध लढण्याचे बळ निर्माण केले होते. हा संघर्ष केवळ जमीनदार सावकारांच्या विरोधातला नव्हता तर तो सर्व व्यवस्थेच्या विरोधातला होता.

**गोदावरीताईंचा आदिवासी भागातील गुप्त दौरा:**

सरकारने परुळेकर दांपत्याला ठाणे जिल्ह्यातून हद्दपार केले होते. त्यामुळे आदिवासींना प्रत्यक्ष भेटणे त्यांना जमेना. गोदावरी या आदिवासींच्या प्रेरक शक्ती बनल्या होत्या. अनेक आदिवासींनी त्यांना भेटीला येण्याचा निरोप दिला. परंतु त्या उघडपणे जाऊ शकत नव्हत्या कारण अटक झाली तर सुटका कधी होईल याची शाश्वती नव्हती. शेवटी त्यांनी आदिवासींच्या भेटीला गुप्तपणे जायचे ठरवले. कॉम्रेड परुळेकरांनी त्यांना भक्कम पाठिंबा दिला. १९५१ साली एका स्त्रीने एकटीने गाडीने किंवा चालत, पोलीस, जमीनदारांपासून लपून-छपून प्रवास करणे, रात्री बे रात्री जंगलपाड्यातून फिरणे ही खूप धाडसाची गोष्ट होती. गोदावरींनी महालक्ष्मी गावापासून आपल्या भेटीला सुरुवात केली. आदिवासींच्या मदतीने जंगलातील चोरवाटेने चालत -चालत विविध वस्त्यांवरती जायचे, आदिवासींच्या झोपड्यातून राहायचे, जे मिळेल ते खायचे, आदिवासींशी चर्चा करायची आणि पुढील गावात जायचे. याप्रकारे उंबरगाव, डहाणू तालुक्यातील अनेक

आदिवासी पाड्यांचा त्यांनी दौरा केला. पोलीस, जमीनदारांची हस्तक ठिकठिकाणी होते. त्यांना चुकवत पुढे जावे लागे. प्रसंगी वेशांतर ही करावे लागे. घनदाट जंगलातून वाट काढताना काटे, फांद्या अंगाला घासत, कपडे फाटत, डास इतर किडे जाऊन रक्त येई. चालून त्यांचे पाय सुजलेले असत, थकवा येई. तरीही गोदावरीताईंनी आपला हा दौरा पूर्ण केला. काही ठिकाणी त्यांना विपरीत अनुभवी आले. अनेक आदिवासींचा लालबावट्यावरचा विश्वास आणि अन्यायाविरुद्धचा लढा गोदावरींना उमेद देऊन गेला. आदिवासींबरोबर चालणारी ही बाई कोण आहे? अशा चौकशीही वाटेतल्या मुकादमकडून केली जात असे, तेव्हा माघारीन म्हणजे माहेरी आलेली आणि आता सासरी परत जाणारी बाई आहे असे सांगून आदिवासींनी निभावले. गोदावरींच्या भेटीने आदिवासींच्या नवा उत्साह संचारला. या भागातून त्या सुरत जिल्ह्यातील वापी येथे गेल्या आणि तेथून रेल्वेने मुंबईला परतल्या. त्या सही सलामत परततील याची किसान सभेच्या कोणालाच खात्री वाटत नव्हती. मात्र त्या पोलीस पहाऱ्याच्या, सावकारी व जमीनदार हस्तकांच्या बंदोबस्तातून सुखरूप परतल्या. आदिवासींच्या चळवळीत त्यांनी नव्याने प्राण ओतला. १९५३ साली परुळेकर दांपत्य आदिवासींना प्रत्यक्ष त्यांना भेटण्यासाठी महालक्ष्मी येथे गेले तेंव्हा  हजारो आदिवासी जमा झाले. आदिवासींच्यात आत्मभान निर्माण करण्याचे कार्य त्यांनी केले होते.

**नगरहवेली मुक्ती संग्राम आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सहभाग :**

पोर्तुगीज सरकार गोवा, दमण, दीव प्रदेशांना स्वातंत्र्य देण्याच्या विरोधात होते. सालाझारचे सरकारने कम्युनिस्ट पक्षाला मान्यता दिली नसल्याने कम्युनिस्ट पक्ष भूमिगत राहून कार्य करीत होता. कम्युनिस्ट पक्षाने जाहीरनामा प्रसिद्ध केला होता. त्यामध्ये गोव्यातील पोर्तुगीज सैन्य मागे घ्यावे. तेथील जनतेला स्वयं निर्णयाने आपले भवितव्य ठरवू द्यावे आणि गोव्याचा प्रश्न वाटाघाटीने सोडवावा. अशी मागणी सालाझार सरकारकडे केली होती. दमण जिल्ह्याचे दमण आणि नगर हवेली असे दोन तालुके होते. दादरचा समावेश नगर हवेली तालुक्यात होत असे. नगर हवेली तालुक्यात आदिवासीं बहुसंख्येने होते. मोहाच्या फुलांपासून दारू तयार करणे हा व्यवसाय तेथे मोठ्या प्रमाणावर चालत असे. आदिवासींच्या मागासलेपणाचा फायदा घेत  सावकार आणि सरकारी अधिकारी शोषण करत असत. त्यांचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांची प्रगती घडवून आणण्यासाठी शामराव परुळेकर आणि त्यांच्या पत्नी गोदावरी परुळेकर यांनी संपर्क केला होता. पोर्तुगीज राजवटीतून मुक्त करण्यासाठी साम्यवादी विचारसरणीच्या गोअन पीपल्स पार्टीने परुळेकर दांपत्याच्या मदतीने नगर हवेलीत आदिवासींचा उठाव करण्याचा प्रयत्न केला. गोअन पीपल्स पार्टीचे पहिले अधिवेशन १९५४ मध्ये खानापूर येथे झाले होते. त्यावेळी शेतकरी कामकरी वर्गाच्या सहकार्यावर आधारित कार्यक्रम त्यांनी गोवेकरांच्या पुढे ठेवला होता.

२३ जुलै १९५४ रोजी नगरहवेली मुक्त करण्याचा दृष्टीने संजान येथे कॉम्रेड परुळेकरांच्या मार्गदर्शनाखाली ऑफिस सुरू करून उधवा येथे स्वयंसेवक भरतीचा कॅम्प सुरू केला. अनेक वारली आदिवासी यामध्ये सहभागी झाले. त्यांनी येताना  सुरे, भाला, कुऱ्हाडी, जुन्या पद्धतीच्या बंदुका आणल्या. २६ जुलै  १९५४ रोजी किसान सभेच्या आणि गोअन पीपल्स पार्टीच्या नेत्यांनी वारली लोकांच्या सहकार्याने लुबारी तसेच दमणगंगा नदीच्या दक्षिणेकडील आणि ईशान्येकडील छोटी गावे पोर्तुगीज राजवटीतून मुक्त

केली. कम्युनिस्टांनी यामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. ३ ऑगस्ट १९५४ रोजी हवेलीची राजधानी सिल्वासा जिंकल्यानंतर दुसऱ्याच दिवशी गोदावरी परुळेकर यांच्या वारली लोकांच्या सहाय्याने आणि कॅप्टन गोळे यांच्या नेतृत्वाखाली सरहद्दीवरील गावे काबीज करत खांडवेल पोलीस चौकी ताब्यात घेतली. ४ ऑगस्टला गोअन पार्टीच्या लोकांनी वारलींना बरोबर घेऊन दापाडा गाव स्वतंत्र झाल्याची घोषणा केली. नगर हवेलीतील पोर्तुगीज सत्ता संपुष्टात आली. १५ ऑगस्ट १९५४ ला भारताचा स्वातंत्र्यदिन नगरहवेलीत आनंदाने साजरा झाला.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीने पन्नाशीच्या दशकाच्या उत्तरार्धात वेग घेतला. ठाणे जिल्ह्याचा आदिवासी भागही त्यात अग्रेसर होता आणि शेकडो आदिवासीना तुरुंगवास घडला. १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती होईपर्यंत ठाणे जिल्ह्यातील संयुक्त महाराष्ट्र लढ्याचे नेतृत्व गोदावरीनी केले. तलासरी, उंबरगाव, डांग आदी गुजरात सीमेवरील भागात संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन करण्यात आले. कॉम्रेड गोदावरी परुळेकर यांच्यामुळे आदिवासींनीदेखील संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत मोठा सहभाग घेतला.

**कॉम्रेड शामराव परुळेकर यांचा मृत्यू :**

१९६२ मध्ये भारत चीन युद्धाला सुरुवात झाली. यावेळी भारत संरक्षण कायद्यांतर्गत अनेक कम्युनिस्टांना नोव्हेंबर १९६२ मध्ये अटक करून तुरुंगात ठेवले. परुळेकर दांपत्याला ही अटक झाली. यादरम्यानच ३ ऑगस्ट १९६५ रोजी कॉम्रेड परुळेकर यांचा हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने आर्थर रोड जेल, मुंबई येथे मृत्यू झाला. हा गोदावरींना बसलेला खूप मोठा धक्का होता. त्यांचा आधारस्तंभ गेला होता. कॉम्रेड परूळेकरांच्या इच्छेनुसार गोदावरीताईंनी त्यांच्या अनुभवांवर आधारित 'जेव्हा माणूस जागा होतो' या पुस्तकाचे लेखन पूर्ण केले. चळवळींना आणि पक्ष कार्याला वाहून घेतलेल्या परुळेकर दांपत्याने मुल होऊ दिले नव्हते. हजारो आदिवासी कामगार शेतकरी हेच त्यांची अपत्य बनली होती. ३० एप्रिल १९६६ मध्ये गोदावरी ताईंची तुरुंगातून सुटका झाली. त्यांनी पक्षाचे आणि किसान सभेचे काम पुन्हा सुरू केले. पक्षाच्या केंद्रीय समितीत त्यांची निवड झाली. पुढे किसान सभेचे अध्यक्षपदही त्यांनी सांभाळले. १९७२ च्या दुष्काळाच्या वेळी किसान सभेने दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी केलेल्या संघर्षाचे त्यांनी नेतृत्व केले. सरकारकडे अनेक मागण्या केल्या. १९७५ ते १९७७ या काळात गोदावरींनी ठाणे जिल्ह्यातील वाडा तालुक्यात बंधुवा मजुरांच्या म्हणजेच वेठबिगारांच्या मुक्तीसाठी चळवळ उभी केली आणि जवळपास एक हजार मजुरांना यातून मुक्त केले.

**डहाणू तालुक्यातील संघर्ष :**

डहाणू तालुका चिकू उत्पादनासाठी प्रसिद्ध होता. चिकू बागातून काम करणाऱ्या कामगारांना अत्यंत कमी मजुरी मिळत असे. किसान सभेने या मजुरांना संघटीत करायला सुरुवात केली. १९७८ मध्ये चिकूवाडी संघटना स्थापन झाली. जानेवारी १९८२ मध्ये सरवली भागातील तीन ते चार हजार मजूर संपावर गेले . प्रत्येक दिवशी किमान आठ रुपये मजुरी मिळावी अशी मागणी केली गेली. हा संप पंचावन्न दिवस चालला. अखेरीस काही चिकू उत्पादक बागायतदारांनी किमान मजुरी देण्याचे मान्य केले.

**लेखन आणि पुरस्कार :**

गोदावरी परुळेकर यांनी आदिवासींचा संघर्ष आणि चळवळीतील अनुभव 'जेव्हा माणूस जागा होतो' (१९७०) त्यांच्या पुस्तकांमधून शब्दबद्ध केले आहे. या पुस्तकाला १९७२ मध्ये साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. हे पुस्तक अनेक भाषांमध्ये अनुवादित केले गेले आहे. Adivasis Revolt : The Story of Warli Peasants in Struggle (१९७५), (आदिवासी विद्रोह: संघर्षातील वारली शेतकऱ्यांची कथा) आणि बंदिवासाची आठ वर्षे हे महिला सहकारी कैद्यांच्या अनुभवांवर आधारित आहेत

परुळेकर यांना भारतातील उपेक्षित आणि दलित समाजासाठी केलेल्या सेवेबद्दल लोकमान्य टिळक पुरस्कार आणि सामाजिक समता आणि महिलांच्या मुक्तीसाठी त्यांच्या कार्यासाठी सावित्रीबाई फुले पुरस्कार मिळाला. १९८४ चे सोव्हीएट लँड नेहरू पारितोषिक देण्यात आले. १९८६-८७ मध्ये महाराष्ट्र शासनाने त्यांना आदिवासी सेवक पुरस्कार देऊन गौरविले.

**भूषविलेली पदे :**

१९८६ साली पाटणा येथे झालेल्या अखिल भारतीय किसान सभेच्या राष्ट्रीय अधिवेशनात गोदावरींची किसान सभेच्या अध्यक्षपदी निवड झाली. त्या किसान सभेच्या एकमेव महिला अध्यक्ष होत्या. गोदावरी परुळेकर यांनी विविध डाव्या संघटनांमध्ये अनेक महत्त्वाच्या पदांवर काम केले. १९८३ ते १९८६ पर्यंत त्या कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सवादी) च्या महाराष्ट्र राज्य युनिटच्या सचिव होत्या. ऑल इंडिया डेमोक्रॅटिक वुमेन्स असोसिएशन (AIDWA) च्या राष्ट्रीय कार्याध्यक्ष बनल्या आणि २००१ मध्ये त्या त्याच्या संरक्षक बनल्या. १९७५ मध्ये सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्सच्या जनरल कौन्सिलवर निवड झाली आणि १९७९ मध्ये त्या तिच्या उपाध्यक्ष झाल्या. याशिवाय १९६१ पासून त्या एकोणीस वर्ष मुंबई महापालिकेत नगरसेविका म्हणून निवडून आल्या.

**समारोप :**

उच्चशिक्षित गोदावरी परुळेकरांनी शेतकरी, कामगार, आदिवासी यांच्या उद्धारासाठी आयुष्यभर प्रयत्न केले. विशेषत: वारली आदिवासींच्यात जागृती घडवून आणण्यात त्यांचे योगदान महत्वाचे राहिले. अनेक वर्षांच्या गुलामीतून वारली आदिवासींना बाहेर काढले. आदिवासी यामुळे जागृत झाले. स्थानिक स्वराज्य संस्था तसेच विधानसभा, लोकसभेच्या निवडणुकांमधून आदिवासी निवडून आले. त्यांनी स्वतःच्या राजकीय, सामजिक, आर्थिक हक्कांबाबत जागृत होणे हे गोदावरींच्या चळवळीला मिळालेले खूप मोठे यश होते. आयुष्याच्या अखेरपर्यंत कार्यरत राहिल्या. त्यांनी आपल्या मृत्यूपत्रात आपली सर्व संपत्ती कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सवादी) च्या नावे केली. ८ ऑक्टोबर १९९६ रोजी त्यांचे निधन झाले. तलासरी येथे त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले.

**स्वयं अध्ययन प्रश्न ३**

क) योग्य पर्याय निवडा

१. गोदावरी परुळेकर यांनी १९५४ मध्ये नगरहवेली ................राजवटीतून मुक्त करण्यासाठी कम्युनिस्ट पक्षाच्या सशस्त्र लढ्याचे नेतृत्व केले.

अ) फ्रेंच ब) पोर्तुगीज क) जर्मन ड) इंग्रज

२. लग्नाच्यावेळी घेतलेले कर्ज फेडण्यासाठी वारलींना ..............बनावे लागे.

अ) साल गडी ब) शिपाई क) वेठी ड) लग्न गडी

३. गोदावरी परुळेकरांनी विद्यार्थी दशेत ............ आंदोलनात भाग घेतला.

अ) वैयक्तिक सत्याग्रह ब) वंगभंग क) छोडो भारत ड) होमरूल

४. परुळेकर दांपत्याने ..................याची शाखा महाराष्ट्रात सुरू केली.

अ) इंडियन असोसिएशन ब) भारत सेवक समाज क) किसान सभा ड) बिहार सभा

५. गोदावरी परुळेकरांनी लिहिलेल्या ............ पुस्तकास साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला.

अ) कोसबाडच्या टेकडीवरून ब) जेंव्हा माणूस जागा होतो क) बेबंदशाही ड) अग्निपंख

### ४.२.४ डॉ. गेल ऑम्व्हेट

१९७० च्या दशकात सुस्थापित कुटुंबातील एक अमेरिकन मुलगी पीएच.डी. करण्यासाठी भारतात आली. तिने इथल्या सामाजिक चळवळींचा अभ्यास केला. अभ्यास पूर्ण करून पदवीही मिळवली. परत अमेरिकेला गेली. अत्यंत संवेदनशील असलेली ही तरुणी पुन्हा भारतात परत आली आणि या भारतातील परिवर्तनवादी चळवळीचा भाग बनली. एवढेच नाहीतर नंतर एका भारतीय तरुणांशी विवाह करून, अंतर्बाह्य भारतीय बनली. अमेरिकेतील आर्थिक लाभाच्या सर्व संधींचा त्याग करून तिने भारतीय नागरिकत्व स्वीकारले आणि इथल्याच मातीत ती सामावून गेली. ती तरुणी होती गेल ऑम्व्हेट. भारतीय बुद्धीजींवीच्या वर्तुळात आणि त्याचप्रमाणे सर्वसामान्यांच्या चळवळीतील कार्यकर्त्यांच्यात सुद्धा अत्यंत आदराने घेतले जाणारे नाव म्हणजे डॉ. गेल ऑम्व्हेट! भारतातील कष्टकऱ्यांच्या त्याचप्रमाणे स्त्रियांच्या चळवळीशी स्वतःला कायमचं जोडून घेणाऱ्या अमेरिकन डॉ. गेल या वेगळ्याच व्यक्तिमत्वाच्या होत्या असे म्हणावे लागेल. अस्सल कासेगांवकरीन असा त्यांचा आजही उल्लेख केला जातो. डॉ. गेल ते कॉम्रेड गेल हा त्यांचा प्रवास साधा सोपा सहज नव्हता. अनेक गोष्टींचा त्याग त्यांनी यासाठी केला.

डॉ. गेल ऑम्व्हेट यांचा जन्म अमेरिकेतील मिनीऑपोलीस मिनीयासोटा (Minneapolis Minnesota, United States) येथे २ ऑगस्ट १९४१ रोजी झाला. वडिलांचे नाव मिस्टर जॅक तर आईचे नाव डॉरथी. मि. जॅक हे वकिली करत होते. डॉ. गेल या तीन भावंडात सर्वात मोठ्या होत्या. हुशार,

अभ्यासू, मितभाषी असणाऱ्या गेल ऑम्व्हेट यांनी मिनीऑपोलीस येथील कार्लटन महाविद्यालयातून पदवी प्राप्त केली तर मिनीऑपोलीस विद्यापीठातून समाजशास्त्र विषयातून एम. ए. केले. कॅलिफोर्निया विद्यापीठात त्यांनी काही काळ प्राध्यापक म्हणूनही काम केले. विद्यार्थीदशेत असतानाच गेल ऑम्व्हेट युद्धविरोधी चळवळी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गटात सहभागी झाल्या होत्या. विशेषत: अमेरिकेच्या व्हिएतनाम युद्धाच्या विरोधात जो गट सक्रिय होता त्यामध्ये त्या अग्रभागी होत्या. लोकशाही हक्क चळवळीत, वंशवादविरोधी चळवळीत त्यांचा सहभाग होता. थोडक्यात, युद्ध नको ही त्यांची भूमिका विद्यार्थी दशेतच तयार झाली होती. भारताविषयी त्यांच्या मनात अगोदरपासूनच कुतूहल होते. भारतात त्यांचे अनेक मित्रही होते. भारत हा त्यांच्या अभ्यासाचा विषय बनला. विशेषत: भारतातील जातीव्यवस्था, स्त्रियांची परिस्थिती, अब्राह्मणी चळवळी याबद्दल त्यांना कुतूहल होते. १९६३ मध्ये वयाच्या बाविसाव्या वर्षी गेल ऑम्व्हेट पहिल्यांदा भारतात आल्या. या काळात त्या मराठी शिकल्या. युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, बर्कले (University of California, Berkeley) येथे त्यांनी वसाहतीक समाजातील सांस्कृतिक बंड : आणि पश्चिम भारतातील अब्राह्मणी चळवळ १८७३-१९३० (Cultural Revolt in Colonial society : The Non Brahmin movement in western India 1873-1930) या विषयावर पीएच.डी.साठी नोंदणी केली. या विद्यापीठातून गेल ऑम्व्हेट यांना शिष्यवृत्ती मिळाली. १९७१ मध्ये त्या पुन्हा भारतात आल्या आणि पुढील प्रत्यक्ष अभ्यासासाठी त्या महाराष्ट्र राज्यात दाखल झाल्या. हा त्यांच्या आयुष्यातील एक मोठा टर्निंग पॉईंट होता.

पीएच.डी. संशोधनाच्या निमित्ताने गेल ऑम्व्हेट यांनी अनेक ग्रंथालये, संस्था, पुस्तके यांचा अभ्यास केला. ब्राह्मणेत्तर चळवळीचा वारसा सांगणाऱ्या अनेकांच्या त्यांनी भेटी घेतल्या. कोल्हापूर, सातारा, सांगली, पुणे, मुंबई इ. शहरांना भेटी दिल्या. प्रबंध लिहून पूर्ण झाल्यानंतर त्यांनी कॅलिफोर्निया विद्यापीठात सादर केला. १९७३ मध्ये त्यांना पीएच.डी. पदवीही मिळाली. हा प्रबंध नंतर पुस्तकरूपाने प्रकाशित झाला. महाराष्ट्रातल्या सामाजिक चळवळीतील अनेकांशी त्या बोलल्या, त्यांची दु:खे जाणून घेतली. प्रबंधाचे काम सुरू असताना त्यांचा अनेक सामाजिक कार्यकर्त्यांशी संबंध आला.

पश्चिम महाराष्ट्रातली स्वातंत्र्यपूर्व काळातील एक महत्त्वाची चळवळ म्हणजे प्रतिसरकार चळवळ. या चळवळीचा अभ्यास करत असताना त्यांची भेट या चळवळीच्या कार्यकर्त्या आणि क्रांतिवीरांगना इंदुताई पाटणकर यांच्याशी झाली. स्वातंत्र्यलढ्यात स्वतःला झोकून देणाऱ्या इंदुताई पाटणकर यांनी स्वातंत्र्यानंतर सामाजिक चळवळींना वाहून घेतले होते. सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्या सतत धडपडत होत्या. १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून संयुक्त राष्ट्र संघटनेने जाहीर केले होते. या निमित्ताने पुण्यात ८ मार्च म्हणजेच महिला दिनादिवशी स्त्रीमुक्ती चळवळीत काम करणाऱ्या महाराष्ट्रातील महिलांचा मेळावा आयोजित केला होता. यावेळी कासेगांववरून इंदुताई पाटणकर अनेक महिलांना सोबत घेऊन हजर राहिल्या होत्या. यामध्ये त्यांनी गाणी म्हटली, भाषण केले. या कार्यक्रमाला गेल ऑम्व्हेटही हजर होत्या. पहिल्यांदाच गेल यांचा परिचय इंदुताईंशी झाला. दोघींच्यात मैत्रीबंध जुळले. शारदा साठे, लीलाताई भोसले व इतर काही स्त्री चळवळीतील कार्यकर्त्यांनी महाराष्ट्रातील वेगवेगळ्या ठिकाणच्या स्त्री संघटनांना भेटी

देण्याचे ठरविले. यावेळी डॉ. गेलही त्यांच्याबरोबर कासेगावला गेल्या. यावेळी त्यांचे स्वागत हे तेथे जमलेल्या तीनशे महिलांनी केले. या महिलांशी संवादाचा कार्यक्रम झाला. गोरीपान, उंच, निळ्या डोळ्याची, अमेरिकन बाई मराठीत बोलते याचे कासेगावच्या महिलांना खूप कौतुक वाटले. महिलांनी, मुलींनी जणू त्यांना घेरावच घातला. डॉ. गेलनी सर्वांशी मोकळेपणाने संवाद साधला. इंदुताई आणि त्यांचे विचार पटकन जुळले. इंदुताईंबरोबर अनेक गावांना भेटी देऊन सर्वसामान्य स्त्रियांच्या प्रश्नांनाही गेल ऑम्व्हेट यांनी जाणून घेतले. या प्रवासादरम्यानच इंदुताई पाटणकर यांचा डॉक्टर झालेला मुलगा पण सच्चा सामाजिक कार्यकर्ता असलेला भारत आणि त्यांच्यात मैत्री झाली. त्यांच्याशी डॉ. गेल यांचा संपर्क वाढत गेला. भारत पाटणकर आणि गेल ऑम्व्हेट यांचे विचार जुळले आणि १९७६ साली ते दोघेही अत्यंत साध्या पद्धतीने पुणे येथे विवाहबद्ध झाले. गेल ऑम्व्हेट यांचे भारतीय नामकरण शलाका भारत पाटणकर असे करण्यात आले.

भारतीय संस्कृती, भारतीय विचारसरणी यांच्याशी त्यापूर्णपणे जोडल्या गेल्या होत्या. लग्नानंतर डॉ. गेल, इंदुताई आणि भारत पाटणकर यांनी एकत्रित येऊन अनेक चळवळी यशस्वी केल्या. दुष्काळ निर्मूलन, समन्यायी पाणी वाटप, परित्यक्त्यांची चळवळ अशा अनेक चळवळीत त्या सक्रिय सहभागी झाल्या. यावेळी डॉ. गेल आणि भारत पाटणकर यांची लहानगी मुलगी प्राची हिला सुद्धा सोबत घेतले जायचे. भारत पाटणकरांचे चळवळींमध्ये सतत व्यस्त राहणे, वेळप्रसंगी तुरुंगात जाणे, कोर्ट केसेसच्या निमित्ताने सतत कोर्टात जाणे, परगावी असणे हे सर्व डॉ. गेलनी मनापासून स्वीकारले होते. लग्नानंतर त्या काही काळ अमेरिकेत सुद्धा गेलेल्या होत्या. तिथे राहून त्यांनी प्राध्यापक म्हणून कार्य केले. १९८३ मध्ये त्यांनी भारतीय नागरिकत्व स्वीकारले.

**डॉ. गेल ऑम्व्हेट यांचे लिखाण :**

डॉ. गेल ऑम्व्हेट यांचा पीएच.डी. प्रबंध १९७६ साली पुस्तक रूपाने प्रसिद्ध झाला. मुंबई येथील द सायंटिफिक सोशॅलिस्ट एज्युकेशन ट्रस्टने प्रकाशित केला. २०११ साली मनोहर प्रकाशनने हा प्रबंध पुन्हा प्रसिद्ध केला. भारतातील जात-वर्ग व्यवस्था, वसाहतकारांची धोरणे, जात नष्ट होऊ नये यासाठी विशिष्ट वर्गांकडून केले जाणारे प्रयत्न, वासाहतिक शिक्षणाचा फायदा झालेला उच्चभ्रू वर्ग, परिघावरतीच राहिलेल्या लोकांचे स्थान अशा अनेक गोष्टींची मांडणी त्यांनी यामध्ये केलेली होती. संशोधनाचा हा दृष्टिकोन पूर्णतः नवा होता. याची खूप चर्चा झाली. भारतातील बुद्धिजीवींच्या वर्गात या प्रबंधाबाबत खूप औत्सुक्य निर्माण झाले. डॉ. गेल यांच्या या पुस्तकाचे कॉम्रेड पी. डी. दिघे यांनी १९८७ साली मराठीत भाषांतर केले त्याचे प्रकाशन सुगावा प्रकाशनातर्फे करण्यात आले.

भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषदेच्या (ICSSR) वतीने भक्ती या विषयावर त्यांनी संशोधन केले. १९७१ मध्ये इकॉनॉमिक आणि पॉलिटिकल विकली या वृत्तपत्रात त्यांचा 'ज्योतिराव फुले आणि भारतातील सामाजिक क्रांतीची विचारधारा' हा अभ्यासपूर्ण शोधनिबंध प्रसिद्ध झाला. महात्मा फुलेंच्या चळवळीचे ऐतिहासिक महत्त्व त्यांनी जगभर नेले. १९८९-९० मध्ये महात्मा फुले यांचे स्मृती शताब्दी वर्ष होते. यावेळी गेल यांनी 'ज्योतिबा फुले आणि स्त्रीमुक्तीचा विचार' ही बेचाळीस पानाची पुस्तिका लिहिली.

महात्मा फुलेंचा स्त्रीवाद या पुस्तिकेतून त्यांनी अधिक ठळकपणे मांडला. पुरुष कधी सता गेला आहे का? हा महात्मा फुलेंनी उपस्थित केलेल्या प्रश्न डॉ. गेल यांना खूप महत्त्वाचा वाटला. अभ्यासाचा एक नवा दृष्टिकोन यामुळे समोर आला. जो इतर अभ्यासकांनाही उपयुक्त ठरला. 'द हिंदू' या इंग्रजी वर्तमानपत्रामध्ये त्यांचे विविध विषयावरचे लेख प्रकाशित झाले.

मध्ययुगीन काळातील एक विद्रोही विचाराचे संत म्हणजे संत रविदास! त्यांनी दुःख विरहित राज्याची कल्पना केली. जिथे कोणतीही वेदना नाही, मालकी भाव नाही, दहशत नाही किंवा चिंता नाही या कल्पनेवर आधारित एक पुस्तक डॉ. गेल यांनी लिहिले ते म्हणजे सिकिंग बेगमपुरा. (Seeking Begumpura : The Social Vision of Anticaste Intellectuals) हे पुस्तक मराठीमध्ये 'बेगमपुराच्या शोधात' या शिर्षकाखाली प्रकाशित झाले आहे. समतावादी समाजाची संकल्पना यात त्यांनी मांडली. महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतेसाठीच्या चळवळी, स्त्रियांचे आणि श्रमिक लोकांचे प्रश्न त्यांनी दिलेले लढे, त्याचबरोबर भारतीय जातसंस्था, भारतीय स्त्रिया हे डॉ. गेल ऑम्व्हेट यांच्या अभ्यासाचे विषय राहिले. या संदर्भात त्यांनी प्रचंड वाचन केले आणि लेखनही केले. त्यांनी केलेल्या लिखाणामुळे भारतातील अनेक गोष्टींचा अभ्यास जागतिक पातळीपर्यंत पोहोचला.

डॉ. गेल ऑम्व्हेट यांनी अनेक विषयांवर इंग्रजी, हिंदी आणि मराठी या भाषांत ग्रंथांचे लेखन केले आहे. इंग्रजी आणि हिंदी भाषांमधील काही पुस्तके पुढीलप्रमाणे आहेत. Cultural Revolt in a Colonial Society: The Non Brahman Movement in Western India, 1873 to 1930 (Edition- 1976), स्त्री-मुक्ती चळवळीवरचे पुस्तक We Will Smash This Prison! Indian Women in Struggle (Edition- 1980) या पुस्तकाचा उद्देश जगातील अन्य देशातील स्त्रियांना भारतीय उपखंडातील स्त्रियांचे जीवन जगण्याची परिस्थिती आणि स्त्रियांचे संघर्ष याविषयी माहिती देणे हा होता. अनेक स्त्रियांशी संवाद साधल्यानंतर त्यांनी या पुस्तकाचे लेखन केले., Violence against Women: New Movements and New Theories In India (1990), Reinventing Revolution: New Social Movements and the Socialist Tradition in India (1993), Dalits and the Democratic Revolution: Dr. Ambedkar and the Dalit Movement in Colonial India (1994), Gender and Technology: Emerging Visions from Asia. (1995), दलित दृष्टि (1995), Growing up Untouchable in India: A Dalit Autobiography (2000), Buddhism in India: Challenging Brahmanism and Caste (2003), Jotirao Phule and the Ideology of Social Revolution in India (2004), Ambedkar: Towards an Enlightened India (2005), आंबेडकर : प्रबुद्ध भारत की ओर (हिंदी -२००५), Seeking Begumpura : The Social Vision of anticaste Intellectuals (2009), Understanding Caste: From Buddha To Ambedkar and Beyond (2011), दलित और प्रजातांत्रिक क्रांती (२०१५), भारतातील बौद्धधम्म (२०१६), जाति की समज : महात्मा बुद्ध से बाबासाहेब आंबेडकर और उनके बाद (२०१८) याबरोबरच त्यांनी आपले पती भारत पाटणकर यांच्यासह The Songs of Tukoba (translator, 2012) हे पुस्तक

त्यांनी लिहिले. याद्वारे संत तुकारामांना नव्या विचार विश्वात नेऊन ठेवले आहे. संत तुकारामांचा अभ्यास करत असताना त्या वारकरी चळवळीशीही जोडल्या गेल्या. डॉ. गेल ऑम्व्हेट यांनी देश-विदेशांत अनेक शोधनिबंध सादर केले. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे परिषदांना उपस्थित राहून मागदर्शन करत असत. त्यांनी विविध ठिकाणी अनेक व्याख्यानेही दिली.

समाजशास्त्र आणि इतिहास अशा दोन्ही अंगांनी त्यांनी संशोधन केलेले आहे. इतर समाजशास्त्रज्ञांपेक्षा त्यांनी लिखाण करताना वेगळ्या पद्धतीचा वापर केला. ऐतिहासिक पद्धत वापरून त्यांनी अनेक तथ्य समोर आणली. महाराष्ट्रातील सत्यशोधक आणि ब्राह्मणेतर चळवळीची त्यांनी दुनियेला ओळख करून दिली. यामध्ये त्यांचे योगदान मोठे आहे. संत तुकाराम, गौतम बुद्ध, महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची नव्याने त्यांनी मांडणी केली. डॉ. गेल यांच्या मते, जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता यांच्या बरोबरीने देशात निर्माण केलेल्या अनेक समस्या व दुःखांचे निराकरण करण्यासाठी बाबासाहेबांनी दिलेले योगदान महत्त्वाचे आहे. जीवनाचा अधिकार व जगण्याचा अधिकार यांचा राज्यघटनेत समावेश हे त्यांचे भारतीय समाजावर फार मोठे उपकार आहेत. त्यांनी भारत पाटणकर यांच्याबरोबर महात्मा फुलेंचा ग्रंथ 'शेतकऱ्यांचा आसुड' याचेही इंग्रजीमध्ये भाषांतर केले. याशिवाय वेगवेगळ्या विषयांवरती त्यांनी केलेले लिखाण आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसिद्ध झाले आहे. सत्तरपेक्षा अधिक अभ्यासपूर्ण पुस्तकपरीक्षणे ही त्यांनी लिहिली. हे सर्व करत असतानाच भारतातल्या विविध भागांना भेटी देणे, त्यांच्या समस्या जाणून घेणे, लोकांना चळवळीसाठी संघटीत करणे हे त्यांचे कार्यही अखंडपणे सुरु होते. या कालखंडात त्यांना एस. टी. किंवा रेल्वेचा प्रवास करावा लागे. ज्या ठिकाणी या सोयी नाहीत तेथे चालतही जावे लागे. या सर्व अडचणींवर मत करत डॉ. गेल कार्यरत राहिल्या. अमेरिकासारख्या एका प्रगत राष्ट्रातून आलेली मुलगी इथल्या विरुद्ध परिस्थितीत सामावून गेली होती.

**विविध चळवळीतील डॉ. गेल ऑम्व्हेट यांचा सहभाग :**

भारत पाटणकर मुंबईमध्ये एम.डी. चा अभ्यास करत होते. त्यावेळी ते मार्क्सवादी विचारांच्या मागोवा या गटात ही सहभागी झाले होते. लाल निशाण कापड कामगार चळवळीसाठी ही ते काम करत होते. या पक्षाचे दादर येथे कार्यालय होते. ज्याचे नाव होते श्रमिक. येथेच डॉ. गेल वास्तव्यही करत होत्या. भारत पाटणकर आणि डॉ. गेल यांनी या कापड कामगार संघटनेत काम करत असतानाच इतर दहा सहकाऱ्यांना बरोबर घेऊन १९८० मध्ये श्रमिक मुक्ती दलाची स्थापना केली. पुढे कासेगाव येथे राहून चळवळीत सहभागी होण्याचे त्यांनी ठरविले. श्रमिक मुक्ती दलाच्या नेतृत्वाखाली नऊ-दहा जिल्ह्यांमध्ये कष्टकऱ्यांची चळवळ उभी करून शोषित समाजाला न्याय देण्याचे काम करण्यामागे डॉ. गेल यांचे योगदान खुपच मोठे आहे.

सुधारकी विचारांच्या भारत व डॉ. गेल या जोडप्याने अनेक चळवळीमध्ये सहभाग घेतला. मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळीत हे दोघेही एकत्रित होते. यावेळी नंदुरबार मधील शहादा येथून पायी समता मार्च निघाला. इंदुताई, भारत पाटणकर यांच्याबरोबर लहान असणाऱ्या प्राचीसह गेल ऑम्व्हेटही या पायी समता मार्चमध्ये सहभागी झाल्या. या मोर्चाच्या वेळी प्राची खूप आजारी पडली. भारत पाटणकर डॉक्टर असूनही

कामाच्या व्यस्ततेमुळे तिच्याकडे पूर्ण लक्ष देऊ शकले नाहीत. डॉ. गेलनाच सर्व जबाबदारी उचलावी लागली. अशा अनेक अवघड प्रसंगांना त्या सामोऱ्या गेल्या. १९८३ मध्ये झालेली समन्यायी पाणी वाटपाची चळवळ, परित्यक्त्यांची चळवळ यातही डॉ. गेल होत्या. शरद जोशी यांच्या शेतकरी संघटनेच्या निमंत्रणावरून त्या चांदवड जिल्हा नाशिक येथे ९-१० नोव्हेंबर १९८६ रोजी झालेल्या शेतकरी महिला परिषदेत सामील झाल्या. त्यांनी त्या परिषदेतदेखील लक्ष्मी मुक्ती आंदोलन, जमीन न नांगरता केलेली बागायती सीता शेती अशा अभिनव उपक्रमांत सहभाग घेतला.

**परितक्त्यांची परिषद :**

महाराष्ट्रातील ग्रामीण भागात परित्यक्त्यांचा प्रश्न खूप गंभीर होता. नवऱ्याने नाकारलेल्या या स्त्रियांना कुठलेच हक्क मिळत नव्हते. यांची आर्थिक परिस्थिती ही खूप वाईट असायची. श्रमिक मुक्ती दलाच्या माध्यमातून डॉ. गेल आणि इंदुताईंनी याविषयी महिलांना जागृत करण्यासाठी अनेक गावांना भेटी दिल्या. अनेक परित्यक्त्या महिलांची भेट घेऊन त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाची त्यांना जाणीव करून दिली. संघर्षासाठी त्यांना प्रेरित केले. महिलांना एकत्रित करण्यासाठी प्रसंगी गाव जत्रांचेही आयोजन केले. या संदर्भातील कागदपत्रे गोळा केली. १९८८ मध्ये परित्यक्त्या स्त्रियांना न्याय मिळावा म्हणून गेल ऑम्व्हेट, इंदुताई पाटणकर, निशा शिवूरकर यासारख्या कार्यकर्त्यांनी मुंबई, पुणे, नाशिक, संगमनेर, औरंगाबाद, कोल्हापूर, नागपूर या ठिकाणी मोठ्या प्रमाणात चळवळी केल्या. परित्यक्त्यांना सन्मानाने जगता यावे हा यामागे हेतू होता. २ सप्टेंबर १९८८ मध्ये सांगली जिल्ह्यातील विटा या गावात स्त्री मुक्ती संघर्ष चळवळी मार्फत अधिवेशन घेण्यात आले. १६ फेब्रुवारी १९८९ मध्ये स्त्री मुक्ती संघर्ष चळवळ आणि परित्यक्त्या आंदोलन यांच्याकडून सांगली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी स्त्रियांच्या समस्यांची यावेळी खूप चर्चा झाली. परिषदेच्या माध्यमातून सरकारकडे काही मागण्याही केल्या गेल्या आणि तत्कालीन सरकारला याची दखल घ्यावी लागली. सांगली जिल्ह्यात एकट्या राहणाऱ्या महिलांना बहे गावालगत घरे बांधून देण्यात आली. अशा रीतीने परित्यक्त्या स्त्रियांना स्वतःचे घर आणि त्यांच्या नावाचे रेशन कार्ड या दोन मागण्या चळवळीमुळे पूर्ण झाल्या. डॉ. गेल यांनी विशेषत: ऐंशीच्या दशकात पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त, कष्टकरी, शेतकरी, परित्यक्त्या स्त्रियांच्या चालवलेल्या चळवळीत इंदुताई पाटणकर यांच्यासोबत स्त्री मुक्ती संघर्ष चळवळीचे नेतृत्व केले.

**जाती अंताबाबतची डॉ. गेल ऑम्व्हेट यांची मते :**

जातीअंताचा विचार अनेक विचारवंतांनी मांडलेला होता. मात्र डॉ. गेल यांनी खूप वेगळा विचार या संदर्भात मांडला. त्यांच्या मते, भारतातील जातींची उतरण ही वर्गीय उतरंडी पेक्षाही खोलवर रुजलेली आहे. त्यामुळे जातीव्यवस्था संपवण्यासाठी चळवळ करायची असेल तर मी जातीव्यवस्था मानत नाही असे म्हणून चालणार नाही तर जातींचे अस्तित्व नाकारण्याच्या भूमिकेतून बाहेर यावे लागेल. जात-वर्ग यांच्यातील हितसंबंधाचे जाळे नीट समजावून घेऊन ते बदलण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. जातीव्यवस्था संपवण्यासाठीची चळवळ अशी वरवरची भाषा त्यांनी केली नाही तर पूर्ण परिवर्तनच झाले पाहिजे असे मत

त्यांनी मांडले. यातूनच भारत आणि डॉ. गेल यांनी विद्रोही सांस्कृतिक चळवळीची स्थापना केली आणि महाराष्ट्रभर त्याची साहित्य संमेलनेही घेतली. डॉ. गेल आणि भारत पाटणकर यांनी १९९६ मध्ये बौद्ध धर्माचा स्वीकार केला. त्यांनी गौतम बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचा स्वीकार कुठल्याही भावनेच्या आहारी न जाता, डोळस, वैचारिक, बौद्धिक, विवेकवादी ज्ञानाधारित, विज्ञानवादी भूमिकेतून केला.

**डॉ. गेल ऑम्व्हेट यांनी सांभाळलेली पदे आणि त्यांना मिळालेले पुरस्कार :**

डॉ. गेल यांनी देशभरातील विविध विद्यापीठात प्राध्यापक म्हणून काम केले. त्यामध्ये प्रामुख्याने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात फुले- आंबेडकर चेअरच्या प्रमुख, समाजशास्त्र विभागाच्या प्राध्यापक, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्स्ड स्टडीज (सिमला), नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सोशल वर्क अँड सोशल सायन्सेस (भुवनेश्वर), इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ (दिल्ली), नेहरू मेमोरिअल म्युझियम आणि लायब्ररी (नवी दिल्ली) अशा भारतातील नामांकित संस्थांमध्ये काम केलं आहे. संयुक्त राष्ट्रांची अन्न आणि कृषी संघटना (FAO), संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (UNDP), नोविब (Oxfam NOVIB) अशा संस्थेत सल्लागार म्हणून काम केले.

त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. यामध्ये सावित्रीबाई फुले पुरस्कार, नाशिक (२००२), डॉ. आंबेडकर चेतना पुरस्कार, पंजाब (२००३), एबीपी माझा सन्मान पुरस्कार (२०१२), मातोश्री भिमाबाई आंबेडकर पुरस्कार, (२०१२), विठ्ठल रामजी शिंदे पुरस्कार (२०१५), भारतीय समाजशास्त्रीय संस्थेचा जीवन गौरव पुरस्कार (२०१८) इ. चा समावेश आहे.

**समारोप :**

विसावे शतक अनेक बदलांचे चळवळींचे शतक होतेच पण ते स्थलांतराचेही शतक होते. विशेषत: भारतातून अनेक बुद्धिमान तरुण-तरुणी नव्या संधीच्या शोधात अमेरिकेत गेले आणि कायमचे तिकडेच स्थायिक झाले. तिथले संपन्न आणि प्रगत आयुष्य हे त्यामागचे एक महत्त्वाचे कारण होते. मात्र अमेरिकेत जन्माला आलेल्या उच्चशिक्षित डॉ. गेल ऑम्व्हेट याला अपवाद ठरल्या. आपल्या पीएच.डी.च्या अभ्यासासाठी भारतात आलेल्या डॉ. गेल या अंतरबाह्य भारतीय बनल्या. एका भारतीयाबरोबर विवाह करून सर्वसामान्य ग्रामीण आयुष्य त्यांनी स्वीकारले. भारतातल्या परिवर्तनाच्या चळवळींचा अभ्यास करणाऱ्या डॉ. गेल या चळवळीच्या कार्यकर्त्याही बनल्या. कष्टकरी जनता, स्त्रियांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरोधातला लढा हे त्यांचे आयुष्य बनले. नंतर त्यांचा कॉम्रेड असा उल्लेख केला जाऊ लागला. भारतीय समाजातील जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था, धर्मव्यवस्था, वर्ग आणि वंश श्रेष्ठत्व, फुले आंबेडकर यांचे तत्त्वज्ञान याची अभ्यासपूर्ण चिकित्सा त्यांनी केली. परिवर्तनासाठी नेमके काय केले पाहिजे याबाबत स्वतःची ठाम मते मांडली. मार्क्सवादाच्या त्यांनी केलेल्या चिकित्सेमुळे त्यांच्या काही विचारवंतांशी वैचारिक संघर्ष ही झाला. मार्क्सवाद आणि दलित चळवळीला एकत्रित करून हा लढा पुढे नेण्यासाठी त्यांनी आणि त्यांचे पती भारत पाटणकरांनी सतत प्रयत्न केले. त्यांचा अभ्यास, त्यांनी मांडलेले तत्त्वज्ञान हा सामाजिक चळवळीचा आधारस्तंभ बनला. डॉ. गेल यांचा अभ्यास केवळ पुस्तकी नव्हता तर प्रत्यक्ष अनुभवावर आधारित होता.

सर्वसामान्य लोकांची, स्त्रियांची परिस्थिती जाणून घेण्यासाठी त्या खेड्यापाड्यात, दुर्गम भागात प्रत्यक्ष फिरल्या होत्या आणि त्यानंतरच आपली मते मांडली होती. मार्क्सवाद-फुले-आंबेडकरवाद या सर्वांशी त्या खूप जोडल्या गेल्या. त्यांचे लिखाण हे आजही अनेक चळवळींना त्याचप्रमाणे अभ्यासकांनाही मार्गदर्शक ठरत आहे. केवळ बोलकी नव्हे तर कर्ती समाजसुधारक असे डॉ. गेल ऑम्व्हेट यांचे वर्णन करावे लागेल. मुक्ती संघर्ष चळवळीच्या वतीने दुष्काळ निर्मूलन चळवळ, दुष्काळ निर्मूलनासाठी बळीराजा धरणाची निर्मिती यासाठी झालेल्या संघर्षात नेहमीच पुढाकारात राहिल्या. आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या समाजशास्त्रज्ञ, श्रमिक मुक्ती दलाच्या संस्थापक सदस्या व धोरण समितीच्या सदस्या, विचारवंत कार्यकर्त्या डॉ. गेल ऑम्व्हेट यांचे निधन २५ ऑगस्ट २०२१ रोजी सांगली जिल्ह्यातील कासेगाव येथे झाले. जेष्ठ साहित्यिक राजन गवस हे डॉ. गेल यांच्याबद्दल म्हणतात की, सैद्धांतिक मांडणी करणारे खूप असतात पण सैद्धांतिक उभे करणारे दिसत नाहीत. डॉ. गेल अशा सिद्धांत उभे करणाऱ्यांपैकी एक होत्या. माती, पाणी, स्त्री आणि विठ्ठल, बुद्ध या चार पायांवर त्यांनी सिद्धांताला सक्षमपणे उभे केले होते.

**स्वयं अध्ययन प्रश्न ४**

ड) योग्य पर्याय निवडा

१. डॉ. गेल ऑम्व्हेट या मुळच्या .................. येथील होत्या.

अ) फ्रान्स ब) इंग्लंड क) भारत ड) अमेरिका

२. पीएच.डी. संशोधनाच्या निमित्ताने डॉ. गेल ऑम्व्हेट .................ये देशात आल्या.

अ) भारत ब) अमेरिका क) जपान ड) इंग्लंड

३. डॉ. गेल ऑम्व्हेट यांनी विद्रोही विचाराचे संत रविदास यांच्या विचारांवर आधारित ............. हे पुस्तक लिहिले.

अ) दलित दृष्टि ब) भारतातील बौद्धधम्म

क) सिकिंग बेगमपुरा ड) आंबेडकर : प्रबुद्ध भारत की ओर

४. महात्मा फुलेंच्या.............. ग्रंथाचे डॉ. गेल आणि भारत पाटणकर यांनी इंग्रजीमध्ये भाषांतर केले.

अ) ययाती ब) शेतकऱ्यांचा आसुड

क) दलित दृष्टि ड) संत तुकाराम

५. १९८० मध्ये डॉ. गेल आणि भारत पाटणकर यांनी ...........दलाची स्थापना केली.

अ) श्रमिक मुक्ती ब) सेवा क) लोकशाही ड) साम्यवादी

**स्वयं अध्ययन प्रश्न ५**

अ) योग्य जोड्या जुळवा

१.

| अ -गट | ब - गट |
|---|---|
| १) शांताबाई दाणी | अ) कोसबाडच्या टेकडीवरून |

| | | | |
|---|---|---|---|
| २) अनुताई वाघ | | ब) रात्रंदिन आम्हा | |
| ३) गोदावरी परुळेकर | | क) जेंव्हा माणूस जागा होतो | |
| ४) गेल ऑम्व्हेट | | ड) सिकींग बेगमपुरा | |

पर्याय –

| | | | |
|---|---|---|---|
| अ) १–अ, | २–ब, | ३–क, | ४–ड |
| ब) १–ब, | २–अ, | ३–क, | ४–ड |
| क) १–क, | २–ड, | ३–अ, | ४–ब |
| ड) १–क, | २–अ, | ३–ब, | ४–ड |

२. अ –गट — ब – गट

| अ –गट | ब – गट |
|---|---|
| १) शांताबाई दाणी | अ) आदिवासींचा लढा |
| २) अनुताई वाघ | ब) परीत्यक्त्यांची परिषद |
| ३) गोदावरी परुळेकर | क) धर्मांतराची चळवळ |
| ४) गेल ऑम्व्हेट | ड) कोसबाड यथील शिक्षण संस्था |

पर्याय –

| | | | |
|---|---|---|---|
| अ) १–अ, | २–ब, | ३–क, | ४–ड |
| ब) १–ब, | २–अ, | ३–क, | ४–ड |
| क) १–क, | २–ड, | ३–अ, | ४–ब |
| ड) १–क, | २–अ, | ३–ब, | ४–ड |

ब) योग्य विधान निवडा

१. अ) शांताबाई दाणी दलित समाजातील होत्या.

ब) शांताबाई दाणी यांनी महाराष्ट्र विधान परिषद सदस्य म्हणून कार्य केले.

पर्याय –

अ) पहिले विधान योग्य आणि दुसरे विधान अयोग्य

ब) पहिले विधान अयोग्य आणि दुसरे विधान योग्य

क) दोन्ही विधाने योग्य आहेत

ड) दोन्ही विधाने अयोग्य आहेत

२. अ) अनुताई वाघ यांनी प्राथमिक शिक्षक म्हणून आपल्या कार्याला सुरुवात केली.

ब) अनुताई वाघ पुणे येथील शाळेतून सेवानिवृत्त झाल्या.

पर्याय –

अ) पहिले विधान योग्य आणि दुसरे विधान अयोग्य

ब) पहिले विधान अयोग्य आणि दुसरे विधान योग्य

क) दोन्ही विधाने योग्य आहेत

ड) दोन्ही विधाने अयोग्य आहेत

३. अ) गोदावरी परुळेकर या महाराष्ट्रातील पहिल्या महिला कायदे पदवीधारक होत्या.

ब) गोदावरी परुळेकर यांनी आदिवासींचा लढा उभा केला.

पर्याय –

अ) पहिले विधान योग्य आणि दुसरे विधान अयोग्य

ब) पहिले विधान अयोग्य आणि दुसरे विधान योग्य

क) दोन्ही विधाने योग्य आहेत

ड) दोन्ही विधाने अयोग्य आहेत

४. अ) डॉ. गेल ऑम्व्हेट या मुळच्या इंग्लंडमधील होत्या.

ब) डॉ. गेल ऑम्व्हेट यांनी १९८३ मध्ये भारताचे नागरिकत्व स्वीकारले.

पर्याय –

अ) पहिले विधान योग्य आणि दुसरे विधान अयोग्य

ब) पहिले विधान अयोग्य आणि दुसरे विधान योग्य

क) दोन्ही विधाने योग्य आहेत

ड) दोन्ही विधाने अयोग्य आहेत

## ४.३ सारांश:

समाजाच्या प्रवाही असण्याचे लक्षण म्हणजे समाजातील लोकांचे जागृत असणे, समाजातील वाईट प्रथा-परंपरांना विरोध करणे, शोषितांना तसेच वंचितांना न्याय मिळवून देणे होय! लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी राजकीय-सामजिक चळवळी या अत्यंत आवश्यक आहेत. राष्ट्राची जडणघडण ही चळवळींमुळे होत असते. भारताच्या इतिहासाचा आढावा घेतला असता अनेक समाज सुधारणा चळवळी झालेल्या दिसतात. याची सुरुवात शिक्षित भारतीय पुरुषांनी केली. स्त्री उद्धाराच्या चळवळीची सुरुवातही पुरुषांनी केली. हळूहळू स्त्रियांचा या चळवळीत सहभाग वाढत गेला. राजकीय, सामजिक, शैक्षणिक सुधारणांमध्ये त्यांनी प्रत्यक्ष योगदान दिले. यामुळे चळवळी अधिक व्यापक आणि अर्थपूर्ण बनल्या. यामध्ये स्त्रियांचा मार्ग खडतर होता. पुरुषप्रधान सामाजिक मानसिकतेला तोंड देत त्यांनी मोठ्या नेटाने आपले कार्य पुढे नेले आणि यशस्वी केले. शांताबाई दाणी, अनुताई  वाघ, गोदावरी परुळेकर, गेल ऑम्व्हेट यांच्या

जीवन कार्याचा जेंव्हा आढावा घेतो तेंव्हा आपणास हेच दिसते. वंचितांना न्याय मिळवून देण्यासाठीचे त्यांचे प्रयत्न खूप महत्वाचे ठरले. समाजाकडून दुर्लक्षित घटकांना त्यांनी न्याय मिळवून दिला. त्यांना समाजाच्या प्रवाहात आणले. माणूस म्हणून जगण्याचा हक्क मिळवून दिला. या सर्वांचे कार्य हे संपूर्ण समाजासाठी प्रेरक ठरले आहे. खरेतर या चौघीही उच्चशिक्षित होत्या. चांगली नोकरी, चांगला पगार, आरामाचे आयुष्य जगणे त्यांना सहज शक्य होते. परंतु या सर्वांचा त्याग करत त्यांनी अत्यंत संघर्षमय जीवनाचा स्वीकार केला. त्यांनी केलेले कार्य हे पायाभूत ठरले.

## ४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

ऑल इंडिया शेड्युल्ड कास्ट फेडरेशन - डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या पक्षाची स्थापना १७ ते २० जुलै १९४२ च्या नागपूर परिषदेमध्ये केली. यापूर्वी अस्तित्वात असलेला त्यांचा स्वतंत्र मजूर पक्ष बरखास्त करून या नवीन पक्षाची स्थापना करण्यात आली होती. राजकीय हितांकरिता लढणारा पक्ष म्हणून शेड्यूल्ड कास्ट फेडेरेशनची स्थापना करण्यात आली.

दादासाहेब गायकवाड-भाऊराव कृष्णराव गायकवाड यांचा जन्म १५ ऑक्टोबर १९०२ रोजी आंबे (जानोरी) ता. दिंडोरी जि. नाशिक येथे झाला. दादासाहेब गायकवाड हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सहकारी होते. भारतीय अस्पृश्यतेच्या आणि समाजक्रांतीच्या प्रश्नाकडे बघण्याची त्यांची दृष्टी होती. पडिक जमिनी कसण्यास मिळण्यासाठी केलेल्या सत्याग्रहात दादासाहेब अग्रभागी होते.

भूमिहीनांचा सत्याग्रह : कसेल त्याची जमीन, पडीक जमिनी भूमीहिनांना मिळाल्या पाहिजे, अन्नधान्याचे पुरेसे वाटप, किमान वेतन, महार वतने नष्ट व्हावी, इ. प्रमुख मागण्यांसाठी बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर रिपब्लिकन पक्षाच्या बॅनरखाली दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली हा सत्याग्रह होता.

पाडा -वीस ते पंचवीस आदिवासी वस्तीचे झोपड्यांचे गाव

वारली -ही महाराष्ट्रामधील चौथ्या क्रमांकाची आदिवासी जमात असून प्रामुख्याने ठाणे, नाशिक, मुंबई, पालघर जिल्ह्यात तसेच, दादरा नगरहवेली व गोवा इत्यादी भागामध्ये वारली समाजाची वस्ती आढळते. त्यांचा मुख्य व्यवसाय शेती असला तरी मोलमजुरी, गवत कापणे, लाकूडतोड, जंगलातील वस्तूंचा व्यवसाय इ. कामे करतात. वेठबिगार म्हणून त्यांचे सतत शोषण होत आलेले आहे. वारली ही जमात जंगलामध्ये अत्यंत हालअपेष्टेत जीवन जगतात. वारली चित्रकला हे वारली जमातीचे वैशिष्ट्य आहे. या चित्रकलेचा प्रचार जगभरात झालेला आहे.

रचनावाद-कृतीयुक्त सहभाग असणा-या अध्ययन अनुभवांची रचना म्हणजे रचनावाद

विकासवाडी-पाळणाघर, बालवाडी, अंगणवाडी, कुरणशाळा, रात्रशाळा, उद्योगवर्ग, कार्यानुभव प्रकल्प अशा सर्वांचा एकत्रित विकास करणारी वाडी म्हणजे विकासवाडी.

कुरणशाळा (Meadow School) - धान्याच्या पेरणीनंतर सहा ते दहा वयोगटातील आदिवासी मुले व काही मुली पूर्ण दिवस गुरांना रानात चारायला नेत. त्यामुळे मुलांची अनुपस्थितीवर उपाय म्हणून शाळेलाच रानात नेण्याचा केलेला यशस्वी प्रयोग.

शबरी उद्योगालय- सभोवतालच्या पर्यावरणात उपलब्ध असणाऱ्या गोष्टीपासून शैक्षणिक साधने तयार करण्यात आली.

ताराबाई मोडक- प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ व पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या प्रवर्तक. त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील कार्याबद्दल २६ जानेवारी १९६२ रोजी पद्मभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

अखिल भारतीय महिला परिषद (All India Women's Conference): ही भारतातील सर्वात जुनी महिला संघटना आहे. १९२७ मध्ये पुण्यातील मागरिट कजिन्स यांनी महिला, मुलांचे शिक्षण आणि सामाजिक कल्याण यांना चालना देण्यासाठी याची स्थापना केली होती.

सालाझार अँतॉन्यू द : १९३२ ते १९६८ या काळातील पोर्तुगालचे पंतप्रधान

भारतीय कामगार संघटना (Centre of Indian Trade Unions - (CITU): १९७० मध्ये स्थापन झालेली ही भारतातील राष्ट्रीय स्तरावरील कामगार संघटना आहे.

ऑल इंडिया डेमोक्रॅटिक वुमेन्स असोसिएशन (AIDWA) : १९८१ मध्ये महिलांची स्थापन झालेली राष्ट्रीय स्तरावरील जनसंघटना.

ऑक्सफॅम नोविब : ऑक्सफॅम ही दुसऱ्या महायुद्धात युद्ध पीडितांना मदत देण्यासाठी इंग्लंडमध्ये १९४२ साली स्थापन झालेली स्वयंसेवी संस्था असून, नोविब ही संस्था जागतिक पातळीवर विविध विषयांवर काम करत आहे.

क्रांतिवीरांगना इंदुताई पाटणकर: सांगली जिल्ह्यातील कासेगाव इथल्या इंदुताई स्वातंत्र्य सेनानी व सामाजिक कार्यकर्त्या होत्या. इंदुताईनी वयाच्या १६ व्या वर्षी स्वातंत्र्य आंदोलनात भाग घेतला. प्रति सरकार आंदोलन, दलित चळवळींमध्ये सहभाग घेतला. राष्ट्र सेवादलाचा प्रसार तसेच महिलांना संघटित करण्याचे काम केले.

परित्यक्त्या : परित्यक्तता म्हणजे नवऱ्याने सोडलेली स्त्री होय.

लक्ष्मी मुक्तीआंदोलन : पतीच्या निधनानंतरही शेतकरी महिलेला सन्मानाने जगता यावे याकरिता लक्ष्मीमुक्ती कार्यक्रमाची शरद जोशी प्रणित शेतकरी संघटनेची चळवळ उभारली. नाशिक जिल्ह्यातील चांदवड येथे १९८६ मध्ये जाहीर सभा झाली. त्यामध्ये पत्नीच्या नावावर शेतकऱ्यानी जमिनी करून द्यायच्या असा ठराव पारित करण्यात आला. पुढे सुमारे दोन लाख शेतकऱ्यांनी त्याच्या जमिनी पत्नीच्या नावे केल्या.

सीता शेती : रासायनिक खतांचा बिल्कुल वापर न करता शेतातल्या शेतात तयार होणाऱ्या जैविक पदार्थाचाच वापर करून शेती करणे म्हणजे सीता शेती.

## ४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वयं अध्ययन प्रश्न १**

१. क) शांताबाई दाणी   २. अ) तक्षशिला   ३. ब) विधान परिषदेवर

४. ड) शांताबाई दाणी   ५. ब) शांताबाई दाणी

**स्वयं अध्ययन प्रश्न २**

१. ब) अकोला   २. ड) म. गांधी, ताराबाई मोडक

३. अ) बाळ गंगाधर खेर   ४. ब) वारली   ५. अ) कातकरी

**स्वयं अध्ययन प्रश्न ३**

१. ब) पोर्तुगीज   २. ड) लग्न गडी   ३. अ) वैयक्तिक सत्याग्रह

४. क) किसान सभा   ५. ब) जेंव्हा माणूस जागा होतो

**स्वयं अध्ययन प्रश्न ४**

१. ड) अमेरिका   २. अ) भारत   ३. क) सिकिंग बेगमपुरा

४. ब) शेतकऱ्यांचा आसुड   ५.अ) श्रमिक मुक्ती

**स्वयं अध्ययन प्रश्न ५ उत्तरे :**

अ) योग्य जोड्या जुळवा -

१. ब   २. क

ब) योग्य विधान निवडा

१. क   २. अ   ३. क   ४. ब

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय :

अ) टीपा लिहा

१. शांताबाई दाणी
२. अनुताई वाघ
३. गोदावरी परुळेकर
४. गेल ऑम्व्हेट

ब) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा

१. शांताबाई दाणी यांच्या कार्याचा सविस्तर आढावा घ्या.
२. अनुताई वाघ यांच्या शैक्षणिक कार्याची सविस्तर माहिती द्या.
३. गोदावरी परुळेकर यांनी आदिवासी हक्कांसाठी दिलेल्या लढ्याचा सविस्तर आढावा घ्या.
४. डॉ.गेल ऑम्व्हेट यांच्या कार्याची माहिती द्या.

## ४.७ अधिक अध्ययनासाठी संदर्भ :


१. पवार उर्मिला, मून मीनाक्षी, आम्हीही इतिहास घडवला, विद्या प्रकाशन, पुणे, १० ऑक्टोबर १९८९

२. दाणी शांताबाई, भार्गवे भावना (शब्दांकन), रात्रंदिन आम्हा..., भावसरिता प्रकाशन, प्रथम आवृत्ती ३ ऑक्टोबर १९९०

३. कोसबाडच्या अनुताई वाघ, प्रा. मंगला गोखले, प्रकाशक ग्राम बाल शिक्षा केंद्र, कोसबाड ता. डहाणू, जि. ठाणे, विकास मुद्रणालय, कोसबाड, २७ सप्टेंबर २०१३

४. वाघ अनुताई, कोसबाडच्या टेकडीवरून, ऋचा प्रकाशन ठाणे,१९८०

५. वाघ अनुताई, ग्राम बाल शिक्षा केंद्र स्मरणिका, कोसबाड: ग्राम बाल शिक्षा केंद्र,१९९०

६. अमृते विद्याधर, शिक्षण पत्रिका, पद्मश्री अनुताई वाघ जन्म शताब्दी विशेषांक, कोसबाड, ग्राम बाल शिक्षा केंद्र,२०११

७. सरदेसाई मनोहर हिरबा, गोवा दमण दीव स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास खंड २, संचालक क्रीडा, गोवा, दमण व दीव सरकार, पणजी-गोवा, १९८६

८. परुळेकर गोदावरी, जेंव्हा माणूस जागा होतो, मौज प्रकाशन गृह, ३ ऑगस्ट १९७०

९. कांबळे संजयकुमार (संपा.), डॉ.गेल ऑम्व्हेट, समाजशास्त्रीय आकलन, डायमंड पब्लिकेशन्स,२०२२

१०. कांबळे संजयकुमार (संपा.), डॉ.गेल ऑम्व्हेट, समजून घेताना, डायमंड पब्लिकेशन्स, २०२२

११. ऑम्व्हेट गेल, ह्यो तुरुंग फोडायचा हाय गं, (अनुवाद -मुजुमदार प्रमोद) मधुश्री पब्लिकेशन, २०२२

१२. दैनिक लोकसत्ता, गेल गेल्यानंतर.., लेख, २६ ऑगस्ट २०२१


❑❑❑